# महाराजा सयाजीराव गायकवाड
# चरित्रसंग्रह

## महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड यांचे चरित्र

भाग ३

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
सौ. मंदा हिंगुराव





महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रसंग्रह भाग-३

हिंदुस्थानचे शिरोभूषण

# महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड यांचे चरित्र

सखाराम गणेश मुजुमदार



संपादक

**यमाजी मालकर**

सहसंपादिका

**सौ. मंदा हिंगुराव**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

➢ **पुस्तकाचे नाव** : महाराणी जमनाबाईसाहेब गायकवाड यांचे चरित्र भाग-३

➢ **संपादक** : श्री. यमाजी मालकर

➢ **सहसंपादक** : सौ. मंदा हिंगुराव

➢ **आयएसबीएन** : ९७८-९३-९३५९९-०९-४

➢ **प्रथमावृत्ती** : २०२२

➢ **प्रकाशक** :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

➢ **© प्रकाशकाधीन** :

➢ **मुद्रक** :

व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी. पी. ओ. नजीक, पुणे - ४११ ००१.

➢ **किंमत** : रु. १०६/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षांचे निवेदन

## महाराजा सयाजीराव चरित्र अनमोल सांस्कृतिक वारसा

स्वातंत्र्यपूर्व काळात जनकल्याणाचा ध्यास घेत एक आदर्श सुप्रशासनाचे उदाहरण दाखवून देणारे महाराजा सयाजीराव गायकवाड हे आधुनिक भारताचे एक शिल्पकार आहेत. त्यांनी ज्ञानाची महती ओळखून तोच प्रगती अन् परिवर्तनाचा एकमेव मार्ग आहे हे ओळखले. त्यासाठी शिक्षणाची कास धरून रयतेला सक्तीचे मोफत शिक्षण दिले. देशाची नवनिर्मिती शिक्षण, नवतंत्रज्ञानातून होत असली तरी त्याला ज्ञानात्म प्रबोधनाची जोड दिली. एवढेच नाही तर वैचारिक, सामाजिक, राजकीय, शेती-उद्योगाच्या बांधणीत कल्याणाचा ध्यास घेतलेले ते एक प्रज्ञावंत दूरद्रष्टा राजा होते.

देशभरातील बहुतांश युगपुरुषांना त्यांनी जबाबदारीने मदत केली. त्यातील प्रमुखात पितामह दादाभाई नौरोजी, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, पंडित मदन मोहन मालवीय, लाला लजपतराय, श्यामजी कृष्ण वर्मा, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर वि.रा. शिंदे, न्यायमूर्ती महादेव गो. रानडे या काही आणि अनेकांना महाराजांनी मदत केली. एवढेच नाही तर या सर्व स्वातंत्र्यवीरांचे ते एकमेव राजा आहेत की, ज्यांनी आयुष्यभर क्रांतिकारकांचे पाठीराखे होऊन बलाढ्य सत्तेशी संघर्ष केला. सुप्रशासनाचे अनेक प्रयोग राबविले. कोणत्याही राष्ट्राची संपत्ती जशी शेती-उद्योग-धंद्यात असते, तेवढीच ती तेथील साहित्य, कला, संगीत, शिल्पकला या सांस्कृतिक वारशातही असते, हे ओळखून ते या सर्वांचे पोशिंदे झाले.

सयाजीराव महाराजांच्या दत्तक मातुःश्री जमनाबाई गायकवाड होत्या. त्यांनी दूरदृष्टीने सयाजीराव महाराजांची बडोद्याच्या राजगादीवर निवड केली. हुशार, चणाक्ष आणि बुद्धिमान असणाऱ्या महाराणींचे चरित्र सयाजीराव महाराजांनी बक्षीस ठेवून लिहून घेतले. अशा अनेक चरित्रांमधून सखाराम गणेश मुजुमदार यांनी लिहिलेल्या या चरित्राची निवड त्या काळी करण्यात

आली. इ.स. १९०५ मध्ये प्रसिद्ध झालेले हे चरित्र काळाच्या ओघात मिळणे दुरापस्त झाले होते. परंतु बडोद्याच्या मंदा हिंगुराव यांनी या चरित्राच्या प्रती शोधून त्याचे सहसंपादन केले. प्रकल्प प्रमुख यमाजी मालकर यांनी या ग्रंथाचे संपादन केले. महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रसंग्रह : ३ 'महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड यांचे चरित्रा'चे प्रकाशन करताना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास आनंद होत आहे.

अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई



महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड

# संपादक व सहसंपादिका अल्पपरिचय

यमाजी बाळाजी मालकर

दैनिक सकाळ, पुणे आणि औरंगाबादचे माजी संपादक. दैनिक दिव्य मराठीचे माजी सल्लागार संपादक. अर्थक्रांती प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि अर्थपूर्ण मासिकाचे संपादक.

'ड्रीम्स फ्रॉम माय फादर' या, अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा यांच्या इंग्रजी आत्मचरित्राचा मराठी अनुवाद प्रसिद्ध, 'डेडलाईन,' 'आहे, उत्तर आहे', 'मराठवाड्याच्या यशकथा' ही पुस्तके प्रसिद्ध. 'झपाटलेपण ते जाणतेपण' या पुस्तकाचे सहलेखक. 'सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र' (२०१०) या कॉफी टेबल बुकचे संपादक. अर्थक्रांती चळवळीत सक्रिय. जागर ब्लॉगवर लेखन.

सौ. मंदा हिंगुराव

बडोदा येथील महाराजा फत्तेसिंहराव म्युझियमच्या संचालिका. तसेच महाराष्ट्र शासनाच्या महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समितीच्या संशोधक अभ्यासक सदस्य. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शिक्षणविषयक कार्याचा त्यांचा विशेष अभ्यास आहे. या विषयावर इंग्रजी-मराठीत लेखन प्रकाशित. 'महाराजा सयाजीराव आणि स्त्रीशिक्षण' हा महत्त्वाचा ग्रंथ मराठी व इंग्रजीत प्रकाशित. या ग्रंथात महाराजांनी स्त्रीशिक्षणासाठी मूलभूत डोळस कृती कशी आरंभली याची अभ्यासपूर्ण मांडणी या ग्रंथात केली आहे. महाराजा सयाजीराव या इंग्रजी चरित्रग्रंथाचे संपादन. महाराजा सयाजीराव ट्रस्टच्या प्रमुख म्हणूनही बडोद्यात त्या कार्य करत आहेत.

# संपादकांचे निवेदन

## एका आदर्श राजवटीची पायाभरणी करणारी महाराणी

स्वतंत्र आणि स्वातंत्र्यपूर्व भारताच्या इतिहासात डोकावताना बडोदा संस्थानाच्या महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कारकिर्दीचे महत्त्व कोणीच नाकारू शकत नाही. महाराजांनी आपल्या कारकिर्दीला जनकल्याणाचे इतके असंख्य पैलू जोडले आहेत, की स्वतंत्र भारताच्या वाटचालीत त्यांचे कायम स्मरण ठेवावे लागणार आहे. भारतातील इतर संस्थानातील जनता मेटाकुटीला आली असताना असा जगावेगळा आदर्श राजा कसा घडला, त्याला कोणी घडविले याचा शोध घेताना लक्षात येते, की महाराष्ट्रातील एका खेड्यातील मुलाला त्याचे गुण पारखून दत्तक घेणाऱ्या महाराणी जमनाबाई गायकवाड यांनी - एका दगडातून मूर्ती कोरावी - असा हा राजा घडविला आहे. अशा या महाराणी जमनाबाईचे जीवन तेवढेच अद्भुत आहे. राजाचा वारस हा मुलगाच पाहिजे, या पद्धतीमुळे भारतातील अनेक संस्थानांत किती उलथापालथ झाली, हा इतिहास सर्वज्ञात आहे. बडोदा संस्थानातही त्याच पद्धतीमुळे त्यावेळी जे घडले ते जाणून घेण्यासाठी महाराणी जमनाबाई यांचे हे चरित्र महत्त्वाचे ठरते. भारतातील राजेरजवाड्यांच्या इतिहासात राजा म्हणजेच पुरुष राजांचाच इतिहास समोर येतो. अशा राजांना संस्कारक्षम वयात घडविणे, त्यांना खंबीरपणे पाठिंबा देणे आणि वेळप्रसंगी राज्यकारभाराची धुरा सांभाळणे, अशा जबाबदाऱ्या राजवाड्यातील अनेक कर्तबगार स्त्रियांनी पार पाडल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रात जिजाबाईंच्या कर्तबगारीचा उलेख येतोच किंवा झाशीच्या राणीने केलेल्या पराक्रमाची चर्चा होते; पण अशी मोजकी उदाहरणे सोडली तर राजवाड्यातील अनेक कर्तबगार स्त्रियांचे कर्तृत्व इतिहासाच्या पानांचा भाग होऊ शकलेले नाही. सुदैवाने महाराणी जमनाबाई यांच्या या चरित्रामळे त्यांच्यावरील हा अन्याय दूर झाला आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर महाराणी जमनाबाई यांचे हे चरित्र अतिशय महत्त्वाचे ठरते. त्याचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांनी सयाजीरावांची राजा म्हणून निवड केल्यापासून त्यांच्यावर केलेले

संस्कार. शालेय शिक्षण न घेतलेल्या, राजघराण्याचा दूरचा संबंध असलेल्या शेतकरी कुटुंबातील मुलाला ज्या परिस्थितीत महाराणींनी राजपदावर बसविले आणि एक आदर्श राजा घडविला, हा सर्व प्रवास अद्भुत असाच आहे. तो काळ ब्रिटिशांची सत्ता भारतात स्थिरावण्याचा होता. १८५७च्या उठावानंतर बहुतेक राजांनी ब्रिटिशांचे मांडलिकत्व मान्य केले होते. दोन राजांमधील लढायांचा काळ संपला होता. ब्रिटिशांचा एकछत्री अंमल प्रस्थापित झाला होता. त्यामुळे संस्थाने आपली सत्ता अबाधित कशी राहील, याची चिंता करत होती. राजा कोण हे वारसा हक्काने ठरत होते. त्यामुळे लढाईतील पराक्रमाऐवजी त्या राजाचे ब्रिटिशांशी संबंध कसे आहेत, राजाच्या घराण्यात किती तंटेबखेडे आहेत आणि प्रजेच्या प्रती राजा किती संवेदनशील, धोरणी आहे, यावर तो राजा कसा आहे हे ठरत होते. या दृष्टीने आपण बडोदा संस्थानाकडे पाहिल्यास महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या रूपाने एक यशस्वी आणि आदर्श अशी राजवट दिसते; पण सयाजीराव गादीवर बसण्यापूर्वी बडोदा संस्थानात ज्या प्रचंड उलाढाली होऊन गेल्या, त्या जाणून घेतल्यास महाराणी जमनाबाई यांच्या कर्तबगारीचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते.

महाराणी जमनाबाई या महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील रहिमतपूरच्या. रहिमतपूरचे जहागीरदार माने यांच्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला (१८५३). महाराजा खंडेराव यांच्याशी त्यांचा विवाह झाल्यामुळे वयाच्या सतराव्या वर्षी त्या महाराणी झाल्या. त्यावेळी खंडेराव आणि त्यांचे बंधू मल्हारराव यांच्यात राजपदासाठी टोकाचा संघर्ष सुरू होता. मल्हारराव कैदेत होते. मल्हारराव यांचे वर्तन राजपदाला साजेसे नव्हते. खंडेराव यांना दोन राण्यांपासून पुत्रसंतती नसल्याने तिसरी राणी म्हणून त्या बडोद्यात आल्या; पण इ.स.१८७० मध्ये अचानक खंडेराव महाराजांचा मृत्यू झाला. म्हणजे केवळ चार वर्षांचा संसार झाला. महाराणी जमनाबाई तर विधवा झाल्याच; पण बडोदा संस्थान संकटात सापडले. त्यावेळी जमनाबाई गरोदर होत्या. राजपदावर केवळ पुरुषच विराजमान होऊ शकतो, या पद्धतीमुळे कैदेतील मल्हारराव बडोद्याचे राजे झाले आणि राजघराण्यात एक सूडकथा सुरू झाली. राजा म्हणून आपले स्थान संकटात सापडू नये म्हणून जमनाबाई प्रसूत होईपर्यंत मल्हारराव यांनी केलेली कटकारस्थाने किती टोकाची होती, याचे वर्णन या चरित्रात आले आहे. वेळोवेळी झालेले विषबाधेचे प्रयत्न, तसेच जिवे मारण्याची कारस्थाने, यातून जमनाबाई मोठ्या शिताफीने वाचल्या. वारस नसताना मृत्युमुखी पडलेल्या राजाचे राज्य खालसा करण्यासाठी ब्रिटिश टपूनच बसले होते. त्यात जमनाबाईंना मुलगी झाली. अशा सर्व संकटांवर महाराणी जमनाबाई यांनी कशी मात केली आणि सयाजीराव यांना कसे गादीवर बसविले, एक स्त्री म्हणून आपले निर्णय त्यांनी कसे धोरणीपणाने घेतले, हा बडोदा संस्थानाचा इतिहास म्हणजेच हे चरित्र होय.

महाराजा सयाजीराव यांना इतिहासलेखन आणि साहित्यात रस होता. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत लिहून घेतलेले शेकडो ग्रंथ आणि त्यांनी ग्रंथालय चळवळीला दिलेली चालना

सर्वश्रुत आहे. त्याचाच एक भाग म्हणजे महाराणी जमनाबाई यांचे हे चरित्र. महाराजा खंडेराव यांच्या निधनानंतर महाराणी जमनाबाई यांना, हे राज्य सांभाळण्यासाठी किती त्रासातून जावे लागले, याची जाणीव सयाजीरावांना होतीच. त्यामुळे महाराणींचे चरित्र जनतेसमोर यावे, असे महाराजांना वाटणे साहजिकच आहे. महाराजांनी त्यासाठी लेखनाची स्पर्धा घेतली आणि सखाराम गणेश मुजुमदार यांनी लिहिलेले चरित्र (१९०५) त्यात निवडले गेले. मुजुमदार हे राजघरातच सेवा करत असल्याने त्यावेळच्या घडामोडींचे अनेक बारकावे त्यांना माहीत होते, तसेच यासाठीची कागदपत्रे मिळण्यास त्यांना सोपे गेले. महाराणी जमनाबाई यांनी ज्या धीराने विपरीत परिस्थितीचा मुकाबला केला आणि बडोदा संस्थानावर आलेले संकट परतवून लावले, त्यासंबंधीचे बारकावे जगाला त्यामुळेच कळू शकले. बडोद्याचे राजवैभव महाराजा सयाजीराव यांच्या रूपाने परत मिळविण्यापर्यंतच्या या प्रवासात महाराणी जमनाबाई यांची बुद्धिमत्ता, प्रसंगावधान, शहाणपण आणि चिकाटी कामी आली. राजघराण्यात सेवा करणाऱ्याने लिहिलेले चरित्र म्हणून या लेखनास आलेल्या मर्यादा मान्य करूनही महाराणी जमनाबाई यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारा तसेच त्यावेळचा संस्थानिकांचा इतिहास या रूपाने सर्वांसमोर आला, हे महत्त्वाचे आहे.

सखाराम मुजुमदार यांच्या लेखनात जे बारकावे आले आहेत, त्यामुळे त्यावेळच्या संस्थानांचे प्रशासन, राजघराण्यातील नातेसंबंध, इंग्रज अधिकाऱ्यांचे वर्तन, राजघराण्यातील सत्तासंघर्ष आणि सामाजिक स्थितीवर प्रकाश पडतो. उदा. महाराज खंडेराव हे मुस्लिम धर्माच्या जनतेचे मन सांभाळण्यासाठी अनेक गोष्टी करत असत, ज्यामुळे हिंदू समाजात अस्वस्थता निर्माण होत असे; पण महाराणी जमनाबाईंनी हिंदू धर्मासाठीही दानधर्म सुरू केल्याने राज्यात समतोल राखला गेला. खंडेराव प्रचंड खर्चिक होते; पण त्यांनी बडोदा संस्थानाची तिजोरी मौल्यवान वस्तूंनी भरून ठेवली होती, याचे अनेक उलेख या चरित्रात आहेत. जमनाबाई बडोद्यात एकट्या पडल्या तेव्हा त्यांच्या माहेरच्या मंडळींची त्यांना चांगली साथ मिळाली. जमनाबाई राहत होत्या, त्या बंगल्याला आग लावून त्यांना ठार मारण्याचा कट मल्हाररावांनी केला तेव्हा महाराणीला असलेल्या कडेकोट पहाऱ्याचे वर्णन आहे, तर जमनाबाई खरोखरच गरोदर आहे काय, याविषयी मल्हारराव यांनी शंका व्यक्त केल्यावर त्याची शहानिशा करण्याचा प्रयत्न झाला. यावरून बडोद्यातील सत्तासंघर्ष किती टोकाला गेला होता, जमनाबाई यांच्यावर किती कठीण प्रसंग गुदरले होते आणि त्यांनी त्या प्रसंगांवर किती धीराने मात केली, हे लक्षात येते. मल्हारराव महाराजांचे वर्तन हे अतिशय अनुचित होते, त्यामुळे त्यांच्याविरुद्ध ब्रिटिश सरकारकडे अनेक तक्रारी केल्या गेल्या; पण कर्नल बार नावाच्या अधिकाऱ्याला त्यांनी फितूर करून ठेवले होते, असा एक उलेख आहे. याचा अर्थ ब्रिटिश अधिकाऱ्यांत अशा परिस्थितीचा गैरफायदा घेणारे अधिकारी होते, हे लक्षात येते. वारस नसताना मृत्युमुखी पडलेल्या राजांची राज्ये खालसा

केली जात होती; पण बडोदा संस्थानाने पूर्वी इंग्रजांना मदत केलेली असल्याने व त्याबदल्यात दत्तक घेण्याचा हक्क मिळाल्याने त्याचा फायदा महाराणी जमनाबाई यांना मिळाला, यावरून ब्रिटिश प्रशासन आणि संस्थानिकांच्या संबंधांवर प्रकाश पडतो. अर्थात, त्यासाठी जमनाबाईंना कायद्याची मोठी लढाई लढावी लागली.

महाराणी जमनाबाई यांना आपल्या ४४ वर्षांच्या जीवनात कोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागले, हे जाणून घेतल्यावर त्यांनी सयाजीराव महाराजांवर केलेले संस्कार आणि त्यावर आदर्श अशा बडोदा संस्थानाची झालेली उभारणी, याचे महत्त्व अधोरेखित होते. खंडेराव महाराजांसोबतचा केवळ चार वर्षांचा संसार, त्यानंतर मल्हारराव यांनी दिलेला त्रास, त्यांच्यावर पुण्यास जाऊन राहण्याची आलेली वेळ, दत्तक विधानाविषयीची कायद्याची लढाई, राजवाडा सोडावा लागल्याने आलेल्या आर्थिक अडचणी, पुन्हा बडोद्यात आगमन आणि राज्यकारभार सांभाळण्याची जबाबदारी, दत्तक पुत्राला राज्यकारभाराचे शिक्षण देऊन एका चांगल्या राज्याचे स्वप्न पाहणे, दरम्यान सख्खी मुलगी आणि अनेक जवळच्या नातेवाईकांच्या निधनाचे दुःख, अनेक ब्रिटिश अधिकारी आणि इतर संस्थानिकांशी सल्लामसलत आणि अखेर राज्यकारभार दत्तक मुलाकडे सोपवून तीर्थयात्रा, असा महाराणी जमानाबाई यांचा अद्भुत जीवनप्रवास झाला. हा प्रवास सखाराम मुजुमदार यांनी मुद्देसूद आणि ओघवत्या भाषेत रेखाटला आहे.

महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र संग्रहाचे प्रकाशन करण्याचा संकल्प महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने केला. या प्रकल्पामुळे भारताच्या इतिहासातील या प्रमुख राजवटीच्या उभारणीवर प्रकाश पडला. सर्व चरित्र ग्रंथ त्यामुळे नव्या स्वरूपात इतिहासाच्या वाचकांना सहजपणे मिळू लागले आहेत. त्या मालिकेतील हिंदुस्थानचे शिरोभूषण 'महाराणी जमनाबाईसाहेब गायकवाड यांचे चरित्र' (लेखक - सखाराम मुजुमदार) हे प्रसिद्ध होते आहे. महाराजा सयाजीराव यांच्या राजवटीचे वेगळेपण लक्षात घेऊन मंडळाचे माजी अध्यक्ष आणि लेखक बाबा भांड, या पुस्तकाच्या सहसंपादक मंदा हिंगुराव, महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या चरित्रांचे सहसंपादक डॉ. राजेंद्र मगर या सर्वांचा ऋणनिर्देश करून हा ग्रंथ वाचकांच्या हाती देत आहोत.

- यमाजी मालकर

# सहसंपादिकेचे मनोगत

# महाराणी जमनाबाई

'महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र संग्रह' या साहित्य संस्कृती मंडळाच्या प्रकल्पांतर्गत 'हिंदुस्थानचे शिरोभूषण महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड यांचे चरित्र' पुनर्प्रकाशित होत आहे. यापूर्वी भाग-१ मध्ये सयाजीराव महाराजांची पाच चरित्रे तर भाग-२ मध्ये 'बडोद्याचे राज्यकर्ते' या ग्रंथाचे प्रकाशन झाले आहे. त्याच मालेत महाराणी जमनाबाई यांचे चरित्र प्रकाशित होत आहे ही अत्यंत आनंदाची बाब आहे.

महाराणी जमनाबाई यांचे हे चरित्र सयाजीराव महाराजांनी स्पर्धा घेऊन लिहून घेतले होते. त्या स्पर्धेत निवडलेले सखाराम गणेश मुजूमदार यांनी लिहिलेल्या या चरित्राची निवड झाली. मुजूमदार यांनी प्रयत्नपूर्वक सर्व साधनसामग्री जमवत या चरित्राची अगदी ओघवत्या भाषेत रचना केली आहे. या चरित्रातील सत्यपणा आणि सर्वसमावेशकता यामुळे हे सर्वांच्या पसंतीला उतरले. यामुळे या चरित्राला महत्त्व आहे. सखाराम मुजूमदार हे बडोद्यात नोकरीला होते. त्यामुळे त्यांना याविषयी संपूर्ण माहिती मिळवणे सोपे गेले; परंतु पुढील कामगिरी पार पाडताना त्यांना नक्कीच कसरत करावी लागली असेल. कारण चरित्रनायिका या राघराण्यातील आदरणीय व्यक्ती असून त्यांच्याविषयी सर्व घटना-प्रसंग लिहिताना त्यांना काळजी घ्यावी लागली असेल. आज या बाबींचे गांभीर्य वाटत नसले तरी त्या काळी याबाबत विशेष काळजी घेतल्याचे चरित्रातून दिसते.

चरित्राविषयी अधिक माहिती पाहण्यापूर्वी बडोद्यात गायकवाड घराणे कसे-कसे उदयास आले हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

हिंदुस्थानातील मध्य प्रांतातील बडोदा संस्थानात इ.स. १७३९ च्या समारास दामाजीराव गायकवाडांच्या (द्वितीय) मुलुखगिरीच्या बहुतेक मोहिमांमध्ये त्यांचे बंधू प्रतापराव आणि खंडेराव गायकवाड यांची त्यांना भरीव मदत होती. दामाजीरावांनी नाशिकच्या बाजूला असलेले

त्यांचे एक सेहेचाळीस गावांचे ठाणे प्रतापराव यांच्याकडे सोपवले. दामाजीरावांच्या मृत्यूनंतर हे ठाणे पेशव्यांकडे पुन्हा सुपूर्द करण्यात आले. पेशव्यांनी नाशिक परगण्यातील गायकवाडांना म्हणजे प्रतापरावांना वतनवाडी देऊ केली; त्यानंतर मात्र त्यांचे कुटुंब विस्मरणात गेले. पुढे या कुटुंबाने कवळाणे येथे जमीनजुमला घेतला. गावाच्या पाटीलकीचे वतन विकत घेतले.

गुजरातमधील गायकवाड संस्थानाचे संस्थापक पिलाजीराव यांना सयाजीराव, दामाजीराव आणि प्रतापराव अशी तीन मुले होती. सयाजीराव (पहिले) १७३२च्या युद्धामध्ये मुगल सरदार अभयसिंहच्या हस्ते मारले गेले. प्रतापरावांना गंभीर जखमा झाल्या. पुढे पिलाजीरावांची ही दोन मुले - दामाजीराव आणि प्रतापराव - १७६३च्या पानिपत युद्धापर्यंत एकत्र राहिली. पुढे पानिपतमधील पेशव्यांच्या पराभवानंतर दोघेही भाऊ वेगळे झाले. दामाजीराव गुजरातमध्ये राहून त्यांनी आपले राज्य वाढवले; तर प्रतापराव खानदेशात जाऊन कवळाणे गावात स्थायिक झाले. तेथेच प्रतापरावांची मुले मोठी झाली. पुढे कालांतराने कवळाणा गावामध्ये गायकवाडांची घरे वाढत गेली. या प्रतापरावांच्या वंशात गबाजीराव, बाबूराव, काशीराव, उखाजीराव आणि सखारामराव अशी पाच भावंडे होती.

गुजरातमधील बडोदा राज्यात दामाजीराव (द्वितीय) यांच्यानंतर त्यांच्या मुलांनी व नातवांनी राज्य केले. इ.स. १८५६ मधील बंडानंतर ईस्ट इंडिया कंपनीचा राज्यकारभार संपल्यामुळे, राज्यकारभाराची सर्व सूत्रे व्हिक्टोरिया राणीच्या हाती गेली. या बंडाचा उपद्रव बडोदे संस्थानाला होण्याचा संभव वाटत होता. बडोद्याची स्थिती एखाद्या जागृत ज्वालामुखीसारखी होऊ लागलेली होती; पण त्यावेळी तेथील राज्य खंडेराव महाराजांच्या हाती होते. खंडेरावांनी अत्यंत सावधगिरीने व दक्षतेने बंडाच्या ज्वाला आपल्या राज्यात पसरू दिल्या नाहीत. राज्यात कोणत्याही प्रकारे दंगेधोपे होऊ न देता शांतता निर्माण केली. तसेच इंग्रज सरकारला द्रव्याची व फौजेची मदत देखील केली. खंडेरावांनी केलेल्या उपकारांची जाणीव ठेवून इंग्रज सरकारने गायकवाडांची तीन लक्ष रुपयांची वार्षिक खंडणी माफ केली. याशिवाय दत्तक घेण्याचा अधिकार, तैनाती फौज घेण्याचा अधिकार, मार्शलचा मान, जी.सी.एस.आय. (ग्रँड कमांडर ऑफ दि ऑडर ऑफ दि स्टार ऑफ इंडिया) हा किताब, दिवाण नियुक्तीचा अधिकार आणि एकवीस तोफांची सलामी इ. अनेक बाबी बहाल करण्यात आल्या.

खंडेराव महाराज आपल्या प्रजेमध्ये यांच्या धीट वृत्ती, भव्य व्यक्तिमत्त्वामुळे लोकप्रिय होते. त्यांची घोडदौड, शिकारीचा, पहेलवानगिरीचा, आयुष्यातल्या उत्सवाचा, निर्भीडपणाचा, खर्चिक जीवनशैलीचा, उदारपणाचा लोकांना अभिमान वाटायचा. त्यांच्यात अतिरिक्त धार्मिक वृत्ती होती; परंतु हिंदू-मुसलमान यात जास्त भेद करत नव्हते. या सर्वच बाबींचे प्रजेला कौतुक वाटायचे. खंडेराव महाराजांनी चैन आणि मजा करण्यावर मनसोक्त खर्च केला; पण तरीही ते पारखी असल्याने बडोदा राज्यात पिढ्यानपिढ्या गौरव करतील असा अमूल्य दागिन्यांचा

ठेवा त्यांनी जमा करून ठेवला. त्यांना मौल्यवान वस्तू, हिरे-मोती ओळखण्याचे ज्ञान होते. जमा करण्याची आवड होती. ते एक चतुर ग्राहक होते. त्यांच्या या आवडीमुळे बडोद्याचा जामदारखाना हा जगात एक अनमोल खजाना झाला. जगभरातून येणारे मान्यवर त्याला भेट देत. त्यांनी जगातल्या नामवंत सूचीबद्ध हिऱ्यात नाव असलेला 'स्टार ऑफ दी साऊथ' हा १२५ कॅरेटचा हिरा, जो एकेकाळी फ्रान्सच्या राजमुकुटाचा एक भाग होता; तो खंडेराव महाराजांनी १८६७ मध्ये विकत घेतला.

हा हिरा कोहिनूर हिऱ्यापेक्षा मोठा आहे. तसेच सात पदरी मोत्यांची माळ जिला जगात दुसरीकडे तुलना नाही. हिरे, मोती व इतर अनेक मौल्यवान नगांनी मढवलेला गालिचा बनवला. खंडेराव महाराजांनी त्यांच्या आवडीनुसार बडोद्यातील खानगीत खूप दाग-दागिने जमा केले. तसेच स्वतःसाठीही अनेक दागिने बनवून घेतले.

खंडेराव महाराजांच्या चौदा वर्षांच्या कारकिर्दीत जितके ब्रिटिश अधिकारी त्यांच्यावर खुश होते; तितकेच बडोद्याची रयतही खुश होती. ते प्रजेत लोकप्रिय झाले होते. खंडेराव महाराजांच्या एकंदर कारकिर्दीत त्यांनी शासक म्हणून योग्य ती कामगिरीही बजावली. दिवाणी आणि फौजदारी खात्याच्या शाखा वेगळया करणे, वरिष्ठ न्यायालयाची स्थापना करणे, द्वारका व धारी येथे पलटणीसाठी इंग्रजी पद्धतीचे दवाखाने उघडणे इ. अनेक गोष्टी त्यांनी आपल्या राज्यात सुरू केल्या. इ.स. १८६३-६४ च्या गुजरातमधील भयंकर दुष्काळाच्या काळात त्यांच्या दातृत्वाने प्रजेला वेगवेगळया प्रकारे मदतीचा हात देऊन मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढले. त्यांचा मृत्यू गायकवाड राजवटीसाठी अनेक नाट्यपूर्ण, वादळी व संघर्षमय घटनांची नांदी ठरला. त्यांचा स्वभाव थोडासा विक्षिप्त असला, तरी ते प्रेमळ व मोठ्या मनाचे होते. त्यांचा भाऊ मल्हारराव व त्यांचे कधीच पटले नाही. दोघे भाऊ कायम एकमेकांच्या विरुद्ध राहिले. कदाचित म्हणूनच १८५७ च्या बंडात खंडेराव महाराजांनी कंपनी सरकारला मदत केली, तर मल्हारराव विरुद्ध पक्षात गेले.

मल्हाररावांनी अहमदाबादेत ब्रिटिश इलाख्यात लूटपाट करून आपल्या भावाला सत्तेवरून काढून राजगादी बळकावण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पुढे १८६३ मध्ये तर मल्हाररावांनी ब्रिटिश सार्जंटला पैसे देऊन खंडेराव महाराजांना मारून टाकण्याचा कट रचला; पण सुदैवाने हा कट उघडकीस आला व खंडेराव महाराजांनी मल्हारराव यांना बडोद्यापासून १०किलोमीटर अंतरावर असलेल्या पादरा जिल्ह्यात कैद करून ठेवले. त्यांच्या पत्नीची त्यांच्याबरोबर राहण्याची विनंती अमान्य करण्यात आली.

मल्हारराव महाराज कैदेत असताना त्यांना फक्त पैसे हातात मिळत नव्हते; बाकी त्यांच्या सर्व प्रकारच्या खाण्या-पिण्याच्या, कपड्यांच्या गरजा त्यांच्या आवडीप्रमाणे, मर्जीप्रमाणे पूर्ण केल्या जायच्या. त्यांना एकांतवासात ठेवण्यात आले होते. त्यामुळे ते नेहमी स्वतःच्या व भावाच्या

परिस्थितीच्या तफावतीची तुलना करत. दुसरे, त्यांच्या मनातही एक आशा नक्कीच होती, की खंडेराव महाराजांनी दोन लग्ने करूनही त्यांना मुलगा झाला नाही म्हणजे खंडेराव महाराजांच्या मृत्यूनंतर गादीवर माझाच हक्क आहे. त्यामुळेच ते नेहमी खंडेराव महाराजांच्या जिवावर उठत.

काही कालखंडानंतर खंडेराव महाराजांनी दोनही पत्नींच्या मृत्यूनंतर १८६६ मध्ये रहिमतपरच्या माने घराण्यातील जमनाबाई यांच्याशी तिसरा विवाह केला. लग्नसमई महाराणी जमनाबाईंचे वय ११ वर्षांचे होते, तर खंडेराव महाराजांचे वय ३८ वर्षांचे होते. आपल्या पत्नीसाठी महाराजांनी भव्यदिव्य राजमहाल आपल्या आवडत्या हरणांच्या अभयारण्यात बांधायला घेतला. त्यामुळे खंडेराव महाराजांना जमनाबाई यांच्यापासून मुलगा होऊन बडोदा राजाला वारसदार होतो की काय असे मल्हाररावांना वाटू लागले. त्यामुळे त्यांचा सगळा राग, द्वेष, तिरस्कार महाराणी जमनाबाईंवर केंद्रित झाला.

तिसऱ्या महाराणीबरोबर चार वर्षे संसार केल्यानंतर दुर्दैवाने वयाच्या अवघ्या ४२ व्या वर्षी, २८ नोव्हेंबर १८७० ला अचानक खंडेराव महाराजांचा छोट्याशा आजारात मृत्यू झाला. त्या वेळचे रेसिडेंट कर्नल बार स्वतः जाऊन मल्हाररावांना बडोद्यात घेऊन आले. मल्हारराव राजा होण्याच्या वेळी रिजंट बनले. कारण महाराणी जमनाबाई गरोदर होत्या आणि जोपर्यंत त्या बाळंतीण होत नाहीत तोपर्यंत राजगादीचा खरा वारस कोण होणार हे माहीत नव्हते; पण मल्हाररावांची परिस्थिती आता कैदखान्यापेक्षा चांगली होती. ते आता बडोदा संस्थानाचे रिजंट होते. बडोदा संस्थानाचा अमाप खजिना, सैन्य, अधिकार, सत्ता, प्रतिष्ठा त्यांच्यासमोर हात जोडून उभे होते. त्यांना फक्त आज्ञा द्यायची होती. शत्रू एकच होता आणि तोही एक अबला, विधवा, दुःखी, खेडेगावांतून आलेली सतरा वर्षांची तरुण स्त्री महाराणी जमनाबाई. बडोद्यात येऊन त्यांना फक्त चारच वर्षे झाली होती. ती चार वर्षेपण बाहेरच्या जगापासून, लोकांपासून दूर राजवाड्याच्या चार भिंतीत संपली होती.

त्याच्याविरुद्ध महाराज मल्हारराव हे ४० वर्षांचे मध्यमवयीन, राजवाड्याच्या कपटकारस्थानांत पारंगत असलेले होते. त्यांना वाटत होते की, या बाईला मी सहजपणे पराभूत करून राजगादी हस्तगत करीन; परंतु महाराणी जमनाबाईंनी त्यांचा समज चुकीचा ठरवला. या तरुण स्त्रीने त्यांच्या कावा-कपटाला खंबीरपणे तोंड दिले. प्रसंगी धैर्य धरून, समयसूचकतेने वागल्यामुळे अंतिम विजय महाराणी जमनाबाईंचाच झाला.

परंतु त्याअगोदर गायकवाडांचे राज्य सयाजीराव द्वितीय यांचे चिरंजीव मल्हारराव यांच्या हाती आले आणि त्यांच्या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या शासनामुळे बडोदा राज्याची अवस्था अत्यंत शोचनीय झाली. भ्रष्टाचारामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेला अनेक ठिकाणी तडे गेले. स्त्रियांचे अपहरण, छळ, निरपराध लोकांचे खून या गोष्टी मल्हाररावांच्या कारकिर्दीत सर्वसामान्य झाल्या. इ.स. १८७५ मध्ये कर्नल रॉबर्ट फेअर या बडोद्यातील ब्रिटिश रेसिडेंटवर विषप्रयोग केल्याच्या आरोपावरून मल्हाररावांना अटक करण्यात आली. त्यासाठी चीफ काऊच

यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमण्यात आली. ब्रिटिश सरकारने त्यात रिचर्ड मीड, पी.एस. मेलव्हिल, ग्वाल्हेर आणि जयपूरचे महाराज, ग्वाल्हेरचे दिवाण सर दिनकरराव यांची नियुक्ती केली. या संमिश्र कोर्टाने द्विविधा निर्णय दिला. या संमिश्र कोर्टाच्या तीन ब्रिटिश सदस्यांनी त्यांना अपराधी ठरवले आणि तीन भारतीय सदस्यांनी त्यांना निरपराध घोषित केले. त्यांच्यावरचे सर्व आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत, तरी ब्रिटिश सरकाने मल्हाररावांना पदच्युत करून नवीन वारस नेमण्याचा निर्णय घेतला; त्याप्रमाणे १९ एप्रिल १८७५ रोजी मल्हाररावांच्या गैरवर्तणुकीमुळे आणि राज्यातील एकंदर ढिसाळ राज्यकारभारामुळे त्यांच्या पदच्युतीची घोषणा करण्यात आली. आपला मुलगा जयाजीराव याची वारस म्हणून नियुक्ती करण्यात यावी, ही त्यांची विनंतीही धुडकावून लावण्यात आली. तीन दिवसांनंतर त्यांना अंगरक्षकांबरोबर मद्रास येथे पाठविण्यात आले. अशा प्रकारे अंतिम विजय मात्र महाराणी जमनाबाई यांचा झाला.

मल्हारराव महाराजांना अटक झाल्यामुळे बडोद्याच्या गादीवर नवीन वारस येण्याचा मार्ग मोकळा झाला. जयाजीरावांना कायदेशीर मान्यता देण्यात आली नाही. सदाशिव, मुरारराव, गणपतराव व खंडेराव हे चार संभाव्य वारसदार त्यावेळी बडोद्यात होते व ते राजघराण्याच्या जवळच्या आप्तांपैकी होते. मात्र हे सगळेच वयाची चोविशी पार केलेले होते. मल्हाररावांचा वारसदार कुमारवयाचा असल्यास त्याला राज्यकर्ता म्हणून विभिन्न प्रकारचे प्रशिक्षण देणे सोयीचे ठरणारे होते. त्यामुळे राजगादीवरील हक्क नाकारण्यात आले.

मल्हारराव राज्य करत असताना जमनाबाई यांच्या जिवाला धोका आहे यावरून त्या पुण्यात गद्रे वाड्यात जाऊन राहिल्या होत्या. मल्हाररावांना मद्रासला रवाना करून दहा दिवस होत नाही तोच दुसऱ्या विशेष ट्रेनने त्या बडोद्याला आल्या. रेसिडेंट कर्नल मिड जातीने त्यांच्या स्वागतासाठी प्लॅटफॉर्मवर हजर होते. महाराणींना ब्रिटिशांकडून दहा तोफांचा, तर बडोद्याकडून एकवीस तोफांचा गन सॅल्यूट व गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला.

महाराणी जमनाबाई या खंडेराव महाराजांच्या विधवा पत्नी. पतीच्या मृत्यूनंतर त्यांना बडोद्यातून बाहेर काढण्यात आले; परंतु ही अत्यंत कठीण आणि बिकट परिस्थिती त्यांनी फार धैर्याने आणि विवेकाने हाताळली. साताऱ्याजवळचे रहिमतपूर हे त्यांचे माहेर (जन्म इ.स. १८५३). तिथे त्या धुळाक्षरे, बाराखडी वगैरे शिकल्या होत्या. खंडेराव गायकवाडांशी विवाह झाल्यावर त्या संस्कृत आणि मराठी लेखन-वाचनात पारंगत झाल्या. गणित, जमाखर्चाची माहिती. मोडी व बाळबोध वाचन आणि लेखन यातही त्यांनी प्रगती केली. राजपरिवारातील स्त्रियांसाठी असलेल्या घोडेस्वारी या विशेष कलेतही त्यांनी प्रावीण्य संपादन केले. गायन, कशिदा, भरतकाम यांसारख्या पारंपरिक कलांमध्ये रस घेत असतानाच सभोवतालच्या घडामोडींबद्दल त्या सजग होत्या. वेगवेगळ्या प्रकारच्या कामकाजानिमित्त येणारे कागद वाचून त्या स्वतः उत्तरे लिहीत अथवा कारकुनाकडून लिहून घेतल्यास त्यावर स्वत: सही करीत. छापील पोथ्या पस्तके व वृत्तपत्रांचे त्या अस्खलित वाचन करीत. त्यांना प्राकृत पोथ्याही सार्थ स्वरूपात कळत होत्या.

खंडेराव महाराजांच्या मृत्यूनंतर राज्याच्या उत्तराधिकाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला, त्याचवेळी महाराणी जमनाबाई गर्भवती असल्याचे लक्षात आले. त्यामुळे राज्याचा हक्क कायमस्वरूपी कोणाकडेही सुपूर्द करण्यात आला नाही. महाराणी जमनाबाईंचा प्रसूतीपर्यंतचा काळ अतिशय खडतर असा होता. त्यांच्या सभोवताली असणाऱ्या संशयास्पद आणि असुरक्षित वातावरणात त्या दिवस कंठित होत्या. अवहेलना, अपमान, एकटेपणा, भय अशा या मानसिक यातना आणि वेदना त्या सोसत होत्या. त्या गर्भवती आहेत किंवा नाही अशा संशयामुळे, एका इंग्रज डॉक्टरकडून त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. त्यांच्या या हृदयद्रावक परिस्थितीबद्दल सर टी. माधवराव लिहितात, 'थोडक्यात, त्या पराकाष्ठेच्या महान संकटात होत्या. कोणी विष खाऊ घालेल की काय? अशी प्रत्येक क्षणी त्यांना भीती वाटत होती. प्रत्येक क्षणी कुठल्याही प्रकारच्या विश्वासघाताने खून होण्याची भीती वाटत होती.'

खंडेराव महाराजांच्या मृत्यूनंतर मल्हारराव जरी गादीवर आले तरी महाराणी जमनाबाई जोपर्यंत प्रसूत होत नाहीत तोपर्यंत कायमस्वरूपी गादीचा हक्क कोणाकडे आहे हे ठरविण्यात आला नाही. त्यामुळे मल्हारराव आणि त्यांचे साथीदार महाराणींच्या जिवावर उठले होते. याबाबतीत रेसिडेंट कर्नल बार यांचीही मल्हारराव महाराजांना साथ मिळत होती. त्याबाबत मुजुमदार म्हणतात, 'निराश्रित होऊन अन्नवस्त्रांकरिता बडोदे राज्यांतून नेमणूक मागणाऱ्या महाराणी जमनाबाईंना वेळोवेळी जो त्रास, जो अपमान आणि जे दुःख सहन करावे लागले, त्यांचे कारण तरी तेव्हाचे रेसिडेंट कर्नल बार साहेब हेच होय. खंडेराव महाराज हयात असता, जे बार साहेब त्यांस पुत्राप्रमाणे मानीत होते, त्याच महाराजांच्या पश्चात ते इतके उलटले की, त्यांनी त्या महाराजांची अर्धांगिनी, त्यांचे नातलग, आश्रित आणि त्यांचे कृपेतील लोक यांना जो त्रास दिला; त्याचा विचार केल्यास, प्रथम दोस्ती दाखवून प्रसंगी उलटणारे लोक असे असतात त्याची कल्पना करता येईल.' थोडक्यात, महाराणीला साथ द्यायची नाही असे सर्व अधिकाऱ्यांनी सुद्धा ठरवले होते.

महाराजा मल्हाररावांना अनुकूल अशी एक गोष्ट घडली. ५ जुलै १८७१ला महाराणी जमनाबाईंना कन्या झाली. सभोवतालची प्रतिकूल परिस्थिती लक्षात आल्याने, महाराणी जमनाबाईंनी सहा महिन्यांत आपल्या मुलीला म्हणजे ताराबाईला घेऊन बडोदे सोडले व त्या पुण्याला गद्रेवाड्यात जाऊन राहिल्या. मल्हाररावांनी त्यांना देऊ केलेली एक लाखाची रक्कमही त्यांनी नाकारली. आपली सर्व परिस्थिती दौलतराव काकासाहेब माने यांना त्यांनी कळवली. त्यांनी या परिस्थितीतून रेसिडेंटच्या मदतीने बाहेर पडण्याचे प्रयत्न सुरू केले, त्यावेळी त्यांनी काकांना पत्रात लिहिले, 'आता या कारणाने मजला बडोदे येथील कोणी मनुष्य जिवाच्या भीतीस्तव अनुकूल होत नाहीत व हल्ली आहेत ते बेडीत झाले आहेत. या ठिकाणी केवळ मोगलाई झाली आहे. याजकरिता रावजी यास लवकर सोडण्याची तजवीज आपले अंग न येता

करावी यापासून आपला लौकिक होणार आहे.' या परिस्थितीतून सुरक्षितपणे बाहेर पडण्यासाठी दौलतराव काकासाहेब माने यांच्यामार्फत मुंबई सरकारशी त्यांनी खाजगी पत्रव्यवहार सुरू केला. 'बाळंतपणाचे वेळेस अशा तजवीज कधीच झाल्या नाहीत आणि दादासाहेब तोफा व लष्कर घेऊन राहिले तेव्हा त्यांच्या मनात येथे राहून काय कर्तव्य आहे हे समजत नाही; याकरिता सरकारांनी याचा अवश्य विचार करून बंदोबस्त झाला पाहिजे. नाही पेक्षा महाराज येथे राहिल्याने कोणता घाट व काय तुफान होईल हे समजत नाही. याजकरिता मजकूर हा सरकारास कळविला आहे. याबद्दल सत्वर तजवीज करणे साहेबांकडे आहे.'

जमनाबाईंनी अशा बिकट परिस्थितीत प्रसंगावधान दाखवत हिमतीने व चिकाटीपूर्वक प्रयत्न करून काळावर मात केली व आपला मार्ग शोधला. जमनाबाई व त्यांच्याबरोबरचे सहकारी यांनी केलेले प्रयत्न, मल्हाररावांचे अयोग्य वर्तन व कुशासन यामुळे जमनाबाईंचा दत्तक घेण्याचा अधिकार मान्य करण्यात आला व २ मे १८७५ला त्यांना बडोद्यात परत सन्मानाने बोलावण्यात आले.

अस्थिरता, असुरक्षितता, एकाकीपणा, दुःख, निराशा, भयग्रस्तता अशा अवस्थांतून वाटचाल करताना जमनाबाईंच्या अनेक गुणांचा कस लागल्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व वयाच्या अवघ्या बाविसाव्या वर्षी धीरगंभीर, कर्तव्यनिष्ठ आणि राज्याच्या उत्तरदायित्वासंबंधी सूक्ष्म विचारी आणि परिपक्व झाले. बडोदे राज्याचे दिवाण म्हणून माधवराव तंजोरकरांची नियुक्ती झाली. बडोद्याच्या इतिहासात ते टी. माधवराव या नावाने ओळखले जातात. बडोदे राज्याचे संस्थापक पिलाजीराव गायकवाड यांचा तिसरा मुलगा प्रतापराव गायकवाड यांचे वारस काशीराव गायकवाड हे महाराष्ट्रातल्या नाशिक जिल्ह्यातल्या कवळाणे गावात स्थायिक झाले होते. काशीरावांना त्यांच्या तीन मुलांना घेऊन बडोद्यात बोलावण्यात आले. अर्थात काशीराव व त्यांची भावंडे दत्तक विधानासंबंधी खंडेरावांशी व नंतर जमनाबाईंशी आधीपासूनच प्रयत्न करीत होते.

महाराणी जमनाबाई स्वतः बावीस वर्षांच्या होत्या; त्यामुळे त्यांना साहजिकच त्यांच्या वयापेक्षा लहान वयाच्या मुलाला दत्तक घेणे आवडले असेल, जो मोठा झाल्यावर त्यांच्याकडे लक्ष देईल. मल्हाररावांच्या कारकिर्दीत सगळयाच बडोदेकर गायकवाडांनी कोणाचा तरी पक्ष घेतला होता. त्यातील वाडीवाले गायकवाडांनी मल्हाररावांचा पक्ष घेतला होता; आणि म्हणूनच त्यांना अशा मुलाचा शोध होता, ज्यांचा गायकवाड दरबाराशी काही संबंध नाही आणि जो वयाने लहान आहे म्हणजे तो थोड्या वेळेसाठी महाराणींच्या निरीक्षणात राहील. शिवाय इंग्रजांना पण लहान वयाचा मुलगा पाहिजे होता, ज्याला ते त्यांच्या मनाप्रमाणे वळण लावू शकतील.

महाराणी जमनाबाईंवर बडोद्याला सुयोग्य वारस नेमण्याची खरोखर अवघड अशी कामगिरी सोपवण्यात आली होती. या कामगिरीत त्यांना सर टी. माधवराव यांचा सला व ब्रिटिश सरकारची मंजुरी घ्यावयाची होती. काशीरावांचा मोठा मुलगा आनंदराव हा सतरा वर्षांचा म्हणजे

मोठा, तरुण व तयार असल्याने ब्रिटिश शासनाच्या पसंतीस उतरणे कठीण होते; कारण त्यांना संस्कारक्षम अशा कोवळ्या वयाच्या मुलाचा शोध घ्यावयाचा होता. गोपाळराव व संपतराव या दोन मुलांपैकी काशीरावांचा दुसरा मुलगा म्हणजे गोपाळराव! ११ मार्च १८६३ रोजी जन्माला आलेला हा मुलगा महाराणींच्या विचक्षण नजरेने पारखला आणि त्यांच्या निवडीला कुणीही विरोध न करता संमती दिली. 'त्यांच्या दत्तक विधानाची कहाणी वारंवार सांगितली जाते; पण त्याच्या सत्यतेबद्दल कुठलाही पुरावा मात्र देता येत नाही. गोपाळरावांच्या निवडीचे एक कारण असे देता येते की, या तिन्ही भावांना जेव्हा विचारले गेले की, त्यांना इथे कशासाठी आणले गेले आहे तेव्हा त्यांच्यापैकी मोठ्या आणि धाकट्या मुलाला कुठलेही समाधानकारक उत्तर देता आले नाही; पण गोपाळराव मात्र धीटपणे म्हणाले, 'मी इथे बडोद्याचा राजा बनायला आलो आहे.' दुसरी आणखी एक गोष्ट सांगण्यात येते की, जेवणाच्या टेबलावर कसे वागावे हे त्यांच्या भावांना कळत नव्हते; पण गोपाळराव महाराणींचे निरीक्षण करायचे आणि त्याप्रमाणे त्यांचे अनुकरण करायचे.'

कै. संपतराव यांनी आपल्या आठवणींत लिहिले, 'आमचा मुक्काम कॅम्पमध्ये असताना कित्येक वेळा महाराजसाहेब, कै. दादासाहेब व मी संपतराव अशा त्रिवर्गास मोतीबागमध्ये कै. मातुःश्री जमनाबाईसाहेबांकडे नेत असत. तेथे गेल्यावर कै. बाळासाहेब माने आम्हा त्रिवर्गास हाताशी धरून मातुःश्री महाराणीसाहेबांकडे घेऊन जात असत. थोडा वेळ तेथे बसून किंवा खेळून आम्ही परत व कॅम्पमध्ये येत असू. याप्रमाणे काही दिवस झाल्यावर एक दिवशी आम्हा सर्व मंडळीस हत्तीवर बसून मोठ्या थाटाने वाजत गाजत शहरात आणून जुन्या राजवाड्यासमोर वाड्यांत ठेविले.' वरील भेटीत महाराणीसाहेब यांनी आपल्या मनाने दत्तकाची निवड केलीच होती. तथापि, तिला इतरांचाही पडताळा असावा, म्हणून त्यांनी आपल्या विश्वासाच्या मंडळीस या त्रिवर्ग मुलांचे बारीक निरीक्षण करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे निरीक्षण करून त्यांनी आपला अभिप्राय महाराणीसाहेबांस कळविला, तोही त्यांच्या मतांशी मिळता असाच पडला. अखेर रेसिडेंट मिडसाहेब यांचे मत मागविले होते, तेही असेच पडले की, त्या त्रिवर्ग मुलांपैकी गोपाळराव यांचीच पसंती करावी. येणेप्रमाणे बहुतांशी मुलाची पसंती झाल्यावरही दरबारच्या ज्योतिषांना त्यांची कुंडली दाखविण्यात आली. तिही त्यांच्या मते शुभदर्शकच आहे असे ठरले. तेव्हा या सर्व दिव्यांतून पार पडून बडोदे राज्याचा राजपदाच्या श्रेष्ठ अधिकारासाठी गोपाळराव यांनाच निवडण्यात आले असे सर्वत्र जाहीर करण्यात आले. (आपटे, १९३६, खंड-१, पृ. १५५).

अर्थातच, जमनाबाई महाराणींच्या मनावर गोपाळरावांची पहिली छाप पडली असली, तरी त्यांनी दत्तक घेण्याआधी बरीच पडताळणी केली होती.

सयाजीराव महाराजांना दत्तक घेतल्यानंतर जमनाबाई महाराणींनी लहान सयाजीरावांना चरित्र, राजकर्ता स्वरूप, राजनीतीत घडवणूक आणण्यात जी ममता, चिकाटी दाखवली ती सर्वमान्य हकिगत आहे. व्यायाम, शिक्षण, नीती आणि कुटुंबप्रणालीमध्ये या खान्देशातील

कवळणा गावातून आलेल्या निरक्षर पण समजदार, गावात खेळण्यात व गायी-बैल चरवण्यात रमलेल्या युवकाला हिंमतबाज, धूर्त, हिकमती, युक्तिबाज बनून राजाचे पद योग्यरीत्या निभावेल असा युवक बनवला. महाराजांच्या शरीर संवर्धनावरही कडक देखरेख ठेवून, शत्रूला कोणत्याही प्रकारची संधी साधण्यास मिळू नये, यासाठी नेहमी सावध राहण्याचे शिक्षण या राजमातेने त्यांना दिले. योग्य वयात येताच राज्याधिकार सुपूर्द करून टाकला. त्यांच्या सुरात रेसिडेंट मिड व दिवाण टी. माधवराव आपले सूर मिळवत असत. फिलिप्स डब्ल्यू. सर्जेट म्हणतात, 'महाराज खूपच रसप्रद अशा मानवी प्रयोगातून निर्माण झालेले आहेत.' या सर्व संस्कारांमुळे महाराजांना पुढे राज्यकारभार व्यवस्थित सांभाळता आला.

मुलगा खरोखरच भाग्यवान होता; पण हळूहळू आपण या कामासाठी किती योग्य आहोत आणि बडोद्यातील लोकही आपल्याला असा ज्ञानवंत राजा मिळाला म्हणून किती नशीबवान आहेत, हे त्याने सिद्ध करून दाखविले. 'या निवडीच्या सुजाणपणाचे बडोद्यातील लोकांनी अगदी तेव्हापासून पुढील अनेक पिढ्यांनी स्वतःचे अभिनंदन केले पाहिजे.' राज्याचे शिल्प घडविण्यासाठी योग्य अशा कसबाची उपजत देणगी त्यांना आपल्या पूर्वजांकडून मिळाली होती. या मदतरूपी देणगीचे संचित त्यांच्या पाठीशी असल्यामुळे ते दुसऱ्या राज्यकर्त्यांसाठीही एक आदर्श ठरले.'

महाराजांच्या पौगंडावस्थेत राज्याचा कारभार सर टी. माधवराव महाराणी जमनाबाईंच्या सल्ल्याने चालवीत होते. राज्यातील सर्व प्रकारच्या साधनांचा वापर करून या तरुण राजाला त्याच्या नैसर्गिक गुणांचा उत्तम उपयोग व्हावा, त्याला अधिकाधिक वाव मिळावा अशा तहेचे शिक्षण दिले पाहिजे, त्यासाठी त्याला प्रशिक्षित केले पाहिजे, हे त्यांनी आपले विशेष कर्तव्य मानले.

## महाराजांचे शिक्षण

राजेशाही व्यवस्थेतील त्यांच्या ऊर्जस्वल अशा नेतृत्वाचा पाया म्हणजे त्यांचे शिक्षण. अत्यंत जाणीवपूर्वक व शिस्तबद्ध अशा शिक्षणाने त्यांची जडणघडण केली. त्यामुळे इतर राज्यांच्या तुलनेने बडोद्याचे राज्य सर्वाधिक उंचीवर जाऊन पोहोचले. खरेतर सयाजीराव महाराजांना शिक्षणासाठी अवघ्या सहा वर्षांचा कालखंड मिळाला. हा काळ अथवा अवधी थोडा जास्त मिळाला असता, तर त्यांना ज्ञानग्रहणाचा लाभ अधिक मिळाला असता अशी एक सल सदैव त्यांच्या मनात राहिली. गोपाळरावांनी कवळाणे सोडले त्यावेळी ते निरक्षर होते; त्यामुळे त्यांचे शिक्षण सुरू झाले तेच मुळी बाराव्या वर्षी. सयाजीराव फार शीघ्र ग्रहणशक्तीचे नव्हते; पण ते एखाद्या बाबीचा चिकाटीने, परिश्रमाने आणि नेटाने पाठपुरावा करीत असत, असे मत त्यांच्या गुरूंनी म्हणजे एफ.ए.एच. इलियट यांनी इ.स. १८७९ मध्ये व्यक्त केले होते. ही चिकाटी आणि नेटाने काम करण्याची वृत्ती यांनीच त्यांना आयुष्यभर पुढे नेले. चार वेगवेगळया प्रकारच्या भाषा

मुळाक्षरांपासून शिकवण्यात याव्यात, त्याही अशा चार भाषा, की त्यांची लिपीही वेगवेगळी असावी आणि पौर्वात्य जिभेसाठी त्या संपूर्णतः अपरिचित असाव्यात. असा बोजा खरे तर बहुतांशी बारा वर्षांच्या मुलावर टाकण्यात येत नाही. या व्यतिरिक्त इतिहास, भगोल आणि त्यांना सोपे जाईल इतपत प्राथमिक गणित इ. विषय जोडीला होतेच. भविष्यातील सत्ताधारी राजासाठी जे-जे महत्त्वपूर्ण आहे त्या सर्वांचे ज्ञान या काळात महाराजांना देण्यात आले. म्हणजे राजाने प्रजेसाठी करावयाच्या कर्तव्यांबद्दल खास सूचना, गुन्ह्यांचे नियंत्रण करणारे कायदे करणे आणि माणसा-माणसांत निकोप संबंध निर्माण करणे, प्रजेचे आरोग्य, तिची सर्वांगीण उन्नती आणि शांतता यासाठी उत्तम प्रशासनाचे दंडक निर्माण करणे या सर्वांचे शिक्षण केवळ सहा वर्षांत ग्रहण करावयाचे होते. बडोदा स्टेट आणि ब्रिटिश सरकारच्या दृष्टीनेही हा प्रयोग महत्त्वपूर्ण होता.

इतिहासात आपल्याला वारंवार अशी उदाहरणे पाहावयास मिळतात, की थोर व्यक्तींना त्यांच्याहीपेक्षा अधिक थोर अशा माता मिळालेल्या असतात. हिंदवी स्वराज्य निर्माण करणाऱ्या शिवाजी महाराजांच्या डोळयांत थोर जिजाऊ मातेने स्वराज्य स्थापनेची स्वप्ने पेरली आणि आईच्या कर्त्या, खंबीर आणि भविष्यवेधी नजरेने ती दक्षतेने जोपासली. पुढे त्याचा वटवृक्ष झालेला आपण पाहिला. महाराजा सयाजीरावांच्या थोरपणामागेही त्यांच्या आईची, जमानाबाईंची अंत:स्फूर्ती प्रेरणारूप झालेली आहे. महाराणी जमनाबाई या आपल्यालाही सदैव वंद्य आणि आदरणीय ठरतील; कारण आपल्या या मुलामधून एक प्रजाहितदक्ष आणि कर्तबगार राजा निर्माण व्हावा यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले.

आपले मातृप्रेम त्यांनी कधीही कर्तव्याचा आड येऊ दिले नाही. महाराणी जमनाबाईंनी कर्तव्यकठोरतेने आपल्या सर्व भावभावना बाजूला ठेवल्या. त्यांचे धैर्य व मनोबल आपत्ती व संकटांना निष्प्रभ करीत असत. आपला आत्मसन्मान आणि स्वातंत्र्य हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मूलाधार होते.

न्यायशीलतेला त्यांच्या दृष्टीने सर्वोच्च महत्त्व होते. महाराणी जमनाबाईसाहेब यांची न्यायशीलता फारच उत्तम प्रकारची होती. सरदार व दरकदारांच्या घरात त्यावेळी होणाऱ्या तंट्यांचे निकाल चालत, त्यांचे त्यांनी केलेले निवाडे फारच विचार करण्यासारखे आहेत. सन १८७७ मध्ये धायबरांच्या घराण्यात चाललेल्या तंट्याचा निकालही त्यांनी उत्तम न्यायशीलतेस अनुसरूनच दिला. महाराणी जमनाबाईंनी ही मूल्ये मुळापासून आत्मसात केलेली होती. त्यांच्या मार्गदर्शन आणि देखरेखीखाली सयाजीराव महाराजांच्या सशक्त व्यक्तिमत्त्वाची घडण झाली. सहनशीलता, न्याय आणि उत्तम वर्तणूक या गुणांचे बीजारोपण महाराजांच्या मनात या मातेने केले. आपला मुलगा खऱ्या अर्थाने थोर राजा व्हावा, त्याच्या हृदयात प्रजेच्या कल्याणाची आणि प्रगतीची तळमळ निर्माण व्हावी यासाठी त्या सदैव प्रयत्न करीत. कल्याणकारी राजा घडविण्याच्या आपल्या आयुष्यातील ध्येयासाठी त्या समर्पित झाल्या होत्या. इ.स. १८७५ मधील प्रिन्स ऑफ वेल्सच्या भेटीप्रसंगी जमनाबाईसाहेब सयाजीरावांना आपल्याबरोबर घेऊन

मुंबईस गेल्या होत्या. मुंबई शहर तेथील लोखंडाचे व आगगाडीचे कारखाने कापडाच्या गिरण्या, वेगवेगळया बागा, विस्तीर्ण रस्ते, ऑमनी बसगाड्या हे सर्व सयाजीरावांना दाखविण्यात आले; त्यामागेही जमानाबाईंची ध्येयशील वृत्ती कार्यरत होती.

राजमहालातही सयाजीमहाराज त्यांच्या दक्ष नजरेखाली असत; किंबहुना त्यांच्या लहानसहान बाबींवर, खाण्यापिण्यावर, आरोग्यावर महाराणींची सूक्ष्म नजर असे. याबाबत सर टी. माधवराव म्हणतात, 'महाराजांच्या शिक्षणासंबंधात महाराणी जमनाबाईसाहेब अत्यंत काळजी घेतात. हे त्यांना फार भूषणावह आहे. त्यांच्या शिक्षणाच्या ज्या सोयी त्यांनी करून दिल्या. त्याहून जास्त चांगल्या सोयी कोणत्याही देशी संस्थानात आढळणार नाहीत. महाराणी जमनाबाईसाहेब फार बुद्धिमान व धोरणी असल्यामुळे बडोद्याच्या भावी राजकर्त्याला चांगले शिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे आहे, हे त्या पूर्णपणे जाणून आहेत, ही मोठ्या सुदैवाची गोष्ट होय.' पुन्हा ते दुसऱ्या ठिकाणी म्हणतात, 'तरुण गायकवाडांच्या शारीरिक व नैतिक शिक्षणावर महाराणीसाहेबांची देखरेखही पूर्ववत चांगली आहे. तसेच कारभारी मंडळीला कारभाराचे काम सुनियंत्रितपणे चालविण्यास त्यांचे चांगले पाठबळ आहे.'

सयाजीराव महाराजांना नंतरच्या आयुष्यात खूप किताब, मानचिन्हे मिळाली; पण वयाच्या बाराव्या वर्षी एका छोट्याशा गावातून येऊन बडोदे राज्याची गादी मिळणे ही कुठल्याही सर्वसामान्य मुलासाठी खूपच मोठी गोष्ट होती. इथे जमनाबाई महाराणींच्या चरित्रातील वेगळेपण, मोठेपणा, कणखरपणा स्पष्ट दिसून येतो. राजवाड्यातील खुशमतगारांच्या संगतीत बिघडू नये म्हणून महाराजांच्या शिक्षणासाठी वेगळया वास्तूची निर्मिती, खाण्यापिण्याच्या चांगल्या सवयीवर कडक नजर, चांगली संगत या सगळयांची त्यांनी काटेकोरपणे निवड केली. दिवाणांना सांगून शिक्षकांच्या मदतीने शिक्षणाच्या वेगवेगळया योजना बनवून, परिकथेतील गोष्टीप्रमाणे कवळणा गावाहून आलेल्या लहान मुलाला सहा वर्षांत राज्यकारभारासाठी तयार केले. एतद्देशीय राजे हे केवळ 'दुर्गुणांचे पुतळे' अशी कित्येक युरोपियन अधिकाऱ्यांची समजूत महाराणींनी खोटी ठरवली.

स्त्रियांच्या आंतरिक शक्तीची जाणीव महाराजांना लहानपणापासून झाली असावी आणि त्यांच्या कोवळया मनावर त्याचा खोलवर प्रभाव पडला असावा. ते यामुळे लक्षात येते. सयाजीरावांनी आपल्या राज्यात स्त्रीशिक्षणाचे जे कार्य केले, त्यामागेही महाराणी जमानाबाईंची शिक्षणविषयक जागरूक दृष्टी प्रेरक ठरली असावी. आपल्या दिवाणगिरीच्या पदातून मुक्त झाल्यावर म्हणजे इ.स. १८८४ मध्ये विजयनगर येथे मुलींच्या बक्षीस समारंभाच्या प्रसंगी केलेल्या भाषणात सर टी. माधवराव म्हणतात, 'त्यांची (जमनाबाईसाहेब) ती नैसर्गिक तीव्र बुद्धी व त्यांनी संपादन केलेले अनेक विषयांचे ज्ञान, त्यांची पोक्त समजूत, त्यांचे चातुर्य, त्यांचा उत्तम स्वभाव, त्यांचे पराकाष्ठेचे कोमल अंत:करण आणि त्यांचे विनयसंपन्न वर्तन पाहून माझ्या मनात त्यांच्याविषयी अतिशय प्रेम व पूज्य बुद्धी उत्पन्न झाली. त्या तेथील राजघराण्यात प्रमुख आहेत

व महाराजांच्या अज्ञानावस्थेत मी संस्थानाचा कारभार पाहत होतो, त्यावेळी जर त्या माझ्या कृतीस मान देऊन माझे साह्य न करत्या, तर तेथे काम करणे मला पुष्कळच जड जाते.'

स्त्रियांच्या जगण्यासंबंधी आत्मनिर्भरतेची जाणीव, स्त्रीशिक्षणासंबंधीची सजगता महाराजांच्या ठायी दिसून येत होती, त्यामागे आधुनिक जीवनविषयक दृष्टिकोन, प्रगल्भ सामाजिक जाणीव इ. अनेक घटकांबरोबरच जमनाबाईंचे संस्कारही असले पाहिजेत हे लक्षात येते.

मातु:श्री स्वतः सुशिक्षित असल्यामुळे कन्येच्या शिक्षणाकडे अगदी लहानपणापासून त्यांचे लक्ष लागले व त्यांनी मोठ्या आस्थेने त्या कामास प्रारंभ केला. या कामाविषयी म्हणजे बाहेरून कोणी तिऱ्हाईत सत्तेने किंवा सामोपचाराने त्यांजला काही सांगावयास गेले होते असे मुळीच नाही. अंत:पुरापासूनच त्याला आरंभ झाला.

महाराणी जमनाबाईंचे चरित्र आतापर्यंत दोन लेखकांनी लिहिले आहे. रा.रा. नागेशराव बापट व रा.रा. गणेशराव सखाराम मुजुमदार. महाराणींच्या कारकीर्दीत बडोद्यास राज्यासंबंधाने खूप मोठ्या घडामोडी घडल्या. महाराणींनी कठीण प्रसंगांना तोंड देऊन राज्यकारभार चांगला चालवला व बडोदे राज्याचे नाव भारतातच नाही, तर विदेशातही मानाने घेतले जाईल अशी वहिवाट करून दाखवली. त्यांच्या चरित्रातून तरुण पिढीला पुष्कळ चांगल्या गोष्टी शिकता येतील हे जाणून सयाजीराव महाराजांनी रु. ५०० बक्षीस जाहीर करून महाराणी जमनाबाईंच्या मृत्यूनंतर त्यांचे चरित्र लिहिण्यासाठी जाहिरात दिली. या जाहिरातीप्रमाणे अनेक जणांनी महाराणींचे चरित्र लिहिले व शाळा खात्याकडे जमा केले. ठरलेल्या मुदतीच्या आत आलेल्या पुस्तकांचे परीक्षण करण्यात आले व त्यातून रा.रा. सखाराम गणेश मुजुमदार यांनी लिहिलेला 'महाराणी जमनाबाईसाहेब गायकवाड यांचे चरित्र' हा ग्रंथ सर्वोत्कृष्ट ठरला. हा ३०७ पानी चरित्रात महाराणींच्या संपूर्ण आयुष्याचे (१८५३ ते २९ नोव्हेंबर १८९८) तपशीलवार प्रेरणादायी अवलोकन केलेले दिसते.

आपल्या अल्पायुष्यात महाराणींनी चार वर्षांचा सुखी संसार, पतिप्रेम (त्यांना देवदर्शनाला जाण्यासाठी महाराजा खंडेरावांनी चांदीची पालखी बनवली होती.), मुलाचा बहरता संसार, कर्तृत्ववान आयुष्य, बडोदा राज्याची उत्तरोत्तर प्रगती पहिली, तसेच विधवेचे दुःख, दिराकडून झालेला अपार मानसिक छळ, जिवाची भीती, बडोदा सोडून निघून जायचे दुःख, एकुलत्या एक कन्येच्या मृत्यूचे दुःख अशा अनेक वाईट घटना त्यांनी सोसल्या होत्या. यातून निर्माण झाल्या महाराणी जमनाबाई. ज्या आनंदी, महत्त्वाकांक्षी, दूरचा विचार करणाऱ्या, स्वदेशाभिमानी, राजनिष्ठ, समयसूचक, उदार, श्रद्धाळू, राजकारणपटू होत्या.

हिंदुस्थान सरकारने 'इंपिरियल ऑर्डर ऑफ द क्राऊन ऑफ इंडिया' (हिंदुस्थानच्या बादशाही दर्जाचा मुकुट) ही सन्मानदर्शक पदवी देऊन महाराणींच्या सद्गुणांविषयी आदर व्यक्त केला. हिंदुस्थानचे व्हाईसरॉय लॉर्ड लिटन ६ जुलै १८७८ रोजी म्हणाले, 'हा सन्मान हिंदुस्थानातील राजेलोकांच्या राजकार्यधुरंधर स्त्रिया आणि राणी सरकारच्या आप्तातील व सद्गुणी स्त्रियांना

देण्यात येत असे.' बडोद्याचे रेसिडेंट रिचर्ड मिड, मि. मेलविल व इतर इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांच्या गुणांची वारंवार प्रशंसा केली आहे. सर टी. माधवराव म्हणतात की, 'त्यांच्यासारख्या राजस्त्रिया फार थोड्या निपजतात. त्यांचे शिक्षण इतर राजस्त्रियांपेक्षा फार उच्च प्रतीचे होते.' महाराणींविषयी मुजुमदार यांनी अनेकांची मते दिली आहेत. मि.पी.एस. मेलविल म्हणतात, 'दिवाणसाहेबांनी राणी जमनाबाई यांच्या संबंधाने जे संतोषप्रद उद्गार काढिले आहेत, ते मला सर्वथैव मान्य आहेत. राणी साहेबांकडून राज्यकारभाराविषयी नेहमी समंजसपणाचे व समतोल असेच मत आम्हास मिळते. सुधारलेल्या राज्यपद्धतीचे उदात्त विचार व प्रशंसनीय हेतू सिद्धीस नेण्यासाठी त्यांनी आपले वजन व सामर्थ्य खर्चुन आम्हास फार चांगली मदत केली.' मल्हारराव महाराजांच्या वेळची अव्यवस्था मोडून राज्यकारभारास व्यवस्थित स्वरूप आणण्याच्या हेतूने सर टी. माधवराव व मि.पी.एस. मेलविल यांचे प्रयत्न एकसारखे चालले होते. यावेळी सरदार, दरकदार व असामदार वगैरे लोकांचे प्राबल्य वाढून ते राज्यव्यवस्थेत घोटाळा करण्याच्या विचारात होते. त्यांचे हेतू सिद्धीस जाऊ न देता, बडोद्याचा राज्यकारभार सुरळीतपणे चालावा म्हणून महाराणी जमनाबाई यांनी जे प्रयास केले व त्या लोकांना शांत करण्यासाठी जे उपाय योजले, ते फारच वाखाणण्यासारखे होते.

नामदार प्रिन्स ऑफ वेल्स त्यांच्या प्रवासवर्णनात महाराणींचे वर्णन करताना म्हणतात, 'महाराणी जमनाबाई यांचे डोळे पाणीदार असून, त्यांचे हास्यमुख फारच देदीप्यमान दिसले. त्यांचे हातपाय गोंडस आहेत. त्यांनी हाताच्या बोटांत मूल्यवान व चमकणाऱ्या अंगठ्या व पायांत सोन्याच्या वजनदार साखळया घातल्या होत्या; त्यांच्या भारामुळे चालताना त्यांना फारच श्रम होत असले पाहिजेत.' नामदार प्रिन्स ऑफ वेल्स यांची बडोद्यात भेट दिली; त्यावेळी महाराणी जमनाबाई या इतर राजस्त्रियांप्रमाणे पडद्यात नव्हत्या. त्यांनी अंगावर जरीकाठी व जरीच्या नक्षीची शालजोडी पांघरली होती व ती त्या वारंवार सावरीत होत्या.

बडोदे राज्यात साहित्याच्या अभिवृद्धीला उत्तेजन देण्याचे कार्य काही अपरिचित नव्हते. श्री. गणपतराव यांनी सन १८४९ मध्ये 'दक्षिणी भाषेत पुस्तके प्रसिद्ध करणारी मंडळी' या संस्थेस पाच हजार रुपये बक्षीस दिल्याचा उल्लेख आढळतो. होनाजी बाळा, सगनभाऊ या प्रसिद्ध शाहिरांना बडोद्याच्या अधिपतीचा पुष्कळ आश्रय व मदत मिळत असे. अनंत फंदी हे तर बडोद्याचेच वतनदार होते. त्यांचे नातू स्वत: आख्याने रचून बडोद्यास कीर्तन करीत असत. खंडेराव महाराज हेही अशा गुणी लेखकवर्गांना चांगला आश्रय देत व त्यांच्या मागे श्री जमनाबाईसाहेब यांनी ही परंपरा पुढे चालू ठेवली होती. महाराणी जमनाबाई यांनासुद्धा साहित्याची आवड होती. त्या नेहमीच साहित्याचे वाचन करत. याचा उलेख या अगोदर आला आहेच.

सयाजीराव महाराज आपला राज्यकारभार दक्षतापूर्वक पाहू लागल्यावर, महाराणी जमनाबाईंनी राजकीय बाबतीतून आपले मन काढून घेतले व त्या आपल्या मुलाच्या संसारात

रमल्या. कारण त्यांना पुरेपूर विश्वास वाटत होता की, महाराज आता राज्यकारभार व्यवस्थित करू शकतील.

सयाजीराव महाराजांना १४ जलै १८८१ रोजी प्रथम कन्यालाभ झाला. या कन्येचे नाव बानूबाई ठेवण्यात आले होते. त्यानंतर ४ जून १८८२ रोजी दुसरी राजकन्या पुतळाबाई हिचा जन्म झाला. तथापि, दुर्दैवाने या दोघीही मुली अल्पायुषी निघाल्या. त्यानंतर ३ ऑगस्ट १८८३ रोजी महाराजांना प्रथम पुत्रलाभ झाला. ही मंगलवार्ता त्या वेळचे खासगी कारभारी रा. शंकरराव विठ्ठल पुणेकर यांनी आणल्याबरोबर सर्व शहरभर हत्तीवरून साखर वाटण्यात आली. गेल्या सुमारे चार पिढ्यांपर्यंत या घराण्यात औरस नसल्यामुळे हा प्रसंग सर्वांसच विशेष आनंदाचा वाटला. महाराणी जमनाबाईसाहेब यांनी ही बातमी आणणाऱ्यास आपल्या गळ्यातील कंठा काढून दिला. अनेक संकटे सोसून बडोदे राज्याची पुन्हा संस्थापना करणाऱ्या या राणीसाहेबांनी सरकारी जवाहरखान्यातील दागिना बक्षीस दिला म्हणून खानगी कारभारी रावजी विठ्ठल यांनी हरकत घेतली; परंतु महाराणी साहेबांनी त्यांचे न ऐकता त्यांस सांगितले की, 'मला यावेळी जो आनंद झाला, त्यात हा कंठा मी दिला. तो परत घेता येणार नाही. ईश्वरकृपेने आज पौत्रदर्शन झाले, हा या राज्यास फारच मोठा लाभ झाला. या लाभापेक्षा या कंठ्याची किंमत बिलकूल जास्त नाही.' यापुढे दहा दिवसांपर्यंत राजवाड्याच्या दरवाजापासून सुवासिनी दुधाचे व पाण्याचे घडे आणून ओतीत असत व त्या दरेकीस रुपये चार ते पाचपर्यंतचा पोशाख देण्यात येई. अशा रीतीने समारे पाच हजार पोशाख देण्यात आले. या नातूचे नाव फत्तेसिंहराव असे ठेवण्यात आले. हा मंगल समारंभ सुमारे एक महिन्यापर्यंत चालू होता.' (आपटे, १९३६, खंड-१, पृ. ३०८). महाराणींची उदारता आणि दान करण्याची वृत्ती अशा अनेक प्रसंगांतून वारंवार दिसते.

महाराणी या आधुनिक विचारसरणीच्या होत्या. व्हाईसरॉय लॉर्ड लिटन यांच्या शेजारच्या सोफ्यावर बसून त्यांना भेटल्या. तसेच श्रीमंत तुकोजीराव होळकरांचे आमंत्रण आल्यावर आपल्या पुत्र व कन्येबरोबर दिल्लीला नाटक पाहायला गेल्या. तसेच त्यांचे सुप्रसन्न सुंदर वदन हा एक उत्कृष्ट नमुनाच होता. इ.स. १८७७ मध्ये दिल्लीस भरलेल्या बड्या दरबाराच्या वेळी; महाराणी जमनाबाई यांची तसबीर काढविण्यात आली. तिची प्रसिद्धी 'लंडन न्यूज' व इतर सामान्य पत्रांत झाल्यामुळे, सर्व युरोप व अमेरिका खंडात त्यांच्या स्वरूपाची विशेष ख्याती झाली. या सगळ्या घटनांवरून हे स्पष्ट होते, की महाराणी खूपच पुढारलेल्या मनोवृत्तीच्या होत्या.

महाराणी जमनाबाई अतिशय धार्मिक वृतीच्या, अनाथ, निराश्रित, सत्पात्र लोकांना दानधर्म करण्यात कायम पुढे राहणाऱ्या होत्या. महाराणींनी बडोद्यात पावणेदोन लक्ष रुपये खर्चुन 'तारकेश्वर' शिवालय बांधले. हे शिवालय होत असताना बडोद्यातील काही कुत्सित ब्राह्मण मंडळींनी मराठ्यांना लिंगस्थापना करायचा अधिकार नाही असे खुसपट काढले; पण महाराणींनी हिकमतीने परिस्थितीला तोंड दिले आणि दैवयोगाने त्याच सुमारास श्री शारदामठाधीश्वर श्री

मच्छंकराचार्य महाराज यांची स्वारी बडोद्यास आली. त्यांचा अनुग्रह महाराणी साहेबांनी घेऊन, त्यांच्या हस्ते या शिवलिंगाची स्थापना करवली. शिवार्चन केल्याशिवाय अन्न व पाणी ग्रहण न करण्याचा त्यांचा नियम होता.

अनेक प्रयत्न करूनही महाराणी जमनाबाई यांच्या एकुलती एक कन्या ताराबाई यांचा १४ जून १८९७ रोजी मृत्यू झाला. हा आघात राजमाता जमनाबाईंना पचवणे जड गेले. त्यांची प्रकृती अशीही बिघडत चालली होतीच, त्यात या धक्क्याने भर पडली. त्यांनी आपला वेळ तीर्थयात्रा करण्यात घालवला. त्या रहिमतपूरला, तसेच आपल्या जन्मस्थळी भेट देऊन आल्या. पुढे प्रकृती बिघडत जाऊन २९ नोव्हेंबर १८९८ रोजी महाराणींनी अंतिम श्वास घेतला. महाराणी जमनाबाई यांच्या मृत्यूनंतर कॅम्पात ब्रिटिश सरकारचा विजयशाली झेंडाही मध्यावर उतरला होता. एवढा मोठा मान हिंदुस्थान सरकारने मोठमोठ्या राज्यकर्त्यांनाही दिला नसेल.

राजकवी रामचंद्र नरहर माळी यांनी आपल्या अर्पण पत्रिकेत महाराणी जमनाबाईसाहेब यांचे अतिशय उत्तम वर्णन केले आहे.

### राजमाता जमनाबाई महाराणी यांचा सयाजीरावांस उपदेश

मी जमना राणिची दिव्य दृष्टी । मर्दानी मोठी । भारी खटपटी होता साडेतीन (३।।) शाहाण्याचा दरबार । स्वतः पाहे राज्यकारभार । बेकायदा कधी नाही करणार ।। गांव कर्नाळी नर्मदातीर बांगलाकेळणपूर । आणि तारकेश्वर । गांव नानाचा भेणवली । या स्थळी जमनाराणी गेली । पण नाही तब्येत बरी झाली ।। सयाजींनां मातृ वदे बाळा । म्हणे सर्व राज्य सांभाळा । रामापरि करा न्यायनीत मेळा । देहजाळ उदवती प्रमाण । ही माझी तुला आण । माझा पुत्र तूं पंचप्राण ।। पुत्रा अंकी, अंती, होती माता । तिचाटक मुखाकडे होता । यापरी वदली तत्वतां स्वर्गी शिव शिव करत गेल्या । मोती बाग बंगल्या । सर्व स्वाऱ्या दुखी झाल्या । विश्वामित्री तिरी । तारकेश्वरी । सयाजीरायांचे करी । अंत्यविधी झाला । पंचेचाळीस तोफा सलामीला । ती बरोबर सी.आय. किताब गेला।। सयाजीची मातृभक्ती मोठी । आलि जगाचे दृष्टी । पुत्र प्रेमाची वृष्टी । ह्याच सत्पुत्र जाण भला । झाली कीर्ती सिकागोला । हा जगी सर्व बोलबाला ।। (माळी, १८-१९)

महाराणी जमनाबाई यांच्या चरित्राचा परामर्श पाहिल्यावर चरित्रकार सखाराम मुजुमदार यांच्याविषयी माहिती घेणे योग्य ठरेल. मुजुमदार यांचा जन्म कुंभारघर (ठाणे) येथे झाला होता. त्यानंतर त्यांनी सातवीपर्यंत शिक्षण घेऊन बडोद्यात छापखान्यात नोकरी केली. त्यांनी काही काळ विठ्ठलगड आणि पालनपूर संस्थानात नोकरी केली होती. मुळातच त्यांच्या अंगी लेखनाचे गुण असल्याने ते एक कादंबरीकार, निबंधकार आणि चरित्रकार म्हणून प्रसिद्धीस आले होते. त्यांनी 'वारुणी आणि विश्वयोषिता' ही कादंबरी इ.स. १८९१ मध्ये लिहिली. त्यानंतर दुसऱ्याच वर्षी 'नशीब आणि उद्योग' हा निर्णयसागर या वृत्तपत्राचा पहिले पारितोषिक मिळालेला निबंध लिहिला. त्यानंतर त्यांनी आपला मोर्चा चरित्राकडे वळवला. 'उदारोजी नाईकचे चरित्र' (१८९२)

हे निबंधवजा चरित्र लिहिले. त्यांनी 'प्रभूरत्नमाला' (१८९६), हिंदुस्थानातले दुष्काळ (१९०१) यावर अभ्यासपूर्ण निबंध लिहिला. याशिवाय त्यांनी 'ज्योतिर्माला' मासिकात 'ज्योतिषावरील ग्रहफले' व कायस्थमित्र मासिकात 'सुमेरियन संस्कृती' या लेखमाला लिहिल्या. त्या काळात या लेखमाला अतिशय गाजल्या. मुजुमदार यांचे लेखन कसदार आणि मुळाशी भिडण्याचे असल्याने त्यामध्ये दर्जेदारपणा आपोआपच प्राप्त होतो. या उक्तीप्रमाणे त्यांनी लिहिलेले महाराणी जमनाबाई यांचे चरित्र हे सर्व कसोट्यांवर खरे उतरले आहे.

महाराणी जमनाबाई यांचे हे चरित्र एकंदरीत बत्तीस भागांमध्ये विभागले असून एकूण सहा परिशिष्टे दिली आहेत. यामुळे चरित्राची व्यापकता आणि परिपूर्णता लक्षात येते. यामध्ये मुजुमदार यांनी प्रत्येक भागामध्ये पुन्हा छोटे-छोटे भाग करत चरित्रातील प्रत्येक घटना-प्रसंगात सखोलपणा आणला आहे. त्यामुळे चरित्र वाचनीय, रसाळ आणि गुणवत्तापूर्ण झाले आहे.

जमनाबाईसाहेब या जरी बडोदा संस्थानच्या महाराणी असल्या, तरी त्या दुर्दैवाच्या गर्तेत अडकल्या होत्या. त्यांच्या जागी एखादी सामान्य स्त्री असती तर ती आपल्या नशिबाला दोष देत बसली असती; परंतु जमनाबाई यांनी आपल्या बुद्धिचातुर्याने, चिकाटीने, कष्टाने आणि मुत्सद्दीपणाने हातून गेलेले राज्य पुन्हा मिळवले. त्यासाठी प्रसंगी आप्तेष्ट आणि इंग्रज यांची मदत घेतली. मुजुमदारांनी अनेक घटना-प्रसंग देत, रसप्रद सत्य प्रसंग देत या ग्रंथात निवेदन केले आहे. अनेक चरित्रकारांनी लिहिलेल्या चरित्रातून या चरित्राची निवड झाली; यावरूनसुद्धा हा ग्रंथ किती मौल्यवान आहे हे समजते. या चरित्रात जागोजागी सत्यनिष्ठा, तटस्थता, सुयोग्य घटना प्रसंगांची निवड, सामान्याकडून असामान्याकडे घेऊन जाणारे निवेदन यांमुळे या चरित्राचे मोल आपोआपच वाढते.

महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे सदर ग्रंथाचे प्रकाशन होत आहे. याबद्दल आनंदच आहे. यासाठी मनापासून मदत करणारे या प्रकल्पाचे संपादक यमाजी मालकर, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रसंग्रह १ चे संपादक डॉ. राजेंद्र मगर यांचे मनापासून आभार मानते.

(**टीप -** महाराणी जमनाबाई यांचा हा चरित्र ग्रंथ दुर्मिळ असल्याने त्याची मूळ प्रत मिळणे दुरापास्त होते. संशोधनांती बडोद्यात याच्या दोन प्रती मिळाल्या; परंतु त्यातील दोन्ही प्रतीत पहिल्या दोन प्रकरणाचे कोपरे फाटलेले होते. त्यामुळे तेथील मजकूर समजण्यास अडचण निर्माण झाली. त्यावर पर्याय म्हणून भाग एक व भाग दोन मधील काही मजकुरात अशी --- खूण केली आहे.)

- सौ. मंदा हिंगुराव

# महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड यांचे चरित्र

*'श्रीमंत सरकार महाराज सयाजीराव गायकवाड' यांच्या आज्ञेवरून*

तयार करणार

सखाराम गणेश मुजुमदार



पहिली आवृत्ती

१९०५

श्रीमंत गायकवाड सरकाराचें देशी शिक्षण खातें.

हिंदुस्थानचें शिरोभूषण.

# महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड यांचें चरित्र.

श्रीमंत सरकार महाराज सयाजीराव गायकवाड
यांच्या आज्ञेवरून
तयार करणार

सखाराम गणेश मुजूमदार.

( सर्व हक्क सरकारांचे स्वाधीन आहेत. )

बडोदें- " सरकारी छापखान्यां " त छापिलें.

संवत १९६१. इ. सन १९०५.

किंमत रु. १-२-०

# प्रस्तावना

राष्ट्रातील असंख्य व्यक्तींच्या अनंत सामर्थ्याने जे काम घडते, त्याच्या इतिवृत्तास इतिहास म्हणतात. चरित्र हा त्याचाच एक पोटभाग आहे. चरित्रग्रंथात एका प्रधान व्यक्तीकडून घडलेल्या कृत्यांचे मुख्यतः वर्णन असते. अशा महान व्यक्तीशी अंशतः साहचर्य असल्याने किंवा त्यांचे साध्य केल्याने, तदितर व्यक्तीचेही वर्णन चरित्रग्रंथात प्रसंगोपात येत असते. चरित्र व इतिहास वस्तुतः एकाच स्वरूपाचे द्योतक आहेत. कित्येक प्रख्यात इंग्लिश ग्रंथकारही चरित्र आणि इतिहास यास भिन्न समजत नाहीत. निरनिराळ्या असंख्य महान व्यक्तींच्या चरित्रांचे एकीकरण यास मात्र इतिहास ही संज्ञा देता येईल. इतिहास शब्दाचे मर्यादेपेक्षा चरित्र शब्दांत मर्यादा लहान आहे, ही गोष्ट लक्षात ठेवल्यास त्यातील खरा भेद सहज कळेल. चरित्रग्रंथात अतिशयोक्ती किंवा मानसिक सृष्टी नसेल तरच त्या ग्रंथास इतिहासाच्या पोटभागांत गणता येईल. चरित्रे ही इतिहासात्मक पाहिजेत. ती तशी असतील तरच वाचकवृंदास त्यापासून खरा लाभ मिळेल. अविश्वसनीय व कल्पनाप्रचुर वर्णनांनी ओतप्रोत भरलेल्या चरित्रग्रंथाचा उपयुक्ततेच्या दृष्टीने काहीच उपयोग होत नसतो. स्त्री-पुरुषांच्या समाजास सवलत लावण्यासाठी चांगल्या व थोर माणसांची खरी चरित्रे प्रसिद्धीस आणण्याची फार जरूरत आहे. मनुष्यकृती निर्दोष असण्याचा संभव फारच कमी. त्यामुळे मोठमोठ्या प्रसिद्ध व्यक्तींच्या हातूनही प्रसंगी दोष होतात. त्या दोघांसह त्या व्यक्तीकडून घडलेली सर्व कार्ये जशीच्या तशीच वर्णिल्याने सामान्य वाचकाच्या मनाचा गोंधळ झाल्यावाचून राहत नाही. त्यास आपले विचार स्थिर करता यावेत व तर्कशक्तीद्वारे त्यांना अंतरंग कळावे, अशा हेतूने लिहिलेल्या चरित्रकाराची योग्यता एकंदरीत जास्त आहे. छिद्रान्वेषण करणारास ती कळणार नाही. अमृतमय प्रकाश देण्याचा व वनस्पतीचे पोषण करण्याचा जो चंद्राचा थोर गुरू, तोच वाचकांनी ग्रहण करावयाचा आहे. चंद्रावरील कलेकाशी किंवा पौराणिक आश्रित कथानकाशी वाचकांनी संबंध ठेवणे हे उचित

नाही. 'चांगले होण्याकरिता चांगल्या स्त्री-पुरुषांच्या चरित्रांचे वाचन झाले पाहिजे' व 'त्या थोर पुरुषांचे स्मारक म्हणजे त्यांच्या सत्कृतीचे, सद्धेतूंचे व सद्विचारांचे पुनरुज्जीवन हेच होय' असे प्रसिद्ध प्रो. मॅक्समुल्लर यांनी म्हटले आहे. त्या मतास अनुसरून चरित्रग्रंथ तयार झाले पाहिजेत, अशी आमची साधारणतः समजूत असल्याने, प्रस्तुत चरित्र हे आम्ही याच दृष्टीने लिहिले आहे.

शौर्ययुगात व त्यापूर्वी महाराष्ट्रात बऱ्याच थोर स्त्रिया होऊन गेल्या व त्यांनी आपली कीर्ती या जगात अजरामर करून ठेवली, तथापि त्यांची चरित्रे अद्यापि यावी तितकी प्रसिद्धीस आलेली दिसत नाहीत. त्या काळाबरोबरच त्यांच्या आयुष्यक्रमाचे इतिवृत्तही लुप्तप्रायः होऊन गेले असेच म्हणावे लागते. ऐतिहासिक साधन संपत्ती नष्ट झाल्याने, त्या इतिहासाचा हल्ली मागमूसही लागत नाही. काही थोर स्वभावाच्या, नीतिमान व सद्गुणी स्त्री-पुरुषांची नावे मात्र ऐकण्यात व वाचण्यात येतात; परंतु त्यांचे साग्र इतिहास फारच थोडे पाहण्यात येतात! ही इतिहासाची उणीव यापुढे आता यथार्थ भरून येणे शक्य नाही. प्राचीन व अर्वाचीन काळाचे इतिहास तयार करण्याकडे काही विद्वानांचे लक्ष लागले आहे; परंतु ते तयार करण्याच्या कामात मुख्यतः साधनांची उणीव असल्याने, त्यांचा व्हावा तसा उपयोग होऊ शकत नाही. जे चार-दोन आधार मिळतील, तेवढ्यावरच त्या ग्रंथकारांना आपल्या इतिहासाची इमारत रचावी लागते! ती साधने ज्या प्रकारची मिळतील, त्यांच्यावर मुख्य भिस्त ठेवून, ते एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीवर विनाकारण दोषारोपही करण्यास चुकत नाहीत. कित्येक प्रसंगी पक्षाभिमानास प्रवर्त झाल्यामुळे, त्यांजकडून फारच मोठे दोष घडत असतात. सारांश, आमच्यातील ऐतिहासिक ग्रंथांची परिस्थिती फार शोचनीय झाली असल्याचेच आढळून येते. स्वदेशातील थोर स्त्री-पुरुषांचे इतिहास ज्या त्या काळचे परिस्थितीस अनुसरून यथार्थ तयार झाले पाहिजेत, ते तसे होतील तरच भावी प्रजेवर त्यापासून चांगला संस्कार घडेल. अर्वाचीन विद्वान लोकांनी या काळात जे खरे थोर पुरुष निर्माण होऊन गेले अथवा झाले असतील, त्यांची यथार्थ चरित्रं किंवा त्यांजकडून घडलेल्या महत्त्वाच्या कामांस साग्र हकिकती लिहून प्रसिद्धीस आणल्यास, त्यापासून बरेच मोठे कार्य होणार आहे. हे इतिहास लिहिले न गेल्यास, प्राचीन काळचा इतिहास जसा नष्ट होऊन गेला, तसा हाही लुप्त होण्याचा संभव आहे.

आपल्या देशात आजपर्यंत असंख्य स्त्रीरत्ने निपजून, त्या राजस्त्रियांच्या हातून मोठमोठी कार्ये घडल्याची इतिहास साक्ष देतात. प्रसिद्ध अहिल्याबाई होळकर, बायजाबाई शिंदे, सावित्रीबाई ठाणेदार, सखाबाईबया खासगीवाले (फणसे), झांशीची लक्ष्मीबाई, उमाबाई दाभाडे व लखतरची उमाबाई जुन्नरकर वगैरे थोर स्त्रियांची चरित्रे ही भावी काळात फार महत्त्वाची होऊन बसतील. पुढील प्रजा सुधारण्यास शिक्षणाचा प्रसार स्त्री-पुरुषांत झाला पाहिजे व त्या प्रसाराबरोबर चांगल्या व थोर माणसांच्या चरित्रक्रमाचाही प्रसार करणे हे अत्यंत इष्ट आहे. अनुभवजन्य ज्ञान मिळविण्यास, 'इतिहास' किंवा 'चरित्र' यावाचून अन्य श्रेष्ठ साधन नाही. याच उद्देशाने आज

आम्ही महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड यांचे साग्र व यथार्थ चरित्र वाचकांपुढे सादर केले आहे. महाराणी जमनाबाई या फार थोर स्वभावाच्या व सद्गुण संपन्न होत्या. त्यांनी बडोदे राज्याचे उत्तम रीतीने रक्षण केले. त्यांना चांगल्या मनुष्यांची उत्तम पारख होती, त्यामुळे त्यांनी चांगल्या माणसांचा बराच संग्रह केला. बडोदे राज्याच्या खऱ्या इतिहासाकडे लक्ष दिल्यास, मल्हारराव महाराजांकडून घडलेल्या अनुचित वर्तनामुळे, बडोदे राज्य काळाच्या तडाख्यात सापडून नष्ट होण्याच्या बेतास आले होते; परंतु तो प्रसंग मोठ्या युक्तीने व नेकीने महाराणी जमनाबाई यांनी टाळला. प्रसंगी धैर्य धरून समयास अनुसरून त्या वागल्या; त्यामुळे त्यांचा सर्वोत्कृष्ट विजय झाला, हे या चरित्रावरून सहज कळेल. त्या मोठ्या चाणाक्ष व मुत्सद्दी होत्या. राजा सर टी. माधवराव यांनी अनेक प्रसंगी महाराणी जमनाबाई यांच्या सद्गुणांविषयी अत्युत्कृष्ट अभिप्राय दिले आहेत. त्यांनी विजयानगर येथील कन्या शाळेच्या बक्षीस समारंभाच्या वेळी इ.स. १८८४ मध्ये म्हटले होते की, "-------महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड यांची मला वारंवार आठवण होते. त्यांच्या आठवणीबरोबर बडोदे राज्यात माझ्या आयुष्याचा जो श्रेष्ठतम काळ गेला, त्यासमयी घडलेल्या असंख्य चांगल्या गोष्टींचे सारण होऊन, माझे चित्तास पराकाष्ठाचे समाधान व आल्हाद झाल्यावाचून राहत नाही. माझ्या अधिकाराच्या व कित्येक राजकीय बाबतीसंबंधाने त्यांच्याशी संभाषण करण्याचे प्रसंग मला नेहमी येत असत. त्यांची नैसर्गिक तीव्र बुद्धी, त्यांनी अनेक विषयांचे मिळविलेले परिज्ञान, त्यांची पोक्त समजूत, राजकीय दूरदृष्टी, त्यांचे अलौकिक चातुर्य, त्यांचा ममताळू स्वभाव, त्यांचे कोमल व विनयसंपन्न अंत:करण, त्यांचे वरिष्ठ प्रतींचे औदार्य हे सर्व सद्गुण पाहून, माझ्या हृदयात त्यांचेविषयी अतिशय आदरभाव उत्पन्न झाला. त्या तेथील राजघराण्यात प्रमुख आहेत. हल्लीच्या महाराजांच्या अज्ञानावस्थेत मी त्या राज्याचा कारभार पाहत होतो, त्यावेळी त्यांनी जर मला खरोखर मदत केली नसती, तर मला तेथे राज्यकारभार चालविणे हे फारच दुरापास्त झाले असते. यांच्यासारख्या राजस्त्रिया फारच थोड्या निपजतात. त्यांचे शिक्षण इतर राजस्त्रियांपेक्षा श्रेष्ठ प्रतीचे झाले होते, असे मी प्रत्यक्ष अनुभवावरून सांगतो-----" हिंदुस्थानचे व्हाईसरॉय लार्ड लिटन, बडोद्याचे रेसिडेन्ट सर रिचर्ड मिड, मि. मेलविल व दुसऱ्या कित्येक मोठमोठ्या आंग्ल मुत्सद्यांनी यांच्या थोर गुणांची वारंवार प्रशंसा केली आहे. नामदार हिंदुस्थान सरकारने यांच्या अंगचे सद्गुण पाहून, यांस 'इम्पिरियल ऑर्डर ऑफ धी क्राऊन ऑफ इंडिया' ही सन्मानदर्शक पदवी देऊन, यांच्यासंबंधाने आपली कृतज्ञता व पूज्य बुद्धी व्यक्त केली.

महाराणी जमनाबाई यांच्या कारकीर्दीत बडोदे राज्यासंबंधाने फारच महत्त्वाच्या गोष्टी घडल्या व त्यांच्यावर आलेले प्रसंगही फार आणीबाणीचे होते. यांच्या चरित्र वाचनापासून भावी पिढीस पुष्कळ चांगल्या गोष्टी शिकता येतील असे जाणून व आपल्या पुत्रधर्मास स्मरून, श्रीमंत 'सेनाखासखेल समशेर बहादूर' सयाजीराव महाराज गायकवाड यांनी पाचशे रुपयांचे

बक्षीस लावून, हे चरित्र लिहिण्याबद्दल जाहिरात प्रसिद्ध केली. ठरलेल्या मुदतीच्या आत जी पुस्तके शाळाखात्याकडे परीक्षणार्थ आली; त्यापैकी प्रस्तुतचा ग्रंथ परीक्षक मंडळींनी सर्वोत्कृष्ट ठरविला. नापसंत झालेले ग्रंथ ज्यांचे परत देण्यात आले; त्यापैकी रा. रा. नागेशराव बापट यांनी लिहिलेल्या महाराणी जमनाबाई साहेबांचा चरित्र ग्रंथ 'सयाजी विजय' पत्राचे चालकांकडून इ.स. १९०१ सालचे भेटीदाखल प्रसिद्ध झाला आहे. विद्वान मंडळींच्या समुदायाने एक मताने पसंत केलेला प्रस्तुतचा चरित्रग्रंथ व रा.रा. नागेशराव विनायक बापट यांचा प्रसिद्ध झालेला ग्रंथ; असे दोन्ही ग्रंथ वाचकांच्यापुढे आहेत. गुणग्राही वाचकांस या दोन्ही वाचनापासून पुष्कळ गोष्टी कळतील. महाराणी जमनाबाई यांचा पत्रव्यवहार, सरकारी रिपोर्टातील माहिती, कित्येक ग्रंथकारांनी यांच्याविषयी लिहिलेले लेख, त्यावेळच्या अनुभवी लोकांकडून मिळालेली माहिती व दुसरी कित्येक साधने यांच्या आधाराने प्रस्तुत चरित्र ग्रंथ आम्ही तयार केला आहे.

श्रीमंत सरकार महाराज साहेबांच्या औदार्याचा लाभ मिळून, प्रस्तुत ग्रंथ प्रसिद्ध होण्यास संधी मिळाली, याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभीष्ट चिंतून, ही लांबलेली प्रस्तावना येथेच संपवितो.

बडोदे, तारीख १५ ऑक्टोबर
इसवी सन १९०४

\- सखाराम गणेश मुजुमदार

# अ नु क्र म


अध्यक्षांचे निवेदन / ५
संपादकाचे निवेदन / ७
सहसंपादिकेचे मनोगत / ११
प्रस्तावना / ३१
१. पितृकुलाची त्रोटक हकीकत आणि जन्मवृत्तांत / ३७
२. बाळपण व बडोद्यास आगमन / ४०
३. लग्नास आलेली विघ्ने / ४२
४. लग्नसमारंभ, सुखाचे दिवस आणि पितृवियोग / ४६
५. मल्हारराव गायकवाडांच्या वर्तनाचा त्यांच्या बंधूकडून मिळालेला बदला / ५१
६. वैधव्य आणि संकटांचा आरंभ / ५६
७. आलेले भयंकर प्रसंग / ६१
८. ब्रिटिश सरकारचा आश्रय आणि मल्हारराव यांजकडून झालेला त्रास / ७२
९. आशाभंग व मातृसुखाचा नाश / ८५
१०. बडोद्याचा त्याग व पुण्यास गमन / ९०
११. आपत्तीचे दिवस आणि प्रसंगावधान / ९५
१२. मल्हारराव महाराज यांच्या कारकीर्दीचा शेवट / १०३
१३. बडोद्यातील लोकांचे तुफान व मल्हारराव महाराजांचा अंत / १११
१४. बडोद्यास आगमन आणि दत्तक विधान / ११४
१५. राज्यकारभारातील दक्षता / ११९
१६. महाराजांच्या शिक्षणासंबंधाने वापरलेली कार्यदक्षता / १२९

१७. राज्ञीपुत्र प्रिन्स ऑफ वेल्स यांची भेट / १३३
१८. दिल्लीचा बडा दरबार व काशीयात्रा / १३७
१९. हिंदुस्थान सरकारने केलेला सत्कार / १४२
२०. राजकन्या व महाराज यांचा विवाह / १४७
२१. श्रीमंत सयाजीराव महाराज यांचे अधिकारारोहण / १५२
२२. पौत्रावलोकन / १५६
२३. सौ. चिमणाबाई यांचा स्वर्गवास व श्रीमंत सयाजीराव महाराज यांचे दुसरे लग्न / १५९
२४. श्रीतारकेश्वर महादेवाची स्थापना / १६१
२५. प्रतिष्ठित लोकांनी बडोद्यास येऊन महाराणी साहेबांस दिलेला मान / १६४
२६. महाराजांच्या आरोग्यासंबंधी उत्सव / १६७
२७. ठिकठिकाणच्या यात्रा आणि त्यांचे औदार्य / १६९
२८. सौ. ताराबाई यांचा शेवट / १७१
२९. जन्मभूमीचे दर्शन / १७४
३०. शेवटची तीर्थयात्रा आणि औदार्य / १७६
३१. आयुष्याची अखेर / १७८
३२. श्रीमंत सयाजीराव महाराजांची कृतज्ञता / १८३
उपसंहार - चरित्रक्रमाचे सामान्य समालोचन / १८६

परिशिष्टे

१. माने वंशाचा वंशवृक्ष / १९७
२. महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड यांची जन्मपत्रिका / १९८
३. गायकवाडांचा वंशवृक्ष / १९९
४. राणी जमनाबाई यांच्या संबंधाने वर्तमानपत्रात आलेल्या संस्कृत कविता / २००
५. राज्ञी जमुनाकाव्य (संस्कृत) / २०२
६. राजा सर टी. माधवराव दिवाण यांनी लिहिलेले महाराणींचे चरित्र / २११

## भाग पहिला

# पितृकुलाची त्रोटक हकीकत आणि जन्मवृत्तांत

### मुसलमानी अम्मल व त्यात मराठ्यांनी सामान्यतः देशहिताची बजावलेली कामगिरी

परदेशांतील लोकांनी हिंदुस्थानावर असंख्य स्वाऱ्या करून, या देशांतील लोकांना 'दे माय धरणी ठाय' असे करून सोडले की ज्यांनी हिंदू राजांना आपले मांडलिक बनवून, त्यांच्या हातूनच तजाती यांच्या मानेवर सुया ठेवविल्या; ज्यांनी प्रत्येक एतद्देशीय मनुष्यास की ज्याचा या देशावर पूर्ण 'मालकी हक्क' आहे अशा हिंदू लोकांस 'काफर' ही संज्ञा देऊन, प्रत्येक बाबतीत हिंदूंच्या हक्काची, सत्तेची, अधिकाराची, वैभवाची व धर्माची पायमल्ली केली. हिंदू दृष्टीस पडताच त्याला मुसलमानी धर्माची दीक्षा देण्याचा त्यांनी जणू विडाच उचलला होता. दोन --- आणि रीतिरिवाज यांनी श्रेष्ठ मानिलेल्या ब्राह्मणांना --- कुदळीफावडी देऊन, त्यांच्याकडून मुसलमान --- खाडे खोदविण्याचे काम ते परस्थ सत्ताधारी मोठ्या सक्तीने घेत! इतकेच नव्हे तर हे काम करून घेण्यात ते मोठे भूषण समजत असत! हिंदू धर्म आणि जगाचे अर्थशास्त्र यांनी पवित्र मानलेल्या गोमातेचा वध ते हिंदूंच्या समोर मुद्दाम करीत! फार तर काय, त्या राज्यकर्त्या वर्गाकडून घडणारे प्रत्येक कर्म त्या देशातील लोकांची मने दुखविण्यास कारणीभूत होणारे असे. अशा महाबलाढ्य परकीय लोकांशी सामना करून, ज्या महाराष्ट्रांतील 'समशेर बहाद्दर' लोकांनी, परस्थांच्या रक्ताने आपल्या वखवखलेल्या आर्यभूस अभिषेक करून, आपले गतवैभव पुनः मिळविले व शौर्य आणि धैर्याच्या कामांत त्या महाराष्ट्रीयन वीरांनी आपले नाव अमर करून ठेवले. अशा महाभयंकर काळात दक्षिणेत जी कित्येक पराक्रमी मराठ्यांची घराणी स्वप्राणाची पर्वा न बाळगल्यामुळे उदयास आली, त्यातच रहिमतपूरचे जहागीरदार प्रख्यात माने या वंशाची गणना होते. रणधुरंधर प्रसिद्ध जाधव, महाप्रतापी व राज्य संस्थापक भोसले, प्राणाकडे न पाहणारे घोरपडे, प्रसंगी शिर कापून देण्यास तयार होणारे काळे व दाभाडे. त्याचप्रमाणे आपल्या देशाच्या

संरक्षणासाठी जिवावर उदार झालेले शिर्के, गेलेले वैभव पुनः मिळविण्यास उद्युक्त झालेले कदम व शेलार, महाराष्ट्र राज्याचे स्थापनेच्या कामात मदत करण्यास तयार झालेले कंक, मालुसरे, पवार, गायकवाड व शिंदे वगैरे महाराष्ट्रीय क्षत्रिय-घराण्यांनी प्रबल --- अंगातील खरी मर्दुमकी दाखवून, त्यांनी --- अनंतकाळपर्यंत तारांगणापर्यंत आपली --- आहेत. त्या माने वंशातील शूर पुरुषांनीही आपल्या क्षात्रधर्मास अनुसरून आपल्या अचल कीर्तीचा प्रकाश महाराष्ट्रावर पाडला. त्यांचा महाराष्ट्रात विशेष उपयोग झाल्याने हे घराणे बरेच पुढे आले. त्या समयी मुसलमान लोक हा प्रबल राज्यकर्ता वर्ग म्हणविला जात असे. धर्मप्रसारार्थ बऱ्याच हिंदू लोकांस त्यांनी सक्तीने बाटवून त्यांना आपल्या धर्मातील नावे देऊन त्यांचे रूपांतर केले! हिंदू देवांच्या मूर्ती आणि देवळे फोडून व मोडून त्या पवित्र जागी त्यांनी आपला धर्म कायम ठेवण्यासाठी काही गावांना आपली नावेही दिली. इतकेच नव्हे तर बरेच मुसलमान लोक या देशातील कायमचे वतनदारही झाले. याच क्रमास अनुसरून साताऱ्या जवळच्या रहिमतपूर गावी मुसलमान हे वतनदार झाले. त्यांचा हरप्रयत्नाने या माने घराण्यातील पुरुषांनी मोड करून, ती जहागिरी विजापूरच्या बादशहाकडून मिळविली.* या मान्यांचे पूर्वज प्रथम देवगिरीच्या जाधवांच्या राज्यात मोठ्या हुद्यावर होते. पुढे ते राज्य मुसलमानांच्या हातात गेल्यावर, त्यांना इतर मराठे सरदारांप्रमाणेच विजापूरच्या बादशाहीत नोकरी पत्करावी लागली! तिकडे त्यांनी मोठमोठ्या मोहिमांत विजय मिळवून, आपल्या कुळाचा मान वाढविला. या कुळात दत्ताजी या नावाचे शूर व राजकारणी पुरुष होऊन गेले. त्यांनी आपल्या मातृभूमीची सेवा यथार्थ बजावून आपले नाव रहिमतपूर येथील माने वंशाच्या वंशवृक्षात उपलब्ध असलेल्या नावात अग्रभागी कायम ठेवले आहे.

## माने घराण्यातील पराक्रमी पुरुषांनी मिळविलेली वतने व त्यांच्या चार शाखा

दत्ताजीनंतर या घराण्यात जे पुरुष निर्माण झाले. त्यांनीही आपल्या पूर्वजांच्या कीर्तीत भर घालून महाराष्ट्र-राज्य-संस्थापक छत्रपतींची चाकरी यथाशक्ती बजावली. हे घराणे प्रथम विजापूरच्या बादशाहीत राहून भावी काळात उदयास येण्यासाठी उद्युक्त होऊन राहिले होते. विजापूरची बादशाही औरंगजेबाने पायमाल केल्यावर, या घराण्यास थोडी आपत्ती भोगावी लागली; परंतु यांच्यात खरे क्षात्रतेज वसत असल्यामुळे, त्यांनी महाराष्ट्रभूच्या उद्धारार्थ पुढे आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांस एकनिष्ठेने मदत दिली. --- क्षत्रियांच्या अंगात

---

*या माने घराण्याचा बादशाही कारकीर्दीत मान फारच असे. त्यांच्या घराण्याच्या बखरीत म्हटले आहे की, "यांच्या मंडळींनी मोठ्यांच्या नामीने शूरत्वाची कामकाजे केली. त्या योगे त्या दयाळू सत्ताधीशांनी --- होऊन चार पाच लक्षांचा परगणा, जहागीर, इनामी गावे, सरंजाम --- मोर्चेल, चवरी व डंकानिशाणसुद्धा पागा वगैरे --- त्या प्रतीचे सरदार केले व दरबारात मोठा सन्मान राखीत --- शिक्केमोर्तबासहित वंशपरंपरेच्या करून दिल्या --- पुढे ---महाराजांचा उत्कर्ष होऊन रायगड येथे मुख्य गादीवर --- छत्रपतींच्या घराण्याशी यांचा पुढे ---

राज्यसंस्थापनेची दिव्य ज्योती होऊन, वीरश्रीचा संचार होताच या माने घराण्यातील अकलूज, वेळापूर व रहिमतपूर या शाखेतील वीर पुरुष मातृभूमीच्या उद्धारार्थ पुढे सरसावले आणि त्या --- मान देऊन, या मानी घराण्यांनी पूर्ण मान मिळविला. सातारच्या छत्रपतींचे संरक्षण --- पुढे याच घराण्यातील पुरुषांवर येऊन पडले होते. त्या घराण्यातील पुरुषांचा पराक्रम व उपयोग पाहून, सातारा, अक्कलकोट, मिरज, सांगली, कुरुंदवाड, हैदराबाद व कोल्हापूर वगैरे राज्यांतून या लोकांत मोठमोठी वतने मिळाली आहेत. त्या वतनांपैकी काहींचा या घराण्यातील लोकांत अद्यापि उपभोग मिळत आहे.

## चरित्र-नायिकेचा जन्म

या माने वंशातील विश्वासराव हे सातारच्या छत्रपतींचे मानकरी होते. छत्रपतींकडून त्यांना स्वतंत्र नेमणूक मिळत असे. महाराष्ट्राच्या नकाशास लाल रंग लागण्याचा दुर्दैवी योग आल्यानंतर, महाराष्ट्राचे सौभाग्यभूत सातारचे राज्य काळाच्या तडाख्यात सापडून नष्ट झाले; त्यामुळे विश्वासरावास रहिमतपुरास आपल्या मूळ जहागिरीवर परत यावे लागले! यांना दौलतराव व बळवंतराव असे दोन बंधू होते. ते फार हुशार असत. यांची राजकीय कामात गती बरीच पुढे गेलेली होती. सातारचे राज्य मोडल्यानंतर म्हणजे शालिवाहन शके १७७५ (इ.स. १८५४) श्रावण वद्य १० रोजी विश्वासरावांस तान्हीबाई या नावाचे कन्यारत्न प्राप्त झाले. या तान्हीबाईंच्या मातु:श्रीचे नाव बजाबाई असे होते व त्या प्रख्यात काळे घराण्यात जन्मलेल्या होत्या. बजूबाईंपासून विश्वासरावांना आनंदराव ऊर्फ अप्पासाहेब व गणपतराव ऊर्फ तात्यासाहेब हे दोन मुलगे आणि खाशीबाई व पूर्वोक्त तान्हीबाई या दोन कन्यांची प्राप्ती झाली.

○○○

# भाग दुसरा

# बाळपण व बडोद्यास आगमन

## बाळपण व त्या वेळची परिस्थिती

तान्हीबाईचे बाळपण बहुतेक बडोद्यातच गेले. त्या बाळपणाचे सर्व सद्गुण विशेष चित्ताकर्षक होते. त्यांचे सुंदर व मोहक वदन, शरीराची मनोहर ठेवण, राजकुलास शोभणारे त्यांचे गंभीर वर्तन व आप्तेष्टांशी प्रेमाने वागून त्यांची श्रद्धा आपल्यावर बसवून घेण्याची हातोटी वगैरे सद्गुण त्यांच्यात चांगले बसत आहेत असे लोकांच्या अनुभवास त्यावेळी आले. चाकर माणसांजवळ भयप्रीती दाखवून कसे काम घ्यावे, या सद्गुणांचा अंकुर त्यांच्या बाळपणातच दिसू लागला. त्यांना लहानपणापासूनच लिहिण्यावाचण्याचा नाद लागला होता. क्षत्रियांच्या मुलींच्या अंगात खरोखर जे सद्गुण असावयास पाहिजेत, ते सर्व यांच्यात आहेत असे त्यांच्या बाळपणातच लोकांच्या नजरेस आले. त्या मनाच्या फार मोकळया व उदार स्वभावाच्या असल्याने, हे कन्यारत्न कोणातरी मोठ्या राजाच्या पदरी पडेल, अशी बऱ्याच लोकांना कल्पना करण्यास संधी मिळाली. विश्वासराव ऊर्फ अप्पासाहेब यांची या कन्येवर फारच प्रीती असे. दौलतराव तर त्यांना आपल्या गळयातील ताईताप्रमाणेच वागवीत असत. --- व सामुद्रिकशास्त्राचे अभिज्ञाते 'या कन्येच्या हातून महत्त्वाची कार्ये घडतील. ही राजपत्नी होऊन --- राज्याचे संरक्षण होईल' असे भविष्य सांगत असत. --- त्यांच्या खरेपणाविषयी त्यावेळी इतर लोकांत मोठा संशय पडला होता. राजपत्नीला अनुरूप असे सुगुण तान्हीबाईच्या अंगात वसत होते, तेवढ्यावरूनच पूर्वोक्त भविष्य खरे होण्याची त्यांना आशा वाटत होती; परंतु प्रस्तुतच्या पडत्या काळात राजघराण्याशी आप्तसंबंध जुळण्याची माने-मंडळीस अशक्यता वाटली असेल हे उघड आहे.

## अंबाबाईचा स्वर्गवास व कदमांच्या कन्येशी लग्न करण्याचा निश्चय व ते लग्न फिसकटते

खंडेराव महाराज गायकवाड यांची राणी अंबाबाईसाहेब या सोनगडात स्वारीबरोबर असता, इ.स. १८६४ (संवत् १९२०) मध्ये महामारीच्या आजाराने निवर्तल्या होत्या. या स्वारीत बरीच

माणसे या रोगाच्या भक्ष्यस्थानी पडली असे म्हणतात. महाराजांच्या मनावर पत्नी वियोगापासून विभक्तपणाचा उठलेला ठसा हळूहळू कमी होऊ लागला होता; इतक्यात बजूबाईंचे बडोद्यास येणे झाले होते. राज्यास औरस वारस पाहिजे; याकरिता लग्न करणे हे इष्ट अशी त्यांच्या मनाची यावेळी समजूत झाली होती. अंबाबाई यांचा स्वर्गवास त्यास यद्यपि असह्य झाला होता, तथापि हिंदुस्थान सरकारची नवीन राज्यपद्धती 'औरस वारस असेल तरच आपल्या पाठीमागे राज्य चालविले जाईल' असा महाराजांच्या मातु:श्री चिमणाबाई साहेब यांचा फार आग्रह होता. बोडनदीजवळ शिरस म्हणून गाव आहे, तेथील कदम घराण्यातील कन्या वधू नेमस्त झाली. गणपतराव अनंत महाजन हे लग्नाचे वऱ्हाड घेऊन आले. कदमांचा जानोतसा मोतीबागेत ठेवला होता. नारायणराव भाऊ शिंदे यांच्या महाराजांनी कन्या पाहून येण्यास सांगितले. त्यांची व त्या वधूची भेट होताच. त्या मुलीला मोठी खोड* आहे असे त्यांना आढळून आले. ही गोष्ट पुढे महाराजांस समजली. 'राजाच्या राणीला व्यंग असणे हे चांगले नाही' अशी जिजाबाईंनी महाराजास सूचना केली व ती महाराजांनी तत्काळ मान्यही केली. अर्थात या कन्येशी लग्न करण्यास त्यांनी नाकारले व याच ठरलेल्या मुहूर्तावर येथील एखाद्या सरदार घराण्यातील कन्येशी लग्न लावण्याचा त्यांनी निश्चय केला.

## तान्हीबाई या वधू नेमस्त होतात

हा लग्नाचा बेत फिसकटला त्या दिवशी बजूबाई या तान्हीबाईस बरोबर घेऊन, राधाबाई साहेबांच्या मुक्कामावर संतुबाईंच्या भेटीस गेल्या होत्या. तान्हीबाईंच्या सद्गुणांची खबर महाराजांची मातु:श्री चिमणाबाई साहेब यांस लागून, त्यांनी तेथे येऊन तान्हीबाईस पाहिले; आणि खंडेराव महाराजांस निरोप पाठवून, 'ही मुलगी लग्न लावण्यास योग्य आहे व ती आपले आप्तांपैकी आहे' असे त्यांना कळविले. महाराजांनी वधूचे अवलोकन केल्यानंतर याच मुलीशी ठरलेल्या मुहूर्तावर लग्न लावण्याचा विचार चालविला; परंतु बजूबाई यांनी महाराजास अन्यद्वारे असे कळविले की, 'तान्हीबाईचे लग्न करण्याचा ज्यांना अधिकार आहे, ते स्वतः रहिमतपुरात आहेत; त्यांच्याशिवाय मला रुकार देता येत नाही.' या हरकतीमुळे ठरलेल्या मुहूर्तावर लग्न लावण्याचा बेत तहकूब ठेवावा लागला. नंतर मान्यांची मंडळी लग्नासाठी घेऊन येण्याकरिता, विठोबा काळे यास त्यांच्या मातु:श्री नानीबाई काळे व संतुबाई भोसले यांची पत्रे देऊन, रहिमतपुरास रवाना केले.

OOO

---

*व्यंगा कन्येशी लग्न करू नये असे हिंदू धर्मशास्त्रात म्हटले आहे. या कन्येच्या जिभेच्या मुळाशी एक काळा डाग होता असे म्हणतात. हीच मुख्य खोड यावेळी मोठे स्वरूप धारण करून पुढे आली. सामुद्रिकशास्त्रात जिव्हामूळ --- काळेपणा असल्यास 'स्यामायां कलहो नित्यं वंशच्छेदो विनिदिशेत्' असे म्हटले आहे.' हे गणपराव महाराजांचे दुसरे कुटुंब.

# भाग तिसरा

# लग्नास आलेली विघ्ने

## विठोबा काळे यांनी विश्वासराव मान्यास व त्यांच्या मंडळीस समजावून बडोद्यास आणले

विठोबा काळे हे रहिम तपुरास गेले; परंतु अप्पासाहेब माने तेथे नव्हते. ते आपली बहीण भागीरथीबाई यास भेटण्यासाठी संस्थान फलटण येथे गेले असल्याने, विठोबास तेथे जाणे भाग पडले. पुढे थोडक्याच दिवसांनी मान्यांचे खटले विठोबांनी बडोद्यास आणले आणि खंडेराव महाराजांस वर्दी दिली. अप्पासाहेब माने यांनी फलटणास असता, तान्हीबाईंकरिता --- पाहण्याचा यत्न चालविला होता; परंतु मनास पटण्यासारखे स्थळ कोठेही आढळून आले नाही; --- महाराज गायकवाडांकडील पत्रे घेऊन विठोबा --- पाहून त्यांस मोठा आनंद झाला. भागीरथीबाई यांनाही मोठे समाधान वाटले. मान्यांच्या मुली आजपर्यंत जशा चांगल्या ठिकाणी पडल्या, त्याचप्रमाणे तान्हीबाईसही चांगले स्थळ मिळण्याचा सुयोग आलेला पाहून माने कुटुंबातील मंडळीस आनंद झाला. काळयांच्या बरोबर अप्पासाहेब, बळवंतराव, अण्णासाहेब वगैरे माने मंडळी बडोद्यास आल्यावर त्यांचा मुक्काम प्रथम काळयांच्या वाड्यातच होता; परंतु पुढे महाराजांच्या आग्रहास्तव मान्यांचे सर्व कुटुंब नजरपागेत जाऊन राहिले.

## कदमांची मुलगी नाकारली त्यामुळे कदमांकडून मान्यांना पोहोचलेला त्रास

खंडेराव महाराजांचा स्वभाव फारच संशयखोर होता. 'मुलीची पत्रिका मिळवून पाहावी व नंतर कार्यास उद्युक्त व्हावे' असा लोकांनी त्यांना सल्ला दिला. यात कदमांच्या पक्षातील मंडळींचेही अंग होते. कदमांची मुलगी नाकारून मान्यांची कन्या वधू नेमस्त केली, ही गोष्ट कदमांच्या मनात वैषम्य उद्भवण्यास कारणीभूत झाली. मान्यांच्या विरुद्ध कदम मंडळींकडून अनेक यत्न सुरू झाले. मान्यांनी मुद्दाम आपला हेतू साधण्याकरिता कदमांची मुलगी महाराजांकडून नाकारली, असा कदम मंडळींच्या मनाचा पक्का ग्रह झाला व तोच वेळोवेळी मान्यांना फार नडला. अप्पासाहेब

माने हे यामुळे नजरपागेत मोठ्या बंदोबस्तात राहत असत. 'तान्हीबाईचे ग्रह महाराजांच्या ग्रहास मिळत नाहीत', असे ज्योतिषांनी सांगावे म्हणून कदमांनी बरीच खटपट केली. मान्यांचे पुरस्कर्ते बरेच असल्याने कदमांचा तो यत्न सफल झाला नाही. जन्मपत्रिका व गणनाडी वगैरे बरोबर जुळते असे ज्योतिषांनी कळविल्यावरून तान्हीबाईशी लग्न करण्याचा महाराजांचा निश्चय पुनः दृढ झाला.

## लग्नाचा बेत तूर्त तहकूब होतो

मान्यांचा पक्ष ज्योतिषांच्या मदतीने विजयी झाल्यावर दुसरेच एक संकट पुढे येऊन उभे राहिले. पत्रिका जमविण्याच्या भानगडीत महाराजांच्या पत्नीच्या मृत्यूस एक वर्ष होऊन गेले. दुसऱ्या वर्षांत लग्न करण्यास धर्मशास्त्र व रूढी यांची मनाई आहे, अशी अडचण महाराजांच्या जवळच्या काही मंडळींनी पुढे आणली. चांगल्या हेतूकरिता आपण लग्न करीत आहोत, तेव्हा जाणूनबुजून विषाची परीक्षा पाहण्याचा यत्न करू नये, असे महाराजांस वाटून त्यांनी लग्नाचा बेत तूर्त तहकूब ठेवला. 'मान्यांनी एक वर्षांपर्यंत येथे राहावे व वर्ष संपताच आम्ही लग्न करू' असे अप्पासाहेब मान्यास खंडेराव महाराजांनी पक्के आश्वासन दिले होते. तथापि, महाराजांचे विचार केव्हा व कसे बदलतील याचा मान्यांना भरवसा वाटत नव्हता. या कार्यास जास्त दिवस लागणे हे त्या काळच्या परिस्थितीत बिलकूल इष्ट नव्हते. तथापि महाराजांच्या इच्छेच्या आड येण्याचा प्रयत्न करणे हे मान्यांना विशेष जोखमीचे वाटत होते.

## मान्यांस नेमणूक होते व तान्हीबाईंची करमणूक करण्याचा प्रयत्न

अप्पासाहेब मान्यांची बडदास्त उत्तम रीतीने राहावी, या हेतूने खंडेराव महाराजांनी त्यांना चांगली नेमणूक करून दिली. शिवाय दोन खास घोडे आणि बैलांचा सिग्राम चंदी व माणसांसह त्यांच्या तैनातीत देण्याचा महाराजांनी हुकूम केला. दोन --- व शिवाय दुसरी सात आठ माणसेही सरकारातून मान्यांच्या तैनातीस मिळाली होती. महाराज कधी कधी नजरपागेत मान्यांच्या भेटीस येत असत. मान्यांकडील दररोजची वर्दी मागविण्याचा क्रमही महाराजांनी चालूच ठेवला होता. चार-आठ दिवसांनी एकदा महाराज स्वत: नरजपागेत येत जात. नजरेपागेतील हे राहण्याने तान्हीबाईंस प्रतिबंधासारखे झाले होते. कदमांची मंडळी मान्यांचे व्यंग शोधण्याच्या मार्गास लागली असल्याने माने मंडळी फारच सावधगिरीने वागत असे. तान्हीबाईच्या करमणुकीसाठी गणपतराव देवळेकर चित्रे यांची कन्या चंद्राबाई व त्यांची स्नुषा लक्ष्मीबाई यांस नेहमी नजरपागेत जावे अशी महाराजांनी आज्ञा केली होती. त्यांजकडून बरेच दिवस त्याप्रमाणे तान्हीबाईंची करमणूक झाली. पांडोबा गुरुजी यांची कन्या यमूताई याही महाराजांच्या आज्ञेवरून तान्हीबाईंकडे येत असत. या सर्व बायांच्या सहवासाने तान्हीबाईच्या शिक्षणात बरीच भर पडली असे म्हणतात.

## लग्न फिसकटू नये याकरिता देवांची मदत मागण्याचा प्रयत्न

खंडेराव महाराजांचे मत आपल्या संबंधाने बदलू नये, याकरिता अप्पासाहेब माने फारच जपत असत. हे मंगलकार्य निर्विघ्नपणे शेवटास जावे, यास्तव त्यांनी देवांना बरेच नवसही केले.

महाराज आपल्यावर सुप्रसन्न राहावेत, यासाठी त्यांनी बरेच यत्न केले. तान्हीबाई चांगल्या सुदृढ बनाव्यात म्हणून त्यांस पौष्टिक औषधे नित्य खाण्यास देऊन त्यांना बरेच सतेज बनविले. महाराजांनी पसंत केलेली ही --- सुगुणसंपन्न असल्यामुळे, महाराजांचे प्रेम दिवसेंदिवस त्यांच्यावर जास्त बसत चालले. खंडेराव महाराज ही आपल्या अंत:करणातील गोष्ट कोणाजवळही बोलत नसत. त्यामुळे त्यांच्या बोलण्याचा मान्यांना भरवसा बरोबर वाटत नसे. अप्पासाहेब माने हे पांडोबा गुरुजींच्या विद्यमाने नित्य श्रीनीळकंठेश्वराची आराधना करीत. 'गायकवाडांशी आमचा आप्तसंबंध जोड' असे भाविकपणाने ईश्वराजवळ ते दररोज मागत असत. बजूबाईंनीही डाकोर येथील श्रीरणछोडजीस नवस केला. सत्यनारायणाची पूजा व दुसरेही कित्येक नवस झाले. तान्हीबाई स्वतः दररोज तुळशीला पाणी घालून भावी पतीची प्राप्ती व्हावी याकरिता आराधना करीत असत. कदमांवर जसा प्रसंग आला, तसा आपणावर येऊ नये यासाठी माने मंडळीला काळजी बाळगणे हे विशेष उचित होते.

## महाराजांचे बाबूराव तेऱ्याशी भाषण व महाराजांचा झालेला ग्रह

मान्यांकडील वर्दी महाराजांस पोहोचविणारा कारकून बाबूराव तेरे हा एके दिवशी वर्दी देण्यास गेला असता खंडेराव महाराज त्यास सहज म्हणाले की, 'मान्यांच्या मुलीचा आम्ही स्वीकार न केला तर माने आमचे काय करतील?' महाराजांचा हा प्रश्न फार मार्मिक होता. त्यांची त्यावेळची गंभीर मुद्रा व विचारण्याचा रोख ओळखून बाबूराव यांनी त्यांस फारच सौम्य मुद्रेने खुबीदार जबाब दिला. 'महाराज साहेब, आपण राजे आहात. आपणाजवळ जास्त बोलण्याची माझी प्राज्ञा नाही. मान्यांना आपण पक्के अभिवचन दिले आहे. ते मोठ्या करड्या स्वभावाचे व मोठे मानी आहेत. ते येथून आपल्या मुलीला तसेच कधीही परत घेऊन जाणार नाहीत. आपण मुलीस नाकारल्यास तिला मृगासनासमोर आणून 'हलाल' करतील, याची आपणास खात्री असावी.' बाबूरावांचे हे बोलणे महाराजांस बरेच लागले. 'मी राजा आहे. माने हे जुन्या वेळचे जहागीरदार आहेत. ते माझ्यापुढे 'हलाल' कसे करतील?' या प्रश्नाचे उत्तरही बाबूरावांकडून समर्पकच मिळाले. 'बिघडलेला एक मनुष्य समोरच्या हजार मनुष्यास भारी असतो. नजरपागेत राहण्यास गेल्यापासून अप्पासाहेबांचे विचार फारच निराळे झाले आहेत. महाराजांनी कबूल केल्याप्रमाणे हे काम सिद्धीस गेले तर ठीक नाही तर आपणास देहांत प्रायश्चित्त घेणे भाग पडेल, असे ते नेहमी म्हणत असतात.' या जबाबाची महाराजांच्या मनावर बरीच छाप बसली. पुढे दोन-चार दिवसांनी महाराज नजरपागेत आले, तो त्यांना माने मंडळींचा बदललेला रंग दिसला. ही मंडळी तलवारीचे हात खेळण्यात व कसरत करण्यात त्यावेळी गढून गेली होती. दक्षिणेतील शूर मराठ्यांच्या अंगात जे गुण असण्याची महाराजांना अवश्यकता वाटत होती, ते सर्व या माने मंडळीत असून, हे खरे पाणीदार आहेतच असा त्यांच्या मनाचा पक्का ग्रह झाला.

## अण्णासाहेब माने हे आजारपणातून बरे होतात व महाराजांच्या वैद्यकीय गुणास यश येते

महाराजांच्या मनात माने मंडळींविषयी पूज्यभाव उत्पन्न होण्यास व तान्हीबाईस नेत्ररोग जडण्यास एकच गाठ पडली. त्यांचे डोळे दुखू लागले व पापण्यांचे केस गळून पडले. त्यामुळे महाराजांचे मन पुनः बदलेल किंवा काय, याची माने मंडळीस फार चिंता पडली. महाराजांनी स्वतः औषधोपचार करून तो रोग हटविला. त्यामुळे मानेमंडळीची ती चिंता अनायासे दूर झाली. विरुद्ध पक्षाच्या मंडळीने यावेळी गावात निरनिराळया प्रकारच्या कंड्या पिकविल्या; परंतु महाराजांनी आपला झालेला निश्चय ढळू दिला नाही. हे विघ्न जात आहे तोच दुसरे एक महाभयंकर संकट पुढे येऊन उभे राहिले. तान्हीबाईंचे बंधू अण्णासाहेब यांची प्रकृती विषमज्वराने एकदम बिघडून ते अत्यवस्थ झाल्यामुळे माने कुटुंबातील मंडळींच्या तोंडचे पाणी पळून गेले. दुर्दैवाने विपरीत गोष्ट घडलीच, तर आपले मनुष्य जाऊन 'प्रतिकूळ' झाले म्हणून शंका निघेल व आपणास विन्मुख होऊन रहिमतपुरास परत जावे लागेल या भयाने अप्पासाहेब व बजूबाई यांनी अन्नपाणी वर्ज्य केले. खंडेराव महाराजांनी ही स्थिती पाहन स्वत: औषधोपचार सुरू केले व त्यांच्या औषधांपासून  लवकरच चांगला गुण आला. महाराज स्वतः मोठे वैद्य आहेत असे यावेळी लोकांच्या निदर्शनास आले. अण्णासाहेबांची प्रकृती सुधारली. त्यामुळे महाराजांस फार आनंद झाला. 'अण्णासाहेब आजारी असताना त्यांच्यासमोर महाराजांची तसबीर ठेवली होती व स्वतः महाराज औषध देत असताही गुण न आला तर ते आमचेच दुर्दैव,' असे अप्पासाहेब हे महाराजांस एकदा सहज विनोदात बोलल्यापासून त्यांच्याविषयी महाराजांच्या मनात आदरबुद्धी जास्त वाढली.

## संतुबाई भोसले व इतर मंडळींनी केलेली मदत

कदमांच्या पक्षाच्या मंडळीने महाराजांच्या आप्तांपैकी काही सरदारांस वळवून घेऊन त्यांच्याद्वारे मान्यांची निर्भर्त्सना आणि आपली थोरवी स्पष्ट शब्दांनी चालविली. महाराजांनी मान्यांच्या घराविषयी आणि या मुलीसंबंधाने चांगली माहिती मिळाली असल्याने कदमांच्या खटपटीचा महाराजांच्या मनावर मान्यांच्या विरुद्ध संस्कार घडला नाही. संतुबाई भोसले यांच्याद्वारे महाराजांचे अंतःकरण मान्यांकडे विशेष आकर्षिले जात असे. त्या नित्यशः महाराजांचे मन मान्यांकडे वळविण्याचा यत्न करीत. संतुबाईवर महाराज फार ममता करीत असत. मान्यांचा संबंध गायकवाडांच्या घराण्याशी यावेळी जडला गेला; हे सर्व श्रेय संतुबाईसच आहे. तान्हीबाई या गायकवाडांच्या घराण्यात आल्याने पुढे ज्या कित्येक महत्त्वाच्या गोष्टी घडल्या त्याचे श्रेयही त्यासच दिले पाहिजे. अनेक प्रकारच्या दुस्तर अडचणी आल्या असतानाही जी मंडळी यासमयी दृढनिश्चयाने वागली व ज्यांनी मान्यांच्या घराण्याचा गायकवाडाच्या घराण्याशी संबंध जुळविण्यास निरपेक्षतेने साहाय्य केले, त्यांचे माने मंडळीने शेवटी आभार मानून त्यांचा पुढे उत्तम गौरव केला असल्याचे आढळून येते.

 OOO

# भाग चौथा

# लग्नसमारंभ, सुखाचे दिवस आणि पितृवियोग

### लग्न समारंभ व पतीगृही आगमन

अनेक संकटांचे निरसन झाल्यावर लग्नकाळ समीप आला. तान्हीबाईंचे ज्या मुहूर्तावर पाणिग्रहण व्हावयाचे तो चांगला साधला जावा यासाठी गायकवाड व माने कुटुंबातील मंडळीने फार प्रयास केले. खंडेराव महाराजांकडून लग्नाची तयारी होण्यास वेळ लागला नाही. मान्यांकडील सर्व तयारी झाली. लग्न ठरून एक वर्ष झाले होते. त्यामुळे महाराजांनी ठरविलेला सुमुहूर्त साधण्यास मान्यांना हरकत पडली नाही. शेवटी संवत् १९२२ (इ.स. १८६६) च्या वैशाख शुद्ध १२ रोजी गोरज मुहूर्तावर तान्हीबाईंचा पाणिग्रहणविधी खंडेराव महाराजांनी हिंदू धर्मशास्त्रास अनुसरून केला. तान्हीबाई या वेळेपासून बडोदे राज्याच्या पट्टराणी झाल्या. लग्नसमारंभ फारच थाटाचा झाला. ब्रिटिश सरकारचे त्या वेळचे रेसिडेन्ट कर्नल जे.टी. बार साहेब हे नजरपागेत आपल्या प्रिय पत्नीसह आले होते. ब्रिटिश सरकारकडून या आनंद प्रदर्शनार्थ रीतसर तोफांची सलामी झाली. खंडेराव महाराजांची स्वारी नूतन पत्नीसह गजारूढ होऊन मोठ्या थाटाने शहरातील राजवाड्यात गेली. तेथे गेल्यावर या राजदाम्पत्याने आपल्या कुलदेवतांचे दर्शन घेतले. महाराजांची मातु:श्री चिमणाबाई साहेब यांनी या राजपत्नीचे नाव जमनाबाई असे ठेवले. हेच त्याचे नाव पुढे फार प्रसिद्ध झाले. ठरल्याप्रमाणे हा लग्न समारंभ आटोपल्यावरून माने मंडळीस विशेष आनंद होणे हे स्वाभाविक आहे. तान्हीबाईंचे पुढील दिवस मोठ्या ऐश्वर्यात जातील असे जाणून त्यांनी ईश्वराचे फार आभार मानले. केलेल्या नवसांपैकी काही नवसकार्याची यथार्थ सिद्ध होताच मान्यांनी फेडले. जी मुलगी महाराष्ट्रातील एका कोपऱ्यामधील साधारण गावात जन्मून जिने आपले बालपण त्याच ठिकाणी घालविले तीच गुर्जराधीश खंडेराव महाराजांची अर्धांगिनी बनून राजवैभवाच्या शिखरास जाऊन एकदम विराजमान होते, ही ईश्वरी लीला अगाध आहे, यात काही संशय नाही.

## पितृकुलाचा सत्कार होतो

हा लग्नसमारंभ उरकण्याच्या कामात बळवंत व काका माने यांच्याबरोबर आलेले रंगोपंत माजगावकर आणि बाबूराव तेरे यांनी फार मेहनत केली. महाराजांनी या त्रिवर्गांचा चांगला सत्कार केला. अप्पासाहेब माने यांनी आपल्या सर्व मंडळींसह बडोद्यास राहावे, असा महाराजांकडून त्यांना अतिशय आग्रह झाला. महाराजांनी माने कुटुंबास राहण्याकरिता ८४,००० रुपये किमतीचा छीपवाड्यातील गणपतराव हुजरातवाले यांचा वाडा विकत घेऊन तो त्यांना बक्षीस म्हणून दिला. तसेच अप्पासाहेब माने व त्यांच्या कुटुंबातील मंडळीस हिरे, मोत्ये व सोने यांचे मौल्यवान दागिने महाराजांनी मोठ्या संतोषाने बक्षीस दिले. अप्पासाहेबांचे चिरंजीव अण्णासाहेब यांच्या नावावर सालीना ४२,००० रुपयांची नेमणूक व ६,००० रुपयांच्या उत्पन्नाचे 'मेघाकुई' नावाचे गाव महाराजांनी जहागीर करून दिले. पन्नास घोड्यांची एक पागा, एक हत्ती व एक पालखी हा लवाजमा त्यांस देऊन महाराजांनी आपली सुप्रसन्नता व्यक्त केली. अण्णासाहेबांच्या नेमणुकीच्या पेद्यांत २,००० दौलतराव माने, २,००० बळवंतराव माने, २,००० खंडेराव माने आणि त्यांच्या पाच मानकऱ्यांच्या नावावर ९०० रुपयांच्या नेमणुकी पटात दाखल केल्या होत्या. तान्हीबाईंचा प्रवेश भर्तृकुलात होताच सरकारातील दाखल्याप्रमाणे पितृकुलाचा जो मोठा सत्कार महाराजांकडून झाला त्याची किंमत व्यावहारिक दृष्टीने फारच जास्त आहे.

## महाराज व महाराणी यांची धर्मश्रद्धा

राणी जमनाबाई ऐश्वर्याच्या शिखरास जाऊन पोहोचताच त्यांचा बालपणातील उदात्त विचार आणि उदार स्वभाव यांचा योग्य उपयोग होण्यास संधी मिळाली. अनाथास आश्रय देणे व धार्मिक श्रद्धाही या वेळेपासून एकसारखी वाढतच चालली. खंडेराव महाराजांची हिंदू व मुसलमान धर्मांवर समान भक्ती असे; परंतु मुसलमान लोक हा पराभूत वर्ग असल्याने महाराज मुसलमानी धर्मावर आपली विशेष श्रद्धा दाखवीत. जिंकलेल्या लोकांवर राज्यकर्त्याने आपले अकृत्रित प्रेम ठेवल्यास राज्यास मोठी मजबुती येते हे तत्त्व खंडेराव महाराज पूर्णांशाने जाणत होते. बडोद्याचे राज्य हे गायकवाडांनी मुसलमानांचा पराभव करून मिळविले आहे. याकरिता त्या शूर लोकांच्या हृदयात गायकवाडांसंबंधीने विपरीत भाव उत्पन्न होऊ नयेत यासाठी ते फारच जपत असत. 'मुसलमानी धर्मावर आमची मोठी श्रद्धा आहे.' असे महाराज वारंवार म्हणत. त्यांनी मक्केस पाठविण्याकरिता एक मोत्यांची चादर (चांदवा) तयार केली होती; परंतु ती काही कारणाने तिकडे पाठविली गेली नाही. या चांदव्याची किंमत त्या काळी २,७६,९३७ रुपयांची होती. फक्त या चांदव्याबरोबर जे दुसरे सामान व दागिने पाठविण्याचे ठरले होते, त्या वस्तूंची (समया, कळस, छडी वगैरे) किंमत ८,९५,५२७-१४० होती. या चांदव्याप्रीत्यर्थ एकंदर खर्च रुपये ११,७१,४५८-१४० झाला. याचप्रमाणे मुसलमान लोकांस खुश ठेवण्याकरिता त्यांनी आणखी बरेच यत्न केले. महाराजांचा जन्म ज्या जातीत झाला त्या जातीच्या धर्माकडे त्यांचे लक्ष नसलेले

पाहून बरेच हिंदू लोक विस्मयात पडले. महाराजांची नूतन पत्नी जमनाबाई यांनी आपले सर्व लक्ष हिंदू धर्माकडे देऊन आपल्या अलौकिक औदार्याचा ठसा लोकांच्या हृदयावर उमटविला. जमनाबाईंनी हिंदू धर्माचा अभिमान दाखविण्याचा जो क्रम सुरू केला त्याला महाराजांचे पूर्ण अनुमोदन मिळाले होते. देवस्थानांचा जीर्णोद्धार, अनाथास अन्नवस्त्र, नित्य ब्राह्मण भोजने व अनेक प्रकारची धर्मकार्ये करून त्यांनी त्या सौख्यमय काळात बरीच मोठी सत्कीर्ती संपादन केली. प्रत्यक्ष महाराजांना मुसलमानी धर्म फार प्रिय असता त्यांच्याच अर्धांगिनीने हिंदू धर्माचा एवढा अभिमान बाळगलेला पाहून पुष्कळ लोक विस्मयात पडले होते. हिंदुस्थानात प्रचलित असलेल्या दोन बलाढ्य धर्मांपैकी एकाची आवड त्या धर्मातील लोकांस खुश ठेवण्यासाठी महाराजांनी प्रदर्शित केली व महाराणी जमनाबाई यांनी हिंदू धर्माचा विशेष अभिमान बाळगला असल्याने मुसलमान व हिंदू लोकांची मने फारच संतोषित झाली. कित्येक माहीतगार लोक असे सांगतात की, खंडेराव महाराजांची मुसलमानी धर्मावर फार निष्ठा होती. स्वतः मुसलमानी धर्माची दीक्षा घेण्याचा त्यांनी विचार केला होता; परंतु त्यावेळचे दिवाण गोविंदराव रोडे यांनी व इतर सदस्यांनी महाराजांना कळविले की, 'ही गादी मूळ हिंदूंची आहे. आपण मुसलमानी धर्मांत प्रविष्ट झाल्यास आपला या गादीवर हक्क राहणार नाही, याकरिता आपण तो धर्म स्वीकारू नये. इतकेही असून, आपण तो धर्म स्वीकारला, तर या राजगादीवर कोणास बसवावयाचे ते महाराजांनी ठरवून द्यावे.' हा युक्तिवाद पुढे येताच त्यांनी तो विचार तसाच तहकूब ठेवला.

## महाराणीस आपल्या अंगचे सुगुण प्रगट करण्यास संधी मिळते

खंडेराव महाराजांची स्वारी मकरपुऱ्या स नव्या व सुंदर राजवाड्यात बहुतेक करून राहत असे. राणी जमनाबाई यांनी थोड्याच दिवसांत महाराजांचे प्रेम आपल्यावर विशेष बसवून घेऊन त्या मान्यही झाल्या. काही महत्त्वाच्या राजप्रकरणी महाराज या नूतन; परंतु विचारशील अर्धांगिनीचा नेहमी सल्ला घेत असत. लिहिणे व वाचण्याचा त्यांनी आपला व्यासंग बराच चालविला. त्यांना मराठी भाषा चांगली येत होती. बडोद्यास आल्यावर गुजराथी भाषेचे ज्ञान त्यांनी मिळविले. तसेच त्यांना इंग्रजी भाषेचेही साधारण बोलण्यापुरते ज्ञान झाले होते.* मधुर स्वराची देणगी त्यांना ईश्वराने चांगली दिली होती. त्यामुळे त्यांनी आपल्या गान-कुशलतेने महाराजांचे मन आकर्षून घेतले. त्या कशिदा काढण्यासही शिकल्या होत्या. सारांश, राजपत्नीच्या अंगात जे सुगुण असावयास पाहिजेत ते सर्व जमनाबाईंच्या अंगी पूर्णांशाने वसत होते. त्यांच्याकडून घडणारे प्रत्येक सत्कार्य विशेष चित्ताकर्षक असे. ज्याअर्थी त्या तारुण्य, सौंदर्य, उत्तम ज्ञान व सद्गुण यात सर्वोत्कृष्ट होत्या, त्याअर्थी त्यांना खंडेराव महाराजांनी आपली खरी प्रीती वाहिली होती यात नवल नाही.

---

*राजा सर टी. माधवराव यांनी महाराणी जमनाबाई यांचे इंग्रजी भाषेत लिहिलेल्या संक्षिप्त चरित्राचा मराठी अनुवाद पाहा. (परिशिष्ट ६)

मान, संपत्ती व वैभव यांच्या साम्राज्यात या सुशील राजपत्नीचे सुगुण पाहून प्रत्येक विचारशील मनुष्यास मोठे कौतुक वाटत असे. त्यांनी या राजवैभवाचा सदुपयोग केला. दुरभिमान तर त्यांच्यात बिलकूल नव्हताच. त्यांचे कोमल हृदय परक्यांचे दुःखावलोकन होताच एकदम द्रवत असे. यांच्या या साम्राज्यात बरेच अनाथ, सनाथ होऊन सुख भोगू लागले. स्वतः राजा पराक्रमी व हुशार आणि राज्ञी सुशील व सुस्वरूप असल्यावर उभयतांस जे अप्रतिम सुख मिळत असते, त्याचे यथार्थ चित्रलेखन येथे होणे अशक्य आहे.

## महाराजांचे राज्ञीवर अकृत्रिम प्रेम बसते

खंडेराव महाराजांना शिकारीचा मोठा नाद असे. ते डबक्यास शिकारीला जात, त्यावेळी आपल्या अर्धांगिनीला बरोबर नेत असत. उभयतांच्या हृदयात परस्परांविषयी विशेष आदरभाव वसत असे. त्यामुळे वियोगजन्य दुःख त्यांस सहन होत नसे. खंडेराव महाराजांसारख्या मानी व महाशूर पुरुषाचे मन या राजपत्नीने आकर्षिल्या कारणाने जमनाबाई या गायकवाडी कुटुंबात विशेष वंद्य होऊन बसल्या. त्यांच्या सद्गुणशाली स्वभावाचा हा जो बदला मिळाला त्यापासून उभय कुलास विशेष अभिमान वाटू लागला. त्यांच्याकडून मिळणाऱ्या प्रत्येक वेळच्या सल्लामसलतीत गंभीर विचारांचे प्रतिबिंब स्पष्ट वटलेले असे. त्यांचे वय जरी अल्प होते. तथापि त्यांच्या विचारांना फारच प्रौढावस्था आली होती. या खेडेगावात व गरीब कुटुंबात जन्मलेल्या असता यांच्या या अलौकिक विचारांचे लोकांस मोठे आश्चर्य वाटत असे.

## पुत्रसंततीकरिता नवस करितात

आपणास पुत्र संतती व्हावी, या हेतूने खंडेराव महाराजांनी हा तृतीय संबंध जोडला होता. लग्न झाल्यापासून तीन वर्षांपर्यंत संततीचा योग न आल्यामुळे महाराज, जमनाबाई व त्यांच्या मातु:श्री ही मंडळी उदास झाली होती. राजपत्नी जमनाबाई यांची देवाधर्मांवर विशेष श्रद्धा असे. यास्तव पुढे लवकरच पुत्र होईल, अशी त्यांस आशा होती. महाराजांनी स्वतः मुसलमानांच्या पीरस्थानांस नवस केले. ओर नदीच्या काठी डभई तालुक्यातील अकोटी नावाच्या गावी 'दावलशहा'चे मोठे परिस्थान आहे. तेथे दर गुरुवारी खंडेराव महाराज हे स्वतः जात व जमनाबाईंसही पाठवीत असत. चांगली पुत्रसंतती होऊन हे राज्य उत्तम रीतीने चालावे एवढेच या दाम्पत्याचे त्या पिराजवळ मागणे होते. जमनाबाईंची श्रद्धा हिंदू धर्मावर असताही आपल्या पतीच्या आग्रहास्तव त्या पीरस्थानाच्या दर्शनास जात, हा त्यांच्या मनाचा केवळ मोठेपणाच होय.

## अप्पासाहेब माने स्वर्गवासी होतात

राणी जमनाबाई याप्रमाणे सुखोपभोग घेत असता, संवत् ४१९२ आषाढ शुद्ध १२ रोजी त्यांचे पितृसौख्य नष्ट झाले! अप्पासाहेब मान्यांचा हा अकस्मात झालेला अंत सर्वांना असह्य झाला. खंडेराव महाराजांनी आपली प्रिय पत्नी, अण्णासाहेब व त्यांच्या मातुःश्री बजाबाई यांचे बरेच

सांत्वन केले. या सर्वांनी सरकारवाड्यातच येऊन राहावे असे ठरवून महाराजांनी त्यांना वाड्यात आपल्याजवळ आणून ठेवले.

### एक परमहंस महापुरुष येतात

रणापूर कवठ्याजवळ 'मेथी सांमली' नावाच्या गावी एक महापुरुष आल्याची वार्ता राजपत्नी जमनाबाई यांस समजली. त्याजवरून त्यांनी बाबूराव तेरे यांस त्यांच्याकडे पाठवून त्यांस येथे आणविले. त्यांच्या दर्शनास राजपत्नी नित्य नियमाने जात असे. त्यांनी प्रसादादाखल एक ताईत राणी साहेबांना दिला. हे बुवा परमहंस दीक्षाधारी होते. ते येथे फार दिवस राहिले नाहीत. राजलक्ष्मीस ते विशेष त्याज्य मानीत. त्यांनी राणी जमनाबाईस स्पष्ट असेही सांगितले होते की, 'तुम्ही कितीही आराधना केली, तथापि पुत्रलाभ न होता एका कन्येचा जन्म होईल. राजवैभव तुम्हास दत्तक पुत्राद्वारे मिळेल व तो दत्तक सर्व प्रकारे योग्य असा निपजेल आणि तुमचा अंत कन्या वियोगानंतर होईल.' 'अनेक संकटांतून बचाव होऊन यश मिळावे.' याकरिता त्या स्वामीने पूर्वोक्त ताईत दिला होता. हे स्वामी पुढे कोठे गेले त्याचा पत्ता लागला नाही. आश्विन शुद्ध १० संवत् १९२६ रोजी हे स्वामी बडोद्यात आले होते. पुत्रसंतती व्हावी यासाठी राणी जमनाबाई यांनी आपल्या प्रिय पतीच्या अनुमतीने प्रख्यात ठिकाणच्या देवस्थानात अनुष्ठाने बसविली. धार्मिक श्रद्धेने युक्त अशा या राज्ञीने आपल्या निष्कलंकित समजुतीने पुष्कळ दैवी उपाय योजिले; परंतु त्यापैकी एकही सफल होऊ शकला नाही.

❍❍❍

भाग पाचवा

# मल्हारराव गायकवाडांच्या वर्तनाचा त्यांच्या बंधूकडून मिळालेला बदला

### भागूबाईंचा खंडेरावांस मारण्याचा प्रयत्न फसला

खंडेराव महाराजांची राजपद्धती फार सरळ असे. गणपतराव महाराजांच्या पश्चात ते बडोद्याच्या गादीवर आले. गादीवर बसल्यापासून एक-दोन वर्षे खंडेराव व मल्हारराव यांच्यात चांगले सख्य होते. मल्हाररावांची आवडती पत्नी भागूबाई* यांस राज्यतृष्णा उद्भवून मल्हाररावांच्या हातून खंडेराव महाराजांचे मन दूषित होण्यासारख्या बऱ्याच कृती घडल्या. त्या कामात मल्हाररावांचे सल्लागारही सामील असत. खंडेराव महाराजांचा स्वर्गवास होईल, तरच मल्हाररावांस गादी मिळेल हे ठरून चुकले होते. मल्हारराव हे स्वतः भोळ्या स्वभावाचे असून, मनाचे फार हलके असत. त्यांचे कृपेतील लोकांपैकी एखाद्याने काही सल्ला दिल्यास त्या कार्यास ते अविवेकपूर्वक प्रवर्त होत. भागूबाईचे वजन मल्हाररावांवर विशेष होते. त्यांच्या इच्छेविरुद्ध ते बिलकूल वागत नसत. त्यामुळे या राजकटंबात द्वेषाची मळे मजबूत रोवली गेली. महत्त्वाकांक्षा व स्वार्थी स्वभाव या दोन गणांस भागूबाईंच्या हृदयात प्राधान्य मिळाले होते. मल्हाररावास राज्यवैभव मिळेल, तरच आपणास राजपत्नी या नात्याने अधिकार वापरण्यास मिळतील, हे विचार त्यांच्या मनात बळावत होते. हृदयात मूर्तिमंत उभे राहिले. मल्हारावांचे प्रीतीतील मंडळींचे या कामास पाठबळ मिळताच, भागूबाईंनी खंडेराव महाराजांचे प्राण हरण करण्याचा यत्न चालविला. मल्हाररावांच्या कृपेतील बहुतेक मंडळी हलक्या विचारांची होती. कल्याणास असता चणे-मुरमुरे विकणारा बळवंतराव राहूरकर हा मल्हाररावांचे कृपेस विशेष पात्र झाला. याच्याद्वारे खंडेराव महाराजांस मारण्याची खटपट त्यांनी चालविली; परंतु तो घाट फसला गेला. गोष्ट फुटली आणि खंडेराव महाराजांनी आपल्या बंधूंच्या विकल स्वभावाकडे दृष्टी देऊन बळवंतरावांस कैदेत न ठेवता हद्दपार केले. 'त्यास कैदेत ठेवल्यास मी प्राण देईन.' असे मल्हाररावांनी काकुळतीने महाराजास

*या खानविलकरांच्या कन्या

सांगितल्यावरून बळवंतरावास जास्त कडक शिक्षा देता आली नाही. मल्हाररावांकडून असे काम व्हावयाचे नाही, अशी खंडेराव महाराजांची समजूत झाली होती. सल्लागार मंडळींच्या कृतीचाच हा परिणाम आहे, अशीही त्यांची कल्पना असावी.

## बडोद्याकडे उभे राहिलेले फितुराचे काहूर

इ.स. १८५७ मध्ये हिंदुस्थानात मोठे बंड झाले. त्यात मल्हारराव व त्यांची मंडळी यांचे बरेच अंग होते असे पुढे निदर्शनास आले. या प्रकरणाची लेखी जी हकिकत सापडते, त्याच्यावरून मल्हाररावांचा हा यत्न खंडेराव महाराजांस पदभ्रष्ट करून त्यास कैदेत ठेवण्यापुरताच होता असे दिसते. बंडखोर मंडळीस मल्हाररावांच्या विकल स्वभावाचा लाभ मिळाला. त्यांना मल्हाररावांकडून चांगली मदत मिळाल्याकारणाने बडोद्याच्या गादीवर मल्हाररावांस बसविण्याचा त्यांचा बेत ठरला. भागूबाईंनी या लोकांस पैशाची चांगली मदत दिली. गायकवाड सरकारच्या लष्करात या लोकांनी फितूर केला. कडी प्रांतापैकी विजापूर परगण्यातील व ब्रिटिश सरकारच्या खेडा जिल्ह्यातील कोळी आणि दुसरे लढाऊ लोक जमवून त्यांच्याकडून बंड करविण्यास त्यांनी सुरुवात केली. हे सर्व लोक खंडेराव महाराज आणि ब्रिटिश सरकार यांच्याविरुद्ध उठले होते. महाराजांनी ब्रिटिश सरकारच्या संरक्षणासाठी आपले काही लष्कर दिले व ते स्वतः बंडखोरांचे पारिपत्य करण्यासाठी जाण्याच्या तयारीत होते, इतक्यात बडोद्यातील या फितुराची साग्र हकीकत त्यांस समजली. त्यांनी सर्व फितुरी लोकांस धरून त्यांचा रीतसर तपास चालविला. या लोकांनी 'कँपातील रेसिडेन्स साहेबांचा बंगला व शहरातील राजवाडा यांच्यावर हल्ला करून खंडेराव महाराजांस पदभ्रष्ट करण्याचा व मल्हाररावांस बडोद्याची गादी देण्याचा आमचा विचार होता,' असे शपथेवर पुढे कबूल केले.* या सर्व गुन्हेगारांस त्यावेळच्या स्थितीस अनुसरून कडक शिक्षा दिल्या; परंतु मल्हाररावांस कोणती शिक्षा द्यावी, त्याचा बराच विचार पडला.

बडोद्याचे रेसिडेन्ट सर रिचर्ड शेक्सपियर यांनी मल्हाररावांस कडक कैदेत ठेवावे, अशी आग्रहपूर्वक सूचना केली; परंतु त्या उदार स्वभावाच्या महाराजांनी बंधूप्रीतीस अनुसरून ती सूचना नाकारली. 'मल्हारराव स्वतः अशा भानगडीत पडावयाचे नाहीत. हे त्यांच्या जवळच्या लोकांचे काम आहे. यात त्यांचे खरोखर अंग असेलच असे वाटत नाही' असे, महाराजांनी ब्रिटिश रेसिडेन्टास कळविले. या मतास पुढे सर रिचर्ड शेक्सपियर हे अनुकूल झाले.

## भागूबाईंचा खंडेराव महाराजांच्या विरुद्ध प्रयत्न

खंडेराव महाराजांनी आपल्या मनाचा यावेळी जो मोठेपणा दाखविला, त्याचा प्रकाश मल्हाररावांच्या अंत:करणात चांगला पडला; परंतु त्यांची पत्नी भागूबाई यांना ते विषतुल्य वाटले. मल्हाररावांच्या हृदयातील खंडेरावांविषयीची पूज्यबुद्धी त्यांनी नष्ट केली. भागूबाईंचा स्वभाव

---

*सर रिचर्ड शेक्सपियर यांच्या ता. १९ ऑक्टोबर सन १८५७ च्या रिपोर्टात या संबंधाची बरीच हकीकत लिहिलेली आहे.

महाराजांना ठाऊक होता. खंडेराव महाराजांचे मन भागूबाईविषयी शुद्ध नव्हते. या वेळेपर्यंत योजिलेले सर्व बेत फसले, असे जाणून भागूबाईंनी एक नवीन युक्ती योजिली. 'मल्हाररावास ठार मारण्याचा खंडेराव महाराजांचा प्रयत्न आहे' असे दाखविण्यासाठी वाघोजी लळीतवाल्यास पैसे देऊन त्याला भागूबाईंनी अनुकूल करून घेतले. त्यांनी स्वतः आपल्या प्रिय पतीच्या अन्नात विष घातले व मल्हारराव भोजनास बसण्यापूर्वी ओरड करून खंडेराव महाराजांनीच हे अघोर कृत्य करविले असे दाखविले व ब्रिटिश सरकारकडे त्यांनी फिर्याद केली; परंतु थोड्याशा तपासाअंती हे भागूबाईंचे दुष्ट कृत्य त्या वाघोजीच्याच मार्फतीने उघडकीस आले. 'भागूबाईंनी हे कृत्य मुद्दाम कपटाने केले व ते खंडेराव महाराजांच्या विरुद्ध ब्रिटिश सरकारचे मत व्हावे एवढ्याच हेतूने घडले आहे. याच मासल्याची भयंकर कृत्ये मल्हाररावांकडून दोन वेळा घडली; तथापि खंडेराव महाराजांनी आपल्या बंधुत्वाच्या दर्जास स्मरून, आजपर्यंत मल्हाररावांवर तशी रहीम नजर ठेवली, तसाच यावेळीही या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्याचा त्यांचा विचार दिसतो. या त्यांच्या इच्छेच्या आड येणे हे मला हल्ली बरे वाटत नाही,' हे त्यावेळचे रेसिडेन्ट कर्नल आर. वॉलेस यांचे म्हणणे विचार करण्यासारखे आहे.*

## मल्हारराव कैदेत जातात

इ.स. १८६३ मध्ये मल्हाररावांच्या पक्षाच्या मंडळीने, खंडेराव महाराजांस ठार मारण्याचा घाट घातला. गंगाधरशास्त्र्यांचा नातू तात्याशास्त्री हा या मसलतीत मुख्य होता. कँपांतील ब्रिटिश लष्करातील लोकांस पैसे देऊन, त्यांच्याशी याने स्नेह संपादिला. ब्रिटिश सोल्जरांच्या हातून गोळीबाराने खंडेराव महाराजांस ठार मारण्याचा या मंडळीचा मुख्य इरादा होता. खंडेराव महाराज हे बैलांच्या गाडीत बसून डाकोर क्षेत्री श्रीरणछोडजीच्या दर्शनास नेहमी जात असत. ही संधी साधून रस्त्यात त्यांना ठार मारावे असे ठरले होते; परंतु ही गोष्ट कर्नल वॉलेस यांस एकदम समजली. त्यांनी दोघा ब्रिटिश अंमलदारास गुप्तपणे साक्षी ठेवून तात्याशास्त्री यांच्या तोंडून ही गोष्ट वदविली. इतकेच नव्हे तर कारस्थानांतील अग्रेसर जो तात्याशास्त्री त्यास पकडून खुद्द कर्नल वॉलेस हे महाराजांकडे घेऊन आले. सर्व हकीकत उघड रीतीने कबूल करून विष्णुपंत नेने, बाबा भगवानदास आणि मुकुंदराव यांची त्याने नावे सांगितली; परंतु त्या तिघांनी ही गोष्ट बिलकूल कबूल केली नाही. मल्हाररावांच्या पूर्ण संमतीने हे कृत्य घडले आहे असे समजून मल्हाररावांस पाव्यास कैदेत ठेविले आणि या भयंकर गुन्ह्यात सामील असलेल्या लोकांवर काम चालवून

---

*मल्हाररावांचे प्रीतीतील बळवंतराव देव यांनी मल्हारराव गायकवाडांचा जो इतिहास प्रसिद्ध केला आहे त्यात ते या प्रसंगास अनुसरून म्हणतात की, "..... वाघोजी व तो स्वयंपाक्या यांस तुरुंगात टाकले होते; पण पुढे काही दिवसांनी त्यांस सोडून दिले. मल्हारराव महाराज राजे असते तर खंडेराव महाराजांचे त्यात अंग होते, असे स्वल्प आयाताने सिद्ध करता आले असते...." बळवंतराव यांचे हे उद्गार केवळ एकतर्फी आहेत.

त्यांस शिक्षा दिल्या*. मल्हाररावांवर यावेळी दया करू नये, असा कर्नल वॉलेस यांचा फार आग्रह पडला होता. महाराजांची मातुःश्री चिमणाबाई यांनी मल्हाररावांस कैदेत ठेवू नये म्हणून बरेच विनविले; परंतु कर्नल वॉलेस यांच्या अत्यंत आग्रहापुढे त्यांचे काहीच चालले नाही. कर्नल वॉलेस यांनी खंडेराव महाराजांस यावेळी सांगितले होते की, 'आपण आजपर्यंत त्यांचे याच मासल्याचे बरेच गुन्हे माफ केले; परंतु त्यांची सवय काही मोडली नाही, याकरिता जितका कडक बंदोबस्त ठेवेल तितका ठेवण्यास महाराजांनी आळस करू नये. केलेल्या कृपेचा बदला वाईट रीतीने देण्यास मल्हारराव चुकले नाहीत. यास्तव महाराजांनी त्यांच्याशी फारच दक्षतेने वागावे, असे दोस्तीच्या हक्काने आम्ही महाराजांस सुचवून ठेवतो.' या सूचनेबाहेर वागणे हे खंडेराव महाराजांस यावेळी इष्ट वाटले नाही. मल्हाररावांस पाद्रे येथे कडक बंदोबस्तात ठेवले होते. त्यामुळे त्यांची पत्नी भागूबाई यांना फार दुःख झाले. त्यांनी पतीविरहजन्य दु:खामळे लवरकच प्राण सोडला. ज्यांनी राज्य मिळविण्याच्या हेतूने आपल्या बंधूस ठार मारण्याचे एकसारखे यत्न चालविले होते, त्यांनाच एकदम कारागृहवास भोगावा लागला. त्यामुळे त्यांच्या सल्लागार मंडळीस अत्यंत वाईट वाटले असेल, हे येथे स्पष्ट सांगितले पाहिजे असे नाही.

## मल्हाररावास कैदेतून मुक्त करण्याचा प्रयत्न व ते करारावर सही करण्यास नाकारतात

जमनाबाईंचे लग्न झाले तेव्हा आपले दीर कैदेत आहेत असे त्यांस समजले. त्याजबद्दल त्यांस फार वाईट वाटले. त्यामुळे त्यांनी महाराजांचे मन मल्हाररावांसंबंधाने वळविण्याचा प्रयत्न केला. शेवटी त्यांनी एक नवीन युक्ती योजिली. आपणास संतती नाही याकरिता मल्हाररावांस येथे आणून त्यांचे लग्न करावे, असे एके दिवशी त्यांनी महाराजांस सांगितले. ही सूचना महाराजांनी मान्य करून विठोबा काळे यांस मल्हाररावांकरिता वधू शोधून आणण्यासाठी दक्षिणेत पाठविले. त्यांनी चांगली मुलगी पाहून बडोद्यास आणली; परंतु मल्हाररावांनी अशा अवस्थेत लग्न करण्याचे स्पष्ट नाकारले. 'कैदेतून मुक्त झाल्यावर लग्न करू' असे मल्हाररावांचे म्हणणे पडले. खंडेराव महाराजांनी शेवटी असे ठरविले की, 'मल्हारराव मी म्हणेन त्याप्रमाणे करार लिहून देत असेल, तर त्यास बंधमुक्त करता येईल.' त्याप्रमाणे खाली दिलेल्या शर्तीचा करार लिहून तो मल्हाररावांकडे सही करण्यासाठी पाठविला :

---

*सर रिचर्ड मिड यांच्या चरित्राचे पृष्ठ १६१ मध्ये म्हटले आहे की, "स. न. १८६३ मध्ये गादीवर असलेल्या आपल्या भावाचा विषप्रयोगाने व दुसऱ्या अन्य रीतीने खून करण्याच्या कटात सामील असल्याच्या आरोपावरून खंडेराव महाराजांचे हयातीपर्यंत मल्हाररावांस राजकीय कैद्यांप्रमाणे ठेवले होते. त्यांच्या त्या कटात सामील असलेल्या लोकांस लांब मुदतीच्या कैदेच्या शिक्षा दिल्या होत्या." त्याचप्रमाणे 'रुलर्स ऑफ बडोदा' या पुस्तकाचे पृष्ठ ३३६ व ३३० वरही असेच म्हटले आहे.

"१. आपल्या कुटुंबाच्या चालीप्रमाणे धाकट्या भावाने मोठ्या भावास जो मान आणि आदब देणे योग्य आहे, त्याप्रमाणे मी नेहमी आपणाशी वर्तणूक ठेवीन. आपण पादशहा आहात असे समजून आपली अबादानी व तनदुरुस्ती निरंतर सुखामध्ये राहावी अशी इच्छा ठेवीन. ज्या संस्थानावर आपण राज्य करिता त्याचे निरंतर कल्याण असावे."

"२. आपण गादीचे पूर्ण मालक आहात. मी आपल्या कुटुंबाचे रीतीप्रमाणे हमेशा दरबारात अथवा हरएक ठिकाणी आपल्या धाकट्या भावाच्या रीतीप्रमाणे अत्यंत खुशीने वागेन."

"३. आपल्यावर माझ्यातर्फेची जी मनुष्ये लेखी किंवा तोंडी वरिष्ठ सरकारकडे फिर्यादी करतील, तर त्या मी मंजूर करणार नाही."

"४. अज्ञानपणाने मी वाईट चालीच्या मनुष्यांवर भरवसा ठेवल्याने आपल्या संस्थानास धक्का येईल असे मजकडून घडू नये; याजविषयी आपली खात्री होण्याकरिता मी लिहून देतो की, आपण मजवर व ज्या लोकांशी माझा व्यवहार आहे त्यांच्यावर आपल्याकडून ज्या रीतीने आपण इच्छिता त्याप्रमाणे नजर-जप्ती राहण्याविषयी मजकडून हरकत नाही."

याप्रमाणे सरळ आणि राज्याच्या हिताच्या शर्तीवरही मल्हारराव हे सही करण्यास तयार झाले नाहीत. त्यांनी हा करार नाकबूल केल्यामुळे त्यांना मुक्त करण्याचा व लग्न करून देण्याचा बेत एकदम फिसकटला. 'संतती न झाल्यास दत्तक पुत्र घ्यावा; परंतु मल्हाररावांस आता सोडू नये,' असे भाऊ शिंद्यांनी महाराजांच्या मनावर यावेळी पूर्ण ठसवून दिले. या शर्ती मल्हाररावांनी कबूल केल्या नाहीत, याचे कारण त्या स्नेही म्हणविलेल्या मंडळींचे यापासून नुकसान होत होते हे उघड आहे.

OOO

# भाग सहावा

# वैधव्य आणि संकटांचा आरंभ

## खंडेराव महाराजांचे आजारपण व त्यांचा स्वर्गवास

राजवैभवाचा उपयोग राणी जमनाबाई या घेत आहेत तोच खंडेराव महाराजांच्या उदरात एका भयंकर व्याधीने आपले ठाणे दिले. ही व्याधी अमुक प्रकारची होती असे निश्चयाने कोणास कळल्याचे समजत नाही. महाराजांस आपल्या शारीरिक बलाचा व आरोग्याचा बराच अभिमान असे, त्यामुळे त्यांनी वैद्य व हकीम यांच्या त्या सूचना फक्त आरोग्यवर्धक अशा व्यापक होत्या. अमुक रीतीने त्या रोगास प्रतिकार करा असे स्पष्ट सुचविण्याची हिम्मत एकाही वैद्यास अथवा हकिमांस झाली नाही. महाराजांची प्रकृती बरोबर नसतानाही, ते राज्यकारभार काळजीपूर्वक पाहत. त्यांचे शरीराची इमारत ढासळत चालल्याची कोणालाही कल्पना झाली नाही. त्यांनी स्वत: औषधोपचार सुरू केले; परंतु रोग पूर्ण दशेत आल्यामुळे त्यांचा उपयोग घडला नाही. हकिमांनी महाराजांस घाम काढण्याचा सल्ला दिला. त्यांनीही शेवटी तो उपाय पसंत केला. संवत् १९२७ च्या कार्तिक वद्य १४ ला सकाळी दहा वाजता, मकरपुऱ्यास राजमहालातील एका बंद खोलीत गवऱ्यांच्या पाच मोठ्या धुण्या करून, खंडेराव महाराज गणूबाबास बरोबर घेऊन, खोलीची दारे व खिडक्या बंद करून ते आत बसले. या कृतीने घाम बराच निघाला. या दिवसापासून त्यांची प्रकृती फार बिघडली. तथापि ते राज्यकारभार पाहतच होते. शेवटी मार्गशीर्ष शुद्ध ६ तारीख २० नोव्हेंबर सन १८७० रोजी महाराजांची प्रकृती अत्यवस्थ झाली. भाऊ शिंदे यांनी दिवाण लिंबाजी दादा ढवळे यांचेकडे अनाजी जासुदास पाठवून, त्यांस महाराजांच्या अत्यवस्थपणाची खबर दिली. लिंबाजींनी हुजूर कामदार गोविंदराव लक्ष्मण सिंदकर यास पुढे रवाना करून, ते रेसिडेन्ट कर्नल बार यास बरोबर घेऊन, मकरपुऱ्यास महाराजांकडे गेले. हे उभयता पोचण्यापूर्वीच खंडेराव महाराजांचे प्राणोत्क्रमण एक वाजता झाले होते. कॅम्पातील डॉक्टर व दप्तरदार हरिपंत यांस कर्नल बार साहेबांनी बोलावून त्यांनी शवाची खात्री केली. तपासांती रोगानेच प्राणोत्क्रमण झाल्याचे

ठरले. जमनाबाई या त्यावेळी मकरपुऱ्यातच होत्या. त्यांच्यावर हा आलेला दुःखद प्रसंग सर्वांस असह्य झाला. राजमहालात त्यावेळी दुःखाची जी वृष्टी झाली; तो देखावा फारच भयंकर होता. राजसंपत्तीची अव्यवस्था होऊ नये, म्हणून गोविंदराव लक्ष्मण हुजूर कामदार व हरिपंत दप्तरदार यांच्याकडून कर्नल बार साहेबांनी जामदारखाना व जवाहीरखाना वगैरे जोखमीच्या ठिकाणी कुलुपे लावून पक्का बंदोबस्त केला.

### जमनाबाई यांचे दुःख व मल्हाररावांस बंधमुक्त करण्याचा विचार ठरतो

या राज्याची व्यवस्था आता कशी करावयाची, त्याबद्दल कर्नल बार ब्रिटिश-सरकारचे रेसिडेन्ट, दिवाण लिंबाजी दादा, गोविंदराव लक्ष्मण हुजूर कामदार आणि नारायण भाऊ शिंदे यांच्यात बरीच वाटाघाट झाली. महाराणी जमनाबाई या गरोदर आहेत, तेव्हा त्या गर्भाच्या नावाने राज्यकारभार चालवावा. नारायणराव पेशव्यांच्या वधानंतर त्यांची पत्नी गरोदर असल्यामुळे पेशवाई त्या गर्भाच्या नावाने चालविली होती, तोच प्रकार यावेळीही अमलात आणावा, अशी सूचना या मंडळीत पुढे आली; परंतु वादविवादांती मल्हाररावास पाद्र्याहून येथे आणून राज्यकारभार सोपवावा असे ठरले. मल्हाररावास बंधमुक्त करून, घेऊन येण्यासाठी ताबडतोब माणसे रवाना झाली. खंडेराव महाराजांचा स्वर्गवास सर्वांस शेवटी फार तापदायक झाला. महाराणी जमनाबाईंचे सौख्यशिखर अकस्मात तुटून पडल्यामुळे त्यांचा व त्यांच्या आप्त वगैरे मंडळींचा धैर्यरूपी पर्वत खचून पडला!* त्यांच्या शरीराची जवळच्या मंडळीस फार काळजी पडली. त्या गरोदर असल्याने त्यांना यावेळी फारच जपावे लागले. याप्रसंगी दुःखातिरेकजन्य विलाप त्यांच्याकडून चालूच होते. हे दुःख विसरून जाण्यासारखे नव्हते. सारांश, पतीवियोगाचा हा प्रथम दिवस अतिशय तापदायक होऊन तो त्यांच्या सुखाचा विध्वंस करणारा असाच गेला.

### प्रजेकडून व्यक्त झालेला शोक

खंडेराव महाराजांच्या अकाली मृत्यूमुळे प्रजाजनास अत्यंत दुःख झाले. व्यापाऱ्यांनी आपले व्यापार एकदम बंद केले. तीन दिवसांपर्यंत बडोदे राज्यातील सर्व ठिकाणांचे बाजार बंद होते. शहरातील दरवाजे एकदम बंद करण्यात आले. महाराजांच्या स्मशान यात्रेची तयारी इकडे चालूच होती. यावेळी बडोद्यातील लोकांच्या पुढे 'राज्यकर्ता कोण येतो' हेच विचार मूर्तिमंत उभे राहिले होते. 'जो राजा आपल्या पाठीमागे औरस वारस ठेवल्यावाचून मरण पावेल, त्याचे राज्य

---

*राजा सर टी. माधवराव यांनी या प्रसंगाचे फारच हृदयद्रावक वर्णन केले आहे. ते म्हणतात, "..... दुर्दैवाच्या पक्क्या फेऱ्यात सापडून राणी जमनाबाई या त्यांच्या सौभाग्याचे शिखर ढासळून पडल्यामुळे त्या खाली पडल्या. तारुण्य व सामर्थ्य यांच्या भरात महाराज खंडेराव हे एकाएकी स्वर्गवासी झाले. सोज्वळ, परंतु सौख्याच्या काळानंतर आलेला हा काळोख दिवसेंदिवस जास्तच पसरत चालला. निराधार बिचारी विधवा राणी जमनाबाई, तीन महिन्यांची यावेळी गर्भवती होती, हेच मुख्य कारण तिजवरील भावी संकटास भयंकर रीतीने कारणीभूत झाले...."

खालसा होते,' ही त्यावेळची ब्रिटिश-सरकारची राजपद्धती प्रजावर्गास ठाऊक होती. त्यामुळे नागरिक जास्त चिंतातुर झाले. कदाचित मल्हाररावांस राज्य मिळाले, तर त्याचा परिणाम काय घडेल, त्याचेही विचार लोकांत याप्रसंगी चालू झाले होते. शोकाने व्याकूळ झालेला प्रजावर्ग आता आपली अवस्था काय होईल, या विचारात गढून गेला आणि खंडेराव महाराजांसारखा खरा प्रजापाळ आता मिळणे अशक्यच, असे जाणून प्रजा फार हळहळू लागली!

## मल्हारराव हे राजे होतात

सायंकाळचे पाच वाजण्याच्या सुमारास मल्हारराव हे पाद्रे येथून बडोद्यास आले. यांच्याबरोबर तात्या टोणपे व बापाजी सदाशिव दिघे हे होते. त्यांची स्वारी मोतीबागेजवळ येताच, त्यांनी कर्नल बार साहेब आले आहेत किंवा नाहीत त्याचा तपास केला. ते आले नव्हते, त्यामुळे मल्हारराव कॅम्पात त्यांच्या बंगल्यावर गेले. कर्नल बार साहेबांनी अण्णासाहेब मान्यांच्या आग्रहास्तव मल्हाररावांजवळ 'राणी जमनाबाई या गरोदर आहेत. त्यांना पुत्र झाल्यास राज्यावर माझा कोणत्याही प्रकारचा हक्क नाही,* असा तोंडी करार करून घेतला.

'ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधी वेळोवेळी ज्या सूचना करतील त्याप्रमाणे मी चालेन,' असेही मल्हाररावांनी कबूल केल्यानंतर ते भ्रातृशवावलोकनासाठी मोतीबागेत आले. यावेळी मृत महाराजांचे शव मकरपुऱ्याहून मोतीबागेत तंबू ठोकून त्यात आणून ठेवले होते. महाराणी जमनाबाई आणि राजकुटुंबातील सर्व बाया मकरपुऱ्याहून मोतीबागेत आणले असल्यामुळे त्यांचा शोकमय आक्रोश एकसारखा चालू होता. मल्हारराव मोतीबागेत दाखल होताच हुजूर कामदार गोविंदराव लक्ष्मण यांनी मल्हाररावांची द्वाही फौजदारी खात्याकडून शहरात फिरविण्याचा हुकूम सोडला. सारांश, मल्हाररावांस हा दिवस बंदिवासजन्य दुःखाचा विसर पडण्यास कारणीभूत झाला. असो.

## खंडेराव महाराजांची स्मशान यात्रा

खंडेराव महाराजांची शेवटची स्वारी लवकरच निघाली. या स्वारीबरोबर मल्हाररावही गेले होते. महाराजांचे प्रेत पालखीत घालून ते शोकजन्य इतमामानिशी केदारेश्वरी नेले. रिसाले व पलटणी उलटी हत्यारे घेऊन व शोकाचा पोशाख घालून स्वारीबरोबर चालल्या होत्या. कर्नल बार हे व कॅम्पातून महाराजांचे स्मशान यात्रेकरिता केदारेश्वरी आले होते. महाराजांचे शेवटचे दर्शन घेण्याकरिता नागरिकांच्या जमावाने स्वारी जाण्याचा रस्ता दुतर्फा भरून गेला होता. सायंकाळी ७॥ वाजता ही स्वारी केदारेश्वरी पोहोचली. चंदनाच्या चितेवर महाराजांचे शव ठेवून मल्हररावांनी त्यांस कर्पूरयुक्त अग्निसंस्कार करविला. दाखल्याप्रमाणे वयाच्या मानाने ४२ तोफांची शेवटची सलामी झाली. पलटणी व रिसाले यांच्याकडून तीन वेळा बंदुकांचे बार झाले. साडेदहा वाजण्याच्या सुमारास सर्व मंडळी स्नान करून परत घरी गेली. हा दिवस बडोद्यातील लोकांस विशेष धामधुमीचा व शोकपर्यवसायी झाला. बडोदे राज्यावर पुढे जी मोठमोठी संकटे

---

*कर्नल बार साहेबांनी ता. १ डिसेंबर सन १८७७ रोजी मल्हाररावांजवळून या बाबतीचा करार नंतर लिहून घेतला होता.

आली, त्याचा पाया याच दिवशी घातला गेला. खंडेराव महाराजांच्या कृपेतील आणि त्यांच्या आश्रयांतील लोकांना तर यावेळेपासून पडती दशा आली. मल्हाररावांच्या हातून आपण जिवंत राहू किंवा नाही याचाही राज्यकारभारातील कित्येक लोकांस संशय उद्भवला. प्रजेच्या कल्याणाकडे ज्या राजाचे विशेष लक्ष होते, तो निर्दय काळाच्या तावडीत सापडून नष्ट झाल्याने आणि त्या जागी खेळगड्यांच्या तंत्राने वागणारा राजा येऊन दाखल झाल्यामुळे बरेच लोक चिंतातुर झाले. महाराणी जमनाबाई यांना पुत्र झाल्यास आपणास चांगले दिवस येतील, एवढ्या दैवी आशेवर मात्र ते मंडळ काळ कंठित होते. तोच त्यांच्या मनाचे समाधान करून घेण्याचा यावेळी समयोचित मार्ग उरला होता, असे म्हटले असता चालेल.

## महाराणीची दान स्थिती

वैधव्य-दुःखाग्नीने पोळलेल्या महाराणी जमनाबाईस सरकार वाड्यात येऊन राहावे लागले. ज्या ठिकाणचा प्रवेश पूर्वी त्यांना आनंददायक वाटत असे त्याच स्थळी शोकातुर होऊन जाण्याचा त्यांना प्रसंग आला! मकरपुऱ्याच्या राजमहालाचा त्यांना या वेळेपासून चिरकालिक वियोग झाला. जेथे विलास केले, तेथेच शोकातुर होऊन राहण्याचा त्यांना दुर्दैवी योग आला. राजवाड्यातील प्रत्येक वस्तू त्यांना उदास दिसू लागली. खंडेराव महाराजांशी राजतृष्णेच्या पाशात सापडून ज्या मल्हाररावांनी अनेक वेळा वैरभाव साधला, त्यांच्याच ताब्यात राहून आयुष्य घालविण्याचा प्रसंग आलेला पाहून महाराणी जमनाबाई यांना पराकाष्ठेचा खेद वाटणे हे अगदी साहजिक आहे. ज्यांचे सर्व मनोरथ पूर्ण करण्यासाठी खंडेराव महाराजांनी अतिशय प्रयास केले, त्यांनाच आज दुसऱ्याची याचना करण्याचा आलेला प्रसंग दयाजनक तर खराच; परंतु तो मरणापेक्षाही फार दुस्तर असा त्यांना वाटला. मल्हारराव जे अन्न-वस्त्र देतील तेवढ्यावर संतोष मानून घेण्याचाच हा प्रसंग होय. त्यांची ही दीन स्थिती पाहून ज्यांचे हृदय द्रवले नाही, असे मल्हाररावांशिवाय दुसरे कोणीही नव्हते.

## एके बाजूस दुःख व दुसरीकडे आनंद

महाराज खंडेराव यांचा जो स्वर्गवास त्यांच्या आप्त इष्टांस व जिवलग लोकांस असह्य झाला, तोच त्यांचे प्रत्यक्ष बंधूस विशेष आनंददायक घडला. मल्हारराव आणि त्यांचे साहचर्यातील लोकांच्या हातात सौख्याचा मुख्य ठेवा अकस्मात आला. खंडेरावांच्या मृत्यूचा दिवस मल्हारराव व त्यांच्या मंडळीच्या खऱ्या भाग्याचाच होता. मस्करे, खेळगडी आणि व्यसनी लोकांनी मल्हारराव गादीवर येताच मोठे उत्सव केले. परमपूज्य खंडेराव महाराजांच्या मृत्यूनंतर परस्पर भिन्न अशा असंख्य गोष्टी घडल्या. एका बाजूस दुःख व दुसऱ्या बाजूस आनंद! महाराणी जमनाबाई व खंडेराव महाराजांवर प्रीती ठेवणारे लोक दुःखाने व्याप्त झाले आहेत, तोच दुसऱ्या बाजूस मल्हारराव आणि त्यांचे मंडळ हे नाचरंगात दंग होऊन यथेच्छ विलास भोगू लागले! एकास दुःख तर दुसऱ्यास आनंद असा राज्य प्रकरणात जगाचा नियमच ठरलेला दिसतो. प्रत्यक्ष भ्रातसुख नष्ट झाले असताही जो राजा विलासात काळ कंठितो, त्याच्या बंधूप्रीतीसंबंधाने विशेष

खुलासा करण्याची जरूरत नाही. राज्यसुख मिळावे याकरिता अत्यंत साहसाची कामे केली. तथापि, ते मिळू शकले नाही व यासमयी ते अकस्मात मिळाले, याबद्दल मल्हाररावांस आल्हाद होणे हे स्वाभाविक आहे.

### मल्हारराव राणी जमनाबाईंचे सांत्वन करतात

महाराजांच्या मृत्यूनंतर मल्हारराव हे तीन दिवसांपर्यंत जमनाबाईंकडे दिवसातून दोनदा येत असत. पतीवियोगाने हतभाग्य बनलेली ही राणी आपले मुख कोणासही दाखवीत नसे. चौथ्या दिवशी भाऊ शिंदे, हरिबा गायकवाड, लिंबाजी ढवळे आणि मल्हारराव हे सकाळी नऊ वाजता राणी जमनाबाईंच्या सांत्वनार्थ आले. यावेळी मल्हाररावांनी दुःखाचा विसर पडावा म्हणून मोठ्या कळवळ्याने राणी जमनाबाईंचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. 'मी बाईसाहेबांचा पुत्र किंवा दीर म्हटले तरी एकच. मजवाचून त्यांना कोणी नाही. मलाही त्यांच्याशिवाय दुसरे कोणी नाही.' हे मल्हाररावांचे भाऊ शिंद्यांशी झालेले भाषण ऐकून महाराणी जमनाबाईंनीही त्याच मासल्याचे उत्तर देऊन आपले शुद्ध मन व्यक्त केले. 'दादासाहेबांवाचून मला दुसरा कोणाचाही आधार नाही. एका विचाराने चालणे होईल तर मी हे राज्य आपणांस गर्भात सुद्धा दिले आहे. मी फक्त शेर अन्नाची व जुन्या वस्त्रांची अधिकारीण.' हे शब्द मल्हाररावांस फारच गोड वाटले; परंतु वाड्यात गेल्यावर तत्काळ त्यांच्या बुद्धीस भ्रंश पडला. त्यांच्या सल्लागार मंडळीने निराळे भासवून जमनाबाईविषयी त्यांच्या मनात विरुद्धभाव उत्पन्न केला. मल्हाररावांकडून पुढे ज्या कित्येक गोष्टी घडत चालल्या त्याच्यावरून पूर्वीचे त्यांचे बोलणे केवळ दाखविण्यापुरतेच होते अशी महाराणी जमनाबाईंची समजूत झाली.

### भाऊ शिंद्यांचा कारागृहवास व मृत्यू

खंडेरावांच्या कारकीर्दीत अखेरीस कर्नल बार यांची भाऊ शिंद्यांवर काही कारणांमुळे इतराजी झाली होती. मल्हाररावांचे मनही भाऊ शिंद्यांसंबंधाने शुद्ध नव्हते. लोकांस कळू नये म्हणून मल्हारराव हे भाऊ शिंद्यांस बग्गीत बरोबर घेऊन शहरात फिरावयास जात. राज्यकारभारात ते मात्र त्यांचा सल्ला बिलकूल घेत नसत. भाऊ शिंद्यास मल्हारराव बरोबर वागवितात म्हणून ता. १ डिसेंबर १८७० रोजी एक यादी कर्नल बार यांनी बडोदे सरकारकडे पाठविली. तीत त्यांनी म्हटले आहे की, ... नारायणराव भाऊ शिंदे यांना गायकवाड सरकारने दिवाणगिरीतून दूर केले असून, असे ऐकण्यात येते की, ते हल्ली गायकवाड सरकारच्या दलालीत येत आहेत व हल्ली आजम आक्रम महाराजांबरोबर ते गाडीत बसून फिरतात; परंतु त्याला गायकवाड सरकारच्या हवेलीत येऊ न देता त्यांनी घरी राहावे आणि त्यांच्याकडे कोणी जाण्या-येण्याचे करू नये म्हणून त्यांच्या घरी बंदोबस्ताकरिता जासूद राहण्याची तजवीज करावी.' ही यादी येताच मल्हाररावांचे फावले. त्यांनी भाऊ शिंद्यांच्या वाड्याची जप्ती केली आणि त्यांस कैदेत ठेवले. अखेरीस त्यांचे हाल करून शेवटी विषप्रयोगाने त्यांस ठार मारविले.*

OOO

*"रुलर्स ऑफ बडोदा" पृष्ठ ३३८.

# भाग सातवा

# आलेले भयंकर प्रसंग

## गर्भ नष्ट अथवा जीर्ण व्हावा यासाठी मल्हाररावांचे चाललेले प्रयत्न व्यर्थ जातात

महाराणी जमनाबाईंच्या गरोदरपणाविषयी मल्हारराव महाराजांनी अनेक प्रवाद केले. 'त्या बिलकूल गरोदरच नाहीत', असा त्यांनी संशय घेतला. कर्नल बार यांनी हा गरोदरपणा कबूल ठेवून मल्हारावांकडून करार लिहून घेतला असल्या कारणाने त्या करारास खोटे ठरविण्याचा हा प्रयत्न होता. गरोदरपणाच्या निकालावर त्यांच्या राजश्वैर्याची मुदत अवलंबून असल्याने मल्हाररावांस राजसुखाची अशाश्वती वाटत होती. आपल्या दुर्दैवाने मुलगाच झाल्यास राजवैभवास मुकावे लागेल, ही त्यांच्या मनात मुख्य भीती होती व तीच अनाथ राणी जमनाबाई यांना वेळोवेळी फार नडली. मल्हाररावांच्या मताने सल्ला घेण्यास लायक ठरलेल्या लोकांनी या अनाथ राणीच्या विरुद्ध सल्ला देऊन महाराजांची कृपा संपादन केली. यासमयी बाळामिया माने व अण्णासाहेब माने यांचा पोक्त सल्ला जमनाबाईंच्या फार उपयोगी पडला. मल्हारराव महाराजांची कारस्थाने उघड रीतीने यावेळी सुरू झाली होती. राणींच्या उदरातील गर्भ नष्ट किंवा जीर्ण व्हावा यासाठी उपाय त्यांनी सुरू केले. या कामात मल्हाररावांनी वैद्य लोकांचीही मदत घेतली; परंतु बाळामिया माने यांनी त्या लोकांच्या खटपटीस यश येऊ दिले नाही. निराश्रित झालेल्या या राणीचा दासीवर्ग मल्हाररावांस ताबडतोब अनुकूल झाला. हुजरेही त्यांना जाऊन मिळाले. त्या सर्व लोकांचे पगार दरबारातून मिळत असत. राजदंडाच्या भयास्तव राणींच्या त्या नोकर लोकांस तसे वागणे भाग पडले. कोणतेही औषध घेण्यापूर्वी अण्णासाहेब व बाळामिया माने यांची संमती मिळविण्याचा महाराणी जमनाबाई यांनी क्रम सुरू केला असल्याने मल्हाररावांचा हा घातकी प्रयत्न सफल झाला नाही. राणींचा नोकरवर्ग मल्हाररावांस अनुकूल झालेला होता. तथापि, त्यापैकी कित्येक इमानी नोकर अंतर्गत भेद गुप्तपणे महाराणीस कळविण्यास चुकत नव्हते.

## आप्तस्वकियांस भेटण्याची बंदी होते व पुढे परवानगी मिळते

पती वियोगाचा प्रसंग येऊन पाऊण महिनाही लोटला नाही, तोच मल्हाररावांनी आपला हेतू साधण्याकरिता अनेक प्रयत्न सुरू केले. त्यांच्या आप्त-इष्टांस या राजाने वाड्यातून काढून लावले. त्यामुळे त्यांना वाड्यात एकटेच राहणे भाग पडले. त्यांच्या बंधूंना, मातुःश्रींना व इतर लोकांस त्या राजाने वाड्यात येण्याची एकदम बंदी केली. मल्हाररावांच्या या कृतीने त्यांचा कावा आता खास साधला जाईल, असे खंडेराव महाराजांच्या कृपेतील मंडळींस यावेळी मोठे भय पडले. महाराणी जमनाबाईंस पुत्ररत्नाची प्राप्ती होऊन खंडेराव महाराजांचे नाव कायम राहावे अशी प्रजावर्गाची आणि सरदार, दरकदार व असीमदार लोकांची फार इच्छा होती. मल्हाररावांच्या या खटपटीमुळे ते सर्व फार चिंतातुर झाले. खंडेराव महाराजांच्या शोकजनक मृत्यूचे व जमनाबाईंवर होत असलेल्या जुलमांचे खेदकारक वर्तमान कळताच दौलतराव काका माने हे ताबडतोब रहिमतपुराहून बडोद्यास आले. त्यांनी येऊन बडोद्याच्या स्थितीचे अवलोकन केले आणि दुःखाच्या निवारणार्थ ते मुंबईस गेले. हे मोठे राजकारस्थानी असल्याने त्यांच्या प्रयत्नास यश येण्याची मोठी आशा होती. कर्नल बार साहेबांस खुश ठेवून आपला कार्यभाग साधण्याचा मल्हाररावांनी प्रयत्न चालविला असल्याने अण्णासाहेब माने या अनाथ राणींच्या अडचणी निवेदन करण्यासाठी रेसिडेन्टाच्या बंगल्यावर जात. त्यावेळी कर्नल बार साहेब हे त्या ऐकून घेत नव्हते. मुंबईस जाऊन दौलतराव काका* माने यांनी सरकारास सरदार मीर बाकरअल्ली व रावजी मास्तर यांच्या साहाय्याने मल्हाररावांच्या वर्तनाची खात्री करून दिली. त्याजवरून त्या सरकारने कर्नल बार यांस राणीची भेट घेऊन त्यांच्या हरकती ऐकून घेण्याचा हुकूम केला. कर्नल बार हे त्या हुकुमास अनुसरून सरकारवाड्यात आले व त्यांनी महाराणी जमनाबाईंसाहेब यांची भेट घेतली. या भेटीत त्या ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधीने त्यांची बरीच निर्भर्त्सना केली. 'मुंबई सरकारास तुम्ही खोट्या तक्रारी जाहीर करून विनाकारण त्रास देता हे बरोबर नाही,' असे बोलून कर्नल बार यांनी महाराणी साहेबांचे मन दुखविले. ही गोष्ट दौलतराव मान्यांना मुंबईत समजली. त्यांनी ती मुंबई सरकारच्या कानावर घातल्यामुळे 'आप्तस्वकियांनी या अनाथ राणींच्या भेटीस खुशाल जावे,' असा हुकूम देणे कर्नल बार साहेबांस भाग पडले. कर्नल बार यांनी त्यातल्या त्यात भेटीस जाणाऱ्या लोकांची यादी करून त्यांनाच जाण्याची मोकळीक दिली व इतरांनी जाऊ नये असा सक्त बंदोबस्त ठेवला. मल्हारराव महाराजांच्या विश्वासातील खास बायांनी महाराणी जमनाबाई यांच्याजवळ राहून त्यांच्यावर पूर्ण देखरेख ठेवावी, असाही बंदोबस्त मल्हाररावांच्या

---

*हे रहिमतपूरचे जहागीरदार असल्याने मुंबई सरकारकडे यांचे वजन विशेष होते. यांना तेथे खुर्चीचा मान मिळत असे. यांच्याबरोबर मदतीस गेलेले रावजी केशव सांबारे यांनी रेसिडेन्टांकडे जमनाबाईंच्या अडचणी कळविण्यासाठी विनायक वासुदेव वकील यांना मुंबईहून बडोद्यास आणले. ते आपली कामगिरी योग्य वेळी बजावीत असत. हे फार चांगले प्रख्यात वकील होते.

सूचनेवरून कर्नल बार यांनी केला. तसेच यांची जप्त झालेली सर्व दौलत मल्हाररावांच्या ताब्यात असावी, असेही कर्नल बार यांनी ठरविले.

## गरोदरपणा खोटा ठरविण्याचा मल्हाररावाने केलेला प्रयत्न

'गरोदरपणाचे राणी जमनाबाई यांनी ढोंग केले आहे,' या तक्रारीस मल्हाररावांनी खटपट करून कर्नल बार यांच्या मदतीने विशेष वजन आणले. खंडेराव महाराजांच्या मृत्यूनंतर कर्नल बार यांनी मुंबई सरकारास जी हकीकत कळविली तीत राजपत्नीच्या गरोदरपणाविषयी बिलकूल कळविले नव्हते. दौलतराव काका माने यांनी ती हकीकत त्या सरकारास सांगितली. कर्नल बार यांच्याकडून घडलेल्या चुकीबद्दल मुंबई सरकारने त्यांस बराच ठपका दिला. 'कर्नल बार यांनी खंडेराव महाराजांचे मृत्यूचे खबऱ्याबरोबर राजपत्नीच्या गरोदरपणासंबंधी हकीकत कळविली असती, तर मल्हाररावांच्या हातात राजसत्ता देण्याचा हुकूम आम्ही कधीही सोडला नसता.' हे मुंबई सरकारचे त्यावेळचे म्हणणे फारच विचार करण्यासारखे आहे. मुंबईहून मिळालेल्या दूषणाचा कर्नल बार यांस बराच राग आला. त्यांनी 'राणी गरोदर आहे' ही गोष्ट मुळातूनच खोटी, असे त्या सरकारास जाहीर केले; परंतु दौलतराव, अण्णासाहेब व रावजी केशव यांनी 'कर्नल बार यांच्या म्हणण्यात किती खरेपणा आहे, त्याचा तपास करण्यासाठी वैद्यकीय खात्यातील विद्वान लोकांची कमिटी नेमावी म्हणजे राजपत्नीच्या गरोदरपणाविषयी आपली विशेष खात्री होईल,' असे सकारण कळविल्यावरून त्या सरकारने डॉक्टर लोकांची एक कमिटी नेमली व त्या कमिटीने सविस्तर हकिकतीचा रिपोर्ट करावा असे ठरविले. ज्या राजपत्नीचे नखही कोणाच्या दृष्टीस पडत नसे, तिच्या शरीराची तपासणी करण्यासाठी हे डॉक्टर लोक बडोद्यास आले. मल्हारराव व कर्नल बार यांच्यासमोर या कमिटीने त्या अनाथ राणींच्या शरीराविषयी विचक्षणा करून 'राणी खात्रीने गरोदर नाही' असे ठरविले. 'पोटावर फडक्यांच्या घड्या बांधून हे सर्व ढोंग केले आहे', असे प्रतिष्ठितपणाने कर्नल बार हे जमलेल्या मंडळींना बोलले. इतकेच नव्हे तर त्यांनी तेथेच अण्णासाहेब मान्यांची कडक शब्दांनी निर्भर्त्सना केली, 'हे पुरुषांचे काम नाही. आपण सर्व गोरे लोक वर पाहून अभिप्राय देत असता. ज्या स्त्रीला चांगले ज्ञान असेल तिच्याकडून तपासावा म्हणजे आपली खात्री होईल,' अशी अण्णासाहेब मान्यांनी तेथल्या तेथेच तक्रार दाखविली व दौलतराव माने यांनी ती मुंबई सरकारास कळवून सुईणी व डॉक्टरणी यांची पुनः कमेटी नेमली. या कमिटीने 'राजपत्नी गरोदर आहे' असा आपला अभिप्राय दिला. कर्नल बार यांनी मात्र तो खरा मानला नाही; परंतु मुंबई सरकारने शेवटी तोच मान्य केला व महाराणी जमनाबाई गरोदर आहेत असे सरकारने ठरविले. अर्थात, मल्हारराव महाराजांचा हा प्रयत्न व्यर्थ गेला.

## अमंगळ आरोपातून महाराणी मुक्त होते

महाराणी जमनाबाई या गरोदर आहेत असे ठरल्यामुळे मल्हाररावांच्या मंडळीने दुसरी एक असमंजसपणाची युक्ती काढली. 'मुंबई सरकारने नेमलेली कमिटी राणी जमनाबाईंचा गरोदरपणा

कबूल ठेवते. यामुळे आमचा निरुपाय आहे. जर राणी खरोखर गरोदर असेल, तर तो गर्भ कायदेशीर नसला पाहिजे,' असे मल्हाररावांनी यादी लिहून कर्नल बार यांच्या मार्फतीने मुंबई सरकारास कळविले. हे प्रकरण पुढे बरेच विकोपास गेले. सरकारने या बाबतीच्या पुराव्यांचा सर्व बोजा मल्हाररावांवर टाकला. शेवटी पुराव्यांची जळवाजुळव करण्यासाठी चिमण्या वाघावर आरोप ठेवून त्यास पकडून सोनगडच्या किल्ल्यावर कैदेत ठेवले व त्यास मारण्याची बास्ती घालून त्याजकडून मनुष्यधर्मविरहित अशा बऱ्याच खोट्या गोष्टी लिहून घेतल्या. तसेच कित्येक लोकांचे न्यायाधीशांपुढे त्यास शिकवून खोटे जबाब लिहून घेतले. हे लेख व चिमण्या वाघाची जबानी मुंबई सरकाराकडे मल्हाररावांनी पाठवून दिली. आजूबाजूच्या गोष्टींचा पोक्त विचार करून त्या सरकाराने तो पुरावा बनावटी आहे असे ठरविले. या कामात कर्नल बार व मल्हारराव महाराज यांस सरकारने बरेच दूषण दिले. याप्रमाणे या अमंगल आरोपातून न्यायी मुंबई सरकारच्या कृपेने महाराणी जमनाबाई यांची पूर्ण मोकळीक झाली. शेवटी सत्याचाच विजय झाला आणि या अनाथ राजपत्नीवर जो कलंक आला होता तो एकदम नष्ट झाला.

## मंत्रशास्त्राचा प्रयोग करून गर्भ नष्ट करविण्याचा प्रयत्न व्यर्थ जातो

इतक्यात मल्हारराव महाराजांची पत्नी म्हाळसाबाई यांस ऋतू प्राप्त होऊन गर्भाधानाचा बडोद्यात मोठा समारंभ सुरू झाला. या समारंभास महाराणी जमनाबाई यांनी यावे असा खाशा मंडळीकडून त्यांस आग्रह झाला. हा आग्रह अंतःस्थ दुष्ट हेतूचा दर्शक आहे, असे रावजी पुराणिकाकडून महाराणी जमनाबाईंस अगोदरच समजले होते. गर्भपात व्हावा म्हणून एका मांत्रिकाकडून गहू मंत्रून आणून ते म्हाळसाबाईंच्या मखरापासून थेट महाराणी जमनाबाई यांच्या राहण्याच्या जागेपर्यंत पेरले होते. 'या गव्हावर पाय पडला असता गर्भपात होईल,' असे त्या मांत्रिकाने मल्हाररावांस सांगितले होते. यात खरेपणा जरी राणीस वाटला नाही, तरी जाणूनबुजून या मार्गाने जाणे बरोबर नाही, असे जाणून महाराणी जमनाबाईंनी मोठ्या युक्तीने जाण्याचे नाकारले. अशाच प्रकारचे जारणमारणादी प्रयोग मल्हाररावांनी करविले; परंतु त्यांचा काही उपयोग झाला नाही.

## विषप्रयोगातून महाराणींचा बचाव होतो

गर्भ नष्ट करण्यासाठी योजिलेले सर्व उपाय अशा रीतीने फसलेले पाहून निराळेच; परंतु वरच्या पायरीचे इलाज मल्हाररावांच्या मंडळींकडून सुरू झाले. त्यांनी महाराणी जमनाबाईंना विषप्रयोग करून ठार मारण्याचा इ.स. १८७१ च्या फेब्रुवारी महिन्यात विचार केला. इ.स. १८७१ या फेब्रुवारी महिन्यात मोठ्या युक्तीने विषप्रयोग केला; परंतु तो उपाय साधला नाही. विषारी पदार्थ पोटात जाताच राणीच्या सुदैवाने मोठे वमन झाले आणि सर्व विष बाहेर पडले. यावेळी हा बेत फसला म्हणून मल्हारराव महाराजांच्या जवळच्या मंडळीने पुन: दुसरा उपाय योजिला. महाराणीस कौठ फार आवडत असे. एक पिकलेले कौठ फोडून त्यात विष भरून ते बेमालूम बंद

केले होते. हे फोडलेले कौठ आहे अशी कल्पना करण्यास बिलकूल जागा नव्हती. महाराणींच्या विश्वासातील सदू गायकवाड या नावाचा हुजऱ्या होता. त्याला अनुकूल करून घेऊन, त्याच्या हातून ते महाराणी जमनाबाईस देवविले. यावेळी त्यांच्याजवळ रावजी पुराणिक व काशीबाई मोलकरीण या होत्या. हातात कौठ घेताच ते थोडेसे दाबताच सारखे फुटले. त्यावरून रावजीस संशय आला. त्यातील थोडासा भाग महाराणी जमनाबाई या तोंडात टाकीत आहेत, तोच रावजी पुराणिकाने त्यास प्रतिबंध केला. यापैकी थोडासा भाग काशीबाईंच्या मात्र पोटात गेला. त्यामुळे तिला जुलाब व उलट्या होण्यास सुरुवात झाली. शेवटी तिला गाडीत घालून तिच्या घरी पोहोचवून देणे भाग पडले. महाराणींसही त्यावेळी वमन झाले. त्यास औषधोपचार करण्यासाठी हरी वैद्य माहुलीकर यास मशालचीच्या वेशाने रावजी रात्री घेऊन आला व त्याजकडून त्यांस औषध देवविले. या दिवशी मल्हाररावांनी फारच कडक बंदोबस्त ठेवला होता. वैद्य किंवा हकीम यांना वाड्यात जमनाबाईंकडे जाण्याची मोकळीक नव्हती. त्यामुळे हरी वैद्य मशालचीचे वेशाने आला व महाराणीस आराम होताच, तो त्या वेशात परत गेला. या विषप्रपूरित कौठाचा राहिलेला भोग कुत्र्यास खाण्यास घालताच त्याने तरफडून थोड्याच वेळात प्राण सोडला!

### गणू ढेकाणे हा आपल्या धन्याचे प्राण संरक्षणार्थ वेडा होतो

महाराणी जमनाबाईंच्या तैनातीस रामजी फोफाळ्या नावाचा एक विडेवाला होता. त्यास बाबाजी गोबजी वाटेकर याच्या मार्फतीने मल्हाररावांनी बक्षिसाची लालूच दाखवून फितविले. बाबाजी जी वस्तू आणून देईल ती या रामजीने विड्यात घालून तो विडा भोजनोत्तर महाराणीस खाण्यास द्यावा असे ठरले होते. मल्हारराव हे कोणकोणत्या व कशा खटपटी करीत आहेत, त्यांच्या शोधावर या चाणाक्ष महाराणीने आपली खास विश्वासातील माणसे ठेवली होती. रामजी फोफाळ्या फितुर झाल्याची खबर रावजी पुराणिकास प्रथम समजली. बाबाजी व रामजी यांची एकांतात कानगोष्ट चालली होती. त्यावरून प्रथम संशय उद्भवला. रावजीने महाराणीस ही गोष्ट कळविल्यावरून त्यांनी रामजीस याबद्दल स्पष्ट विचारले. त्याने ती गोष्ट थोड्याशा वेळाने कबूल केल्यावरून त्याच्याकडचे पानदानाचे काम काढून ते गणू ढेकाण्यास त्यांनी सांगितले. मल्हाररावांस ही गोष्ट समजली. त्यांनी गणू ढेकाण्यास बोलावून त्यांच्याशी बुद्धिवाद केला व पाच हजार रुपये बक्षीस देण्याची त्यास लालूच दाखविली. त्याने ती गोष्ट बिलकूल कबूल ठेवली नाही. त्यावरून 'मी राजा आहे. माझे न ऐकशील तर तुझा परिणाम फार वाईट होईल. नीट विचार कर,' अशी धमकी दिल्यामुळे त्याचा निरूपाय होऊन त्याला ती घातकी गोष्ट मान्य करावी लागली. थोड्याशा लाभास लालचून किंवा आपल्या जिवाच्या भयाने एका निराश्रित आणि सगर्भा राजपत्नीला ठार मारण्याचे त्याच्या मनास पसंत पडले नाही. तो घरी गेला व वेडा बनला. दुसरे दिवशी तो नोकरीवर गेला नाही. त्यामुळे त्याच्या तपासाकरिता रावजीस महाराणीने पाठविले. रावजी त्याच्या घराच्या दारात शिरत आहे, तोच या भ्रांतिष्ट बनलेल्या गणूने आपल्या

जवळच्या पानदानाच्या खोलीच्या किल्ल्या रावजीच्या अंगावर फेकून देऊन त्यास दोन-चार मार्मिक व योग्यार्थ सूचक शिव्या देऊन त्याने वेडेचार केले. हा वेडा का झाला त्याचे कारण महाराणीस ज्यावेळी बरोबर समजले, त्यासमयी त्या फारच हळहळल्या. आपल्याकरिता यास भ्रांतिष्ट बनावे लागले, ही गोष्ट त्यांच्या हृदयास फार लागली. त्या दिवसापासून त्यांनी तांबूल ग्रहण करण्याचे सोडून दिले. तो त्यांचा क्रम हल्लीचे सयाजीराव महाराज यांचे दत्तक विधान होईपर्यंत कायम होता.

## ठकू पोरीने बजावलेली कामगिरी

छिपवाड्यातून मान्यांच्या घरून दररोज जेवण्याचे ताट महाराणी जमनाबाई यांच्याकडे येत असे. ही संधी विषप्रयोगाला बरी आहे असे जाणून मल्हाररावांच्या मंडळीने निराळीच युक्ती योजिली. मान्यांचा कामाठी ताट घेऊन नजरबागेच्या पाठीमागच्या गल्लीतून येत असता मल्हाररावांचा जासूद यशवंत महिपत येवल्या हा येऊन त्यास भेटला. महाराजांनी दिलेली हिऱ्याची अंगठी त्याने त्या कामाठ्यास देऊन त्याला येथेच थांबविले. नंतर काही वस्तू आणून त्याने त्या ताटातील मिष्टान्नांत टाकिली. ताटवाल्याच्या पाळतीवर ठेवलेल्या ठकू नावाच्या पोरीने ती बनलेली सर्व हकीकत ताटवाला येऊन दाखल होण्याच्या पूर्वी महाराणी जमनाबाईस कळविली. बारा वाजण्याच्या सुमारास तो ताटवाला वाड्यात येऊन दाखल झाला. तो येताच महाराणीच्या जवळच्या मंडळीने प्रथम त्याची चांगली संभावना केली. इतकेच नव्हे तर त्यास मिळालेली हियाची अंगठी या मंडळीने त्याच्याजवळून हिसकून घेतली. या ताटातील काही पदार्थ कुत्र्यास घातले. त्यामुळे त्या गरीब प्राण्याने शेवटी प्राण सोडला. ठकू पोरीने ही चहाडी केली, अशी खबर लागताच मल्हाररावांकडील मंडळी फार रागावली. ठकूने ही जी कामगिरी बजाविली त्यावरून महाराणी जमनाबाई या तिच्यावर फार खुश झाल्या.

## बडोदे सोडण्याविषयी महाराणी जमनाबाई यांचा प्रयत्न

बडोद्यास या ज्या गोष्टी घडत होत्या, त्यांची खबर दौलतराव माने हे मुंबई सरकारास वेळेवर देत असत. इ.स. १८७१ च्या अखेरीस अण्णासाहेब माने हे मुंबईस गेले. महाराणी जमनाबाई यास बडोद्यास निर्भय राहता येणे प्रसूतीच्या समयी अशक्य असल्या कारणाने त्यांनी ब्रिटिश हद्दीत कोठेतरी राहावे, याविषयी अण्णासाहेबांनी खटपट चालविली. मल्हारराव महाराजांकडून घातकी प्रयत्न एकसारखे चालले होते. गर्भास व राजपत्नीच्या जिवास बडोद्यात राहिल्याने अपाय घडेल म्हणून महाराणी जमनाबाईंनी मुंबई सरकारास स्वदस्तुरची पत्रे लिहिली. ती पत्रे खोटी आणि बनावटी आहेत, तसेच दौलतराव मान्यांना या तक्रारी पुढे आणण्याचा अधिकार नाही, वगैरे प्रकारचा मजकूर कर्नल बार साहेबांनी मुंबई सरकारास कळविला होता. त्या मजकुरात खरेपणा किती आहे, ते पाहण्याकरिता सरकारने अण्णासाहेब मान्यांचा लेखी जबाब

लिहून घेतला. हा जबाब येथे दिल्याने त्यावेळच्या हकिकतीचा बराच बोध होईल. यासाठी तो येथे अक्षरशः दिला आहे :

"मी आनंदराव विश्वासराव माने, कै. खंडेराव महाराज यांच्या कुटुंबाचे बंधू. या लेखाने मुंबई सरकारास लिहून देतो की,

१. दौलतराव माने यांच्या नावाची दोन पत्रे मला आता दाखविली. ती राणी जमनाबाई साहेब यांच्या खास हातचीच आहेत. तसेच इंग्रजी अर्जावरील सही दाखविली तीही राणी साहेबांच्या हातची आहे.

२. मुंबई, पुणे किंवा इंग्रजी अमलातील दुसऱ्या ठिकाणी राहण्यास जावे, अशी राणीसाहेबांची फार इच्छा आहे. मल्हारराव कोणत्या वेळी काय दगा देईल व त्याचा परिणाम कसा होईल, त्याचा भरवसा वाटत नाही. यास्तव बडोदे सोडण्याची त्यांना उत्कंठा आहे. राणीसाहेबांस विषप्रयोग मल्हाररावाने फेब्रुवारी महिन्यात केले. त्यांची चौकशी केली असता, पुरावा होण्यासारखा आहे. राणीसाहेबांनी व दुसऱ्या तिघा इसमांनी ते पदार्थ चुकून खाल्ल्यामुळे, त्यांना वांत्या व जुलाबही झाले; परंतु वेळेवर औषधांची मदत पोहोचली, यास्तव त्यांचे प्राण वाचले.

३. खंडेराव महाराज हयात असता मी त्यांच्याजवळ वाड्यातच राहत होतो. ते वारल्यावर मी राणीसाहेबांजवळ राहत असे; परंतु पुढे पाच-सहा दिवसांनी मला वाड्यातून निघून जाण्याचा हुकूम मल्हाररावाने नारायणराव केळकर यांच्या हातून पाठविला.

४. राणीसाहेबांच्या मातुःश्री वाड्यात होत्या. त्यांनाही माझ्याबरोबर वाड्यातून बाहेर काढले. इतर नातलग मंडळी आपापल्या घरीच राहत होते. ते कधी कधी राणीसाहेबांस भेटण्यासाठी वाड्यात येत असत. आम्हास वाड्यातून बाहेर काढले तेव्हापासून मोहरमच्या ७ व्या तारखेपर्यंत वाड्यात राणीसाहेबांजवळ कोणी नातलग राहत नव्हते. खंडेराव महाराज यांच्या वेळच्या पोरी व हुजेरी राणीसाहेबांजवळ होते, त्यांचा पगार दौलतीकडून खर्च पडत होता. त्या सर्वांना मल्हारराव महाराजांनी फितविले. विषप्रयोग झाल्यापासून तर ७ व्या मोहरमपर्यंत राणीसाहेब स्वतः हाताने स्वयंपाक करून जेवत होत्या. इतर माणसांस व नातलगास वाड्यात राणीसाहेबांजवळ दिवसातून एक वेळ जाण्याची परवानगी असे. एक किंवा दीड तासापेक्षा जास्त वेळपर्यंत तेथे कोणासही राहू देत नसत. मी नेहमी त्यांच्याकडे जात होतो. आमच्या मातुःश्री दोन-चार दिवसांनी राणीसाहेबांच्या भेटीस जात असत. ता. ७ मोहरमच्या अगोदर बडोद्याचे रेसिडेन्ट कर्नल जे.टी. बार साहेब हे वाड्यात आले. तेव्हा राणीसाहेबांनी त्यांच्याजवळ आपली नातलग मंडळी सन्निध बसण्याविषयी इच्छा दर्शविली. त्यावरून कर्नल बार साहेबांनी राणीसाहेबांजवळ यादी मागितली. बळवंतराव रामराव माने आमचे चुलते, अमृतराव

सयाजीराव जाधव, आनंदराव विश्वास माने, बाळयाजी माने, कारकन बाबा नेराळकर, बाबूराव तेरे, देवबा जमादार, रखमाजी गाढवे व लक्ष्मण कदम या नावांची यादी राणीसाहेबांनी चैत्र शुद्ध ३ ची बार साहेबांस दिली. या यादीवर राणीसाहेबांची सही आहे. ही यादी दिल्यानंतर मी रेसिडेन्ट साहेबांच्या बंगल्यावर गेलो होतो. कोण कोणत्या बायांनी जवळ असावे असे राणीसाहेबांना वाटते, त्या बायांच्या नावांची यादी मी बार साहेबांस दिली. आमची मातुःश्री बजुबाई, चुलती म्हाळसाबाई, बहीण खाशीबाई व त्यांची *भावजई ही नावे त्या यादीत आहेत. याप्रमाणे सदरहू तेरा इसम ता. ७ मोहरम रोजी दिवसांच्या अकरा- बारा वाजण्याच्या सुमारास सर्व एकाच वेळी वाड्यात राहण्यास गेलो. ता. ७ मोहरमपूर्वी आम्ही वाड्यात राहण्यास गेलो नव्हतो."

५. कर्नल जे.टी. बार साहेब हे वाड्यात आले. त्यावेळी ते गोपाळराव व मैराळ यांस बरोबर घेऊन आले होते. मल्हारराव महाराजांकडून राणीसाहेबांच्या विरुद्ध चाललेल्या प्रयत्नांसंबंधाने बरेच बोलणे झाले. बार साहेबांनी सर्व उडवाउडवीचे जबाब दिले. राणीसाहेबांची सर्व मिळकत मल्हाररावांनी जप्त केली आहे. 'ती मिळकत मल्हाररावांजवळ असली काय आणि माझ्याजवळ असली काय एकच. त्या मिळकतीचा मी जबाब देईन,' असे बार साहेब बोलले. गणपतराव महाराज यांचे कुटुंब व मल्हारराव महाराज यांची कन्या यांनी राणीसाहेबांजवळ मल्हारराव महाराजांच्या तर्फेने असावे, असेही बार साहेब बोलले. 'काही हरकत नाही' असे राणीसाहेब बोलल्या.

६. शिवरात्रीच्या दिवशी (ता. १० फेब्रुवारी १८७१) बार साहेबांस राणीसाहेबांनी सांगितले की 'माझ्या जिवास फार भीती आहे. याकरिता मुंबई, पुणे किंवा ब्रिटिश हद्दीतील दुसऱ्या एखाद्या ठिकाणी जाऊन राहण्याची मोकळीक असावी.' या मतलबाची त्यांनी ताबडतोब यादीही लिहून दिली. 'ही यादी मी खाजगी रीतीने घेतो' असे ते म्हणाले, 'मुलगा झाल्यावर मोतीबागेत किंवा चिमणबागेत तुम्हास नेऊन ठेवू. तोपर्यंत कॅम्पात राहावे' असे बार साहेब बोलले. 'ही गोष्ट पुढची आहे. तिचा पुढे विचार करून सांगू' असे राणीसाहेबांनी त्यास सांगितले. बार साहेब ती यादी बरोबर घेऊन गेले. सुमारे दीड महिन्याने राणीसाहेबांच्या गर्भाला पुरे दिवस होतील असे वाटते.

७. 'लवकर बडोद्यातून नेण्याची तजबीज करावी,' असे गव्हर्नर साहेब बहादूर यास जाहीर करण्याविषयी राणीसाहेबांनी मला सांगितले. 'बडोदे येथे राहिल्याने माझ्या व गर्भाच्या जिवास धक्का बसेल. ईश्वरकृपेने खरोखर मुलगाच झाला व तो खोटा आहे असेही कदाचित ते म्हणतील. कारण त्यांच्या हातात आज राजसत्ता आहे. ते धरतील ते करू शकतील,' असे राणीसाहेबांचे सुचविणे आहे. राणीसाहेबांकडून दगा न होईल असा

---

*अण्णा साहेब मान्यांचे कुटुंब.

ब्रिटिश सरकारच्या अमलात सरकाराने बंदोबस्त करावा. प्रसूत काळी अब्रूदार मडमा राणीसाहेबांजवळ हजर असाव्यात. ईश्वरकृपेने मुलगाच झाला तर पुढे भलताच संशय न येईल, असा इंग्रज सरकारने खात्रीचा बंदोबस्त आमच्या योग्यतेनुरूप करावा.

८. वरील मजकूर वाचून दाखविल्यावरून आणखी असेही कळवितो की, बार साहेबांस राणीसाहेबांनी भीतीविषयी दोन वेळा जाहीर केले. ते पहिल्याने जाहीर केल्यानंतर पाच-सहा दिवसांनी पुनः जाहीर केले. त्यावेळी बार साहेब राणीसाहेबांवर बरेच रागावले होते. त्यांनी मल्हाररावांची बरीच स्तुती करून राणीसाहेबांची फार निर्भर्त्सना केली; असे राणीसाहेबांच्या तोंडून त्याच दिवशी मला समजले. बार साहेबांच्या या वर्तनामुळे राणीसाहेबांस फारच वाईट वाटले; परंतु त्यांचे आम्ही समाधान करून मुंबई सरकार फार उदार मनाचे व न्यायी आहे असे आम्ही त्यांना सांगितले.

९ 'मला मुंबई किंवा पुणे मुक्कामी नेले, तर त्या ठिकाणी माझे आप्त वगैरे मजबरोबर यावेत' असे राणीसाहेबांचे म्हणणे आहे.

सदरहू लिहिलेला मजकूर अगदी खरा आहे. तारीख २७ एप्रिल सन १८७१ इसवी.

- आनंदराव विश्वासराव माने दस्तुर खुद्द

## राजा सर टी. माधवराव यांनी केलेले भयंकर वर्णन

आनंदराव माने यांच्या या जबाबाकडे नामदार मुंबई सरकारचे लक्ष लवकरच गेले. या अनाथ राणीवर यावेळी मल्हाररावांनी जे प्रसंग आणिले व त्यांनी जो छळ केला, त्यासंबंधाने राजा सर टी. माधवराव यांनी आपल्या एका लेखात फारच हृदयद्रावक मजकूर लिहून ठेवला आहे. ते त्या लेखात म्हणतात की, "... ही वेळ मोठी आणीबाणीची आहे, असे मल्हाररावांस वाटत होते. त्यांचे कैदेत परत जाणे किंवा राज्यपद कायम होणे हे राणी जमनाबाईंवरच अवलंबून राहिले. अशा स्थितीत स्वाभाविकपणे घडून येणाऱ्या गोष्टींची वाट पाहणारे मल्हारराव नव्हते. नाजूक आणि कळवळा उत्पन्न होण्यासारख्या अवस्थेत त्या निराधार राणीचा ते फार द्वेष करीत. राणी गरोदर असल्याची गोष्ट लपविण्याचा त्यांनी प्रथम प्रयत्न केला; परंतु त्यात त्यांना यश आले नाही. त्यांनी गरोदरपणाची गोष्ट स्पष्ट नाकारली आणि महाराणी जमनाबाई यांनी हे केवळ ढोंग केले आहे, असे ते प्रतिष्ठितपणे म्हणू लागले. पारतंत्र्याच्या व प्रबळ शत्रूच्या कटाक्षाखाली दबून गेलेल्या या राणीस पुत्र होण्याची जी आशा होती, तिचा भंग व्हावा या हेतूने अनुष्ठाने, जारणमारण वगैरे असंख्य प्रयोग या राजाने सुरू केले. सारांश, ही अनाथ राणी यावेळी फारच संकटात होती. क्षणोक्षणी विषप्रयोगाची भीती उद्भवली. भयंकर राजमोहाने धुंद झालेल्या या राजास असंख्य लोकांची यथेच्छ मदत, प्रतिपक्षास दुर्दैवाने आलेला निराश्रितपणा व महाराणी जमनाबाईंच्या जनानखान्यातील लोकांमधील फितुरांचे विलक्षण काहूर, या सर्व गोष्टींमुळे

महाराणींचा खून होणे किंवा दुसऱ्या अन्य तहेने त्यांच्या प्राणाचा नाश होणे हे अशक्य नव्हते. ते दुष्ट कृत्य करण्यास मल्हारराव महाराज हे शक्तिमान होते. या संकटातून आपला चांगला बचाव व्हावा म्हणून या निराधार; परंतु चाणाक्ष आणि प्रसंगावधानाने युक्त अशा राणी जमनाबाईंनी अनेक प्रयत्न केले. ही त्यांची खरोखर अनिर्वचनीय कसोटीच होती. या भयंकर संकटांतून अपूर्व गांभीर्याने आणि अलौकिक धैर्याने त्या पार पडल्या. विलक्षण चातुर्याने आणि दृढ निश्चयाने त्यांनी समोरच्या पक्षाने चालविलेल्या कपटी वर्तनाचा पक्का मोड केला. स्वतःची स्थिती, आपापल्या गोष्टी प्रत्यक्ष दिराने चालविलेला छळ आणि संकटांना त्रासून टाळण्याचा चालविलेला क्रम, या सर्व गोष्टी ब्रिटिश सरकारच्या नजरेस आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला; पण सरकारास त्यांची साहजिक कीव आली; परंतु या दुर्दैवी राणीस त्यावेळी ग्रहयोग इतका अनिष्ट आला होता की, युरोपच्या डॉक्टरांनासुद्धा त्या गरोदर नाहीत असेच वाटले! चांगले सत्वशील लोकही या राणीने गरोदरपणाचे ढोंग केले आहे असे म्हणू लागले. तरणोपायास अवश्य अशी जी मनुष्ये व संपत्ती यांसह बडोदे-राज्याची अंशात्मक सत्ता ज्यांस प्राप्त झाली होती, असे मल्हारराव हे सत्याचा लोप करून अन्यायाने राजवैभव लाटण्यास फार आतुर झाले होते..."

## महाराणी जमनाबाई यांनी मुंबई सरकारास केलेली विनंती

याच प्रसंगी खुद्द महाराणी जमनाबाईंनी तारीख ११ एप्रिल सन १८७१ ची एक यादी मुंबई सरकारास पाठविली. या यादीत त्यांनी आपली खरी स्थिती त्या सरकारला कळवून सरकारचे लक्ष आपल्याकडे वळवून घेण्याचा प्रयत्न केला. या यादीत त्यांनी म्हटले की, "...........आमच्या सुदैवाने आम्हास मुलगा झाल्यास हल्लीचे अधिकारी (मल्हारराव) यांचे नकसान होणार आहे. आमच्या पतीचे व श्री मल्हारराव महाराजांचे वैमनस्य किती होते ते आपणास ठाऊक आहे. तेव्हा आम्हास त्यांच्या कारकीर्दीत सुख कोठून मिळेल. सबब आम्हास मुंबईस नेण्याविषयी तजवीज लवकर व्हावी. आपल्या समजुतीत आम्हास येथे मोकळीक बरीच आहे; परंतु आम्हास बाहेर जाण्यासही अडचणी होतात! यास्तव हल्ली व पुढे ज्या अडचणी होणार त्यापासून आपण आमचे दयाळूपणाने संरक्षण करावे... ....या बंदिवासातून आमची सुटका करून हल्ली व पुढे चांगले सुख मिळेल असे करावे. या आमच्या स्वदस्तुरच्या पत्राबरोबर आपणास कळविण्यासाठी त्याचा इंग्लिश भाषेत तरजुमा करून पाठविला आहे. सत्वर मेहेरबानी करून आमचे निघणे येथून लवकर होईल, अशी तजवीज व्हावी. म्हणजे आमच्या जिवास निर्भयता होऊन पुढे आमच्यावर कोणताही अपवाद येणार नाही. ज्यादा काय लिहिणे?" ही यादी दौलतराव काका माने यांच्या मार्फतीने मुंबई सरकारकडे दाखल झाली; परंतु तिचा व्हावा तसा उपयोग होऊ शकला नाही. त्यामुळे दौलतराव काका मान्यांनी महाराणी जमनाबाईंच्या तर्फे स्वदस्तुरची एक यादी तारीख २४ एप्रिल सन १८७१ रोजी मुंबई सरकारास दिली. या यादीच्या शेवटी त्यांनी त्या सरकारास निक्षून कळविले की, "... जर नामदार मुंबई सरकार व त्यांचे कौन्सिल या बाबतींचा बंदोबस्त करण्यास

तयार नसेल, तर विलायत सरकारास तार करून या कामाचा निकाल लवकर लावून घ्यावा, असे महाराणी जमनाबाई यांनी आपल्या खानगी पत्रात मला कळविले आहे." मल्हाररावांकडून दररोज नवनव्या खटपटी सुरू होत. त्यामुळे त्यांच्या ताब्यातून सुटल्यावाचून आपणास निर्भयता नाही. असा महाराणींच्या मनाचा पक्का निश्चय झाला होता, जमनाबाईंच्या उदरस्थ गर्भाच्या दर्शनावर मल्हारराव महाराजांचे राजवैभवाचे आयुष्य सर्वथैव अवलंबून होते; त्यामुळे ती मुदत वाढविण्यासाठी त्यांचे एकसारखे यत्न चालू असणे हे स्वाभाविक आहे. त्यांनी योजिलेले उपाय सत्यास अनुसरून असते, तर त्याबद्दल महाराणी जमनाबाईंना बिलकूल वाईट वाटले नसते. आपला कावा साधण्यासाठी योजिलेल्या प्रत्येक उपायात कपट आणि घातकी वर्तन यांची भेळ मल्हाररावांनी मनसोक्त केली असल्यामुळे, कोणत्या वेळी काय परिणाम घडेल, त्याचा महाराणी जमनाबाईसारख्या चतुर राजपत्नीस भरवसा वाटत नव्हता. ज्या मंडळींची महाराणीस अंतःस्थ मदत होती, त्यास व माने कुटुंबातील काही लोकांना ठार मारण्याचा मल्हाररावांनी यत्न करण्यास सोडले नाही. मीर बाकरअल्ली, आनंदराव माने, बळवंतराव माने व बाळामिया यांच्यावर मल्हाररावांनी आणलेल्या भयंकर प्रकाराची खबर मुंबई सरकारास दौलतरावांनी देऊन, त्या सरकारने या बाबतीचा गुप्त तपास ठेवण्यासाठी कर्नल बार यांस न कळेल अशी योजना केली. सरकारने आपल्या विश्वासातील काही हेर बडोद्यास पाठविले व दौलतराव ज्या हकिकती सांगतात त्यात खरेपणा किती आहे, त्याचा शोध त्यांनी प्रथम केला. मल्हाररावांकडून घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर या हेरांचे लक्ष मुख्यतः होते असे म्हणतात; तथापि 'राणी व त्यांचे माणसांस मल्हाररावांकडून त्रास पोचण्यासारखे कृत्य घडू नये, असा योग्य बंदोबस्त करावा' असा तार सरकारने कर्नल बार यांस ता. २९ एप्रिल सन १८७१ रोजी पाठवून बंदोबस्त केला.

ooo

## भाग आठवा

# ब्रिटिश सरकारचा आश्रय आणि मल्हारराव यांजकडून झालेला त्रास

### मल्हारराव महाराजांच्या त्रासातून सुटका होण्याबद्दल महाराणी जमनाबाई यांचा मुंबई सरकारकडे अर्ज व मेजर कोल्स यांची बडोदे येथे या कामी नेमणूक

मल्हारराव महाराजांनी महाराणी जमनाबाईंना नेहमी उपसर्ग लावून, त्यांच्यावर संकटांचा एक सारखा वर्षाव चालविला होता. या हकिकतीकडे मुंबई सरकारचे वेळेवर लक्ष गेले. त्या सरकारने कर्नल बार यांस यावेळच्या त्यांच्या वर्तनाबद्दल बरेच दूषण दिले. त्यांनी आपले चीफ सेक्रेटरी व कौन्सिलर नामदार टक्कर साहेब यांस मार्च महिन्याच्या अखेरीस बडोद्यास पाठवून, त्यांच्याकडून बारकाईने तपास करविला. त्यांनी योग्य तपास करून मुंबई सरकारास कळविले की, हल्ली महाराणी जमनाबाई या फार जोखमीत असून, मल्हारराव महाराजांच्या देखरेखीखाली त्या राहिल्यास, त्यांचे आयुष्य जोखमीत येऊन पडेल. तसेच त्यांना हल्ली जो त्रास होत आहे तोही अक्षम्य आहे. याकरिता महाराणी जमनाबाईंना राहण्यास कॅम्पात जागा द्यावी. हाही बंदोबस्त लवकर झाला नाही. तेथे राहिल्याने आपल्या दुःखाचा परिहार होईल असे त्यास वाटतही नव्हते. कॅम्पात जाऊन राहण्याचा राणी जमनाबाईंचा बिलकूल विचार नव्हता. बडोदे सोडून इतर स्थळी राहण्याची मोकळीक असावी, अशी त्यांची इच्छा होती. ही इच्छा या निराश्रित राजपत्नीने मुंबई सरकारपुढे तारीख ८ एप्रिल १८७१ रोजी मांडली. त्यांनी त्या यादीत लिहिलेला मजकूर फारच *महत्त्वाचा आहे. मल्हाररावांच्या तावडीत सापडून प्राणास मुकण्याचे

---

*त्या यादीची नक्कल या खाली देतो : यादी मेहरबान गव्हरनर साहेब इन कौन्सिल मुंबई यांसी जमनाबाई खंडेराव महाराज यांची स्त्री अर्ज करिते ऐसा जे : माझी अशी खात्री आहे की, सध्याचे चिंताग्रस्त व संकटग्रस्त स्थितीमध्ये मी रहावे असा सरकारचा हेतू नसावा; परंतु मला वाटते की, मी योग्य रस्त्याने सरकारचे कानावर हकीकत घातली नाही, सबब मला बडोद्याहून मुंबईत नेण्याची तजवीज झाली नाही.

(पुढे चालू)

प्रसंग वारंवार येत, त्यामुळे हे बडोदे कसे सुटेल असे या अनाथ राजपत्नीला झाले होते. बडोद्यास राहून पुष्कळ स्वातंत्र्य मिळाले, तथापि त्याची राणी जमनाबाईस यावेळी जरूर वाटत नव्हती. ब्रिटिश सरकारच्या मुलुखांत कडक बंदोबस्तात राहावे लागले तरीही हरकत नाही; परंतु बडोद्यात राहणे नको, असा त्यांच्या मनाचा झालेला निश्चय त्यांनी मुंबई सरकारात वेळोवेळी कळविला. त्या सरकारास शेवटी दयेचा पाझर फुटला व कॅम्पात रेसिडेंट कर्नल बार साहेब ज्या इमारतीत राहत होते, ती इमारत राणी जमनाबाईस राहण्यासाठी दिली. या ठिकाणी तारीख ५ मे सन १८७१ रोजी महाराणी जमनाबाई व त्यांचे भ्रातृवर्ग राहण्यास गेले. ही राहण्यास जाण्याची संधी आपला कार्यभाग उरकण्यास ठीक आहे असे मल्हाररावास वाटले. त्यांनी मारेकरी तयार करून, त्यांस विठ्ठल मंदिराजवळ छपवून ठेवले. 'कॅम्पात राहण्यास जाताना या मारेकऱ्यांनी राणी व त्यांचे आप्त यांना रस्त्यांतच ठार करावे' असे मल्हाररावांनी ठरविले होते. मल्हारराव महाराजांचा हा

---

(मा. पा. पुढे चालू)

१. सध्याचे माझे वास्तव्य सुरक्षित नाही. या संबंधाची बारीक कारणे न लिहिता, इतकीच विनंती करिते की, मला बडोदे शहरातून काढून मुंबईमध्ये आणून ठेवण्याची तजवीज करावी. माझ्या विनंतीकडे सरकार दुर्लक्ष्य करणार नाही; कारण माझे भ्रतार कै. खंडेराव महाराज हे अंतःकाळपर्यंत सरकारचे परम दोस्त होते.

२. सरकारास माहितच आहे की, माझे पति खंडेराव महाराज व हल्लीचा राजा मल्हारराव या उभयतांमध्ये मोठे वैमनस्य होते. हल्ली मी गरोदर असून, त्यापासून पुढे जो परिणाम तो ध्यानात घेतला असता, व हल्लीचे राज्याचा मोठा अक्त्यार या गोष्टीकडे लक्ष्य दिले असता, मला वाटते की, बडोदे शहरात राहणे सुरक्षित नाही. मुंबईस जाऊन राहण्याची तजवीज होईतोपर्यंत माझे चित्तास समाधान होणे नाही.

३. मी माझ्या भ्रताराचे परम स्नेही सरदार मीर वाकर अल्लीखान यांस, ही हकीकत सरकारचे नजरेस आणण्यास सांगितले होते व हल्लीचा अर्ज मी आपल्या सहीनिशी त्याच्या इंग्रजी भाषांतरासह आपल्याकडे पाठविला आहे; त्याचे कारण इतकेच की, मुंबईस येण्याचे इच्छेविषयी सरकारचे मनात बिलकूल संदेह येऊ नये. मला मुंबईस नेऊन तेथे सरकारने कितीही बंदोबस्त ठेविला तरी तो मला कबूल आहे; परंतु बडोद्यामध्ये मला कितीही मोकळीक मिळाली तरी राहण्यास नको. कारण येथील राहणे बिलकूल सुरक्षित नाही.

४. हल्ली माझे चुलते दौलतराव साहेब माने मुंबई मुक्कामी आहेत; ते सर्व काम माझ्या तर्फेने करतील; ते मला कबूल आहे. या अर्जाची नक्कल रेसिडेन्ट साहेबांस दिली आहे. सदरहू माझे चुलते हे माझे मुक्त्यार असून, ते फार विश्वासू आहेत. तारीख ८ एप्रिल सन १८७१ इसवी.

(सही) जमनाबाईसाहेब गायकवाड

कावा, निघण्यापूर्वी अर्धा तास अगोदर राणी जमनाबाईस समजला. त्यांनी या मारेकऱ्यांचे यत्न सफल होऊ नयेत, यास्तव विशेष बंदोबस्त केला. त्या मेण्यात बसल्या आणि अण्णासाहेब, बाळासाहेब काका व बाळामिया ही माने मंडळी व तात्या साहेब जाधव, बापूराव गुजर वगैरे मंडळी हत्यारबंद होऊन मोठ्या सावधगिरीने स्वारीबरोबर निघाली. मेण्याची दारे बंद केली होती, तथापि आत सावधगिरीने महाराणी जमनाबाई या बसल्या असल्याने स्वारीबरोबरच्या मंडळीस विशेष धास्ती वाटत नव्हती. स्वारीबरोबर पूर्वोक्त शूर मंडळी घोड्यावर स्वार झाली होती. या वेळचा हा कडक बंदोबस्त पाहून मारेकरी पुढे येऊ शकले नाहीत. कॅम्पात महाराणी जमनाबाईंचा बरोबर बंदोबस्त राहून मल्हाररावांकडून भलतेच आक्षेप पुढे येऊ नयेत, यासाठी मुंबई सरकारने ठाणे जिल्ह्याचे पोलीस सुप्रिन्टेन्डेन्ट मेजर कोल्स व त्यांच्या पत्नी यांची योजना केली. यांचा महाराणी जमनाबाईंना बराच चांगला उपयोग झाला. अमदाबादचे फौजदार गजानन विठ्ठल व ठाण्याचे दादा इन्स्पेक्टर यांस मेजर कोल्स यांच्या मदतीस त्या सरकाराने दिले होते. घोडदवडीवरील पलटण मेजर कोल्स यांच्या ताब्यात देऊन त्या पलटणीने महाराणी जमनाबाईंचे संरक्षण करावे, असे मुंबई सरकारने ठरविले. बंगल्याच्या हद्दीपासून दरवाजापर्यंत पलटणीचे सहा पहारे बसविले. बंगल्याच्या दरवाजात खानगी बेहड्याचा कडक पहारा ठेविला. राणी जमनाबाई यांच्या शयनागाराजवळ खाशाच्या नागव्या तलवारीचा पहारा होता. या पहाऱ्यावर १) अण्णासाहेब माने, २) बाळासाहेब काका माने व रावजी पुराणिक, ३) बाळामिया माने व मुकुंदराव पंतोजी आणि ४) तात्यासाहेब जाधव हे अनक्रमे पाळया भरीत असत. मेजर कोल्स. गजानन विठ्ठल व दादा इन्स्पेक्टर यांची या सर्व मंडळीवर कडक देखरेख होती. राणी जमनाबाईंच्या शरीराचे व गर्भाचे संरक्षण व्हावे, यासाठी इतका कडक बंदोबस्त ठेवला होता. तथापि, महाराणी जमनाबाईंनीही आपल्याजवळ तीक्ष्ण शस्त्रे बाळगली होती. मल्हाररावांकडून संकट आल्यास आपणास आपला बचाव करता यावा, याकरिता ही सर्व मंडळी फारच दक्षतेने वागू लागली.

## महाराणी जमनाबाई यांच्या वस्त्रालंकारांची मल्हाररावांकडून अव्यवस्था व व कॅम्पातील बंदोबस्त

सरकार वाड्यात असताना या अनाथ राणीला आपल्या प्राणाचे जितके भय होते, त्यापेक्षाही जास्त कॅम्पात राहण्यास गेल्यावर पडले; परंतु ब्रिटिश सरकारने कृपाळू होऊन योग्य बंदोबस्त ठेवला असल्याकारणाने त्या धास्तीचा संस्कार फारसा घडला नाही. महाराणी जमनाबाई या कॅम्पात राहण्यास गेल्या त्यावेळी त्यांच्या मालकीचे सामान व दौलतही मल्हाररावांनी नेऊ देण्यास हरकत केली. परिधान केलेल्या वस्त्रालंकारांशिवाय त्यांच्याबरोबर कॅम्पात काहीच येऊ शकले नाही. त्यांच्या राहण्याच्या ठिकाणास कुलुपे लावून त्यांजवर मल्हाररावांनी आपल्या

मोहरा करविल्या. तेथे त्यांनी दरबारातून पहारा बसवून दागदागिना व कपडालत्ता यांच्या विवंचनेत महाराणी जमनाबाईस* पाडिले.

मेजर कोल्स यांच्या हुकुमाने बसलेल्या पहाऱ्यावरील लोकांच्या बदल्या आठ आठ दिवसांनी होत. महाराणी जमनाबाईंच्या तैनातीतील लोकही त्यांच्याजवळ आठ दिवसांपेक्षा जास्त राहत नसत. इतका जरी कडक बंदोबस्त होता तथापि, मल्हाररावांनी त्यातल्या त्यात आपले हेतू साधण्याचे प्रयत्न चालविले होते. मल्हाररावांसारख्या अधिकारसंपन्न राजाचे हेतू महाराणी जमनाबाईंसारख्या अनाथ राजपत्नीने सफल होऊ दिले नाहीत, हे सर्वांत मोठे आश्चर्य आहे. शहरातून जे लोक तैनातीत येत, त्यांची व मल्हारराव यांची प्रथम एकांतात भेट होत असे. ही हकीकत मेजर कोल्स यांना समजताच त्यांनी बडोद्याहून तैनातीकडे येणाऱ्या लोकांचा प्रवेश महाराणी जमनाबाईंच्या जवळ होऊ न शकावा, यासाठी योग्य उपाय योजिले.

## कर्नल बार यांचे जमनाबाईंच्या मागण्यांकडे दुर्लक्ष व त्यामुळे मल्हाररावांच्या खटपटीस उत्तेजन

ब्रिटिश सरकारने आपल्या आश्रयास महाराणी जमनाबाईंना ठेवले, याबद्दल मल्हाररावांस फार वाईट वाटले. त्यांना आपल्या नशिबी राजवैभव भोगण्याचा योगच नाही असे वाटू लागले. आपल्या ताब्यात ही राणी असता आपण जे भयंकर इलाज योजिले त्यापैकी एकही सफल झाला नाही, तेव्हा राणी जमनाबाईंची पुण्याई फारच मोठी, असे मल्हारराव स्पष्ट म्हणत असत. ही त्या राजाच्या मनावर उदासीनत्वाची पडलेली छाया, सल्लागार मंडळीने फार वेळ राहू दिली नाही. त्यांनी त्या भोळ्या स्वभावाच्या राजाच्या मनास तजेला आणला व निरनिराळे घातकी

---

*वैशाख शुद्ध ५ चे एक पत्र राणी जमनाबाई यांनी दौलतराव काका माने यांना लिहिले. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "ता. ५ मे रोजी आम्ही कॅम्पात राहण्यास आलो. ते रेसिडेन्सीच्या बंगल्यात राहिलो आहे. आम्हाजवळ राहण्यास ठाणे जिल्ह्याचे पोलीस सुप्रिन्टेन्डेट आजम मे. कोल्स साहेब हे मडमेसुद्धा सुद्धा नेमले आहेत. त्यांनी चौकीपहारे वगैरेचा बंदोबस्त बराच ठेवला आहे; परंतु आम्ही दागदागिना चालू कृत्याचा मागितला असून मिळाला नाही ... चि. राजश्री मल्हारराव यांनी येथे दौलतीची फार अव्यवस्था व तसनस चालविली आहे. तसेच आम्हास कॅम्पात उचलल्यासारखे आणून ठेवले आहे. आमचा अक्त्यार काडीचासुद्धा ठेवला नाही. आमच्या राहत्या जागेत बडोदे येथे आमचे जे सामान आहे, त्या सामानावर कुलुपे लावून त्याच्यावर आमच्या मोहरा आहेत; परंतु ते आमचे खासगत असता त्यातून एखादी जिन्नस आणावी लागल्यास आणण्याचा आमचा अधिकार नाही! तेव्हा अर्थात दौलतीपैकी हर एक प्रकरणी खप लागल्यास मिळण्याची आशा कशास ठेवावी? घडो तो दरसाल दोन हजारांची मिळते. तीसुद्धा हे संवत् १९२७ चे साल भरून गेले असून व तो ऐवज आम्ही रोख मागितला असता मिळू शकत नाही! याप्रमाणे आमची व्यवस्था आहे..."

प्रयत्न चालविले. प्रसूत समय जसजसा नजीक येत चालला, तसतशी मल्हाररावांच्या मनावरील उदासीनता वाढत गेली आणि सल्लागार मंडळींच्या खटपटी मोठ्या वेगाने चालू झाल्या. कन्या झाल्यास राज्यावर आपला पूर्ण हक्क आहे, याकरिता आपल्या हक्काचा नाश करण्यासाठी मुलीच्या बदल्यात मुलगा आणण्याची लबाडी होऊ नये, अशी तक्रार कर्नल बार साहेबांपुढे मल्हाररावांनी केल्यावरून त्यांच्या संमतीने अत्यंत विश्वासू अशा काही खाशा बायांनी प्रसूत काळी जमनाबाईंच्या जवळ असावे असे त्यांनी ठरविले. या बायांचा मुक्काम मल्हाररावांनी कॅम्पातील नवाब साहेबांच्या बागांत तंबू ठोकून तेथे आणून ठेवला. रेसिडेन्सीच्या बंगल्याभोवती मल्हाररावांनी आपल्या तर्फेच्या लोकांचे पहारे ठेवून कडक बंदोबस्त केला असल्याने राणी जमनाबाईंच्या आप्तस्वकियांना फारच त्रास पडला. बाळंतपणात स्त्रियांच्या प्रकृतीला फार जपावे लागते व त्यातून प्रथम प्रसंग असल्यास विशेष काळजी घेणे भाग पडते. बाया मंडळीत राणी जमनाबाईंची पोक्तपणाने काळजी वाहणारे कोणी नव्हते. म्हणून पत्र पाठवून फलटण येथून आपली आत (पितृभगिनी) भागीरथीबाई भोसले यांना बोलविल्यावरून त्या आल्या; परंतु मल्हाररावांनी जमनाबाईंची त्यांस नुसती भेटही होऊ दिली नाही. उलट त्यांचा अपमान करण्यास त्यांनी आळस केला नाही. शेवटी त्यांना आल्या रस्त्याने परत फलटणास जाणे भाग पडले! "मी आपली आत येथे बाळंतपणासाठी बोलविली आहे, तेव्हा त्यांना मजकडे येऊ देण्याची परवानगी असावी," वगैरे मजकूर महाराणी जमनाबाईंनी कर्नल बार यांना कळविली; परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही. मल्हाररावांनी यावेळी जे केले तेच कर्नल बार यांनी कबूल ठेवले. शेवटी ही हकीकत दौलतराव काका माने यांनी मुंबई सरकारास कळविली; परंतु कर्नल बार यांचे वजन यावेळी मुंबईस बरेच वाढले होते, म्हणून या कामात दौलतराव माने यशस्वी झाले नाहीत.

## कर्नल बार हे मल्हाररावांस अनुकूल असल्याने महाराणीस खुराकी व पोशाखीचा खर्च न मिळता तिची छळवणूक

मेजर कोल्स यांना या दुर्दैवी राणींचा बंदोबस्त ठेवण्यास नेमले होते; परंतु राणींची दुःखे ऐकून घेण्याचा किंवा त्यांच्या अडचणींचा निकाल लावण्याचा त्यांना अधिकार नव्हता. कर्नल बार यांच्याकडून मिळत असलेल्या सवलतीमुळे मल्हारराव यांनी चालविलेला छळ त्यांच्याने बिलकूल पाहवेना. शेवटी त्यांनी तारीख २७ मे सन १८७१ चा एक रिपोर्ट परभारे मुंबई सरकारकडे केला; परंतु त्यावेळचे चीफ सेक्रेटरी निराळ्या वळणाचे असल्याने त्या त्याच्या रिपोर्टाचा काहीच उपयोग झाला नाही. खुद्द महाराणी जमनाबाईंनीही "मेजर कोल्स यांना आपल्या अडचणींचे निवारण करण्याचे अधिकार असावेत," म्हणून यादी त्या सरकारकडे दिली होती; तिचा जबाब पुढे लिहिल्याप्रमाणे आला : "पोलिटिकल कामात मेजर कोल्स हे दरम्यानगिरी करू शकणार नाहीत. त्यांनी मात्र देखरेख ठेवावयाची आहे. तुमच्या ज्या हरकती असतील त्या तेथील रेसिडेन्टास कळवाव्यात म्हणजे ते त्या आम्हास कळवतील किंवा त्यांचा

योग्य बंदोबस्त करतील." महाराणी जमनाबाईंना त्रास भोगावा लागतो म्हणून ही तक्रार असता 'पोलिटिकल' या सदरात हे प्रकरण सेक्रेटरी साहेबांनी नेऊन ठेवल्यामुळे पुष्कळ लोकांस मोठा विस्मय पडला. सरकारचे वळण ऐन प्रसंगी कसे चमत्कारिक असते, त्याचीही यासमयी बरीच कल्पना करता आली. इतकेच नव्हे तर असा जबाब आल्याने सर्वांचा अगदी निरूपाय झाला. खुराकी जबाब व पोशाखी खर्चाची रक्कम महाराज मल्हाररावांनी एकदम बंद केल्याची हकीकत कळविण्यास अण्णासाहेब माने हे 'सिनेन्टु कर्नल' बार यांच्याकडे गेले असता भर कचेरीत यांनी त्यांचा बराच अपमान केला. इतकेच -- जमनाबाईंच्या मनास बसेल --- बसेलच त्रास असेही शब्द आमच्या न्यायी सरकारच्या प्रतिनिधींनी द्यावे. त्यावेळी उच्चारिले! हे प्रकरण मुंबई सरकारकडे ताबडतोब गेले; परंतु त्याचाही काही उपयोग झाला नाही. खंडेराव महाराज गादीवर असता कर्नल बार हे आपल्या पुत्राप्रमाणे मानीत व खंडेराव महाराज त्यांना आपल्या पित्याप्रमाणे माया देत असत. पूर्वीच्या इतका निकट संबंध असता, त्याच खंडेराव महाराजांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या अर्धांगिनीवर होणाऱ्या जुलमांत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने त्यांचे साहाय्य असावे हे फारच विचार करण्यासारखे आहे. खंडेराव महाराजांच्या चालत्या काळात कर्नल बार हे अनुकूल असल्याने त्यांच्या निधनानंतर त्यांच्या बंधूचा चालता काळ येताच ते आपली पूर्वीची वृत्ती एकदम बदलतात, हे केवळ सदाश्चर्य होय. ज्यांच्या आश्रयास महाराणी जमनाबाई या पडल्या होत्या, ते त्यांच्या प्रतिपक्षास सर्वथैव अनुकूल असल्यामुळे, रेसिडेन्ट साहेबांकडून घडणारी प्रत्येक कृती महाराणी जमनाबाई या कामी पडल्या होत्या, ते त्यांच्या प्रतिपक्षास सर्वथैव अनुकूल असल्यामुळे, रेसिडेन्ट साहेबांकडून घडणारी प्रत्येक कृती महाराणी जमनाबाईंना त्रासदायक वाटली.

## महाराणी जमनाबाईस --- पुत्र झाला खोटा ठरविण्यासाठी मल्हारराव महाराजांचे ---

तारीख २७ मे सन १८७१ रोजी महाराणी जमनाबाईंच्या मातुःश्री बजुबाई यांची प्रकृती एकदम फार बिघडली. ही संधी पाहून कोणी गावात खोटीच गप्प ठेवली की, "आपल्या मातुःश्री जमनाबाई या शहरात गेल्या व त्या प्रसूत होऊन पुत्रजन्म झाला." ही हकीकत समजताच मल्हारराव महाराज फार घाबरले व मोठ्या त्वरेने ते कॅम्पात आले. येताना रस्त्यात त्यांच्या बगीखाली सापडून चार मनुष्ये प्राणास मात्र मुकले! तेथे जाऊन तपास केल्यावर सर्व गोष्ट खोटी ठरली व नाउमेद झालेल्या मल्हाररावांना बराच धीर आला. यावेळेपासून त्यांनी विशेष तयारी चालविली. त्यांनी काही गरोदर स्त्रिया जमविल्या. या स्त्रियांच्या भर्त्यांना मल्हारराव यांनी बरीच लालूच दाखवून त्यांच्या जवळून "आम्ही आपला मुलगा महाराणी जमनाबाईंस दिला व त्यांची कन्या आम्ही घेतली," असे प्रसंग येईल तेव्हा सांगावे असे कबूल करून घेतले. असे करण्यात मल्हाररावांनी दोन हेतू कपटाने साधण्याचा घाट घातला होता. महाराणी जमनाबाईंस मुलगाच झाल्यास तो त्यांनी कन्या देऊन बदलून आणला आहे व मुलगी होऊन कपटाने जरी त्यांनी

अदलाबदल केली असेल, तथापि, ती गोष्ट या रीतीने सहज शाबीत करता यावी. कोठूनही मुलगा बदलून आणलेला असो, तो या ठरीव ठिकाणचाच आहे असे शाबीत करून दिल्यास आपणास राज्यवैभवास अंचवावे लागणार नाही, अशी मल्हाररावांची समजूत होती. पैशाचे व सत्तेचे जेथे पूर्ण पाठबळ असते तेथे खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे ठरण्यास बिलकूल विलंब लागत नसतो. महाराणी जमनाबाईंच्या सुदैवाने पुत्र झाल्यास त्याला खोटे ठरविण्याच्या चालविलेल्या प्रयत्नास यश येऊ न देण्याकरिता महाराणी जमनाबाईंनी ही सर्व हकीकत एकदम मुंबई सरकारास कळविली. त्यांनी आपल्या प्रसूतीच्या खोलीजवळ मिसेस कोल्स यांचा जाबता ठेवून मल्हारराव महाराजांच्या अत्यंत विश्वासू खाशा बायांनी खोलीच्या बाहेरच्या जाबत्यावर पाहिजे तर असावे; परंतु त्यांनी खोलीत येता उपयोगी नाही असे ठरवून घेतले. राजलक्ष्मी आणि युक्त्या यांच्या प्रभावाने मल्हारराव महाराज यावेळी खास घोटाळा केल्यावाचून सोडणार नाहीत, अशी सर्व लोकांची समजूत झाली होती. महाराणी जमनाबाईंना खरा मुलगा झाल्यास तो खोटा ठरविण्याकरिता जे अग्रोपाय मल्हाररावांनी योजिले, त्यासाठी सरकारी खजिन्यातून हजारो रुपये खर्च झाले.

## राजलक्ष्मीची अपार लूट व कर्नल बार यांचे तिकडे दुर्लक्ष

महाराणी जमनाबाईंनी मल्हाररावांच्या या खटपटीविषयी वेळोवेळी जी पत्रे मुंबई सरकारास पाठविली, त्यांचा जबाब कर्नल बार व मल्हारराव महाराज यांना त्या सरकारने विचारल्यावरून त्यांनी जे उत्तर दिले, तेही फारच मौजेचे असून मखलाशी केलेले आहे. त्यात म्हटले आहे की, "....खरोखर मुलगी जन्मून तिच्या बदल्यात मुलगा आणून ठेवण्याचा खोडसाळपणा घडला नाही, या गोष्टीची खात्री करून घेण्याचा आम्हाला पूर्ण हक्क असलाच पाहिजे. प्रस्तुतच्या स्थितीवरून जन्मलेल्या मुलांचे रूपांतर होण्याचे आम्हास भय आहे. आम्ही आपल्या मनाची खात्री करून घेण्याकरिता जी माणसे ठेवली आहेत, त्यांना हरकत होऊ नये." हा युक्तिवाद मुंबई सरकारने मान्य केल्यामुळे मल्हारराव महाराजास विशेष फावले. त्यांनी व त्यांच्या पक्षातील मंडळींनी आपला क्रम एकसारखा चालूच ठेवला. ही वेळ फारच आणीबाणीची व धामधुमीची होती. मोठमोठी इनामे देऊन देवभक्तांची त्यांनी एकसारखी मनधरणी चालविली. हाच हेतू सिद्धीस नेण्याकरिता आकाशातील ग्रहांना मीड घालण्यासाठी ज्योतिषांना लालूच दाखवून वळविले. या त्यांच्या समजुतीप्रमाणे देव, देवऋषी, आकाशातील ग्रह हे कदाचित अनुकूल झाले आणि महाराणी जमनाबाईंना मुलगा झाल्यास आपणास या संपत्तीस, मुकावे लागेल, याकरिता राजवाड्यातील पुष्कळ जवाहीर व मौल्यवान पदार्थ लांबविण्याचा क्रम त्यांनी सुरू *ठेवला. त्यांनी राजवाड्यातील बरीच संपत्ती लांबविली. त्यांचे मित्र व आश्रित लोकांनीही

*महाराणी जमनाबाईसाहेबांचा पक्ष निर्बळ करण्याच्या हेतूने त्यांच्यातर्फे मुंबईस राहून परिश्रम करणारे त्यांचे चुलते दौलतराव व बडोद्यास त्यांची काळजी बाळगणारे बळवंतराव काका

(पुढे चालू)

राजलक्ष्मीची अपार लूट केली. सुदैवाने आलेली संधी त्या लोकांनी व्यर्थ जाऊ दिली नाही. काहींनी तर सरकार वाड्यातील संपत्ती स्वदेशी लांबवून ते एकदम श्रीमंत बनले! बडोद्यात ही जी संपत्तीची लूट चालली, तिकडे कर्नल बार यांनी दुर्लक्ष केले. शेवटी महाराणी जमनाबाईंनी ही हकीकत कर्नल बार यांस प्रथम कळवून; नंतर ती दौलतराव काका माने यांच्या मार्फतीने मुंबई सरकारास जाहीर केली. मुंबईचे गव्हर्नर सर सी. मोर फिट झिराल्ड यांनी राजसंपत्तीचा दुरुपयोग होऊ देऊ नये, असा कर्नल बार यांस हुकूम पाठविला; परंतु त्या हुकुमाचा अंमल पुराव्यांचा अभाव दाखवून, कर्नल बार साहेबांनी केला नाही*.

## मल्हारराव महाराजांच्या जुलुमामुळे रावजी केशवास विषप्रयोग व नारायणराव केळकराची आत्महत्या

आपल्या उद्दिष्ट हेतूंच्या आड महाराणी जमनाबाईंच्या पक्षाची मंडळी फार येते; म्हणून मल्हारराव महाराज आणि त्यांच्या पक्षाच्या मंडळीने निरनिराळी तर्कटे रचली. त्यांनी प्रथम रावजी केशव सांबारे यांस सराव करण्याचा विचार केला. महाराणी जमनाबाईंचा हा अत्यंत विश्वासू गृहस्थ, मुंबईस राजपत्नीच्या कामासाठी गेला होता. त्याच्यावर चोरीचा खोटा आरोप त्याला, कर्नल बार साहेबांच्या मदतीने मुंबईहून प. --- आणिले. त्याच्यावर दाखविण्यापुरते रीतसर काम चालवून मल्हाररावांनी त्यास कैदेत टाकिले. खंडेराव महाराजांनी हिरा नीट करण्यासाठी रावजी केशवाजवळ दिला होता, तो त्याने परत जवाहीरखान्यात आणून दिला

---

(मा. पा. पुढे चालू)

माने आणि शेख बाळमिया माने यांना आपल्या पक्षास अनुकूल करून घेण्याचा मल्हारराव महाराजांनी घाट घातला. या माने मंडळीस मोठमोठ्या नेमणुका, जहागिरी व हुद्दे देण्याची त्यांनी लालूच दाखवली. तथापि, ते दृढनिश्चयी व स्वकर्तव्यदक्ष माने मंडळी मल्हारराव महाराजांच्या पक्षास जाऊन मिळाले नाहीत. महाराणी जमनाबाई यांचे वडील अप्पासाहेब माने व चुलते दौलतराव आणि बळवंतराव यांच्यात बऱ्याच दिवसांपासून वतनासंबंधी भाऊबंदकीचे तंटे चालू होते, तरी तो वाद तूर्त विसरून जाऊन 'महाराणी जमनाबाई ही आपल्या बंधूंची कन्या व तिला अशा पडत्या काळात मदत करणे हे आपले कर्तव्य' या सबबीवर ते मल्हारराव महाराजांच्या विरुद्ध झाले. अर्थात, त्यांनी महाराणी जमनाबाईंचा पक्ष प्रबळ करून आपल्या स्वार्थाचा त्याग केला. भाऊबंदकीच्या तंट्यामुळे मुंबई सरकारात दौलतराव काका माने यांनी जी ओळख व जो वगवशिला संपादिला त्याचा त्यांनी याप्रसंगी महाराणी जमनाबाईंच्या कल्याणार्थ उपयोग करून जगास एक कित्ता घेण्यासारखे उदाहरण घालून दिले. ऐन आणीबाणीच्या प्रसंगी परस्परांमधील खासगी वैषम्य बाजूला ठेवून सर्वांनी एक विचाराने आलेल्या संकटाचे निवारण करण्यासाठी झटणे, हेच खऱ्या शहाणपणाचे लक्षण आहे, असे मानण्यास हरकत नाही.

*रुलर्स ऑफ बडोदा, पृष्ठ ३३९.

नाही, हाच काय तो आरोप व तोही मुळातून खरा नव्हता. यात खराब करण्याचे आणखीही एक अंत:स्थ कारण होते. रावजी केशव यांनी "मल्हारराव हे राज्य करण्यास लायक नाहीत" असा महाराणी जमनाबाईंच्या तर्फे मुंबई सरकारास अगोदरच रिपोर्ट केला होता. कर्नल बार हे मल्हाररावांच्या पक्षाचे असल्याने, त्यांनीही या कामाचा गुप्तपणे तपास चालविला. रावजीच्या बरोबर सरकारांतून एकदम जप्ती बसविली, त्यावेळी त्याचे महत्त्वाचे सर्व कागद घरातच होते. शेवटी भाऊ साने याने पोलीसच्या वेशाने रात्री रावजी केशव याच्या घरात जाऊन ते कागद हस्तगत केले आणि महाराणी जमनाबाईंस आणून दिले. कर्नल बार यांस रावजीने आपले जवळच्या नकलांवरून त्यांच्या दफ्तरांतील अस्सल कागद दाखवून त्यांची खात्री केली होती. मल्हारराव महाराजांच्या अब्रूवर हात टाकण्याचा महाराणी जमनाबाई व त्यांची मंडळी यांचा प्रयत्न आहे, असे दाखवून त्यांना गुन्हेगार ठरविण्याचा कर्नल बार यांचा हेतू होता. कैदेत असता तुरुंगावरील कामदार भुजंगराव यांच्याकडून रावजी केशव यास जबरदस्तीने विष पाजल्यामुळे त्याचा तेथेच अंत झाला! रावजीचा हा असा शेवट झाल्याने या अनाथ राणीच्या पक्षाला कोणी उघड मिळेनासे झाले. "महाराणी जमनाबाईंना आपण अनुकूल आहोत असे मल्हाररावांस समजले तर भलतेच तर्कट आपणावर येऊन शेवटी प्राणास मकावे लागेल." या विचारांचा उद्भव राणीच्या पक्षाच्या लोकांत अधीन जाऊन ते केवळ उदास झाले. रावजीस नारायणराव केळकर खानगी कारभारी यांनी जवाहीरखान्यातून गुप्त कागदांच्या नकला दिल्या, असा संशय मल्हारराव महाराजांस येऊन त्यांनी एकांतात नारायणरावास बरीच तंबी दिली. त्या दहशतीने दुसरे दिवशी आपणांस खात्रीने शिक्षा होईल असे जाणून, नारायणरावांनी रात्री घरी गेल्यावर आत्महत्या करून प्राण सोडला! खंडेराव महाराजांच्या कारकीर्दीत मल्हाररावांच्या विरुद्ध सरकारातून जे कागद बनले होते, त्या सर्व कागदांच्या नकला रावजी केशव यांनी मिळवून हे प्रकरण मुंबई सरकारापुढे नेले असल्या कारणाने, हा प्रयत्न केव्हातरी आपणास खास बाधक होईल, असे मल्हाररावास पूर्णांशाने वाटत होते. मीर बाकरअल्ली साहेब व हरी वैद्य माहुलीकर यांच्यावरही मल्हाररावांनी भयंकर प्रकरणे उपस्थित करून त्यांना अतिशय विवंचनेत पाहिले होते.* राणी

---

*शके १७९३ ज्येष्ठ शुद्ध १४ चे राणी जमनाबाईंनी दौलतराव माने यांना पत्र पाठविले होते. त्यात म्हटले आहे की, "आमच्या सर्व हकिकती खऱ्या आहेत; परंतु मल्हारराव राज्यावर असल्यामुळे आमच्या खोट्या करून दाखवतील. तथापि, चांगल्या हुशार भरवसेदार मनुष्यांकडून तपास कराल तर सर्व खात्री होऊ शकेल... अधिकारामुळे व प्राणात नुकसानीच्या भीतीने पाहिजे तो बनावटी प्रकार उभा करण्यास त्यास फावले आहे... इकडील सर्व उपाय थकल्यामुळे आमची हिम्मत गेली; परंतु आपण नामदार साहेबांजवळ माफी मागून तोंडी लवकर खुलासा कराल, इकडे लक्ष्य लागून राहिले आहे. इन्साफी राज्यात या हकिकती एकदम खऱ्या मानण्यास

(पुढे चालू)

जमनाबाईंवर जे कित्येक विषप्रयोग झाले, त्यातून त्यास या हरी वैद्याने वाचविले. हरी वैद्याने मल्हाररावांस अनुकूल व्हावे, असा त्यांच्या सल्लागार मंडळीने प्रयत्न चालविला; परंतु तो महाराणी जमनाबाईंच्या विरुद्ध वागण्यास तयार झाला नाही. 'हरी वैद्य जर अनुकूल होईल तर त्यास पंचवीस हजार रुपये आम्ही देऊ,' अशी लालूच दाखविण्यासही मल्हारराव महाराज चुकले नाहीत. आपल्या इच्छेस हा वैद्य अनुकूल होत नाही, असे पाहून त्यास पकडून कैदेत ठेवण्याचा मल्हाररावांनी पोलीस खात्याला हुकूम सोडला. हकीकत हरी वैद्यास समजताच त्याने गुप्तपणे ताबडतोब बडोदे सोडले व तो वाईस निघून गेला.

## महाराणी जमनाबाईंच्या पक्षाकडील मंडळीस ठार मारविण्याची कारस्थाने

सरकार खानगीतील कारकून बाबा नेराळकर हा खंडेराव महाराजांच्या वेळेपासून महाराणी जमनाबाईंच्या तैनातीस होता. आपल्या विरुद्ध होणाऱ्या खटपटीत तो सामील आहे असे जाणून, मल्हाररावांनी त्याचे महंमदवाडीतील घर जप्त केले. त्याच्या सर्व मालमत्तेचे लिलाव करून त्याचे ते घर आपल्या प्रीतीतील माधवराव घाणेटकर यास बक्षीस दिले. तसेच काठ्यावाडात त्याचे बंधू वंशपरंपरेच्या पोतदारीचे असामीवर काम करीत होते, त्यास एकदम पकडून आणण्याचा हुकूम पाठविल्यामुळे तो पळून गेला. महाराणी जमनाबाईंच्या पक्षाच्या मंडळीवर मल्हारराव महाराजांनी मारेकरी घातले. या मारेकऱ्यांनी बनेल तोपर्यंत माने मंडळीचा नाश करावा असे त्यांनी ठरविले होते. या मारेकऱ्यांनी कॅम्पातून येत असता, रावजी पुराणिक व भाऊ पुणेकर यांस गाठले. या वेळी पुराणिक तर पळाले; परंतु भाऊ पुणेकरांवर मात्र त्या लोकांनी तरवारीचा एक वार केला. माने मंडळी न सापडता, हे भलतेच लोक सापडले, त्यामुळे ते मारेकरी खजील होऊन

---

(मा. पा. पुढे चालू)

अडचणी पडायच्या; परंतु मल्हारराव आल्यापासून आजपर्यंत त्यांनी केलेली कामे मनात आणल्याने विशेष खात्री होईल. पूर्वी आपणास आणावयाकरिता रावजी केशव सांबारे यांस पाठविले, असे असून त्या अदावतीमुळे त्याच्यावर खोटी तक्रार चालवून रेसिडेन्ट साहेबांनी त्यास मल्हाररावांच्या स्वाधीन करून दिल्यावर सर्व खटले झाले. ते सर्व कागदपत्र बनावट केले आहेत. आता या कारणाने मजला बडोदे येथील कोणी मनुष्य जिवाचे भीतिस्तव अनुकूल होत नाही! हल्ली मजजवळ जे लोक आहेत तेही बेदिल झाले आहेत! या ठिकाणी केवळ मोगलाई झाली आहे. याकरिता सदर रावजी यास लवकर सोडण्याची तजवीज आपल्या अंगावर न येता करावी. यापासून आपला लौकिक होणार आहे. याचप्रमाणे आजम बाकरअल्ली मीर साहेब यांचाही प्रकार आहे. तसाच हरी वैद्य माहुलीकर यांचाही प्रकार! हा सर्व आपणास कळला आहे." हा अंतःकरणातील खया कळवळयाने राणी जमनाबाई यांनी कळविलेला मजकूर फारच विचार करण्यासारखा आहे. आपणाकरिता काळजी बाळगणाऱ्या लोकांवर ही आलेली संकटे पाहून महाराणी जमनाबाईंना किती वाईट वाटत होते, तेही या पत्रावरून कळेल.

चालते झाले. भाऊ पुणेकरास ज्या मारेकऱ्यांनी वार केला, त्यांचा तपास करण्यासही शेवटी मल्हारराव व रेसिडेन्ट साहेब तयार झाले नाहीत, ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे.

## रेसिडेन्सीतील बंगला प्रसूत समयी जाळण्याचा बेत

प्रसूती समय जवळ येऊन ठेपला, तथापि आपला कावा साधत नाही असे पाहून, महाराणी जमनाबाई ज्या बंगल्यात राहत होत्या, तो एकदम आग लावून जाळून टाकावा किंवा तोफा लावून उडवून द्यावा असा विचार मल्हारराव महाराजांनी चालविला. या दोहोंपैकी जो उपाय साधेल तो योजावा असे वादविवादांती ठरवून, सर्व लष्कर व तोफा यांसह मल्हारराव महाराज हे आपल्या सल्लागारास बरोबर घेऊन, कॅम्पात जाऊन तेथे त्यांनी तळ दिला. मल्हारराव महाराजांच्या या हेतूची खबर महाराणी जमनाबाई यांच्या एका हितकर्त्या गृहस्थाने मुंबई सरकारास व स्टेट सेक्रेटरीस ताबडतोब परभारे दिली... या पत्रातील सर्व मजकूर हृदयद्रावक असल्यामुळे, ते पत्र येथे अक्षरश: दिले आहे.

श्री

मेहेरबान नामदार राइट ऑनरेबल गव्हरनर साहेब बहादूर यांस :

मेहेरबानांस खालील मजकूर कळविण्याची त्वरा करितो व तिकडे दुर्लक्ष न होता त्याच्याविषयी योग्य विचार होईल अशी विनंती करतो.

मी बडोदे संस्थानातील पालकांपैकी आहे व मला थोडेस उत्पन्न तेथून मिळते. गत झालेले खंडेराव महाराज यांची हतभाग्य राणी हिच्या विरुद्ध मल्हारराव यांची विलक्षण कामे व चमत्कारिक वर्तणूक पाहून मला फार आश्चर्य वाटते. त्यांनी तिला संकटात पाडण्यासाठी उघड रीतीने प्रयत्न चालविले आहेत हे पाहून मनास मोठा धक्का बसतो. ही गोष्ट थोड्या दिवसांपूर्वी बडोद्यास असताना मी पाहिली. इंग्रज सरकारास यांजविषयी मजकर कळविला व त्यांनी लागलीच योग्य तजवीज त्या वेळेस जी करविली ती कळली, हे पाहून फार आनंद वाटतो. ज्या संकटात ती पडली होती त्यातून तिला सोडविले. तिच्या पदवीच्या बायकांस जी मुखे अवश्य आहेत ती तिला उपभोग करून देत नाहीत! बिचारी बाई! तिला ईश्वर तारो! अजून कोणकोणती संकटे तिला भोगावी लागतील हे न कळे.

मल्हाररावांस या राणीस कृपाळू इंग्रज सरकारच्या मदतीने आपल्या ताब्याबाहेर ठेवले आहे, हे समजताच फार वाईट वाटले. आपली भरभराटी राणीस मारल्याशिवाय होत नाही, तर आता कोणता उपाय करावा, याविषयी त्यांचे जवळचे जे दुष्ट मसलतगार यांस बोलावून त्यांस त्याने हे विचारले.

त्यांची वाटाघाट होऊन कृतघ्न व अतिलुच्चा दासीपुत्र हरिबा गायकवाड यांनी असा बेत सुचविला की, राणी प्रसूत होण्याच्या गडबडीत ती ज्या बंगल्यात राहते त्यास आग लावावी. मेजर कोल्स यांच्या हातात आग विझविण्याची साधने नसल्याकारणाने राणी आगीच्या

कल्लोळात तेव्हाच प्राणोत्क्रमण करील. नवीन झालेले लुच्चे पहारेकरी व त्यांचे सरनाईक दौलतराव गायकवाड यांनी त्यांच्याकडून राणी राहिलेल्या बंगल्यास आग लाविली असता जर हा कोणी बेत उघडकीस आणील तर असे सांगावे की, राणीने आपले कन्यारत्न बदलून पुत्ररत्न ठेवण्यासाठी तिने स्वतः घरास आग लावली. हा बेत सर्वांनी पसंत केला व शेवटास नेण्याकरिता प्रयत्न करण्याचे त्यावेळी ठरविले.

ही बातमी मोठ्या प्रयत्नाने व श्रमाने सामील असलेल्या लोकांशी ज्या लोकांचा निकट संबंध आहे त्यापासून गुप्त रीतीने मिळाली आहे. हे घोर कृत्य करण्यास मल्हारराव याने सर्व तयारी त्या लोकांकडून करविली आहे. वरील मजकुराकडे दुर्लक्ष न देता भयंकर झालेला बेत जो क्वचित पूर्ण होणार, त्याविषयी खावंद खबरदारी ठेवतील. आता असे न केले तर राणीवर जे संकट येणार आहे, ते कधी टळणार नाही व पूर्वी योग्य तजवीज व्हावी व मी खावंदांस असे कळवितो की, कोल्स साहेबांच्या हातात हे संकट टाळण्यास काहीच उपाय नाही.

रेसिडेन्टास तजवीज करण्यास सांगणे व्यर्थ आहे. कारण ते मल्हाररावांस फार लागून आहेत. ते बडोद्याच्या गादीची वस्त्रे मल्हाररावांस देण्याचा प्रयत्न करीत आहेत व करतील.

व्हिक्टोरिया राणीसाहेबांच्या चिटणीसांना योग्य दिसल्यामुळे एक प्रत पाठविली आहे. ता. ३० जून सन १८७१.

हरी रघुनाथ वाळवेकर.

## मेजर कोल्स यास लष्कर तयार ठेवण्यास हुकूम व कर्नल बार यांस ताकीद मिळाली

महाराणी जमनाबाईंनी मल्हाररावांची ही जय्यत तयारी मुंबई सरकारच्या नजरेस आणून देण्यास विलंब लागला नाही. त्यांनी ता. १ जुलै सन १८७१ चे पत्र मुंबई सरकारास लिहिले. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "...... आमच्या तर्फेने सर्व मजकूर सरकारास जाहीर केल्यावरून सरकारने विचार करून आम्हास कॅम्पात आणून बंदोबस्त केला. त्यावरून मल्हारराव दादासाहेब यांनी आपल्या तर्फेने खाशा बायास ठेवल्या आहेत, असे असून हल्ली दादासाहेब स्वतः फौजेसुद्धा तोफा वगैरे सरंजाम घेऊन आम्ही ज्या बंगल्यात राहतो, त्याच्या बारीच्या पलीकडे आजमासे दहा हातांवर राहिले आहेत. हे आम्हास फार त्रासदायक आहे. कारण इंग्रज सरकारने सर्व बंदोबस्त ठेवून त्यांच्या भरवशाच्या खाशा बाया जवळ, असा हर्दूकडील पक्का बंदोबस्त असून, स्वतः फौजेसह येऊन राहतात. हे लोकांत अपकीर्तीस कारण होऊन उपहास होण्याचा संभव आहे. बाळंतपणाच्या वेळेस अशा तजविजी कोठे कधीच झाल्या नाहीत व दादासाहेब स्वत: तोफा व लष्कर घेऊन राहिले. तेव्हा त्यांच्या मनात त्यास येथे राहून काय कर्तव्य आहे हे समजत नाही. याकरिता याचा विचार अवश्य करून बंदोबस्त झाला पाहिजे. नाहीपेक्षा मल्हारराव दादासाहेब राहिल्याने कोणत्या वेळी काय तुफान होईल ते सांगवत नाही..." ही खरी स्थिती मुंबई सरकारास कळताच त्यांनी कर्नल बार यांस ताबडतोब बंदोबस्त करण्यास लिहून

मेजर कोल्स यास काही विशेष अधिकार दिले. तसेच वर लिहिल्याप्रमाणे हकीकत घडल्यास त्याची सर्व जबाबदारी आपणावर येईल, अशी मुंबईचे गव्हर्नर सर सी. मोर फिट्झिराल्ड यांनी कर्नल बार साहेबांस सक्त ताकीद दिल्याने मल्हारराव महाराजांचा बेत फिसकटला. तथापि, तोफ लावून बंगला उडवून देण्याचा त्यांचा झालेला निश्चय त्यांनी फिरविला नाही. याबाबतीचे प्रकरण कदाचित चाललेच तर कर्नल बार साहेबांच्या मदतीने त्यातून आपण पार पडू, अशी मल्हारराव महाराजांस मोठी उमेद होती. तोफा व लष्कर आणण्याचे कारण ब्रिटिश सरकारने विचारल्यावरून "महाराणी जमनाबाईंना मुलगा झाल्यास आनंद प्रदर्शनार्थ तोफा सोडून लष्करी मान द्यावा लागेल. यासाठी आम्ही ही तजवीज केली आहे. यात आमचा वाईट हेतू बिलकूल नाही," असा मल्हाररावांनी जबाब दिला. कर्नल बार यांनीही मुंबई सरकारास असेच कळविले; परंतु मल्हाररावासंबंधाने त्या सरकारचा झालेला ग्रह बदलला नाही. त्या सरकाराने कर्नल बार यांस कळू न देता आपले लष्कर तयार ठेवले आणि मेजर कोल्स यांस संशय येताच त्यांनी मुंबईस तार करावा व योग्य बंदोबस्त ठेवावा, असा अंतःस्थ हुकूम सोडला. महाराणी जमनाबाईंच्या संरक्षणाकरिता मेजर कोल्स यांनी ब्रिटिश लष्करातील पहारे ठेवून अगोदरच बंदोबस्त केला होता. राजवाड्यात गुप्त कारस्थाने काय चालतात, ती आपणास अगोदर समजावीत, याकरिता त्यांनी महाराणी जमनाबाईंच्या विनंतीवरून काही खटपटी लोकांसही थोडेसे अनुकूल करून घेतले. तसेच तपासाकरिता महाराणींच्या खर्चाने काही गुप्त माणसेही त्यांनी ठेवली होती.

०००

# भाग नववा

# आशाभंग व मातृसुखाचा नाश

## मल्हाररावांस पडलेली चिंता व त्यांचा अलोट उधळेपणा

गर्भाचे दिवस जसजसे पूर्ण होत चालले तसतसे मल्हाररावांच्या हृदयातील धैर्य नष्ट होत गेले. त्यांना काहीच सुचेनासे झाले. त्यास अन्नपाणी गोड वाटेना. रात्रंदिवस त्यांचे लक्ष परिणामाकडे लागून ते केवळ सुस्त बनले. त्यांचे सल्लागार जे सांगत ते ते ऐकत असत. कोणी येऊन भलतीच कल्पना सुचविल्यास तिही ते कबुल करीत! रेसिडेन्ट साहेबांचा बंगला तोफा लावून उडवून देण्याची मसलतही याच मासल्याची होती. शहरात सहज फिरण्यास आले असता रस्त्यात कोणी 'राणी प्रसूत झाली' किंवा 'तिचे पोट दुखत आहे' असे म्हटल्यास, हा आतूर राजा ताबडतोब कॅम्पातील आपल्या मुक्कामावर येऊन तपास करीत असे. त्यांनी देवास असंख्य नवस घालून त्यांच्याजवळ 'राणी जमनाबाईंस कन्या व्हावी,' हे मागणे मागून घेण्याचा प्रयत्न केला. 'राणी साहेबांस पुत्रलाभ होवो' असे मात्र महाराणी व त्यांची हितकर्ती मंडळी इच्छित होती. 'मुलगा झाल्यास ईश्वराने आपली लाज ऐन प्रसंगी ठेवली असे होऊन मल्हाररावांस 'हरी हरी' करीत बसण्याचा प्रसंग येईल, अशा मनोराज्यांत काही मंडळी गळून गेली होती. मल्हारराव हे शेवटच्या अनिष्ट परिणामाच्या विवंचनेत पडले आणि महाराणी व त्यांचे आप्त 'मुलगा होऊन प्रस्तुतचे दुःखाचे दिवस निघून जातील' या आशेवर काळ कंठित होते. उभय वर्गाचे भिन्न हेतू व परस्परविरोधी विचार असल्याने बडोद्याला भावी अवस्था कशी येते. या संभ्रमात त्यावेळचा लोकसमुदाय पडला. मल्हारराव महाराज जे जन्मापासून दुःखी असल्याने त्यांच्या हातात राज्यसूत्रे ईश्वर देणार नाही, असे लोकांस वाटले व खुद्द मल्हाररावांचीही हीच दृढ समजूत होती. ज्या ईश्वराने कैदेतून मुक्त करून एकदम गादीवर आणून बसविले तो ते राजवैभव हिरावून घेणार नाही, अशीही काही लोकांची समजूत होती. सारांश, भावी अवस्थेत निर्णय

ईश्वराच्या अधीन राहिला होता. महाराणी प्रसूत होईपर्यंतचा जो अवधी ईश्वराने दिला आहे, त्यात संपत्तीचा मनसोक्त विनियोग करण्याचा मल्हाररावांनी निश्चय केला व तेवढेच काय ते त्यांच्या मनाला समाधान वाटत होते. महाराणींचा प्रसूत काळ जर बराच लांबेल तर फार चांगले असे त्यांस वाटू लागले. पोक्त स्त्रिया व वैद्य यांना यासंबंधाने त्यांनी सल्ला विचारल्यावरून 'प्रथमप्रसंगी दहा महिने सुद्धा पुरे होतात' असा जबाब मिळाल्यास त्यांना मोठे समाधान वाटत असे. 'आमच्या राजवैभवाची मुदत आणखी एक महिना वाढेल तर फार चांगले होईल. कारण मला आणखी बऱ्याच आश्रितांचे दारिद्र्य दूर करावयाचे आहे,' असे महाराज मल्हारराव हे वारंवार म्हणत. त्यांच्या या समजुतीमुळे त्यांचे आश्रित व सल्लागार यांस फार फावले. त्यांनी इनामे, वर्षासने व असाम्यांच्या सनदा विलक्षण प्रकारच्या शपथा त्यात घालून लिहून घेतल्या! भावी राज्यकर्त्यांनी त्या शपथास भिऊन ती चालवावीत असा त्या शपथांचा मुख्य उद्देश होता. दुर्दैवाने आपल्या हातून राज्यकारभार निघून गेल्यास आपल्या पक्षाच्या व दोस्तांच्या चरितार्थास अडचण पडू नये आणि 'कल्याण केले नाही' हा अपवाद पुढे येऊ नये. याकरिता त्यांनी उदास मनाने एकसारखा प्रयत्न चालविला. राणीस मुलगा झाल्यास त्याचे पुढे याचना करण्याचा प्रसंग न यावा, यासाठी मल्हाररावांनी स्वतःही बरीच संपत्ती लांबविली. त्यांचा हा उधळेपणा महाराणी जमनाबाई यांस आवडला नाही. सुदैवाने मुलगा झाल्यास त्यास संपत्तीची अडचण पडेल, याकरिता मल्हाररावांच्या उधळेपणाची हकीकत त्यांनी ब्रिटिश सरकारच्या नजरेस आणली; परंतु त्या प्रयत्नाचा म्हणण्यासारखा उपयोग झाला नाही.

### महाराणी प्रसूत होऊन कन्यारत्न प्राप्त होते

प्रसूती समय नजीक असल्याची वर्दी आनंदराव मान्यांनी मुद्दाम मल्हाररावांस दिली. त्याच्यावरून ते दिवाण वगैरे मंडळीस बरोबर घेऊन महाराणी जमनाबाईंच्या राहण्याच्या ठिकाणी गेले. महाराणींचे बंधू व इतर आप्तस्वकीय मंडळी तेथे होतीच. कॅम्पातील सर्व ब्रिटिश ऑफिसर यांस घेऊन कर्नल बार साहेबही तेथे आले. प्रसूतीचा परिणाम काय घडतो, इकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले. काही लोकांचे मुखश्रीवर नव्याची व काहींच्या तोंडावर आनंदाची झाक मारीत होती. मल्हाररावांच्या हृदयात विपरीत परिणामाचा ठसा उमटून ते चिंतातुर झाले व त्यांची छाती भयाने धडधडू लागली. महाराणी जमनाबाईंच्या भ्रातृवर्गास आता पुत्ररत्नाची प्राप्ती होईल व आपली प्रस्तुतची संकटे एकदम नष्ट होतील, अशी आशा होती; परंतु ईश्वराची धारणा काही निराळीच दिसली. महाराणींची खरी कसोटी त्यास पाहावयाची होती. चिंतातुर व उतावळ्या स्वभावाच्या मल्हाररावांस काही दिवस राज्यसुख देऊन त्याचे पर्यवसान निराळेच करावयाचे होते. तसेच महाराणीस तूर्त संकटांतून मुक्त करावयाचे नव्हते. इत्यादी ईश्वरी सूत्रास अनुसरून तारीख ५ जुलै सन १८७१ आषाढ वद्य २ संवत् १९२८ रोजी सकाळी महाराणी प्रसूत होऊन कन्यारत्न प्राप्त झाल्याची वर्दी जमलेल्या मंडळीत येऊन पोहोचली. ज्या आशांकुरावर

महाराणींनी असंख्य दुःखे सहन करून विघ्नाचे परिमार्जन केले, तो त्यांचा प्रबळ आशातंतू कन्येचे दर्शन होताच एकदम तुटला आणि त्यांना मरणप्राय दुःख आले. त्यांना झालेल्या दुःखाचे निवारण करण्याचे सामर्थ्य कोणातही नव्हते. सुतिकागृहातून आलेली खबर मल्हाररावांस प्रथम खरी वाटली नाही; परंतु मिसेस कोल्स यांनी त्या नूतन जन्मलेल्या कन्येस आपल्या ओसंगात घेऊन बाहेर बसलेल्या खाशा बायास आणून ती दाखवली. नंतर येथून त्या कन्येस घेऊन बाहेरच्या दिवाणखान्यात आल्या. 'महाराज आपले नशीब मोठे खरे. आपल्या नशिबाने महाराणी साहेबांस मुलगी झाली' हे मिसेस कोल्स यांच्या मुखातून निघालेले विनोदपर उद्गार मल्हाररावांस अमृतापेक्षाही गोड लागले. या कन्यादर्शनाने मल्हाररावांस जितका आनंद झाला, त्यापेक्षा जास्त महाराणी जमनाबाई व त्यांची आप्त मंडळी यांना दुःख झाले. 'या हालअपेष्टेत राहूनच मरण्याचे ईश्वराने आपल्या नशिबी लिहिले आहे,' असे वाटून महाराणी जमनाबाईंनी त्यावेळी फार शोक केला. मातुःश्री बजुबाई, बहीण खाशीबाई व दुसऱ्या आप्तस्वकियांना हा एकदम झालेला आशाभंग अनिवार होऊन पराकाष्ठेचे दुःख झाले. यासमयी हे प्रसूतिगृह केवळ शोकमय बनले होते! आनंदराव व त्यांच्या मातुःश्री बजुबाई यांनी आपले दुःख आवरून महाराणींच्या उद्वेगजन्य मनाचे बरेच सांत्वन केले.

## मल्हाररावांनी व्यक्त केलेला आनंद

ईश्वराने मल्हाररावांस हा दिवस खरोखर सोन्याचाच दाखविला. त्यांनी व त्यांच्या मंडळींनी कन्येचे दर्शन होताच, त्याच ठिकाणी मोठा जयजयकार केला. मल्हाररावांवर त्यांनी पुष्पवृष्टी केली. कर्नल बार साहेबांनी फुलांचा हार मल्हाररावांच्या गळयात घालून त्यांनी आपली उघड खुशी दर्शविली. 'आजपर्यंत योजलेले सर्व प्रयत्न फसले; परंतु अखेरीस मात्र ईश्वराने खूब साधली' असे म्हणून ते उल्हसित झालेले मंडळ आनंदात दंग झाले. 'बडोद्याचे राज्य ईश्वराने आपणास व आपल्या वारसास अनायासे दिले' म्हणून मल्हाररावांस झालेल्या आनंदाच्या प्रदर्शनासाठी गजारूढ होऊन त्यांनी आपली स्वारी मोठ्या थाटाने मिरवत काढली. स्वारी कॅम्पातून राजवाड्यात जात असता रस्त्याने मोहरा, पुतळया व रुपये वगैरे उधळून त्यांनी आनंद प्रदर्शित केला. ही स्वारी नाना प्रकारच्या वाद्यांच्या गजरात निघाली होती. केदारेश्वराजवळ स्वारी येताच त्यांनी ब्राह्मणांस खिचडी वाटण्याचा हुकूम दिला. याशिवायही बराच दानधर्म त्यांनी केला. रस्त्याने हा जो संपत्ती उधळण्याचा क्रम चालला होता, तो मुंबई सरकारास कळल्यास आपणास तिकडून ठपका मिळेल असे जाणून कर्नल बार यांनी अर्ध्या रस्त्यातच मोहरा, पुतळया वगैरे वाटण्याचा क्रम एमदम बंद केला. 'वाड्यात गेल्यावर तेथे आपणास योग्य वाटतील ते उत्सव करावेत, असे यावेळी कर्नल बार यांनी मल्हाररावांस सांगितले. वाड्यात स्वारी दाखल होताच महाराजांनी ब्राह्मणास मोहरा वाटल्या व पूर्वी केलेल्या नवसांची फेड चालविली. पंचपक्वान्नाचे सहभोजन घालून त्यांनी ब्राह्मणांस तृप्त केले. भोजनोत्तर ब्राह्मणास प्रत्येकी एकेक मोहरा दक्षिणा

दिली. हा उत्सव अंतःकरणपूर्वक साजरा करून मल्हाररावांनी आपल्या औदार्याचा कळस केला. महाराजांस चांगले वाटून त्यांची प्रीती आपणावर बसावी यासाठी त्यांच्या मंडळीनेही घरोघर उत्सव सुरू केले व या भोळया दिलाच्या राजाकडून बक्षिसे मिळविली. देवभक्त, देवऋषी व दुसऱ्या ढोंगधतुरा करणाऱ्या लोकांनी 'आमच्याच प्रयत्नांस यश आले' असे महाराजांस सांगून त्यांजकडून देणगी मिळविली. 'महाराणी जमनाबाईंना मुलगी व्हावी व महाराजांस राज्य मिळावे, असा आम्ही नवस केला होता,' असे सांगून नवसाची फेड करण्यासाठी वाटेल तशा रकमा, या स्वार्थी व लबाड लोकांनी महाराजांकडून उपटल्या. काही लबाड स्त्रियांनी 'मी भात खाण्याचे बंद केले होते. आता राज्य आपणास मिळाले तेव्हा मला कायमचा भात जेवू घाला', असे मागणे करून त्या राजापासून आपला स्वार्थ साधून घेतला. या आनंदाच्या दिवसांत मल्हाररावांनी कोणाचीही मागणी नाकारून त्यास विन्मुख जाऊ दिले नाही. त्यांनी सर्वांस इच्छेप्रमाणे पैसे देऊन खुश ठेवले. 'आपण आता साडेसातीच्या फेऱ्यातून निरंतर मुक्त झालो.' असे मल्हाररावांच्या मंडळीस वाटून ती फारच उल्हसित झाली.

## या जन्मलेल्या कन्येचे नाव ताराबाई असे ठेवले

महाराणी प्रसूत झाल्यानंतर त्यांच्या जवळच्या खाशा बाया व खाशा मंडळींचे जाबते ताबडतोब मल्हाररावांनी उठविले. या मुलीचा बारशाचा समारंभ साधारण स्थितीतील मनुष्याप्रमाणेच झाला! खाशा मंडळींपैकी बारशाच्या दिवशी कोणीही आले नव्हते. यावेळी खंडेराव महाराज हयात असते तर असा दुर्योग कधीही आला नसता. ज्या कन्येच्या जन्मामुळे मल्हाररावांस राज्य मिळाले, तिच्या नामकरणविधीत ते सामील का झाले नाहीत ते न कळे. जेमतेम या कष्टमय अवस्थेत नामकरणविधी उरकून घेऊन या कन्येचे नाव ताराबाई असे ठेवले. या ताराबाईस पाहून दिवस काढण्याचे ईश्वराने या अनाथ राणीस भाग पाडले होते!

## महाराणी जमनाबाई यांची मातुःश्री बजुबाई यांचा स्वर्गवास

महाराणीचे सौख्यरूप पर्वताचे शिखर ऐन प्रसंगी एकदम ढासळल्यामुळे त्यांची मातुःश्री बजुबाई यांना अतिशय दुःख होऊन त्या आजारी पडल्या. पुष्कळ उपचार केले; परंतु त्यांची प्रकृती सुधारली नाही. शेवटी त्यांचा याच दुखण्याने श्रावण शुद्ध ११ रोजी दोन प्रहरी बारा वाजता अंत झाला. हे मातृवियोगाचे दुःख महाराणी जमनाबाई यांना प्रस्तुतच्या निराश अवस्थेत फारच असह्य झाले. मातुःश्रींच्या देहावसान समयी जमनाबाई व अण्णासाहेब हे त्यांच्याजवळ नव्हते. यांना शहरात जाण्याची बंदी होती. त्यावेळी या दुःखसागरात बुडालेल्या महाराणीस स्वतःच्या शरीराची अशाश्वती वाटू लागली. ज्या मातेच्या मायेच्या दोन शब्दांवर समाधान मानून त्या घेत असत, ते मातृसुख नष्ट होताच त्यांनी अन्नपाणी वर्ज्य केले; परंतु त्यांच्या जवळच्या मंडळीने त्यांच्या या दुःखाचा परिहार त्यांचे सांत्वन करून केला.

### मल्हाररावांना राज्याभिषेक करण्याची परवानगी मिळते व राज्यारोहण समारंभ

गादीवर आल्यानंतर मल्हाररावांनी संवत् १९२७ च्या माघ शुद्ध ३ रोजी राज्याभिषेक करून घेतला; परंतु महाराणींच्या उदरस्थ गर्भाचा परिणाम समजेपर्यंत हा समारंभ करू नये, असे नामदार ब्रिटिश सरकाराकडून लिहून आल्यामुळे हा समारंभ तसाच राहिला होता. पुढे प्रसूतीचा निकाल लागताच मल्हाररावांनी पुन्हा राज्याभिषेक करून घेण्याची चळवळ चालविली. यावेळी दौलतराव मान्यांनी महाराणी जमनाबाईंच्या तर्फे मुंबई सरकारकडे एक अर्ज दिला. "मल्हारराव हे राज्यकारभार चालविण्यास लायक नाहीत, त्यास गादी दिल्याने बडोद्याचे राज्यात फार बखेडे होतील. ते विकल स्वभावाचे असून, त्यांच्या हातून बऱ्याच वाईट गोष्टी घडल्या आहेत. यासाठी त्यास गादी न देता महाराणी जमनाबाईंच्या मांडीवर दत्तक मुलगा देऊन त्याच्या नावे बडोद्याचा राज्यकारभार चालवावा." या अर्जाचा निकाल महाराणीच्या विरुद्ध सरकारने केला. मुंबई सरकाराच्या हुकुमाने कर्नल बार यांच्याकडून या अर्जाचा जबाब आला की, "कै. खंडेराव महाराज हयात असता ते व दरबारचे तमाम लोक जाणत होते की, त्यांच्या मागे मुलगा नसेल तर गादीचे वारस मल्हारराव हे आहेत. तसेच सन १८६९ च्या जानेवारी महिन्यात कै. महाराजही मल्हारराव महाराजास बडोदे येथे सरकार हवेलीत परत बोलावीत होते. ते या शर्तीने की, त्यांचे वडील बंधू गादीवर होते, त्यांच्यापाशी मल्हारराव महाराजांनी कनिष्ठ बंधूप्रमाणे वर्तणूक ठेवून राहावे. तसेच राणी जमनाबाई यांच्या अर्जीच्या कारणाने आजम आक्रम मल्हारराव महाराजांस गादीनसीनचा संस्कार लांब करून मुलतबी ठेवण्याचे योग्य कारण काहीच सरकारास दिसून आले नाही." असा तारीख ४ सप्टेंबर सन १८७१ चा जबाब मिळाला. या जबाबामुळे महाराणीस फार वाईट वाटले. या जबाबानंतर त्यांनी गादीवर बसण्याचा मोठा समारंभ केला. कर्नल बार व त्यांचे मदतगार, महाराजांचे सल्लागार, त्यांच्या अनुसंगी मंडळी व महाराज मल्हारराव यांना हा समारंभ फारच महत्त्वाचा होता. मुंबई सरकारचे चीफ सेक्रेटरी या समारंभास रीतसर बहुमान पोशाख घेऊन आले होते. त्यांनी तो आणलेला पोशाख दरबारात गायकवाड सरकार जे मल्हारराव महाराज त्यास मोठ्या अदबीने अर्पण केला व सलामी दिली.

ooo

# भाग दहावा

# बडोद्याचा त्याग व पुण्यास गमन

## बडोदे सोडून इतर ठिकाणी राहण्याचा महाराणी जमनाबाई यांचा विचार

मल्हारराव महाराजांकडून महाराणी जमनाबाईंस पुढे वेळोवेळी फार त्रास होऊ लागला. त्यांनी या अवस्थेत बडोद्यामध्ये राहणे हितकर वाटेना. तसेच ताराबाईंची व त्यांची प्रकृती बडोद्यास बरोबर राहीना. सर्व लोक मल्हाररावांस फितुर झालेले ते विलक्षण प्रकारचा बुद्धिवाद करण्यास येऊ लागले आणि त्यांच्याजवळच्या नोकर मंडळीस ऊर्जितावस्था येण्याची पूर्वी जी आशा होती, तिचा कन्याजन्मामुळे झालेला भंग, त्यांच्या मनावर औदासीन्याची पडलेली छाया वगैरे कारणांनी 'आता बडोदे सुटेल तर फार बरे' असे महाराणी जमनाबाई यांस वाटू लागले. कर्नल बार यांच्याकडून आनंदराव मान्यांचा प्रत्येक खेपेस अपमान होत असे! 'आम्ही आपल्या बंगल्यातून तुम्हास एकदम हाकलन देऊ. तुम्ही वाड्यात जाऊन राहावे.' अशी ताकीद कर्नल बार यांच्याकडन वारंवार होऊ लागली होती. तसे मल्हारराव महाराजांनी यावेळी कृत्रिम प्रेम दाखविण्यास आरंभ केला होता. 'महाराणी जमनाबाई यांनी सरकारवाड्यात येऊन राहावे,' असे त्यांनी जमनाबाईंस इतर लोकांच्या मार्फतीने कळविले होते. इतकेच नव्हे, तर 'उभयतांनी सल्लासंपाने राहिल्यास सुख मिळेल,' असेही त्यांनी सांगितले; परंतु अंतःस्थ तपासाअंती महाराणीस असे समजले की, मल्हारराव महाराज हे जी शिष्टाई करीत आहेत, तिचा हेतू चांगला नाही. अर्थात अंतःस्थ भेद त्यास समजल्याने त्यांना बडोदे शहर हर प्रयत्नाने सोडल्यावाचून सुटका नाही असेच वाटू लागले.

## तैनातीतील नोकरांची स्थिती व महाराणी जमनाबाई यांचा अर्ज

दररोज बडोदे शहरात घडणाऱ्या वाईट गोष्टी जमनाबाईंच्या कानी येत असल्यामुळे त्यांना चैन पडत नसे. खंडेराव महाराजांच्या वेळचा राज्यकारभार यांस ज्ञात असल्याने मल्हाररावांचा जुलमी

राज्यकारभार त्यांना असह्य झाला. वाड्यात येऊन राहण्याचे त्यांनी उघड रीतीने नाकारल्यानंतर मल्हारराव महाराज हे दुसऱ्या विलक्षण खटपटीस लागले! महाराणींच्या तैनातीस जी माणसे दिली होती ती त्यांनी परत मागितली. तसेच खुराकी व पोशाखी खर्चांचा ऐवज त्यांना देण्याची या राजाने एकदम बंदी केली. त्यांच्या तैनातीतील माणसास मारण्याची धमकी देऊन काहींना त्यांनी घरी बसविले. काही मरणाच्या भयाने मल्हारराव महाराजांस अनुकूल झाली. महाराणी व त्यांचे आप्त यांची मल्हारराव महाराजांनी मानहानी चालविली. मध्यंतरी दौलतराव काका माने बडोद्यास जमनाबाईंच्या भेटीस आले होते. त्यांचाही मल्हारराव महाराजांनी जबरदस्त अपमान केला. त्यामुळे ते तसेच मुंबईस गेले व सरकारास त्यांनी ती हकीकत कळविली. तारीख २ ऑक्टोबर सन १८७१ रोजी महाराणी जमनाबाई यांनी आपल्या अडचणी अर्ज रूपाने मुंबई सरकारास कळविल्या. महाराणींच्या तैनातीतील लोकांच्या अवस्थेबद्दल त्या अर्जातील मजकुरावरून बरीच कल्पना करता येईल. "....... मजपाशी नोकर वगैरे काही लोक दरबारातर्फे तैनातीस आहेत. प्रसूत होईपर्यंत त्या लोकांस आमच्याकडून चांगला लाभ मिळेल अशी उमेद होती. तथापि, त्या वेळेसही ते लोक वेदिलच राहात होते. आपण आमच्याजवळ पोलिसांचा बंदोबस्त ठेवल्यावर मात्र ते नीट राहात असत. हल्ली दोन्ही अर्थ नसल्याने, त्या लोकांचे मन आमच्याकडून उठले आहे. त्या लोकांपैकी काही लोक दरबाराकडेही मिळाले व काही आम्हास सोडून निर्धास्तपणे निघून गेले; अशी अवस्था आहे. त्यात आमच्याजवळ सरकारने पोलिसांचा बंदोबस्त ठेवला आहे. त्याचा खर्च दरबारास फार पडतो, याकरिता तो कमी करण्याविषयी दरबारातून आपल्याकडे लिहून आल्याचे समजते. याविषयीचा खर्च दरबारास भारी वाटण्याचे कारण नाही. कारण दरबारात लाखो रुपये विनाकारण इतर रीतीने खर्च होतात. दरबार आहे तेथे हा खर्च विशेष आहे असे नाही. हे आपण लक्षात घेऊन दरबाराचे म्हणणे कबूल ठेवणार नाहीत अशी मला उमेद आहे. कारण आपण आजपावेतो आमचा बंदोबस्त चांगला ठेवून अशा संकटमय अवस्थेत संरक्षण केले, तेव्हा यावेळीही माझ्या विनवण्याचा पोक्त विचार होईलच." महाराणी जमनाबाई यांची ही दीनवाणी; परंतु सप्रमाण विनंती मुंबई सरकाराने मान्य केली व त्यांच्या बंदोबस्ताकरिता पोलिसांची माणसे पहिल्याप्रमाणेच ठेवून त्यांचा खर्च बडोदे दरबाराने द्यावा असा ठराव केला.

## बडोदे सोडण्याच्या मागणीचे प्रकरण

मल्हरराव महाराज हे विलासात व महाराणी जमनाबाईंच्या पक्षाच्या मंडळीस त्रास देण्यात सर्वथैव गढून गेले होते. अशा भयंकर अवस्थेत येथे राहणे हे निर्भय नाही, तसेच पुढे जर दैवयोगाने चांगले दिवस यावयाचे असतील तर ते येथे राहिल्याने कधीही येणार नाहीत, अशी महाराणी जमनाबाई यांची पक्की समजूत झाली होती. कोणतीही राजकीय गोष्ट बोलण्याचा बडोद्यास त्यांना प्रतिबंध होता. यांची मुंबईस जाणारी पत्रे फार जपून पाठवावी लागत असत.

मुंबईहून येणारी पत्रे यांना मिळेनात, असा काही विलक्षण घोटाळा झाला होता असे म्हणतात. ही स्थिती त्यांनी मुंबई सरकारास कळविली व बंदोबस्त करून घेतला. तथापि एका वेशधारी मनुष्याने आठ-पंधरा दिवसांनी पत्रे घेऊन मुंबईस जावे व तिकडील पत्रे घेऊन यावे, असा नवीन क्रम महाराणी जमनाबाई यांनी या वेळेपासून सुरू केला होता. बडोद्यातील अनेक प्रकारच्या विवंचनेमुळे महाराणी जमनाबाई यांची प्रकृती अशक्त होत चालली होती. नूतन ताराबाईंचीही प्रकृती बरोबर नव्हती. येथील किंवा बाहेरच्या वैद्यांचे औषध सुरू केल्यास फितुरी काहूर उभे राहून विपर्यास होण्याचे त्यांना भय पडले होते. याकरिता बडोदे सोडून कोठे तरी चांगल्या हवेच्या ठिकाणी राहण्यास जाण्याची सरकाराजवळ त्यांनी परवानगी मागितली. त्या सरकाराने या कामात बरेच आढेवेढे घेतले. 'कर्नल बार साहेबांनी राणी जमनाबाईंचे मन वळवून त्या बडोद्यासच राहतील अशी तजवीज करावी,' असे मुंबई सरकारने कळविले होते. कर्नल बार यांनी या हुकुमास अनुसरून महाराणी जमनाबाईंची भेट घेतली व त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. तथापि महाराणी जमनाबाईंनी अनेक अडचणी दाखवून बडोदे सोडण्याची मागणी कायमच ठेवली. त्यांनी तारीख ८ ऑक्टोबर सन १८७१ ची यादी मुंबई सरकारास दिली व तीच या बाबतीची शेवटची मागणी होय. तीत त्यांनी असे म्हटले आहे की, "..... आ साहेबांनी आम्हांस प्रसंगी मदत देऊन मेहेरबानी करून आमचा या वेळेपर्यंत सांभाळ केला, याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. येथे माझी व मुलीची प्रकृती नीट राहत नाही. हमेशा चित्त उदास राहते. याकरिता काही दिवस मुंबई किंवा पुण्यास जाऊन राहण्याबद्दल तजवीज होण्याविषयी तारीख १४ ऑगस्ट सन मजकुराची याद आ साहेबांकडे व रेसिडेन्ट साहेब यांजकडे देण्यात आली.

त्यानंतर दुसरी यादी तारीख १९ सप्टेंबर सन १८७१ रोजी मेहेरबान रेसिडेन्ट साहेब यांच्याकडे देण्यात आली. ती नामदार साहेबांकडे त्यांच्याकडून पाठविण्यात आल्याबद्दल तारीख २० सप्टेंबर सन १८७१ ची यादी साहेब ...... यांच्याकडून आली. आज पुष्कळ दिवस झाले; परंतु माझी निघण्याबद्दलची तजवीज झाली नाही. दिवसानुदिवस प्रकृती विशेष अस्वस्थ राहत असून, ही शरद ऋतूची हवा गुजराथेत किती वाईट असते हे प्रसिद्ध आहे. तशात लहान मुलास तर फारच वाईट. यास्तव मेहेरबानी करून जितके माझे निघणे येथून लवकर होईल अशा तजविजीबद्दल मेहेरबानी व्हावी..... विशेष हकीकत तीर्थस्वरूप दौलतराव काका माने रहिमतपूरचे जहागीरदार हे आपणास समक्ष कळवतील."

## महाराणींचे पुण्यास गमन

या त्यांच्या यादीचा उपयोग चांगला झाला. मुंबई सरकारचे मन महाराणी जमनाबाई यांच्या विनंतीकडे वळले. 'राणी जमनाबाई यांनी आपल्या बरोबरच्या मंडळींसह पुण्यास जाऊन राहावे, असा त्या सरकाराकडून हुकूम आला. या हुकुमात 'मल्हारराव महाराज हे ज्या हकिकती दाखवितात त्या आम्हास ऐकण्याचे कारण नाही,' असाही खुलासा केला आहे. तारीख ३

जानेवारी सन १८७२ रोजी महाराणी जमनाबाई यांनी आपल्या नूतन प्रिय कन्येसह बडोदे सोडले. त्यांनी पुण्यातील शनिवार पेठेमधील गद्रे यांच्या वाड्यात मुक्काम* ठेवला. तेथे गायकवाड सरकारचा मोठा वाडा असता त्यांनी त्या वाड्यात राहावे, अशी मल्हारराव महाराजांनी परवानगी दिली नव्हती. अर्थात, त्यांना तेथे भाड्याने जागा घेऊन तेथेच राहणे भाग पडले. यांना पुण्यास राहण्याची जागा मिळू नये याकरिता यशवंता येवल्या व तात्या पुणेकर यांना मल्हाररावांनी तिकडे पाठविले होते. त्यांनी तेथे जाऊन बरीच खटपट केली; परंतु त्यांचे काहीच चालले नाही. महाराणी जमनाबाई यांच्याबरोबर आनंदराव माने, तात्यासाहेब जाधव, बाळामिया, बाबा नेरळकर वगैरे मंडळी सहकुटुंब गेली होती. यांच्या तैनातीतील माणसांनासुद्धा या स्वारीबरोबर एकंदर दोनशे मनुष्ये गेली होती असे म्हणतात. राजा सर टी. माधवराव यांनी महाराणी जमनाबाई यांच्याविषयी जी हकीकत कळविली, तीत त्यांनी या प्रसंगाचे वर्णन फारच हृदयद्रायक केले आहे. ते म्हणतात की, "........ या निराश बाईला निराधार आणि दुःखमय स्थितीत असे वाटले की, पुढचे दिवसही याप्रमाणेच आपल्याकरिता कठीण नियमित झाले आहेत. यासाठी शांतपणे निवांत स्थळी आयुष्यक्रमण करावे, म्हणून हमेशाकरिता बडोदे सोडण्याची तिने तयारी केली. या तिच्या विचाराला पुष्कळ दुर्भेद्य अडचणी येऊ लागल्या. आपल्या मृत नवऱ्याच्या देशातून हद्दपार होणे व राजवाडा सोडून झोपड्यात राहणे हे तिने पसंत करून आपला हेतू तडीस नेण्याचा आग्रह धरला. नवीन जन्मलेल्या ताराबाईरूपी फक्त तिच्याजवळ असलेल्या खजिन्यासह तिने बडोदे सोडले! हीच ती तारा व हीच ती चांदणी. जिने तिच्या वर्तमानभावी दुःखाचा परिहार केला. जमनाबाईला आपण बडोद्याला हा शेवटचा रामराम केला असे वाटत होते; परंतु आपले माहेरघर जे रहिमतपूर येथे न जाण्यापुरती ती मानी होती. फार तेजस्वी आशेवर कौमार्यावस्थेत

---

*"....बार साहेब यांच्या मनात असे होते की, त्यांनी (जमनाबाईंनी) बडोद्यात राहावे व त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यास नेमणुक करून देववावी याबद्दल त्यांनी महाराजांचे अनमतदेखील मिळविले होते; परंतु राणीसाहेब यांना ते बिलकल आवडले नाही. आपणास दत्तक द्यावा, असा त्या आग्रह धरून बसल्या व तसे होणे शक्य नाही असे त्यांना (कर्नल बार) वाटले. तेव्हा मल्हारराव महाराज यांचा काही इलाखा न ठेवता आपल्या नेमणुकीबद्दल त्या निराळी जहागिरी मागू लागल्या......" (बळवंतराव देवकृत मल्हारराव महाराज गायकवाड यांचा खरा इतिहास.)

*हा वाडा येथील एका सावकाराकडे गहाण होता. महाराणी जमनाबाई साहेब या पुढे बडोद्यास परत आल्यावर त्यांनी तो वाडा आठरा हजार रुपयांस ताराबाईंकरिता खरेदी करण्याचा ठराव करून बयाण्यादाखल त्या गहाणदारास दोन हजार रुपये दिले व बाकीची रक्कम त्यास न पोहोचल्यामुळे ती बयाण्याची रक्कम गडप झाली व वाडा ताब्यात आला नाही. या कामात महाराणीस एकंदर अठरा हजार रुपयांचे नुकसान लागले असे म्हणतात. हा वाडा तेवीस हजार रुपयांत 'न्यू इंग्लिश स्कूल'ला पुढे मिळाला.

जे रहिमतपूर तिने सोडले होते, तेथे निराधार विधवेप्रमाणे तिच्याने जाववेल काय? जे तिचे रहिमतपूरचे मित्र तिला पूर्वेकडील प्रदेशात उत्पन्न होणाऱ्या अति मूल्यवान जवाहिराने मढविलेली व अति संपत्तीवान राजाची प्रिय पत्नी आहे अशा स्थितीत पाहत होते, त्या मित्रांकडे सर्व वैभव नष्ट अशा स्थितीत तिने जावे काय? नाही. पतीच्या व आई-बापांच्या घरापासून दूर निर्भय स्थळी आयुष्य क्रमण्याचा तिने निश्चय केला. तिने पुण्यास आपली वस्ती केली...."
असो. बडोदे सोडताना मल्हाररावांनी महाराणी जमनाबाईंना वाड्यातील त्यांच्या मालकीचे जडजवाहीर नेऊ दिले नाही. त्यांनी जप्त केलेली मालमत्ता आपल्या सरकारी जामदारखान्यात दाखल केली. कर्नल बार साहेब हे या मालमत्तेची हमी घेण्यास जे पूर्वी तयार झाले होते, तेच आता महाराजांचा त्यांचे क्रमाप्रमाणे पक्ष ताणून महाराणीच्या विरुद्ध बोलू लागलेले पाहून बडोदे सोडताना त्याबद्दल जमनाबाई महाराणीस फार वाईट वाटले. या राजपत्नीला फक्त अंगावरच्या कपड्यांसह पतीच्या राजधानीचा त्याग करण्याचा दुर्दैवी योग यावा, हे अतिशय विलक्षण आहे. बडोदे सोडताना त्यांच्या डोळ्यांस पाणी आले. आता आपले पाऊल बडोद्यास पुनः पडण्याची आशा नाही व आपला अंत अशा कष्टमय अवस्थेतच व्हावयाचा आहे, असा त्यांच्या मनाचा पक्का ग्रह झाला. त्यांनी थोड्या दिवसांकरिता पुणे पसंत केले; परंतु पुढे काही दिवसांनी श्रीकाशी किंवा श्रीरामेश्वर क्षेत्री जाऊन आपल्या आयुष्याचे दिवस संपविण्याचा निर्धार व्यक्त केला होता.

# भाग अकरावा

# आपत्तीचे दिवस आणि प्रसंगावधान

## महाराणी जमनाबाईंची निर्वाहास मिळणारी नेमणूक मल्हाररावांनी बंद केली

महाराणी जमनाबाईंनी पुण्यास राहण्याचे मुक्रर केलेले दिवस हे लोकांच्या समजुतीप्रमाणे शेवटचे होते. विषयांध आणि निर्दय मल्हाररावांकडून अप्रतिष्ठा झाल्यानंतर बडोदे सोडण्यापेक्षा स्वतः खुशीनेच दोन पाऊल दूर जाऊन राहण्याचा त्यांनी निश्चय केला. बडोद्यात होणाऱ्या घडामोडी आणि चाललेले प्रकार हे विचारवान मनुष्यास असह्यच होते. महाराणी जमनाबाईंनी शेवटपर्यंत संकटात राहून काळक्रमण करावे, याकरिता गायकवाडी कुटुंबातील प्रमुखपण भोगणाऱ्या मल्हाररावांनी त्यांना निर्वाहापुरती नेमणूक देण्याचेही नाकारले. महाराणी बडोद्यात येऊन राहील तरच नेमणूक मिळेल, अशी अट ठेवून त्यांनी आपला पक्ष सबळ केला. ज्या थोड्याशा नेमणुकीवर यांचा निर्वाह चालत असे, तिही मल्हाररावांनी पुढे बंद केली. अर्थात, हे प्रकरण मुंबई सरकारापुढे नेण्याची जरूरत पडली. मल्हारराव हे सत्ताधीश असल्याकारणाने त्यांचाच पक्ष तेजदार बनत चालला. रेसिडेन्ट साहेबांस खुश कसे ठेवावे ते मल्हाररावांस बऱ्याच अंशाने साधले होते. अन्नवस्त्रांकरिता मिळणारी नेमणूक बंद झाल्याकारणाने महाराणी जमनाबाईंचा सर्व खर्च अण्णासाहेब मान्यांनी आपल्याच नेमणुकीतून चालविला. जी राजपत्नी हजारो कुटुंबांचे योगक्षेम चालविण्यास शक्तिमान होती, तिला वैधव्यदशा येताच निराधार बनून दुसऱ्यांवर अवलंबून राहण्याचा दुर्योग यावा, ही दैवाची एक विचित्र लीलाच समजली पाहिजे. आपल्या पाणीदारपणाचा बाणा कायम ठेवण्यासाठी त्या पुण्यास आल्या, हे मल्हारावांस आवडले नाही. त्यांनी पुण्यास महाराणी जमनाबाईंवर व त्यांच्या पक्षाच्या लोकांवर अनेक भयंकर प्रसंग आणण्याकरिता बडोद्याहून काही लोक तिकडे पाठविले होते; परंतु त्यांच्या हातून तेथे म्हणण्यासारखी एकही महत्त्वाची गोष्ट घडली नाही. मल्हाररावांचे सर्व प्रयत्न वाया गेले व शेवटी त्यांनी आपल्या सर्व मंडळींनी बडोद्यास यावे असे ठरविले.

## महाराणी जमनाबाईंनी बडोदे येथे राहावे याबद्दल मल्हाररावांनी केलेले प्रयत्न

महाराणी जमनाबाईंची नेमणूक बंद केल्यास त्या मुकाट्याने बडोद्यास येतील, अशी मल्हारराव महाराजांची त्यांच्या मंडळीने समजूत घातली होती. ती समजूत खोटी ठरताच त्यांनी एक लाख रुपये देण्याची महाराणी जमनाबाईंना लालूच दाखविली. असे करण्याचे कारण महाराणी जमनाबाईंनी बडोद्यास येऊन सरकारवाड्यात राहावे एवढेच होते. बडोद्याच्या एकंदर स्थितीविषयी महाराणी जमनाबाईंच्या हृदयात बराच तिरस्कार उत्पन्न झाला असल्यामुळे त्यांनी बडोद्यास जाण्याचे बिलकूल नाकारले. "राणी बडोद्यात येऊन सरकारवाड्यात राहील तर मला मोठा आनंद होईल. ही सर्व दौलत त्यांचीच आहे," असे मुंबई सरकारास मल्हारराव महाराजांनी कळविले होते. ते त्या सरकारास संयुक्तिकही वाटले. दौलतराव मान्यांना त्या सरकारने बोलावून 'राणी जमनाबाईंनी बडोद्यास जाऊन राहाणे युक्त आहे,' असे त्यांना सांगितले. त्यांनी मल्हारराव महाराजांचे अंतःस्थ हेतू काय आहेत, त्यांची यथार्थ ओळख करून दिली; परंतु त्या सरकारने आपला आग्रह सोडला नाही. ही हकीकत केवळ काल्पनिक आहे, असेच गृहीत धरले व 'राणी जमनाबाईंनी ताबडतोब बडोद्यास निघून जावे. तेथे त्यांची व्यवस्था नीट रीतीने राहील,' असा हुकूम सोडला. त्यावरून हे प्रकरण तात्काळ हिंदुस्थान सरकारच्या कानावर घालणे भाग पडले. दौलतराव काका मान्यांनी महाराणी जमनाबाईंच्या तर्फेने एक यादी त्या सरकारकडे पाठविली व तिकडून 'महाराणी जमनाबाईंना पुण्यास राहण्याची हरकत होऊ नये,' असा हुकूम आणला. या यादीत मल्हारराव महाराजांच्या एकंदर घडलेल्या वर्तनाचे वर्णन दौलतराव काका माने यांनी केले असल्यामुळे त्या सरकाराने त्यांची ती मागणी कबूल केली होती. मल्हाररावांनी आपले वाईट हेतू कोणासही कळू नयेत, म्हणून त्यावर सरळपणाचे आच्छादन टाकले व महाराणी जमनाबाईंना बडोद्यातील सरकारवाड्यात आणून ठेवण्याचा प्रयत्न आरंभिला. त्यांनी चालविलेली रदबदली महाराणी व त्यांच्या पक्षाच्या लोकांनी कबूल केली नाही, म्हणून त्यांच्या रोषास ते विशेष पात्र झाले. अण्णासाहेब माने यांचीही नेमणूक मल्हाररावांनी बंद केली; परंतु हे प्रकरण हिंदुस्थान सरकारपुढे गेल्याने त्या सरकारने मुंबई सरकारास लिहून महाराणी जमनाबाईंना सालिना छत्तीस हजार रुपयांची नेमणूक तूर्त बांधून दिली व ज्यांच्या नेमणुका बंद केल्या होत्या त्या मोकळ्या करण्याचा बडोदे दरबाराकडे हुकूम पाठविला. महाराणी जमनाबाईंना जी छत्तीस हजार रुपयांची नेमणूक बांधून दिली, ती त्यांच्या चरितार्थाला पुरण्याइतकी बिलकूल नव्हती; परंतु तूर्त तिचा स्वीकार करणे हेच त्यांनी पसंत केले. पुण्यास आल्यापासून लिहिणे, वाचणे आणि आपली प्रिय कन्या ताराबाई यांच्याशी लडिवाळपणा करून त्यात काळ घालविणे, हीच काय ती यांच्या करमणुकीची खरी साधने होती. याप्रसंगी त्यांनी इंग्रजी भाषेचाही अभ्यास वाढविला.

## हिंदुस्थान सरकारकडे व मुंबई सरकारकडे महाराणी जमनाबाईंनी स्वतःस दत्तक मुलगा मिळून त्याच्या नावाने राज्यकारभार चालविण्याची केलेली मागणी

मिळत असलेली नेमणूक फारच थोडी असल्यामुळे महाराणी जमनाबाईंनी ती वाढवून देण्याकरिता खटपट चालविली. राजपत्नीच्या दर्जाला व मानमान्यतेला योग्य अशी नेमणूक मिळावी, अशी मागणी केली होती. यावेळी मुंबई सरकारही बरेच अनुकूल झाले. बडोद्याचे रेसिडेन्ट कर्नल आर. फ्रेयर यांनी ता. २ नोव्हेंबर सन १८७४ चा मुंबई सरकारास जो रिपोर्ट केला आहे त्यात महाराणी जमनाबाईंना मल्हाररावांनी सालिना एक लाख रुपयांची नेमणूक द्यावी असे लिहिले आहे. हा रिपोर्ट मुंबईस जाऊन पोहोचताच बडोद्याचे राज्यचक्र बदलण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली. महाभयंकर अरिष्टामुळे या राज्याचे पुढे काय होते, याचा कोणासही भरवसा वाटेनासा झाला. मल्हारराव महाराजांच्या झोटिंग बादशाहीमुळे राज्यावरील संकटे दिवसेंदिवस वाढत जाऊन त्यांची सत्ता ढासळत चालली. स्वभावतःच जे दुर्बळ, अज्ञान आणि पुष्कळ दिवस तुरुंगात राहून एकदम सिंहासनावर येऊन बसलेले, त्याच्या हातून राज्यकारभार उत्तम रीतीने चालण्याची आशाच ठेवावयास नको. भयंकर निकराला ही गोष्ट जाऊन पोहोचली. सर रिचर्ड मिडचे कमिशन बसून त्या कमिशनने केलेल्या रिपोर्टास अनुसरून राज्यात सुधारणा करण्याकरिता दिलेल्या मुदतीचा काहीच उपयोग झाला नाही. उलट बडोद्याचे राज्यरूपी तारू महाभयंकर तुफानात सापडून बुडण्याची वेळ नजीक येत चालली. हे पाहून राणी जमनाबाईंनी समयसूचकता वापरून ब्रिटिश सरकारास जागे करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सविस्तर कारणांची व मुद्देसूद हकिकतीची एक यादी त्या सरकारकडे देऊन 'मला दत्तक मुलगा देऊन बडोद्याचे राज्य त्या मुलाच्या नावाने चालवावे,' अशी मागणी केली. या यादीमध्ये मुख्यत्वेकरून खाली लिहिलेल्या गोष्टींना विशेष प्राधान्य दिले होते :

१. मल्हारराव महाराजांस कर्नल बार यांनी पाद्र्याहून आणविले, असे असताना मुंबई सरकारास त्यांनी 'बडोद्याच्या दिवाणांनी त्यास आणले' असे खोटे कळविले. अर्थात, बडोद्याच्या अव्यवस्थित राज्यकारभाराची जबाबदारी बडोदे राज्यावर नाही.

२. मल्हारराव महाराज हे राज्यकारभार चालविण्यास लायक नाहीत, याविषयी पूर्वीच हिंदुस्थान सरकारची आम्ही खात्री करून दिली होती. यांच्या हातून कै. खंडेराव महाराजांच्या कारकीर्दीत घडलेल्या गोष्टी ब्रिटिश सरकारास पूर्ण ठाऊक आहेत. तेव्हा ते त्या सरकाराशी राजनिष्ठेने वागणार नाहीत, हे आम्हास ठाऊक होते. यास्तव चि. ताराबाईंचा जन्म झाल्यावर 'आमच्या मांडीवर दत्तक पुत्र देऊन त्यांच्या नावाने राज्यकारभार चालवावा,' अशी आम्ही पूर्वी मागणी केली होती.

३. मल्हारराव महाराजांस गादीवर बसवू नये, असे आम्ही पूर्वी सुचविले असता मुंबई सरकारने कर्नल बार साहेबांच्या शिफारशीवर भिस्त ठेवून मल्हाररावांस राज्याधिकार

सोपविला, त्याचाच हा प्रस्तुतचा परिणाम आहे. यात कै. खंडेराव महाराजांच्या वारसदारांचा बिलकूल दोष नाही. मल्हाररावांकडून घडलेल्या कृतीची जबाबदारी ते व त्यांच्या वारसांवरच असली पाहिजे. बडोद्याच्या राजगादीवर ती जबाबदारी येऊ शकत नाही.

४. मल्हारराव महाराजांस बडोद्याची गादी मिळू नये, मिळाल्यास मोठे अनर्थ होतील हे कै. महाराजांना ठाऊक होते व त्यांनी ते ब्रिटिश सरकारच्या नजरेस आणून दिले असतानाही सरकारने ही गादी मल्हाररावांसच दिली. मल्हाररावांच्या हातून राज्यात असंख्य बखेडे झाले आहेत. त्याची जबाबदारी बडोद्याच्या हक्कदार गायकवाडांवर येऊ शकत नाही.

५. बडोदे राज्यातील सर्व प्रजा, सरदार, दरकदार व दुसरे लोक मल्हारराव महाराजांच्या जुलुमामुळे फार त्रासून गेले आहेत. काही कुलीन लोकांच्या स्त्रियांना मल्हारराव महाराजांनी भ्रष्ट केले! त्यांनी राज्यात फार घोटाळे केले. त्याचा सरकाराने पोक्तपणाने विचार करून बडोदे राज्याची व्यवस्था नीट लावावी.

६. इ.स. १८५७ सालच्या बंडाच्या वेळी कै. खंडेराव महाराजांनी ब्रिटिश सरकारचे संरक्षण करण्याकरिता फार प्रयास केले. त्यांनी ही जी मोठी कामगिरी बजाविली, तिची विस्मृती हिंदुस्थान सरकारास अद्यापि झाली नाही.

७. नामदार लॉर्ड कॅनिंग यांनी तारीख ११ मार्च सन १८६२ रोजी दिलेल्या सनदेने आम्हास दत्तक घेण्याचा हक्क मिळाला आहे. खंडेराव महाराज हे पूर्ण राजनिष्ठेने वागले होते. तेव्हा त्यांना या सनदेद्वारे मिळालेला हक्क अद्यापि कायमच आहे.

८. सन १८६३ सालात कै. महाराज हे मुंबईस गेले होते, त्यावेळी नामदार सर. बार्टल फ्रेयर मुंबईचे गव्हर्नर यांच्याजवळ त्यांनी दत्तक पुत्र घेण्याची मागणी केली होती; परंतु महाराजांनी एवढ्यात दत्तक घेण्याची घाई करू नये, पुत्र होण्याचे दिवस अद्यापि आहेत. महाराजांस पुत्र नच झाला, तर दत्तक पुत्र घेण्याचा त्यांनी विचार केल्यास तो घेता येईल. असे नामदार साहेबांनी सांगितल्यावरून दत्तक पुत्र घेण्याचा विचार त्यावेळी तहकूब राहिला.

९. दत्तक पुत्र घेऊन बडोद्याचे राज्य आपण आपल्या ताब्यात घ्या', अशी बडोद्यातील प्रतिष्ठित लोकांची पत्रे मजकडे आली असून, मुंबई सरकारकडेही ती गेल्याचे कळते. खंडेराव महाराजांवर बडोदे राज्यातील प्रजा फार अनुरक्त होती व त्यांच्या राणीने दत्तक पुत्र घेऊन राज्यकारभार चालविल्यास ते लोक फार खुश होतील.

अशा मतलबाच्या याद्या करून दौलतराव काका माने यांच्याद्वारे मुंबई सरकारकडे अण्णासाहेब किवे यांच्याजवळून बडोद्याच्या रेसिडेन्ट साहेबांकडे आणि गोविंदपंत भावे यांना कलकत्त्यास पाठवून हिंदुस्थान सरकारकडे देवविल्या व त्यांच्याद्वारे त्या सरकारास बडोद्याच्या

या प्रकरणाची साग्र माहिती देवविली. या तिन्ही गृहस्थांनी यावेळी फारच खटपट केली. त्यांनी युरोपियन लोकांत चांगले वळण ठेवून महाराणी जमनाबाईंची मागणी न्यायशीलतेस किती अनुसरून आहे, त्याची त्यांना ओळख करून दिली. त्यांनी ही कायदेशीर तक्रार मोठ्या नेटाने चालवून तिला विशेष वजन आणले. इतकेच नव्हे तर युरोपियन लोकांच्या न्यायशीलतेचे ते एक स्मारक करून ठेवले.

## जमनाबाई महाराणी यांस दत्तक पुत्र देऊन राज्य चालविण्यासाठी शिंदे व होळकर यांनी केलेली मदत

पुण्यास आल्यावर महाराणी जमनाबाईंनी इंदूर संस्थानाधिपती तुकोजीराव होळकर यांना पत्र पाठवून बडोदे राज्यावर आलेल्या प्रस्तुतच्या प्रसंगाची त्यांना यथार्थ माहिती दिली व त्यांच्याशी निस्सीम भ्रातृभाव संपादन केला. महाराज तुकोजीराव होळकर यांनी आपल्या या संकटग्रस्त भगिनीची पुण्यास येऊन भेट घेतली आणि आलेल्या संकटांतून बडोदे राज्याचे संरक्षण करण्याचे त्यांना पूर्ण अभिवचन दिले. त्यांच्या मार्फतीने ग्वाल्हेर संस्थानाधिपती अलिजा बहादूर जयाजीराव हेही राणी जमनाबाईंस अनुकूल झाले. "आज खंडेराव महाराजांच्या कुटुंबावर वाईट प्रसंग आला आहे. उद्या याच्याहून कठीण प्रसंग आमच्यावर येईल. याकरिता आम्ही तनमनधने करून महाराणी जमनाबाईंस मदत देण्यास आणि प्रसंगास अनुसरून परिश्रम करण्यास तयार आहोत." याप्रमाणे या उभय महाबलाढ्य राजांचे पाठबळ मिळाल्याने महाराणी जमनाबाईंस बराच धीर आला. या राज्यकार्यधुरंधर महापुरुषांनी नामदार व्हाईसरॉय साहेबांजवळ बडोदे राज्यातील प्रस्तुतच्या अव्यवस्थेसंबंधी गोष्ट काढून महाराणी जमनाबाई यांना दत्तक पुत्र देऊन ते राज्य त्या मुलाच्या स्वाधीन करावे, असे त्यांस सांगितले आणि त्यांनी नामदार लॉर्ड नार्थब्रुक यांच्या जवळून त्याविषयी आश्वासन घेऊन ठेवले. पुण्यास असताना महाराणी जमनाबाईंना पैशाची लागेल ती मदत देण्याचा तुकोजीराव होळकर यांनी विडाच उचलला होता! महाराणी जमनाबाई यांनी हिंदुस्थान सरकारकडे पाठविलेली यादी आणि तीत केलेल्या मागण्या या हिंदुस्थानातील सर्व एतद्देशीय राजांच्या फार हिताच्या आहेत. याकरिता त्यांच्याकडे हिंदुस्थान सरकारचे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी तुकोजीराव होळकर यांनी फार खटपट केली. ही वेळ फारच नाजूक होती. नामदार हिंदुस्थान सरकारचे लक्ष खंडेराव महाराजांच्या राजनिष्ठेकडे वळवून खंडेराव महाराजांनी ब्रिटिश सरकारचे ऐन आणीबाणीच्या वेळी जे संरक्षण केले, तशी उदाहरणे एतद्देशीय राज्यकर्त्यांकडून घडावीत, अशी जर इच्छा असेल, तर महाराणी जमनाबाईंस दत्तक पुत्र देणे हेच इष्ट आहे, असे सांगून बडोदे राज्याला तुकोजीराव होळकर यांनी चिरस्थायीपणा आणला. या कामात त्यांना अलिजा बहादूर जयाजीराव शिंदे यांची बरीच मदत झाली.

## कवळाणे येथील गायकवाडी घराण्यातील मुलगा बडोदे येथील गादीवर दत्तक घेण्याबद्दल प्रयत्न

खंडेराव महाराजांच्या कारकीर्दीत दत्तक घेण्याचा प्रश्न ज्यावेळी निघाला, त्यावेळी कवळाण्याचे (नाशिक) उखाजीराव गायकवाड हे बडोद्यासच होते. 'बडोद्याच्या गायकवाड कुटुंबास आम्ही फार जवळचे आहोत,' असे त्यांनी खंडेराव महाराजांस सांगितले. त्यांनी या गोष्टीच्या सत्यतेकरिता सनदा, वंशवृक्ष व पत्रेही दाखविली. या म्हणण्यात किती खरेपणा आहे, ते पाहण्याचे काम खंडेराव महाराजांनी त्या वेळचे हुजूर कामदार गोविंदराव लक्ष्मण सिंदकर यांस सांगितले. त्यांनी योग्य तितका पुरावा घेऊन कवळाणे येथील गायकवाड कुटुंबाची असलेली शाखा बडोद्यातील गायकवाडांस फार जवळ आहे असे ठरविले; परंतु दुर्दैवाने इतक्यात खंडेराव महाराजांचा अंत झाला! अर्थात हे प्रकरण तसेच पडून राहिले. पुढे मल्हाररावांनी दत्तक पुत्र घेण्याचा विचार चालविला त्यावेळी हे प्रकरण पुन्हा उपस्थित झाले. यासमयी उखाजीराव व त्यांचे बंधू काशीराव हे आपल्यापैकी मुलगा दत्तक देण्यास तयार झाले. मल्हाररावांनी काशीराव यांच्या वडील मुलास दत्तक घेण्याचा विचार करून त्या कामास बडोद्याच्या रेसिडेन्टाची संमत्ती मिळवली. इतकेच नव्हे तर मुलास घेऊन येण्याकरिता पोशाख वगैरे देऊन माणसेही रवाना केली. इतक्यात मल्हाररावांनी महाराजांची राणी लक्ष्मीबाई या प्रसूत होऊन पुत्ररत्नाची प्राप्ती झाल्यामुळे दत्तक घेण्याचा विचार मल्हारराव महाराजांनी एकदम बंद ठेवला. पुण्यास काशीरावांस त्यांच्या तीन मुलांसह मल्हारराव महाराजांनी योग्य बंदोबस्त करून देऊन ठेवले होते; परंतु दत्तक घेण्याचा विचार बंद पडताच त्यांनी आपली चाकरमाणसे बडोद्यास परत बोलावून घेतली. त्यामुळे काशीरावास फार वाईट वाटले. हा त्यांना जो मोठा लाभ होण्याचा योग आला होता, तो नष्ट झाल्यामुळे ते उदास बनले. भाऊ खेडकर जो मल्हारराव महाराजांच्या कृपेस अपात्र ठरला होता, त्याने काशीरावांचा पक्ष स्वीकारून मल्हारराव महाराजांची कृपा संपादन करण्याचा घाट घातला; परंतु काशीरावांचा मुलगा दत्तक घेण्याचा बेत फसताच त्याला विशेष दुःख झाले. एवढ्यात महाराणी जमनाबाईंच्या मांडीवर मुलगा देण्याची खटपट सुरू झाल्याची खबर या भाऊस लागली. त्याने जानबा पुणेकरांस सांगत बाळामिया माने यांच्या मार्फतीने काशीराव गायकवाड व त्यांची मुले यांना महाराणी जमनाबाईकडे आणून त्यांची सविस्तर हकीकत त्यांस कळविली. काशीरावाने समाधान करून 'जर दत्तक मुलगा घेण्याची परवानगी मिळाली, तर आपल्या या तिघा मुलांपैकी एक मुलगा दत्तक घेईन,' असे महाराणी जमनाबाईंनी त्यांस अभिवचन दिले. परस्परांच्या शपथा होऊन एकमेकाने कोणास अंतर देऊ नये, असे याचवेळी ठरले. दत्तक विधान होईपर्यंत काशीराव गायकवाडांचा पक्ष बळवंतराव काका व बाळामिया माने यांनी घेऊन या कामात बरेच परिश्रम केले.

## महाराणी जमनाबाईंनी दत्तक पुत्र घेण्याबद्दल हिंदुस्थान सरकारची परवानगी मिळविली

कलकत्यातील व मुंबईतील खटपटीस बरेच स्वरूप येत चालले. त्यामुळे राणी जमनाबाईंचा ईश्वरावरील भाव दृढ होत गेला. बडोद्यात धामधूम सुरू झाली. विषप्रयोगाचे प्रकरण उपस्थित होऊन राज्य वैभवावर आरूढ झालेले मल्हारराव यांना बंदिवासात जाण्याची वेळ नजीक आली आणि त्यांच्या सल्लागारांस हद्दपार होण्याचा योग आला. या हकीकतीच्या खबरा बडोद्याहून महाराणी जमनाबाईंना त्यांच्या हितकर्त्या मंडळींकडून पत्राद्वारे पुण्यास जात असत. हिंदुस्थान सरकारचे मत बदलू नये, यासाठी तुकोजीराव नारायण अकोलकर हे गेले होते; परंतु महाराणी जमनाबाई यांच्या तर्फेने तेथे गेलेल्या लोकांस ते मिळाल्याची व खर्च फार होतो, ही सबब नानासाहेब खानविलकरांनी मल्हारराव महाराजांस दाखविल्यामुळे वामनरावांस परत फिरावे लागले. अर्थात, महाराणी जमनाबाईंचा पक्ष प्रबळ होण्यास यावेळी चांगली संधी मिळाली. ग्वाल्हेर व इंदूर येथील राज्यकर्त्यांनी विशेष मनावर घेतल्यामुळे या दत्तक घेण्याच्या प्रकरणास विशेष वजन आले. मल्हारराव महाराजांवरील आरोपांचा तपास करण्यासाठी बसलेल्या कमिशनचा निकाल लागताच महाराणी जमनाबाईंना दत्तक पुत्र घेण्याची परवानगी हिंदुस्थान सरकाराकडून मिळाली व बडोदे राज्यावर आलेले भयंकर संकट एकदम नष्ट झाले. महाराणी जमनाबाई व त्यांच्या पक्षाच्या मंडळीने यावेळी जी खटपट चालविली ती व त्यांना हिंदुस्थानातील प्रख्यात राज्यकर्त्यांचा मिळालेला पाठिंबा हा फारच विचार करण्यासारखा आहे.

## गणपतराव महाराजांच्या पत्नी राधाबाई यांचा दत्तक घेण्याचा श्रेष्ठ हक्क व त्याबद्दल महाराणी जमनाबाईंनी वापरलेली समयसूचकता

बडोद्यास भानगडी उत्पन्न होऊन महाराणी जमनाबाईंनी ब्रिटिश सरकारजवळ दत्तकपुत्र घेण्याची मागणी केल्याची व तो त्यांचा प्रयत्न सफल होण्याच्या तयारीत आहे ही खबर गणपतराव महाराजांच्या पत्नी राधाबाई यांना लागताच त्यांनी आपला श्रेष्ठ हक्क दाखविण्याचा प्रयत्न आरंभिला. आम्हास दत्तकपुत्र द्यावा. कारण राणी जमनाबाईंपेक्षा आमचा हक्क जास्त आहे. गणपतराव महाराजांस औरस संतती असती, तर खंडेराव महाराजांस राज्यच मिळाले नसते, या मतलबाचा अर्ज तयार करून तो त्यांनी बापूसाहेब निंबाळकर यांच्याबरोबर मुंबई सरकारकडे पाठविला. राधाबाई साहेबांच्या या प्रयत्नाची खबर महाराणी जमनाबाईंना लवकरच लागली. त्यांनी राधाबाई साहेबांस समजावण्याचा प्रयत्न चालविला. 'यासमयी आपण जर दत्तक पुत्र घेण्याच्या कामात हरकत घेतली, तर ब्रिटिश सरकार या भानगडीचा भलताच निकाल लावील. इतकेच नव्हे तर बडोद्याच्या आपल्या राज्यावर अनिष्ट प्रसंग येईल. यासाठी आपण या भानगडीत पडू नये. महाराणी जमनाबाई यांना जरी दत्तक पुत्र मिळाला तरी तो आपणास मिळाल्याप्रमाणेच आहे. त्यांचा प्रयत्न सफल होण्याच्या तयारीत आहे. तेव्हा यावेळी हरकत घेतल्यास हे प्रकरण वादावर चढेल व विनाकारण राज्याची खराबी होईल' हा तिऱ्हाईत लोकांकडून महाराणी

जमनाबाईंच्या लाभांत मिळालेला सल्ला त्यांनी मान्य केला. चाणाक्षपणाचा उपयोग करून त्यांनी पुढच्या परिणामाकडे लक्ष दिले, 'मला पुढे तुम्ही अंतर देणार नाहीत, असे लिहून देत असाल, तर मी माझा अर्ज परत खेचून घेईन,' अशी अट राधाबाई साहेबांनी दाखविली व ती संयुक्तिक असल्यामुळे महाराणी जमनाबाईंनी स्वदस्तुरचे पूर्वोक्त कबुलीचे पत्र बाबा नेराळकर यांच्याबरोबर पुण्याहून पाठविल्यावरून राधाबाई साहेबांनी आपला अर्ज परत खेचून घेतला. तंजावर, त्रावणकोर वगैरे एकद्देशीय राज्यांत दत्तक पुत्र घेण्याच्या बाबतीत अशाच भानगडी उत्पन्न होऊन त्यांचा झालेला विपर्यास महाराणी जमनाबाईंना ठाऊक होता. तसा प्रसंग न येण्यासाठी यावेळी त्यांनी जी सावधगिरी वापरली तिचा परिणाम फारच चांगला घडला. ही वेळ फारच आणीबाणीची असल्याकारणाने यावेळी प्रसंगावधानाचाच उपयोग करण्याची जरूरत होती. राधाबाई व महाराणी जमनाबाई या उभयता समंजस असल्यामुळेच या प्रकरणाचा संतोषकारक निकाल लागला असे म्हणण्यास हरकत नाही.

## महाराणी जमनाबाई यांनी पुण्यास राहून स्वपक्षास बळकटी आणण्याकरिता केलेले प्रयत्न

यांनी पुण्यास जो काळ कंठिला त्यात त्यांनी मोठमोठ्या युरोपियन स्त्रियांशी स्नेह संपादन केला. कित्येक एतद्देशीय सभ्य गृहस्थही त्यांनी आपल्या पक्षास अनुकूल करून घेतले. मल्हारराव महाराजांविषयी मुंबई सरकारचे मन दूषित व्हावे, याकरिता दौलतराव व आनंदराव माने यांच्याकडून प्रयत्न चाललेच होते. बडोद्यात घडणाऱ्या महत्त्वाच्या हकीकती सांकेतिक भाषेत लिहून महाराणी जमनाबाई यांच्या हितकर्त्या मंडळींकडून पुण्यास येऊन दाखल होत असत. त्यामुळे योग्य वेळी दक्षता वापरून आपला पक्ष सबळ करण्यास त्यांना चांगली संधी सापडली. पुण्यास असता कृष्णराव गोपाळ व गोपाळ हरी देशमुख यांची ही इंग्लिश पत्रव्यवहार व इतर खटपटीस चांगली मदत झाली. या मदतीचा बदला त्यांना पुढे बडोदे दरबारातून उत्तम रीतीने मिळाला.

# भाग बारावा

# मल्हारराव महाराज यांच्या कारकीर्दीचा शेवट

## बडोद्याचा घोटाळ्याचा राज्यकारभार

बडोदे राज्यात अव्यवस्थेने आपले साम्राज्य स्थापन केले. मनसोक्त वर्तन करणे यातच मल्हारराव महाराजांस आनंद वाटत असे. ईश्वराने राजवैभव दिले, त्याचा पूर्ण स्वैरतेने उपभोग घेण्याचा क्रम त्यांनी सुरू केला. राज्यकर्त्या पुरुषांवर जबाबदारी किती व कोणती असते, त्याचे त्यांना ज्ञान नव्हते. राज्याचे आपण पूर्ण मालक आहोत, अशी त्यांची पक्की समजत होती. विलासामुळे प्रजाहिताकडे दृष्टी देण्यास मल्हारराव महाराजांस फावले नाही. राजा व प्रजा यांच्यातील परस्पर संबंध कशा प्रकारचा आहे, हे या वेळच्या बडोद्याच्या राज्यकर्त्यास अवगत नव्हते. यांना अधिकार मिळाल्यापासून प्रजेच्या हितानहिताकडे त्यांचे लक्षच गेले नाही. राज्यात निरनिराळ्या भानगडी उद्भवल्या. लोकांत गुप्त खलबते सुरू झाली. त्यांच्या सल्लागारांचा जोर होऊन त्यांनी मल्हारराव महाराजांस अंकित केले. त्यामुळे लोकांवर पाहिजे तसे जुलूम करण्यास त्या दुष्ट लोकांस संधी मिळाली. राज्याचे मुख्य आधारस्तंभ किंवा ज्यांनी राज्य संस्थापनेच्या काळात आपल्या अमूल्य प्राणाची पर्वा न ठेवता शिरे देऊन गायकवाडांस बडोद्याचे राज्य संपादन करून दिले, त्यांच्या वंशजांच्या घासांत कमतरता आणून ते पैसे चैनीकडे उडविण्याचा क्रम त्यांनी चालविला. त्यामुळे ते लोक नाराज झाले. हुशार व अब्रूदार दिवाण गोपाळराव मैराळ जोपर्यंत हयात होते तोपर्यंत मल्हारराव महाराज हे जरासे दाबांत असतः परंतु त्यांच्या मृत्यूनंतर बडोद्याच्या दरबारात हलकट लोकांचा बाजार भरला! ही दिवाणाची जागा मल्हारराव महाराजांनी ब्रिटिश सरकारच्या संमतीने नानासाहेब खानविलकर यांना दिली. हे मोठे लालची होते. ते महाराजांचे आप्त* असल्यामुळे त्यांचे वजन महाराजांवर नव्हते. उलट महाराज त्यांची

*हे महाराज मल्हारराव यांच्या कुटुंबाचे सख्खे बंधू होते. राजाचे आप्त असल्यामुळे ते दिवाणगिरीच्या हुद्यास लायक ठरले!

भरदरबारात टवाळकी करीत! पैसे मिळविण्याकरिताच त्यांनी दिवाणगिरी पत्करली होती. त्यामुळे मल्हारराव महाराजांना खुश ठेवण्याचा त्यांच्याकडून नेहमी प्रयत्न होई. यावेळचे सेनापती शिवाजीराव खानविलकर व सरसुभे हरिबा गायकवाड हे असत.

या व्यवस्थेमुळे मल्हारराव महाराजांच्या अश्लील वर्तनास आळा बसू शकला नाही. पूर्वोक्त अंमलदारांकडून लोकांवर निरनिराळे जुलूम झाले व ती अंमलदार मंडळी आप्त किंवा स्नेही म्हणवीत असल्याकारणाने त्यांच्या त्या दुष्ट कृतींना प्रतिबंध होऊ शकला नाही. महाराज व त्यांचे सल्लागार अथवा यावेळचे मोठे कारस्थानी लोक यांच्याकडून होणारा त्रास सहन न होऊन बडोद्यातील काही प्रतिष्ठित लोक महाराणी जमनाबाईंच्या पक्षास जाऊन मिळाले. त्यांनी मल्हाररावांविरुद्ध अनेक प्रकारच्या कांगाळ्या ब्रिटिश सरकारपुढे नेल्या. गादीचा अधिकार मिळेपर्यंत मल्हाररावांनी प्रजेला छळले नव्हते; परंतु गादीचे पूर्ण मालक बनताच त्यांच्या वृत्तीत जो एकदम फेर पडला तोच प्रजेला विशेष त्रासदायक झाला. महाराणी जमनाबाईंच्या आशेचा भंग झाल्यामुळे मल्हारराव महाराजांस उल्हास झाला. तेथपासूनच राज्यात अव्यवस्थेचा पाया घातला गेला, असे म्हणण्यास हरकत नाही. मल्हारराव महाराजांनी व त्यांच्या मंडळींनी बडोद्यात पूर्ण स्वैरतेचे वर्तन ज्यावेळी चालविले त्याप्रसंगी महाराणी जमनाबाई या बडोद्यात नव्हत्या, हे फारच चांगले झाले. दामोदरपंत नेन्याने महाराजांच्या मनास जे वळण लावले त्याचा परिणाम बडोद्यातील लोकांस फारच वाईट रीतीने भोगावा लागला. प्रजेला पोटच्या पुत्राप्रमाणे वागविण्याचे जे राजाचे खरे शील ते नष्ट होऊन अब्रूदार लोकांच्या स्त्रिया, सुना व मुली यांना भ्रष्ट करण्याचा यावेळी बराच प्रयत्न झाला! सर्व प्रकारच्या अनिष्टविषयक वर्तनास या कारकीर्दीत प्रोत्साहन मिळून ते दुर्गुण प्रधानपदावर विराजमान झाले! नीतीचा पराभव होऊन अनीतीला बडोद्याचे राज्य मिळाले! कुलीन लोकांच्या स्त्रिया, सुना व मुली या जुलमी प्रकारामुळे घराबाहेर इतकेच नव्हे बारीतूनसुद्धा दृष्टीस पडत नसत! दुर्दैवाने एखादी कुलीन सुंदर स्त्री दृष्टीस पडल्यास तिच्यावर जुलूम करून हे सल्लागार लोक प्रथम तिचा उपभोग घेत व नंतर महाराजांकडे तिच्याविषयी ते शिफारस करीत! हिंदुस्थानातील लोकांची राजनिष्ठा ही फारच अपार असल्यामुळे ते राजदर्शनास स्वभावतः फार उत्सुक असतात; परंतु मल्हारराव महाराजांच्या प्रस्तुतच्या वर्तनामुळे हे राजदर्शन न होईल तर फार बरे असे कुलीन स्त्री-पुरुषांस वाटत असे. शरीर विक्रयाचा धंदा करणारे आणि अनीतिमान लोकांना यावेळी विशेष मान होता. त्यांचे पुरस्कर्तृत्व मल्हारराव महाराजांनी आपल्याकडे घेतले होते. सत्त्वशील व नीतिमान लोकांची कुटुंबे यावेळी अगदी दीन बनली! या स्थितीमुळे बडोद्यातील कित्येक सरदार दाद मागण्याकरिता ब्रिटिश सरकारकडे गेले. काही सुशील स्त्रियांच्या अब्रूचा नाश झाल्यामुळे त्यांनी आत्महत्याही केल्या असे म्हणतात. काही लोकांनी अब्रूच्या भयाने आपली कुटुंबे स्वदेशी पोहोचवून दिली. काही लोकांनी बडोदे राज्य सोडले व ते इतर ठिकाणी गेले. बडोद्याच्या रेसिडेन्ट साहेबांकडे असंख्य अर्ज झाले; परंतु प्रथम तर आम्ही दरम्यानगिरी करू शकत नाही, असाच त्यांच्याकडून जबाब मिळत गेला.

## मल्हाररावांच्या राज्यकारभाराची चौकशी

कर्नल ए.जी. शार्ट यांची कारकीर्द संपून कर्नल आर. फेयर हे मार्च सन १८७३ मध्ये बडोद्याच्या रेसिडेन्टांच्या जागेवर आले. मल्हारराव महाराजांनी चालविलेले घोटाळे त्यांच्याने पाहवले नाहीत. बडोद्यातील प्रजा इतकी त्रस्त झाली असता आपण जर तिकडे लक्ष न दिले तर या कामात ब्रिटिश सरकारची मल्हारराव महाराजांस संमती आहे असे दिसून येईल. इतकेच नव्हे तर त्यांची चाललेली गैरवर्तणूकही सुधारू शकणार नाही. याकरिता त्यांनी लोकांच्या फिर्यादी ऐकून घेण्यास व त्याबद्दलचा खुलासा महाराजांस विचारण्यास सुरुवात केली. या व्यवस्थेमुळे फिर्याद करणाऱ्या लोकांना मात्र मल्हारराव महाराजांनी व त्यांच्या सल्लागारांनी विशेष त्रास देण्यास आरंभ केला. त्यामुळे या फिर्यादी थेट हिंदुस्थान सरकारच्या पुढे जाऊन दाखल होण्यास विलंब लागला नाही. 'आम्हास मल्हारराव हा राजाच नको' व 'राणी जमनाबाईंना दत्तकपुत्र द्यावा' अशा मतलबाचेही काही अर्ज हिंदुस्थान सरकारकडे गेले. राज्यात झालेली अव्यवस्था कितपत खरी आहे, त्याविषयी तपास करण्याच्या हेतूने त्या सरकारने सर रिचर्ड मिड साहेबांच्या प्रमुखपणाखाली एक कमिशन नेमले. हे कमिशन ता. ८ नोव्हेंबर सन १८७३ रोजी बडोद्यास आले. त्यात नबाब फैजली, जयपूरच्या राजाचे दिवाण, रेव्हरंड स्क्राफ्ट व एथ्रीज हे सभासद होते. ता. १२ नोव्हेंबर रोजी कमिशनच्या कामास आरंभ झाला. या कमिशनने राज्यातील सर्व लोकांच्या फिर्यादी ऐकून घेतल्या व सविस्तर हकिकतीचा हिंदुस्थान सरकाराकडे रिपोर्ट केला.*

## राज्यकारभारात सुधारणा करण्याची सूचना

या कमिशनपुढे महाराणी जमनाबाई यांच्या नेमणुकीविषयी आणि त्यांच्या आप्त स्वकियांवर मल्हाररावांनी जे भयंकर प्रसंग गुजरविले ज्याबद्दलच्या फिर्यादी दाखल झाल्या होत्या; परंतु मुंबई सरकारपुढे हे प्रकरण चालत असल्यामुळे त्यांचा तपास करण्याचे या कमिशनने नाकारले. मीर कलामुद्दीन नवाब साहेब व दुसरे सरदार लोक आणि बडोदे राज्यातील शेतकरी यांनी मल्हारराव महाराजांच्या अन्यायी वर्तनाबद्दल कमिशनरांची खात्री केली. हा तपास केल्यानंतर जो रिपोर्ट झाला त्यात सर रिचर्ड मिड साहेबांनी असे लिहिले आहे की, "या राज्यात आता विघ्नांचा पूर्ण प्रवेश झाला आहे. चाललेली अव्यवस्था बंद करून राज्यात योग्य सुधारणा करण्याचे सामर्थ्य मल्हारराव यांच्यात नाही. ते एककल्ली स्वभावाचे असून, दुराचरणी लोकांच्या तंत्राने वागणारे आहेत. यास्तव त्यांच्या हातून राज्याचा बंदोबस्त बरोबर होऊ शकणार नाही. बडोदे राज्याची

---

*हिंदुस्थान सरकारकडून ता. १५ ऑक्टोबर सन १८७३ चा मल्हारराव महाराज यांच्याकडे आलेल्या खलित्यात म्हटले आहे की, "... आपल्या प्रजेपैकी काही वर्गांच्या लोकांत असमाधान उत्पन्न होऊन बखेडे झाले आहेत आणि ते इतक्या शिखरास जाऊन पोहोचले आहेत की, त्यापासून या देशातील स्वस्थतेचा भंग होण्याचा विशेष संभव उद्भवला आहे."

व्यवस्था चांगली लावण्याकरिता हुशार दिवाण नेमून राज्यातील बहुतेक कामकाजांत रेसिडेन्टाने दरम्यानगिरी करावी, म्हणजे काही बंदोबस्त झाल्यास होईल."

या अभिप्रायाचा हिंदुस्थान सरकारने बराच विचार केला आणि मल्हारराव महाराजांनी आपल्या राज्यव्यवस्थेत सुधारणा करावी, याकरिता दीड वर्षाची मुदत दिली. "या मुदतीत राज्यकारभारात सुधारणा करून योग्य व्यवस्था लावावी, तसे आपल्याकडून न झाल्यास तुमच्या सत्तेत हात घालणे आम्हास भाग पडेल. तुम्हास राज्यकारभाराच्या मदतीकरिता काही हुशार कामदार आमच्या राज्यातील पाहिजे असल्यास ते आम्ही मोठ्या संतोषाने देऊ," या आशयाचा खलिता मल्हारराव महाराज यांच्याकडे आला. तथापि, त्यांनी सुधारणा करण्याच्या प्रयत्नास न लागता विलक्षण प्रकारचा कोटिक्रम लढवून आपली बाजू उजळ करून दाखविण्याचा प्रयत्न केला. राज्यातील लोकांचे प्रेम संपादण्याचा मार्गच त्यांनी स्वीकारला नाही. यामुळे त्यांना पुनः ब्रिटिश सरकारकडून ठपका मिळाला. त्यावरून त्यांनी दादाभाई नौरोजी यांना दिवाणगिरी देऊन काजी शहाबुद्दीन, बाळ मंगेश वागळे, होरमसजी वाडिया, पेस्तनजी जहांगीरजी, लक्ष्मण जगन्नाथ वैद्य व अप्पाजी रामचंद्र मेढेकर ही माणसे ब्रिटिश सरकारजवळून मागवून घेतली. मुलकी खात्याची व्यवस्था लावण्यासाठी त्यापूर्वी रघुनाथ रामचंद्र मेढेकर व विनायक माधवराव कर्णिक रेवाकांठ्यातील दप्तरदार यांना ते चांगले हुशार असल्यामुळे राजर्स साहेबांच्या शिफारशीवरून मागवून घेतले होते. ही इतकी चांगली मंडळी बडोदे राज्यास मिळाली. तथापि, त्यांचा उपयोग मल्हारराव महाराजांच्या सल्लागारांनी होऊ दिला नाही. या हुशार लोकांना बडोद्यात येऊन फसल्यासारखेच वाटले. कर्नल फेअर यांच्याकडून होणाऱ्या सूचना मल्हारराव महाराजांच्या सल्लागारांना पथ्यकर वाटल्या नाहीत! त्यांनी महाराजांचे मन वळवून रेसिडेन्ट कर्नल फेअर यांची बदली करविण्याची ब्रिटिश सरकारकडे गुप्त रीतीने खटपट चालविली. दिवाण नौरोजी यांच्याकडून त्या सरकारकडे रेसिडेन्टाच्या विरुद्ध रिपोर्ट करविला. कर्नल फेअर हे मल्हारराव महाराजांनी राज्यात चालविलेल्या अव्यवस्थेविषयी लोकांच्या तक्रारी ऐकून घेत व राज्यकारभारात ते आपला हात बराच घालीत, हे सहन न होऊन त्यांना दरम्यानगिरी करण्याचा अधिकार नसताना ते संस्थानाच्या हक्कात हात घालतात,' हीच या वेळची मुख्य तक्रार होती.

## लक्ष्मीबाईशी लग्न लावल्याचा परिणाम

ब्रिटिश सरकारच्या संमतीवाचून मल्हारराव महाराजांनी लक्ष्मीबाईशी लग्न लावले. तिचा लग्नाचा नवरा पांडू याने 'माझी लग्नाची बायको मल्हारराव महाराजांनी आपल्या जनानखान्यात ठेवली,' अशी कर्नल फेअर यांच्याकडे फिर्याद केली. लक्ष्मीबाईंचा जन्म ज्या घराण्यात झाला ते फार हलके होते. इतकेच नव्हे तर सुरतेच्या बंदरावर हमाली करण्याचा त्यांचा धंदा होता; परंतु त्यांना सुंदर स्वरूपाची देणगी ईश्वराने दिली असल्यामुळे त्यांचे पाणिग्रहण मल्हारराव महाराजांनी केले. बडोदे येथील मराठे जातीच्या लोकांनी महाराजांच्या या वर्तनाचा निषेध केला आणि

त्यांच्याशी ज्ञातीविषयक व्यवहार ठेवण्याची बंदी केली. त्यामुळे मल्हारराव हे बरेच खवळले व त्या रागाच्या आवेशात त्यांच्या हातून बरीच अनन्वित कृत्ये घडली. पांडूच्या फिर्यादीचा उघड रीतीने तपास चालून न्यायाच्या कोर्टानी ती फिर्याद खोटी ठरविली; परंतु नवरेपणाचा हक्क सांगणाऱ्या या पांडूस दरमहा २५ रुपये बडोदे दरबाराने देत जावे, असा कर्नल फेअर यांनी ठराव केला. हे पैसे त्याच्या हयातीपर्यंत त्यास पावत होते.

## दादाभाई नौरोजी दिवाण राजीनामा देतात

हिंदुस्थान सरकारने दादाभाई नौरोजी यांच्यासारखा हुशार व विद्वान दिवाण दिला असतानाही मल्हारराव महाराजांनी त्यांचा चांगला उपयोग करून घेतला नाही. महाराजांनी रेसिडेन्टाजवळ एक प्रकारचे बोलून यावे व दिवाण दादाभाई यांच्याकडून भलतेच लिहवावे, असा क्रम चालल्यामुळे कर्नल फेयर व दादाभाई यांच्यात वितुष्ट पडले. महाराज आणि त्यांचे सल्लागार यांचे वर्तन एक प्रकारचे व कर्नल फेयर यांचा उद्देश निराळा असल्याने बडोद्यावरील राज्यचक्र बदलण्याची चिन्हे दिसू लागली. त्यामुळे दिवाण दादाभाई नौरोजी यांना येथे राहणे इष्ट न वाटून त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन ते चालते झाले. तेणेकरून मल्हाररावांच्या सल्लागारांना निरनिराळ्या प्रकारचे घोटाळे करण्यास विशेष फावले.

## रेसिडेन्टास विषप्रयोग व त्याचा तपास, मल्हारराव पदभ्रष्ट होतात

कर्नल फेयर हे दिवसेंदिवस जास्त कडक रीतीने वागू लागले. ते मोठे निःस्पृही असल्याने मल्हारराव महाराजांच्या सल्लागारांना त्यांचे वर्तन असह्य झाले. त्यांनी कर्नल फेयर यांना मारण्याच्या धमकीची अनेक पत्रे पाठविली. इतकेच नव्हे तर त्यांना ठार मारण्याचेही प्रयत्न चालविले. यापैकी शेवटचा प्रयत्न ता. ९ नोव्हेंबर सन १८७४ रोजी झाला. यशवंता येवल्या, माधवराव काळे व अरब सालम यांच्या साह्याने हिरे व सोमल यांचे चूर्ण सरबतात टाकून ते विष कर्नल फेयर यांना दिले असा पुढे आक्षेप आला. काचेच्या प्याल्याच्या तळाशी राहिलेल्या गाळाचे पृथक्करण डॉक्टर सीवर्ड यांनी करून पूर्वोक्त दोन विषांचे मिश्रण केल्याचाच अभिप्राय दिला. कर्नल फेयर यांची प्रकृती ताबडतोब बिघडली; परंतु वेळेवर औषध पोहोचल्यामुळे अपाय घडला नाही. या बनावाची खबर तारेने मुंबई सरकारास देऊन नंतर त्यांनी सविस्तर हकिकतीचा रिपोर्टही केला. या रिपोर्टात मल्हारराव महाराजांच्या स्वभावाचे व त्यांनी आजपर्यंत केलेल्या भयंकर खटपटीचे वर्णन फारच खुबीदार केले आहे.* रावजी, नरसू व बटलर पेद्रू यांनी लालूच घेऊन हे काम केले, असे गुप्त तपासात बाहेर आले. हा बनाव बनताच कर्नल फेयर यांची बदली दुसऱ्या महत्त्वाच्या कामावर करून त्यांच्या जागेवर सर लुई पेली यांस पूर्वीचा 'रेसिडेन्ट' हा हुद्दा बदलून 'स्पेशल कमिशनर आणि एजंट टू दी गव्हर्नर जनरल' या हुद्याने हिंदुस्थान सरकारने नेमले.

---

*ता. १७ नोव्हेंबर सन १८७४ चा कर्नल फेयर यांचा रिपोर्ट. (बडोद्याचे ब्ल्यू बुक नंबर ६, पृष्ठ क्रमांक ६)

हे तारीख ४ डिसेंबर सन १८७४ रोजी आपल्या कामावर येऊन दाखल झाले. सर लुई पेली यांनी मुंबईचे पोलिस कमिशनर सर फ्रांक साटर व अहमदाबादचे पोलिस इन्स्पेक्टर गजानन विठ्ठल यांनी केलेल्या तपासास आधारभूत मानून हिंदुस्थान सरकारकडे रिपोर्ट केला व ता. १४ जानेवारी सन १८७५ रोजी एक खुबीदार जाहीरनामा काढून मल्हारराव महाराजांस पकडून कॅम्पात डॉ क्टर सीवर्ड यांच्या बंगल्यात कडक बंदोबस्ताने ठेवले. शहरात तुफान होऊ नये म्हणून बडोद्याच्या गादीवर संरक्षण सर लई पेली यांच्यातर्फे राजे पांढरे व नबाब साहेबांनी करावे असे ठरविले. नंतर या महत्त्वाच्या खटल्याची चौकशी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारने कमिशन नेमले. या कमिशनात सर रिचर्ड क्रौंच, मि. मेलविल, सर रिचर्ड मिड, अलिजा बहादूर महाराज जयाजीराव शिंदे, जयपूरचे महाराज रामसिंह बहादूर व सर दिनकरराव यांना कमिशनर नेमले. बॅरिस्टर सार्जंट बालंटाईन यांस विलायतेहून मल्हाररावांनी आपल्यातर्फे काम चालविण्यास आणले व मुंबई सरकारने ॲडव्होकेट जनरल स्कोबल आणि इनव्यारिटी यांची काम चालविण्याकरिता योजना केली. या कमिशनने रीतसर तपास करून आपापल्या अभिप्रायाचे निरनिराळे रिपोर्ट केले. सर रिचर्ड क्रौंच, सर रिचर्ड मिड व मि. मेलविल यांनी ठेवलेले आरोप शाबीत मानले आणि जयाजीराव महाराज शिंदे, महाराज रामसिंह बहादूर व सर दिनकरराव यांनी हे आरोप शाबीत होत नाहीत, असा अभिप्राय दिला. या कमिशनने केलेल्या तपासाच्या कागदाचे अवलोकन करून तारीख ११ एप्रिल सन १८७५ रोजी हिंदुस्थान सरकारने एक ठराव प्रसिद्ध केला. या ठरावात त्यांनी शेवटी म्हटले आहे की, "हिंदुस्थान सरकारास मोठ्या नाखुशीने निश्चयात्मक असा अभिप्राय देणे भाग पडते की, मल्हारराव महाराजांवर जे आरोप ठेवले होते, ते चौकशी केल्यावरून शाबीत झाले आहेत. त्यांनी प्रोत्साहन दिल्यावरून रावजी आणि नरसू यांनी कर्नल फेयर यांना विषप्रयोग केला." या अभिप्रायावरून स्टेट सेक्रेटरी लॉर्ड सॅलिसबरी यांनी हिंदुस्थान सरकारास खाली लिहिल्याप्रमाणे सूचना दिली. "नेटिव्ह कमिशनरांचे अभिप्राय भिन्न पडले आहेत, यास्तव मल्हारराव गायकवाड यांच्यावर आरोप शाबीत झाले आहेत असे मानून त्यांना गादीवरून दूर करणे हे योग्य होय. त्यांनी राज्यकारभार वाईट रीतीने चालविला व पुढे ते चांगल्या रीतीने चालवतील अशी आशा नाही. या सबबीने त्यास पदभ्रष्ट करावे." हा हुकूम येताच हिंदुस्थान सरकारकडून तारीख १९ एप्रिल सन १८७५ चा जाहीरनामा बडोद्यात प्रसिद्ध झाला. त्यात म्हटले आहे की,

"बडोदे संस्थानातील ब्रिटिश सरकारचे माजी वकील कर्नल आर. फेयर सी.बी. यांना विषप्रयोग करण्याच्या कामास महाराज मल्हारराव गायकवाड यांनी फूस दिली. या आरोपाच्या खरेपणाविषयी उघड रीतीने चौकशी करावी आणि वरील संशयातून मुक्त होण्यास महाराज हर एक प्रकारची संधी मिळावी म्हणून त्यांना अधिकारापासून तूर्त दूर केले होते व ब्रिटिश सरकारने बडोदे संस्थानाचा कारभार आपल्या हाती काही वेळ घेतला होता.

कमिशनपुढे झालेली चौकशी पूर्ण झाल्यावर बडोदे संस्थानातील राज्यकारभार चालविण्याचा अधिकार मल्हारराव महाराज गायकवाड यांना फिरून द्यावा किंवा नाही, याचा विचार राणी सरकारने केला आहे.

कमिशनर लोकांमध्ये मतभेद झाल्यामुळे त्यांच्यापुढे झालेल्या चौकशीवरून किंवा त्यांनी केलेल्या रिपोर्टावरून राणी सरकारांनी आपला शेवटचा अभिप्राय दिला नाही व त्या चौकशीच्या अंती महाराजांवर आलेल्या संशयांत खरेपणा आहे, असेही त्या समजत नाहीत. तथापि, मल्हारराव महाराज गायकवाड गादीवर बसल्यापासून या वेळेपर्यंत बडोदे येथील हकिकतीच्या संबंधाने सर्व स्थितीकडे लक्ष देऊन व महाराजांची जगजाहीर गैरवर्तणूक व संस्थानची फार वाईट राज्यव्यवस्था व ज्या सुधारणा करणे जरूरी आहे, त्या अमलात आणण्याच्या कामात त्यांचा उघड नालायकपणा आणि महाराजांस राज्यकारभार फिरून देणे हे बडोद्यातील लोकास अतिशय अनहितकारक होईल व बडोदे संस्थान व ब्रिटिश सरकार यांच्यामध्ये जे संबंध राहावे ते राहण्यास यांच्यापासून विरोध येईल, असे हिंदुस्थान सरकारचे मत लक्षात आणून राणी सरकारने असा ठराव केला आहे की, बडोद्यातील राज्याधिकारापासून मल्हारराव महाराज गायकवाड यांना दूर करावे व तत्संबंधी हक्क आणि मानमरातब हे आजपासून त्यांना व त्यांच्या संततीस मिळू नयेत. सदरील हुकुमाप्रमाणे व्हाईसरॉय आणि गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया इन्कौन्सिल हे या जाहीरनाम्याने असे प्रसिद्ध करतात की, बडोदे संस्थानातील राज्यसत्तेपासून मल्हारराव महाराज गायकवाड यांना दूर केले आहे आणि त्यांना व त्यांचे संततीस तत्संबंधी हक्क व मानमरातब वगैरे मिळू नयेत.

ब्रिटिश हिंदुस्थानात हिंदुस्थान सरकारच्या संमतीने एखादी जागा पसंत करून मल्हारराव यांना त्यांच्या कुटुंबासह व योग्य इतमामासह तेथे राहू दिले जाईल व त्यांना बडोदे संस्थानातील उत्पन्नातून खर्चाकरिता योग्य नेमणूक केली जाईल.

बडोदे संस्थानाचा कारभार नेटिव्ह लोकांच्या हाती देण्यात मलिका-मा-अझमा राणीसाहेब यांनी सन १८५७ सालात खंडेराव महाराज गायकवाड यांनी दिलेल्या राजनिष्ठ मदतीबद्दल आपला चांगला अभिप्राय दाखवावा, अशी इच्छा धरून त्यांची विधवा जमनाबाई महाराणी साहेब यांची विनंती मान्य केली आहे व त्यांना गायकवाडाच्या घराण्यातील जो मनुष्य हिंदुस्थान सरकार बडोदे सस्थानच्या गादीस योग्य आहे म्हणून पसंत करील तो मनुष्य त्यांनी दत्तक घ्यावा अशी परवानगी आहे.

मलिका-मा-अझमा राणीसाहेबांचे हुकूम अमलात आणण्याकरिता ज्या गोष्टी करणे आवश्यक आहेत, त्या गोष्टी सदर हुकुमाप्रमाणे लागलीच केल्या जातील.

मध्यंतरी इंदूरचे महाराज यांची परवानगी मिळाल्यावरून सर माधवराव के.सी.एस.आय. हे एकदम बडोद्यास जातील व संस्थानचा कारभार मुख्य दिवाण या हुद्याने गव्हर्नर जनरल

यांचे बडोदे येथील एजंट व स्पेशल कमिशनर यांच्यापासून ज्या सूचना मिळतील, त्या अन्वये चालवतील.

बडोदे संस्थानातील राज्यसत्ता देण्याच्या कामात ब्रिटिश सरकार व बडोद्याचे गायकवाड यांच्यामध्ये जे तहनामे झाले आहेत, त्यामध्ये फेरफार होणार नाही व बडोद्याच्या गायकवाडांस अर्ल कॅनिंग साहेबांनी मार्च तारीख ११ सन १८६२ रोजी दिलेल्या सनदेत जे अधिकार व हक्क आहेत, त्यांचा नवीन गायकवाडांस उपभोग मिळेल."

(सही.)

सी. यू. एचिसन,

हिंदुस्थान जनरल सेक्रेटरी

ooo

# भाग १३ वा

# बडोद्यातील लोकांचे तुफान व मल्हारराव महाराजांचा अंत

## मल्हाररावांचा मुलगा जयाजीराव यांना लोक गादीवर बसवितात

मल्हारराव महाराजांस पदभ्रष्ट केल्याचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर ता. २२ एप्रिल सन १८७५, गुरुवार रोजी संध्याकाळी सहा वाजता बडोदे कॅम्पातून जुन्या स्टेशनावरून खास गाडीत बसवून मोठ्या बंदोबस्तानिशी त्या पदभ्रष्ट राजास मद्रासेत नेले. हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी सी. यू. एचिसन यांच्या सहीने जो जाहीरनामा बडोद्यात प्रसिद्ध झाला, त्यात दिलेली आश्वासने खरी होतील किंवा नाहीत, त्याविषयी बडोद्यातील लोक संशयात पडले होते. 'आपल्या हातून भयंकर कृत्य घडू नये व शांतता राहावी एवढ्याच हेतूने हा जाहीरनामा लावला आहे,' अशी अनचित कल्पना चालवून शहरातील लोकांनी आपला जमाव केला. महाराणी जमनाबाई यांना दत्तक पुत्र देऊन बडोद्याचे राज्य गायकवाडांकडे कायम ठेवण्याबद्दल दिलेल्या अभिवचनास पाच-सहा दिवस झाले. तथापि, अद्यापि काहीच व्यवस्था होत नाही, असे पाहून शहरातील कणसारे (तांबट), गादीचे आश्रित व गायकवाडांचे भगवे निशाण कायम ठेवण्याकरिता प्राणाचीही पर्वा न ठेवणारे लोक हे बरेच खवळले. त्यांनी मल्हाररावांची धाकटी राणी लक्ष्मीबाई यांच्या पोटी जन्मलेल्या; परंतु मुंबई सरकाराने नाकबूल केलेल्या राजपुत्रास बडोद्याच्या गादीवर बसविण्याचा विचार चालविला. या कामात शेठ सावकार व महाजन लोकही अनुकूल होते असे म्हणतात. या कामात काही सरदार लोकांची संमती असावी, असा ब्रिटिश सरकारास संशय आला होता. मल्हारराव महाराजांस दूषण देऊन हे राज्य 'खालसा' करण्याचा विचार असल्यामुळे 'ते सरकार आपल्यावर लष्कराकडून मारा करवील' असे जाणून त्या लोकांनी ता. २८ एप्रिल सन १८७५ रोजी शहराचे सर्व दरवाजे एकदम बंद केले आणि लक्ष्मीबाई यांच्या मुलास गादीवर बसवून त्याचे नाव जयाजीराव असे ठेवले. इतकेच नव्हे, तर त्या मुलाच्या नावाची शहरात द्वाही फिरविली.

'हिंदुस्थान सरकार आम्हास अद्यापि राजा देत नाही, तर आम्ही आमच्या समजुतीप्रमाणे गादीवर राजा बसवून बडोद्याचे राज्य कायम ठेवतो.' अशी बाजू पुढे आणून लोकांचे मन ते तुफानी लोक वळवीत होते.

## बडोद्यातील लोकांचे तुफान

जयाजीरावांची गादीवर योजना केल्यानंतर या नागरिकांपैकी काही दांडगे लोक सरकारवाड्यापुढे जमले. त्यांनी ब्रिटिश सरकाराकडून येणाऱ्या विघ्नांचे निवारण करण्याचा विचार चालविला. नवाब व राजे पांढरे यांनी गादीचे संरक्षण करावे असे सर लुई पेली बडोद्याचे रेसिडेन्ट यांनी प्रथम ठरविले होते; परंतु पुढे या उभय सरदारांचा त्यांनी भर दरबारात अपमान करून त्यांनी धमकी दिल्यामुळे ते गादीजवळ यासमयी नव्हते. या तुफानाच्या योगाने बडोद्यातील व्यापार एकदम बंद पडला. लोक हत्यारबंद होऊन कोटावर चढले. ही खबर सर लुई पेली यांना लागताच त्यांनी कॅप्टन जॅक्सन यांच्याबरोबर फौज देऊन त्यांस बडोदे शहर सर करण्यासाठी पाठविले. ते लष्करासह लहरीपूर दरवाजाजवळ आले; परंतु तो दरवाजा बंद असल्यामुळे त्यांचा प्रवेश शहरात होऊ शकला नाही. लोकांनी फौजेवर कौले, विटा व दगड यांचा एकसारखा मारा चालविला होता. त्यांनी दरवाजे लवकर उघडावेत म्हणून कॅप्टन जॅक्सनने गोळीबार सोडण्याचा हुकूम दिला व त्याप्रमाणे गोळीबारही सुटले; परंतु बंद असलेले दरवाजे लोकांनी उघडले नाहीत. नंतर लोकांची नीट समजूत करण्याचा प्रयत्न कॅप्टन जॅक्सन यांनी चालविला. त्यांनी काही समजूतदार लोकांस मध्यस्थी घातले; परंतु त्यांचा उपयोग होऊ शकला नाही. शहरातील लोक बरेच हट्टास पेटले. त्यामुळे कॅप्टन जॅक्सन यांनी दरवाजांवर तोफा लावून ते फोडण्याचा हुकूम दिला. तोफांचे मोर्चे शहरांवर लागलेले पाहताच नागरिक बरेच घाबरले. 'दरवाजे उघडतो; परंतु आम्हास राजा पाहिजे तो द्या,' अशी त्यांनी मागणी केली. त्यांनी ते सर लुई पेली यांना कळवून 'बडोद्यातील गादीवर लवकरच गायकवाडी कुटुंबातील योग्य वारसास बसवू' असा त्यांच्याकडून आलेला जबाब कॅप्टन जॅक्सन यांनी लोकांस कळविला. त्यावरून लोकांनी दरवाजे उघडले. ब्रिटिश लष्कर सरकारवाड्यात गेले व या 'औट घटकेच्या राजास' पकडून त्यास त्यांनी आपल्या ताब्यात घेतले. नंतर लोकांची मने शांत करून लष्कर परत फिरले. ज्यावेळी सरकारवाड्याकडे फौज चाल करून गेली, त्यावेळचा देखावा फार भयंकर होता. लोकांची गर्दी विशेष होऊन त्यांनी लष्करावर दगड फेकण्याचा व बंदुकाही झाडण्याचा क्रम चालविला असल्यामुळे ब्रिटिश लष्करास बंदुका झाडीत झाडीतच सरकारवाड्याकडे जाणे भाग पडले.

## मल्हारराव महाराजांचा अंत

मल्हाररावांचा मुलगा जयाजीराव, राणी म्हाळसाबाई व लक्ष्मीबाई यांना ता. ३० एप्रिल सन १८७५ रोजी सरकारने आपल्या देखरेखीखाली मद्रासेत पावते केले. हे जयाजीराव ता. २९ एप्रिल सन १८८० रोजी मद्रासेत गेल्यापासून उदास बनले. 'ते मरेपर्यंत बिलकूल हसले नाहीत,'

असे म्हणतात. त्यांना पूर्वीच्या दुष्कृत्यांचा शेवटी फार पश्चात्ताप झाला. त्यांच्या चालवणुकी खर्चासाठी दरसाल बडोदे दरबारातून दीड लाख रुपयांची नेमणूक मिळत होती. त्यांच्यावर पॉलिटिकल ऑफिसरांची पूर्ण देखरेख होती. हा दुःखी राजा ता. २६ जुलै सन १८८२ रोजी दोन प्रहरी अतिसाराच्या आजाराने परलोकवासी झाला. त्यामुळे त्यांच्या निराश राण्यांना पुनः बडोदे राज्यात येण्याचा योग आला. सुदैवाची गोष्ट ही की, या उभय राण्यांना दु:ख वाटू नये याकरिता श्रीमंत सरकार सयाजीराव हे फार जपत असत. या दोन राण्यांपैकी म्हाळसाबाई या श्रावण वद्य १४ संवत् १९५९ मध्ये स्वर्गवासी झाल्या. लक्ष्मीबाई यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे चांगली नेमणूक मिळत आहे. या उभय राण्यांशी महाराणी जमनाबाई या कोणताही भेदभाव न ठेवता त्यांचा मान त्या उत्तम रीतीने ठेवीत असत.

OOO

# भाग चौदावा

# बडोद्यास आगमन आणि दत्तक विधान

## बडोद्यास महाराणी साहेबांचे आगमन व गादीजवळ भरलेला दरबार

बडोद्यास झालेल्या दंग्याची शांती करण्यासाठी नामदार हिंदुस्थान सरकारने महाराणी जमनाबाई यांनी पुण्यास न राहता बडोद्यास जावे, अशी त्यांना सूचना दिली. त्यावरून तारीख २ मे सन १८७५ रोजी त्या बडोद्यास खास गाडीने येऊन दाखल झाल्या. हा दिवस त्यांच्या राजवैभवाच्या पुनरुज्जीवनाचा होय. त्यांचा सत्कार करण्यासाठी स्टेशनावर सरदार, दरकदार, असामदार, अंमलदार, शेठ सावकार वगैरे प्रतिष्ठित गृहस्थ गेले होते. हा त्यांच्या आगमनाचा दिवस बडोद्यातील नागरिकांना फारच आनंददायक वाटला. राजगादीसंबंधाने पडलेली चिंता त्यामुळे एकदम नष्ट झाली. उदास बनून केवळ प्राणरक्षणासाठी ज्या पुण्यास जाऊन राहिल्या व ज्यांना पुनः बडोदे दृष्टीस पडेल अशी आशा नव्हती, त्या महाराणी भावी सुभाग्याचा पाया घालण्याकरिता स्टेशनावर उतरताच त्यांना ब्रिटिश सरकाराकडून अकरा व बडोदे राज्याकडून एकवीस तोफांची आणि फौजेची सलामी झाली. दरकदार व मानकरी वगैरे मंडळींनी फुले उधळली. हिंदुस्थान सरकारचे बडोदे येथील प्रतिनिधी सर रिचर्ड मिड हे स्टेशनावर त्यांना सामोरे आले होते. जरीपटक्यासह महाराणी जमनाबाई यांची स्वारी स्टेशनावरून मोतीबागेत आली. तेथून त्यांची स्वारी सर्व प्रकारच्या इतमामासह सरकारवाड्यात आल्यावर त्यांच्याऐवजी ताराबाई यांना गादीवर बसविले. यावेळी गादीच्या दिवाणखान्यात जो दरबार भरविला होता, त्यात सरदार, दरकदार, असामदार वगैरे लोकांकडून महाराणी जमनाबाईंस बडोद्याच्या गादीचे पूर्ण मालक समजून नजराणे झाले. दुसरे दिवशी सरकारवाड्यात त्यांनी राहावे असे ठरल्यावरून सर रिचर्ड मिड साहेबांनी महाराणी जमनाबाईस तारीख ३ मे सन १८७५ चे आनंद प्रदर्शक पत्र लिहिले. त्याचे भाषांतर खाली देतो :

बडोदे रेसिडेन्सी
ता. ३ मे सन १८७५

श्रीमंत जमनाबाई महाराणी साहेब गायकवाड, मु. बडोदे.

फार फार सलाम. जो खंडेराव महाराजांचा राजवाडा आपणास फार दिवस अंतरला होता, त्या वाड्यात आज सुमुहूर्ताने आपण पुनः जाणार आहात, त्याबद्दल मी बहुत खुशी आहे. आपणास तेथे पोहोचविण्याकरिता येथून मी मि. रिची यांना पाठविले आहे. आपण खंडेराव महाराजांच्या राणीसाहेब व भावी गायकवाड सरकार यांच्या मातुःश्री या नात्याने जो मानमरातब व इतमाम आपणास योग्य आहे, त्याचा आपण चिरकाळ उपभोग घ्यावा, अशी माझी अंत:करणापासून पूर्ण इच्छा आहे.

आर. मिड

## दत्तक घेणे तो कोणत्या शाखेतील घ्यावा हा विचार

मल्हारराव महाराजांच्या कारकीर्दीत महाराणी जमनाबाई यांनी दाखविलेल्या सर्व हरकती ब्रिटिश सरकाराने मान्य केल्या नाहीत. त्यामुळे पूर्वी त्यांना बरीच निराशा उत्पन्न झाली होती; परंतु बडोद्यास विषप्रयोगाचे भयंकर प्रकरण उपस्थित होताच त्यांच्या त्या हरकती खऱ्या आहेत, असे त्या सरकारास वाटले व त्याचा परिणाम शेवटी बडोदे राज्यावर फारच हितावह घडला. 'आम्ही पूर्वी आपल्या अडचणींचा विचार केला नाही हे फारच घडले,' असे एका खासगी पत्रात लॉर्ड नार्थब्रुक हिंदुस्थानचे व्हाईसरॉय यांनी महाराणी जमनाबाईंस कळविले आहे. आपले दुःखाचे दिवस संपून पूर्ण राजसुख भोगण्याचे दिवस नजीक येऊन ठेपले, अशी महाराणी जमनाबाई यांना कल्पना करण्यास त्यामुळे संधी मिळाली. हिंदुस्थान सरकारने महाराणीस बडोद्यात आणून त्यांचा गौरव केला. त्यामुळे बडोद्यातील लोकांनी आपल्या स्वस्थतेचा भंग होऊ दिला नाही. तारीख १९ एप्रिल १८७९ च्या जाहीरनाम्यात म्हटल्याप्रमाणे महाराणी जमनाबाई साहेबांच्या मांडीवर मुलगा दत्तक देण्याचे अगोदरच ठरले होते. गायकवाडांच्या गादीकरिता जो दत्तकपुत्र घ्यावयाचा तो कोणाचा घ्यावा व तो कसा असावा, त्याचा बरोबर विचार करण्याचे दुर्घट काम महाराणींवर एकदम येऊन पडले. हा प्रश्न जितका नाजूक वाटत होता तितकाच तो कठीणही होता. बडोद्यात गायकवाडांच्या घराण्यापैकी दोन शाखेतील कुमार राजगादीवर आपला हक्क दाखवीत होते. तसेच नाशिक जिल्ह्यातील कवळाणे येथील काशीराव गायकवाड हेही हक्कदार म्हणवीत असत. ते खंडेराव महाराजांच्या कारकीर्दीपासून बडोद्याच्या गायकवाडांशी आपला जवळचा संबंध स्थापन करीत होते. मल्हाररावांनी तर त्यांचा वडील मुलगा आनंदराव यांस दत्तक घेण्याचा विचार करून सन १९३० च्या चैत्र शुद्ध ३ रोजी शालजोडी व मंदील हा पोशाख काशीरावास दिला होता; परंतु मल्हाररावांस पुत्र झाल्याने दत्तक पुत्र घेण्याचा विचार एकदम बंद पडला. ब्रिटिश सरकाराने हा झालेला मुलगा कायदेशीर नाही, असे मल्हाररावास उघड

रीतीने कळविले. तथापि, मल्हारारावांनी तोच औरस पुत्र ठरविण्याचा प्रयत्न चालविला; परंतु तो सफल झाला नाही. बडोद्यातील हक्कदार म्हणवीत असलेले गायकवाड हे नजीकचे म्हणवीत व कवळाण्याचे गायकवाडही त्याचप्रमाणे म्हणत. येथील गायकवाडांकडून महाराणीस भीड घालण्याचा प्रयत्न एकसारखा होता असे व काशीरावांना तर पुण्यास असता अभिवचन दिले होते. तेव्हा याप्रसंगी काय करावे, याचा त्यांना मोठा विचार पडला.

## नाशिक जिल्ह्यातील वंशजांना हक्क जमनाबाई कबूल करतात

नाशिक व बडोदे येथील गायकवाडांच्या भाऊबंदांपैकी गादीला जवळचा वारसा कोणाचा पोहोचतो, त्याचा निर्णय करण्यासाठी हिंदुस्थान सरकारने एक कमिशन नेमले. कर्नल एथरिज इनाम कमिशनर व नाशिकचे कलेक्टर मि. एलियट यांनी या बाबतीत तपास करून रिपोर्ट करावा असे ठरले होते. कवळाणे येथील सर्व गायकवाड मंडळीस नाशिकास आणून या कमिशनने तपास केला व तेच खरे हक्कदार* आहेत असे ठरविले. हक्कदारांच्या मुख्य दोन शाखा बडोद्यात होत्या. बडोदे येथील एक शाखा, गादीचे मूळ संपादक पिलाजीराव यांच्या वडील बंधूचे वंशज असल्याविषयी व दुसरी दमाजीरावाचे बंधू झिंगोजीराव यांच्या वंशात उत्पन्न झाल्याचा हक्क दाखवीत होते. तसेच नाशिक जिल्ह्यातील शाखा त्याच पिलाजीरावांचा धाकटा मुलगा जो प्रतापराव यांच्या वंशात उत्पन्न झाल्याचा हक्क दाखवीत होता. बडोदे येथील दोन्ही शाखांनी आपल्या हक्काच्या शाबितीकरिता जसा पुरावा पुढे आणिला त्यापेक्षा जास्त मजबूत नाशिक जिल्ह्यातील शाखेने रुजू केला. नाशिकची शाखा बडोद्याच्या गायकवाडांच्या फार जवळची आहे, हे मल्हारराव महाराजांनी कबूल केले. त्या घराण्यातील मुलगा दत्तक घेण्याचा जो पूर्वी विचार केला होता, तोच प्रत्यक्ष पुरावा यावेळी विशेष वजनदार होऊन वाढला. काशीराव गायकवाडास पुण्यास असता महाराणी जमनाबाई यांनी अभिवचन दिले होते, त्यामुळे त्यांनी नाशिककडीलच मुलगा दत्तक घेण्याचा विचार ब्रिटिश सरकारास कळविला.

## दत्तक घेणे तो नाशिकचे शाखेतील येण्याबद्दल प्रयत्न

नाशिक येथे बसलेल्या कमिशनने जर तिकडील शाखेच्या लाभात रिपोर्ट केला तर सर रिचर्ड मीड यांनी बडोद्यातील शाखेला प्राधान्य देऊन, त्यांच्यापैकी मुलास महाराणी जमनाबाईंनी दत्तक घ्यावे असे मत दिले. या समयी बाळामिया माने यांनी पुण्यातील अभिवचनाची महाराणीस ओळख देऊन, काशीरावांचा मुलगा दत्तक घ्यावा असे सुचविले. सर टी. माधवराव यांस बरोबर घेऊन, बाळामिया हे मीड साहेबांच्या बंगल्यावर गेले व या उभयतांनी त्यांची बरीच समजूत

---

*सर रिचर्ड मीड यांच्या चरित्रात म्हटले आहे की, ".... बडोद्याच्या हक्कदारांनी या ठरावाच्या खरेपणाबद्दल बऱ्याच तक्रारी आणल्या; परंतु खानदेशची शाखा योग्य वंशज असल्याबद्दल पूर्वीच गायकवाड घराण्यात आणि महाराणी जमनाबाई यांनी मानल्याचे स्थापित झाले होते. शिवाय त्या स्वतः नाशिक जिल्ह्यातील मुलगा दत्तक घेण्यास उत्सुक होत्या....."

केली; परंतु त्यांनी आपले मत या वेळेपर्यंत बदलले नाही. 'थोरले सयाजीराव व ही चार मुले मूळ एकाच परुषाच्या वंशांत उत्पन्न झालेली आहेत. यास्तव गणपतराव व खंडेरावाप्रमाणेच बडोदे येथील शाखा या राजगादीची पूर्ण वारसदार आहे. या मुलांचा हक्क रद्द केल्याने ब्रिटिश सरकारच्या न्यायशीलतेस दूषण लागेल. या मुलांचा पक्ष हिंदुस्थानातील नामांकित लोकांनी उचलला आहे; तेव्हा ज्याचा संबंध फार दिवसांपासून लांब राहिलेला, अशा शाखेपैकी मुलगा दत्तक घेता येणार नाही.* याप्रमाणे मीड साहेबांनी जरी सांगितले तरी शेवटी 'या हकिकतीची खबर हिंदुस्थान सरकारास द्यावी व त्यांच्याकडून जो निकाल होईल तोच खरा' या समजुतीवर हे प्रकरण आले. सर रिचर्ड मीड साहेबांनी आपले मत व महाराणी जमनाबाई यांचा हेतू हिंदुस्थान-सरकारास तारेने कळविला. या बाबतीचे जाबजबाब तीन दिवसांपर्यंत तारेने एकसारखे चालले होते. शेवटी हिंदुस्थानचे व्हाईसरॉय लॉर्ड नार्थब्रुक यांनी योग्य विचार करून सर रिचर्ड मीड साहेबास असे कळविले की, 'महाराणी जमनाबाई यांचे मत बडोदे राज्यातील सर्व लोक मान्य करीत असतील, तर तुम्ही दरबार भरवून, त्या सर्वांचे एकमत झाल्याबद्दल खात्री करून घ्यावी व ताबडतोब आम्हास कळवावे म्हणजे इकडून शेवटचा हुकूम देण्यात येईल.' ही खबर येताच सर टी. माधवराव व बाळामिया शहरातील प्रतिष्ठित लोकांची मने वळवून त्यांना दुसरे दिवशी सकाळी मीड साहेबांच्या बंगल्यावर नेले, 'आमच्या मातुःश्री जमनाबाई महाराणी या आहेत; त्या जी व्यवस्था करतील ती आम्हास मान्य आहे. बडोद्याचे गादीवर गायकवाड नेमावा एवढेच आम्हास पाहिजे. मातुःश्री जमनाबाई महाराणी साहेब यांची आज्ञा शिरसामान्य करणे हे आमचे कर्तव्य आहे.' सरदार, दरकदार वगैरेंनी हा दिलेला जबाब मीड साहेबांनी सरकारास कळविला. त्याजवरून 'महाराणी जमनाबाई यांच्या इच्छेविरुद्ध हुकूम देण्याची हिंदुस्थान सरकार इच्छा ठेवीत नाही. त्या जो मुलगा पसंत करतील, तो त्यांनी मोठ्या संतोषाने कबूल ठेवू.' असा जबाब हिंदुस्थान सरकाराकडून तारेने आला व नंतर थोड्याच दिवसांनी रीतसर ---- महाराणी जमनाबाई यांच्याकडे सरकारांतून आला.

## गोपाळराव यांची निवडणूक होते

हिंदुस्थान सरकारकडून महाराणी जमनाबाई यांच्या मतास वजन मिळताच, काशीराव गायकवाडास त्यांच्या तीन पुत्रांसह बडोद्यास आणविले. या मुलांना मोठ्या बंदोबस्ताने ठेवले होते. मुलाची निवड करण्याच्या वेळी सर रिचर्ड मीड, सर टी. माधवराव, महाराणी जमनाबाई व दुसरी काही सरदार मंडळी मोतीबागेतील बंगल्यात आली. तेथे काशीराव हे आपले चिरंजीव आनंदराव, गोपाळराव व संपतराव यांस घेऊन आले होते. या तीन मुलांपैकी बुद्धीने तीव्र व पाणीदार, तसेच ज्यांचे भावी तेज प्रदर्शित होण्याच्या पूर्ण तयारीत होते अशा गोपाळरावांसच महाराणी जमनाबाईंनी पसंत केले. निवडणूक करण्याची हातोटी पाहून सर रिचर्ड मीड व सर

*बाळामिया माने यांनी श्रीमंत सयाजीराव महाराज यास सविस्तर हकिकतीच्या दिलेल्या रिपोर्टाचे कलम ११.

टी. माधवराव यांनी आनंदाची टाळी वाजवून आपली पूर्ण खुशी दर्शविली. लोकांनाही या निवडणुकीमुळे त्यावेळी बराच आनंद झाला.

## मुरारराव आत्महत्या करतात, सदाशिवराव काशी क्षेत्रास जातात व गणपतरावाची नेमणूक वाढविली जाते

बडोदे येथील वारसदार म्हणविणाऱ्या दोन्ही शाखांचा या न्यायाच्या अथवा मतभेदाच्या लढाईत पराभव झाल्याने, पहिल्या शाखेपैकी मुरारराव यांस ते सहन न होऊन त्यांनी आत्महत्या करून प्राण सोडला. त्यांचे सख्खे बंधू सदाशिवराव यांस ब्रिटिश सरकारने आपल्या देखरेखीखाली काशीस नेऊन ठेवले व त्यांस या राज्यातून स्वतंत्र नेमणूक बांधून दिली. दुसरे हक्कदार गणपतराव हे फार हुशार होते. त्यांनी प्रसंग ओळखून 'गादीवर आम्ही हक्क सांगणार नाही' असे लिहून दिल्यामुळे, त्यांस ब्रिटिश सरकारने बडोद्यासच राहू दिले व त्यांची नेमणूक वाढवून दिली.

## दत्तक विधान

मुलाची याप्रमाणे निवड झाल्यानंतर, दत्तक विधान होईपर्यंतचा काळ फारच भयंकर होता. बडोद्यातील हक्कदार गायकवाडांच्या शाखेपैकी मुलाची निवड न केल्यामुळे, त्यांच्या पक्षातील मंडळीस फार वाईट वाटून, त्यांनी विलक्षण प्रकारच्या खटपटी चालविल्या. शेवटी त्यांच्या त्या अयोग्य यत्नांस यश आले नाही. अखेरीस वैशाख शुद्ध ७ संवत् १९३१, तारीख २७ मे सन १८७५ रोजी सकाळी शुभ मुहूर्तावर गोपाळरावास महाराणी जमनाबाईसाहेब यांच्या मांडीवर बसवून विधीपूर्वक दत्तक विधान केले. या दत्तक पुत्राचे पहिले नाव बदलून सयाजीराव असे नवीन नाव ठेविले. महाराणी जमनाबाई या यांस 'बाळासाहेब' या नावाने हाक मारीत असत. हा दत्तक विधानाचा समारंभ फारच थाटाचा झाला. ब्रिटिश सरकारकडून सर रिचर्ड मीड साहेब हे रीतसर पोशाख घेऊन समारंभास आले व त्यांनी तो पोशाख दरबारांत सयाजीराव महाराजांस दिला. राज्यातील सर्व सरदार, दरकदार, असामदार व प्रतिष्ठित गृहस्थ यांनी या समारंभास येऊन मोठा उत्साह प्रदर्शित केला. महाराणी जमनाबाई यांस दत्तकपुत्र देऊन खंडेराव महाराजांचे राजनिष्ठेचे स्मारक ब्रिटिश सरकारने योग्य वेळी केले, त्यामुळे सर्व लोकांस मोठा आनंद झाला. ज्या शाखेतून हे दत्तक चिरंजीव घेण्यात आले त्या शाखेपैकी जे लोक चांगले उपयोगी पडले, त्यांचा महाराणी साहेबांनी चांगला सत्कार करून त्यांना व ऐन आणीबाणीच्या प्रसंगी जी माने व इतर मंडळी मल्हारराव महाराजांकडून मिळणारे अन्यायाचे फायद्याकडे न वळता; त्यांनी महाराणी साहेबांचा पक्ष निश्चयाने स्वीकारला होता, त्यांना नेमणुका करून देण्यात आल्या. या कामात मीड साहेब व दिवाण सर टी. माधवराव यांची महाराणी जमनाबाई साहेबास चांगली मदत झाली.

○○○

# भाग पंधरावा

# राज्यकारभारातील दक्षता

## महाराणी जमनाबाई यांच्या मागणीवरून बडोद्याची दिवाणगीर सर टी. माधवराव यांस दिली व सर रिचर्ड मीड हे बडोदे येथील ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधीच्या जागी आले

मल्हारराव महाराजांस पदभ्रष्ट केल्यानंतर महाराणी जमनाबाई यांचा ब्रिटिश सरकारने सत्कार करून, त्यांच्या योग्य सद्गुणांकडे दृष्टी दिली आणि त्यांना बडोद्याचा संपूर्ण राज्यकारभार सोपवला. या राज्यकारभारात ज्याच्याकडून चांगली मदत होईल, असा दिवाण शोधून काढण्याची जोखीम ओघानेच महाराणी जमनाबाई पुण्यास असताना सरकारी हुकुमास अनुसरून आली. त्यांनी हिंदुस्थानातील विद्यमान प्रख्यात मनुष्यांचा बराच शोध केला; परंतु त्यांना झोके खात असलेल्या बडोद्याच्या राज्याचा कारभार उत्तम रीतीने चालवू शकेल असा मनुष्य आढळून येईना. बडोद्याकडे लागलेले राजग्रहण सुटून त्याचा पर्वकाळ होऊन गेल्यावर प्रसंग ओळखून चालणारा व हुशार असा दिवाण मिळेल तरच राज्याची व्यवस्था बरोबर लागेल असे महाराणी जमनाबाई पूर्णांशाने जाणून होत्या. त्यांनी आपले मानलेले बंधू की ज्यांचा उपयोग त्यांना संकट काळात बराच झाला, त्या महान राज्यकार्यधुरंधर तुकोजीराव होळकरांस त्यांनी आपला उद्देश कळविला. त्यांनी आपल्या भगिनीचे उद्दिष्टहेतू साधण्यासाठी आपले अत्यंत हुशार व राज्यकार्यनिष्णात दिवाण सर टी. माधवराव यांस देण्याचे अभिवचन दिले. हिंदुस्थान सरकारच्या हुकुमास अनुसरून महाराणी जमनाबाईंनी 'सर टी. माधवराव यांची बडोदे राज्याच्या दिवाणगिरीवर योजना करावी. कारण होळकर सरकार त्यांना माझ्याकरिता सोडण्यास तयार आहेत' असे त्यांनी हिंदुस्थान सरकारास कळविले. ही सूचना मान्य केल्यानंतर मल्हारराव महाराजांस पदभ्रष्ट केल्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. सर टी. माधवराव हे ता. १० मे सन १८७५ रोजी बडोद्याच्या दिवाणगिरीवर दाखल झाले व त्यास ता. १६ मे सन १८७५ रोजी यथाविधी दिवाणगिरीची वस्त्रे मिळाली. तसेच बडोदे येथील ब्रिटिश-सरकारच्या प्रतिनिधींच्या

जागेवर चांगल्या मनुष्याची नेमणूक केल्यास राज्यकारभारात उत्तम मदत होईल, असा हेतू महाराणी जमनाबाईंनी दर्शविल्यावरून, त्या जागेवर सर रिचर्ड मीड यांची नेमणूक सन १८७५ च्या एप्रिल महिन्यात केली.

## राज्यकारभार उत्तम रीतीने चालविण्यासाठी ब्रिटिश राज्यातून निवडक अंमलदार आणले

पुढे राज्यकारभार कोणत्या धोरणाने चालवावा त्याचा विचार महाराणी जमनाबाईंनी चालविला. त्यावेळी बडोदे दरबारातील बहुतेक कामदार मल्हारराव महाराजांच्या अव्यवस्थित वळणातले जरी होते, तथापि त्यात जे हुशार व राज्यकार्यनिष्णात आढळून आले तेवढ्यांना ठेवून, बाकीच्यांना कमी करण्याचे काम फारच कठीण असतानाही ते महाराणी जमनाबाईंनी सर टी. माधवरावांच्या मदतीने यथार्थ बजाविले. ज्या कामदारांनी मल्हारराव महाराजांच्या कारकीर्दीत महाराणी जमनाबाईंचा छळ केला किंवा ज्यांनी त्यांच्याविषयी खोटेच आक्षेप पुढे आणले होते, त्यांना हा नवीन राज्यकारभार सुरू होताच मोठे भय पडले. अशा काही लोकांनी बडोदे सोडले व काही महाराणी जमनाबाईंना शरण आले. गणपतराव अनंत महाजन यांच्याकडून महाराणी जमनाबाईंवर अनुचित आरोप आणला गेला होता; परंतु ते शरण येताच त्यांना त्यांच्या जागेवर कायम ठेवले, इतकेच नव्हे तर या गुणग्राहक जमनाबाईंनी त्यांच्या हातून बरीच महत्त्वाची कामे घेतली. ज्यांची वतने, असाम्या, नेमणुका व उत्पन्ने मल्हारराव महाराजांनी केवळ अन्यायाने जप्त केली होती, ती ज्यांची त्यांस परत देवविली. महाराणी जमनाबाई यांच्या पक्षाच्या ज्या लोकांची घरेदारे लुटून फस्त केली होती, त्यांना त्यांच्या पूर्वस्थितीत त्यांनी आणले; तसेच प्रसंगी जे उपयोगी पडले, त्यांना कायमचा आश्रय देऊन, त्यांच्या कामाचा त्यांना योग्य मोबदला देण्यास त्यांनी आळस केला नाही. राज्यकारभार उत्तम रीतीने चालावा याकरिता त्यांनी सर टी. माधवराव यांच्या अनुमताने बरेच हुशार कामदार ब्रिटिश-राज्यातून मागवून घेतले. मल्हारराव महाराजांच्या कारकीर्दीच्या अखेरीस परत गेलेले काजी शहाबुद्दीन यांना त्यांनी परत बोलविले. तसेच दिवाणात मदत करण्यासाठी विनायक जनार्दन किर्तने यांस इंदूरातून आणले. न्यायखात्याकरिता खरशेटजी रुस्तमजी ठाणेवाले यांस ब्रिटिश सरकाराकडून मागून घेतले. त्यांनी या नव्या हुशार मंडळीच्या हातून राज्यकारभार येण्यास सुरुवात केल्यामुळे, जुन्या लोकांना बरेच वाईट वाटले. त्यांनी महाराणी जमनाबाईंकडे जाऊन, या कृत्याबद्दल नाखुशी दर्शविली, परंतु त्यांचे समाधान त्यांनी फारच विचारपूर्वक केले. "आपल्या येथील जुने सरदार वगैरे लोक फार हुशार आहेत ही गोष्ट खरी आहे; परंतु सांप्रत जो काळ चालला आहे, त्यास अनुसरून कोणती राज्यपद्धती हितावह होईल, ते अद्यापि ठरून चुकले नाही. ब्रिटिश सरकारचे हेतू फारच निराळे आहेत. त्यांच्या मूळ हेतूस अनुसरून राज्यात सुधारणा झाली, तरच या राज्यास चिरस्थायीपणा येईल. ब्रिटिश राज्यातील नामांकित अंमलदार मागवून त्यांच्या हातून राज्यांत सुधारणा केल्यास आपल्या

येथील कामदारांस चांगले वळण लागेल, इतकेच नव्हे तर पुढे तशी चांगली माणसे आपल्या येथेच तयार होतील. आपल्या येथील लोक राज्यकारभार चालविण्यास लायक बनले पाहिजेत. आम्ही हल्ली जी पद्धती चालविली आहे, तिच्यापासून हिंदुस्थान सरकारास खात्रीने संतोषच होईल. आपले राज्य त्यांच्या संरक्षणाखाली आहे, तेव्हा त्यांचेच अनुकरण आपणास केले पाहिजे. नवीन नमुना तयार करून इमारत बांधण्यापेक्षा जुन्या नमुन्यावर इमारत बांधल्यास त्यात विशेष हित असते." महाराणी जमनाबाईंनी हा दिलेला जबाब त्या लोकांस बराच आवडला व ते आपापली कामे बरोबर करू लागले.

## सर रिचर्ड मीड यांनी राज्यव्यवस्था कशी चालवावी याबद्दल ठरवून दिलेली कलमबंदी!

राज्यकारभार कोणत्या तत्त्वावर चालवावयाचा, तो प्रथम ठरवून नंतर त्यांनी सरळ व उपयुक्त अशी व्यवस्था सुरू केली. हिशेबी व दुसरी महत्त्वाची खाती यांची व्यवस्था प्रथम बरोबर लागेना. कारण जुन्या वेळच्या लोकांना ही व्यवस्था पसंत नव्हती. मनास वाटेल तशा हरकती पुढे आणून ते घोटाळे उडवून देत. ही गोष्ट अप्पाजी रामचंद्र यांनी आपल्या पसंतीने नेमावेत, असे सर टी. माधवराव व महाराणी जमनाबाई यांनी सांगितले. ही नवीन झालेली व्यवस्था सर रिचर्ड मीड यांना पसंत पडली. राज्यातील हिशेब चांगला राहून पुढे कोणतेही दूषण येऊ नये, असा महाराणी जमनाबाईंनी सक्त हुकूम दिला होता. खासगी खात्यावर महाराणीसाहेब स्वतः देखरेख ठेवीत असत. सर टी. माधवराव यांना योग्य सल्ला देऊन त्यांच्या हातून राज्यकारभाराचे काम त्या करवून घेत. राज्यव्यवस्थेला चांगले वळण लागावे, यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. तारीख १५ सप्टेंबर सन १८७५ रोजी सर रिचर्ड मीड यांना मुद्दाम बोलावल्यावरून त्यांनी सर टी. माधवराव व महाराणी जमनाबाई यांनी राज्यव्यवस्था कशी चालवावी ते ठरविले. यावेळी खाली लिहिल्याप्रमाणे कलमबंदी ठरली :

१. महाराज लहान आहेत तोपर्यंत बडोदे संस्थानच्या राज्यव्यवस्थेचे काम पुढे संस्थान सुधारून चांगल्या स्थितीत महाराजांच्या हाती जावे, म्हणून ते हिंदुस्थान सरकारच्या देखरेखीखाली चालेल.

२. महाराजांचे पालनपोषण महाराणीसाहेब स्वतः करतील. सरकारी कामाच्या संबंधात त्यांच्यावर देखरेख व त्यांच्या विद्येची व्यवस्था, एजंट गव्हर्नर जनरल साहेब राखतील; परंतु त्या कामात महाराणीसाहेब व दिवाणसाहेब यांचा ते सल्ला घेत जातील. विद्याभ्यास, वागणूक वगैरेंविषयी वेळोवेळी हिंदुस्थान सरकारास रिपोर्ट केले जातील.

३. महाराज लहान आहेत, त्या स्थितीत बाईसाहेब यांना गायकवाड कुटुंबात प्रमुख लेखले जाईल. तसेच त्यांचा योग्य सन्मान ठेवला जाईल. गायकवाड कुटुंबातील कोण्या माणसाविषयी काही व्यवस्था करणे असेल तेव्हा बाईसाहेबांचा सल्ला विचारला जाईल. महिन्यातून दोनदा अथवा जरूरीप्रमाणे अधिकदा दिवाणसाहेब बाईसाहेबांच्या

मुलाखतीस जातील. त्या वेळेस सरकारी तिजोरीची स्थिती कशी आहे व एकंदरीत राज्यव्यवस्था कशी चालली आहे हे बाईसाहेबांस ते कळवीत जातील. बडोद्याच्या लोकांसंबंधी काही महत्त्वाचा बंदोबस्त होणे असेल तेव्हा बाईसाहेबांचा अभिप्राय कळण्यासाठी दिवाणसाहेब बाईसाहेबांस कळवतील. हरएक सुधारणुकीच्या कामात बाईसाहेब साहाय्य करीत जातील, अशी मजबूत उमेद आहे.

४. खानगीतील कारखाने व कामे बाईसाहेबांच्या हुकुमाने चालतील व त्यांच्यावर बाईसाहेब पूर्ण देखरेख ठेवतील. खानगी कामदार यांनी सर्व लोकांचा भरवसा आपणावर असेल अशा रीतीने राहून बाईसाहेबांच्या हुकुमाने वागावे आणि वाड्यातील जडजवाहीर, दागिने, सोन्यारुप्याच्या जिनसा वगैरे हरएक किमती सामान महाराजांसाठी सांभाळण्याचा जिम्मा व त्याचप्रमाणे ठरविलेल्या नेमणुकीच्या आत खानगीचा खर्च ठेवण्याचा जिम्मा सदरहू खानगी कामदार यांचा आहे.

५. बाजूस *दाखल केलेले कारखाने हल्ली जे बांधून देऊन खानगी कामदाराच्या स्वाधीन केले आहेत, त्या कारखान्यांची देखरेख मर्जी असेल तोपर्यंत बाईसाहेब जातीने ठेवतील.

६. बाईसाहेब धर्माच्या कामात तत्पर आहेत. यासाठी शहरातील धर्मादायाचे कारखाने आहेत. त्यांच्यावर हल्ली असल्याप्रमाणे देखरेख बाईसाहेब चालू ठेवतील.

७. बाईसाहेबांच्या कानावर घालण्यासाठी खानगी कारखान्यांतील खर्चवेचाचे हिशेब व हरएक माहिती दिवाणसाहेब मागतील ती वेळच्यावेळी देत जावी, अशी ताकीद बाईसाहेब खानगी कामदारांना देतील. त्यासंबंधाने ज्या योग्य सूचना करणे असतील त्या दिवाणसाहेब करतील.

८. खानगी कामदार काही गावांची वहिवाट पाहत आले, ती यापुढे दरबाराचे महाली कामदार खालशात पाहतील; परंतु सदरहू गावचा वसूल योग्य खात्यात पोहोचविला जाईल. गायकवाडी राज्याचे कल्याण चांगल्या रीतीने व्हावे, अशी हिंदुस्थान सरकारची इच्छा आहे. ती सिद्धीस जाईल अशा रीतीने दिवाणसाहेब यांनी राज्यातील मुख्य अधिकाऱ्यांचे काम चालवावे.

१०. राज्याची सुधारणा कशी चालते, हे समजण्याविषयी हिंदुस्थान सरकार फार इच्छितात. यासाठी राज्यव्यवस्थेच्या संबंधाने दर महिन्यास एक रिपोर्ट एजंट गव्हर्नर साहेब यास

---

*जवाहीरखाना, कापडी जामदारखाना, कलावंतखाते, बाजेलोक, पहिलवान, साठमार, केशव मिस्त्री, साताजी मिस्त्री, बंदखाना, लखा लोहार, शिबंदी बेहेडा, वजरमुष्टी, जिलाब, वालम, शिकारखाना, हत्तीखाना, बंदीखाना, गाडीखाना, शिकारी जंगल, डागदार, पट्टेकरी, पांड्यांचा कारखाना, केदारेश्वर, भीमनाथ, सर्वेश्वर भैरवेश्वर, यवतेश्वर, काशीविश्वेश्वर (कर्नाळा) मिरुपूरचा सर्वेश्वर, गौरीशंकर, दक्षणा आणि बिदागी.

पाठवीत जातील. त्या रिपोर्टाचे मराठी भाषांतर राणीसाहेबांना पाहण्यास देतील आणि जरूरत असेल त्याप्रमाणे समक्ष माहिती सांगतील.

११. मीड साहेबांच्या कमिशनच्या रिपोर्टावरून लॉर्ड साहेबांनी जो सल्ला दिला आहे, तो अमलात आणण्याविषयी काळजी ठेवावी.

१२. मोठ्या महत्त्वाची कामे असतील त्या कामात एजंट गव्हर्नर जनरल यांची काम करण्यापूर्वी दिवाण साहेब सल्ला घेतील आणि राज्य प्रकरणाची माहिती देतील व एजंट गव्हर्नर जनरल वेळोवळी जो सल्ला देतील, त्यावर दिवाण साहेबांनी लक्ष द्यावे.

१३. हिंदुस्थान सरकारचा दिवाण साहेबांवर भरवसा आहे. राज्य व्यवस्था सुरळीत चालविण्याचा भार त्यांच्यावर आहे. यासाठी एजंट गव्हर्नर जनरल साहेब व राणीसाहेब हे उभयता दिवाणसाहेब यांना हरएक तऱ्हेची मदत करतील, त्यांचा सन्मान ठेवतील, त्यांची हुकूमत मजबूत ठेवतील आणि राज्य चालविणारे ते आहेत असे जेणेकरून सर्व रयतेस वाटेल असे ते करतील. दिवाणसाहेब जी कामे करतील, त्यात उगीच हात घातला जाणार नाही.

१४. फौज खात्याची देखरेख तूर्त एजंट गव्हर्नर जनरल यांच्या हाती राहील.

१५. काही महत्त्वाच्या कामांत मुख्य सरदार लोक आणि सेवेतील जाणते लोक यापासून काही माहिती घ्यावी व मत घ्यावे, असे दिवाणसाहेब यांना जरूरत दिसल्यास त्यास ते केव्हा केव्हा बोलावतील.

१६. शिरस्त्याचे दरबार मामूलप्रमाणे वाड्यात होत जातील आणि केव्हा रेसिडेन्सीत सरदार, दरकदार व मुख्य सावकार यांचा दरबार केला जाईल व सरदहू दरबारात राज्यकारभार चालविणारे मुख्य कामदार लोक हजर राहतील.

याप्रमाणे ठराव होऊन खानगी खात्याची सर्व व्यवस्था, महाराणी जमनाबाई यांच्याकडे, राजकीय बाबतीची दिवाणाकडे व फौज खात्याची सर रिचर्ड मीड यांच्याकडे जरी दिली होती, तरी या तिघांनी महत्त्वाच्या कामांत एकमेकांचा सल्ला घ्यावा व त्यावाचून कमीजास्त करू नये असे ठरले होते. प्रत्येक महत्त्वाच्या बाबतीत महाराणीसाहेबांच्या अभिप्रायास विशेष वजन देण्यात येत असे. त्यांनी दिलेला सल्ला व सुचविलेल्या युक्त्या सर रिचर्ड मीड व सर टी. माधवराव यांना तर पसंत पडल्याच; परंतु त्यांचा हा समयोचितपणा, राज्यकार्यदक्षता आणि हुशारी पाहून खुद्द हिंदुस्थान सरकारांनी त्यांची बरीच तारीफ केली. त्यांनी आपल्या तारीख २९ सप्टेंबर सन १८७६ च्या पत्रात महाराणी जमनाबाई यांचा उल्लेख करून त्यांनी आपल्या एजंट गव्हर्नरास लिहिले आहे की, "राणी जमनाबाई यांनी राज्यकारभारात वेळोवेळी जे कुशलत्व दाखविले व त्यांनी आपल्या अंगातील हुशारीचा आम्हास चांगला उपयोग करून दिला आणि बडोद्याचे राज्यासंबंधाने हिंदुस्थान सरकारवर जे दूषण येऊ पाहत होते, ते नाहीसे करून ब्रिटिश

राज्यासारखे निष्कलंक राज्य जगावर दुसरे कोणत्याही ठिकाणी नाही, असे त्यांनी प्रत्ययास आणून दिले, याबद्दल मी राणी जमनाबाईंचे फार आभार मानते. त्यांना आपण माझा हा निरोप पोहोचवून सांगावे की, आपल्या या अपरिमित श्रमाचा योग्य मोबदला देऊन आपला सत्कार करण्याचा योग ज्या वेळी येईल ती ती वेळ हिंदुस्थान सरकार फुकट जाऊ देणार नाही..." हा त्या पत्रातील कारणापुरता उतारा मि.पी.एस. मेलविल हे महाराणीसाहेबांकडे घेऊन आले व त्यांनी तो वाचून दाखविला. या पत्राचे मराठी भाषांतर महाराणीसाहेबांना सर टी. माधवराव यांनी करून दिले.

## महाराणी जमनाबाई साहेबांच्या देखरेखीखाली खानगी खात्यांची सुधारणा झाल्यावरची हिंदुस्थान सरकारकडे हकीकत

सर टी. माधवराव दिवाण यांनी बडोदे राज्याच्या एकंदर व्यवस्थेसंबंधी हिंदुस्थान सरकारकडे जे रिपोर्ट केले आहेत, त्यांपैकी एकात त्यांनी म्हटले आहे की, "संस्थानच्या हिताच्या गोष्टीत त्यांनी कारभारी मंडळीला पाठबळ दिले. हल्ली त्यांच्या ताब्यातील खात्यांच्या खर्चाची शिस्त लावून देण्याचा प्रश्न त्यांच्या पुढे आला आहे. अशा वेळी त्यांच्याकडून, शहाणपणाने योग्य अशी काटकसर होईल, अशी आम्हास उमेद आहे." ही त्यांची उमेद सर्वांशाने पूर्ण झाली. मल्हारराव महाराजांच्या कारकीर्दीत खानगी खात्याची व कारखान्यांची अव्यवस्था होऊन जे कित्येक घोटाळे माजले होते, ते सर्व यांनी थोड्या दिवसांत मोडून टाकले. त्यांनी या खात्यातून होणाऱ्या खर्चास व्यवस्थित स्वरूप येण्यासाठी योग्य तितकी काटकसर करून या खात्याची व्यवस्था नीट लावली. राज्यकारभारात त्यांनी दिवाण सर टी. माधवराव यांना जी मदत केली, तिच्याविषयी त्यांनी आपल्या रिपोर्टात म्हटले आहे की, "... आमच्या कारभारातील मुख्य तत्त्वे आणि त्यांची अंमलबजावणी महाराणीसाहेबांस पसंत पडल्यामुळे आम्हास राज्यकारभार चालविण्याची मोठी उमेद आली. त्यांची विलक्षण बुद्धिमत्ता, शहाणपण आणि सौजन्य हे कोणत्याही एतद्देशीय राजास किंवा राणीस साजेल असे तर ते आहेच; परंतु त्यांच्या ठिकाणी दुसरे जे सुगुण झळकतात ते फार अलौकिक आहेत.'

## दिवाण सर टी. माधवराव यांनी बडोदे राज्यकारभाराचा सन १८७६-७७ सालचा केलेला वार्षिक रिपोर्ट

इ.स. १८७६-७७ सालच्या राज्यकारभाराच्या रिपोर्टात सर टी. माधवराव यांनी म्हटले आहे की, "राज्यकारभारातील सुधारणुकीच्या संबंधाने जे फेरफार होत आहेत, त्या कामात महाराणी जमनाबाई यांनी सहानुभूतीपूर्वक अनुकूलता दाखविण्याचा क्रम सुरू ठेवला आहे. राज्यकारभारात सुधारणा केल्याने संस्थानाचे पुढे हित होईल. ही गोष्ट त्यांच्या अंगातील अद्वितीय समंजसपणामुळे त्यांच्यात सदसद्विवेकबुद्धीचे जे वास्तव आहे, त्या कारणाने त्यांना खात्रीपूर्वक समजून चुकली आहे. त्या अत्यंत नि:स्पृह आणि दूरदर्शी असल्याने त्यांचे नातलग,

मित्र किंवा आश्रित यांना राज्यकारभारात ढवळाढवळ करण्यास बिलकुल फावत नाही. उदात्त विचार व विलक्षण बुद्धिचातुर्य यांच्या योगाने त्या लोकांवर बराच मोठा दाब आहे. आपले चिरंजीव जे बडोद्याचे भावी राज्यकर्ते व्हावयाचे आहेत, त्या तरुण मुलावर पुढे ती जबाबदारी येऊन पडणार आहे. ती नीट रीतीने आपल्या शिरावर घेण्यास ते तयार होतील, अशा तऱ्हेचे त्यांना शिक्षण मिळून त्यात आपण यशस्वी होऊ, अशी त्यांना मोठी उमेद आहे. मुख्य प्रेरक शक्तीचा राज्यकारभारात वेळेवर जरी उपयोग झाला नाही. तथापि, राज्यरूपी यंत्राची रचना सर्व गोष्टी सुरळीत चालतील, अशा तऱ्हेची असावी अशी त्यांची उत्कट इच्छा आहे.*

या अभिप्रायावर पी.एस. मेलविल साहेबांनी हिंदुस्थान सरकारास महाराणी जमनाबाईंच्या संबंधाने आपला अभिप्राय खाली लिहिल्याप्रमाणे कळविला. "दिवाण साहेबांनी राणी जमनाबाई संबंधाने जे संतोषप्रद उद्गार काढले आहेत, ते मला सर्वथैव मान्य आहेत. राणीसाहेबांकडून राज्यकारभाराविषयी नेहमी समंजसपणाचे द्योतक व समतोल असेच मत आम्हास मिळते. सुधारलेल्या राज्यपद्धतीचे उदात्त विचार व प्रशंसनीय हेतू सिद्धीस नेण्यासाठी त्यांनी आपले वजन व सामर्थ्य खर्चून आम्हास फार चांगली मदत केली.**" मल्हारराव महाराजांच्या वेळची अव्यवस्था मोडून राज्यकारभारास व्यवस्थित स्वरूप आणण्याच्या हेतूने सर टी. माधवराव व मि.पी.एस. मेलविल यांचे प्रयत्न एकसारखे चालले होते. यावेळी सरदार, दरकदार व असामदार वगैरे लोकांचे प्राबल्य वाढून ते राज्यव्यवस्थेत घोटाळा करण्याच्या विचारात होते, त्यांचे ते हेतू सिद्धीस जाऊ न देता बडोद्याचा राज्यकारभार सुरळीतपणे चालवावा म्हणून महाराणी जमनाबाई यांनी जे प्रयास केले व त्या लोकांचे सांत्वन करण्यासाठी जे उपाय योजिले ते फारच वाखाणण्यासारखे होते.

## सर रिचर्ड मीड यांची बदली होऊन बडोद्यास त्यांचे जागी पी.एस. मेलविल यांची नेमणूक

इ.स. १८७५ च्या नोव्हेंबरात सर रिचर्ड मीड साहेबांची बदली काही अपरिहार्य कारणाने निजामच्या राज्यात रेसिडेन्टाच्या जागेवर हिंदुस्थान सरकारने केल्यामुळे बडोद्यास पी.एस. मेलव्हिल यांची नेमणूक झाली.

सर रिचर्ड मीड एकदम तिकडे गेल्याने या राज्याची सुधारणा करण्याच्या हेतूस कदाचित व्यत्यय येईल, या भीतीने महाराणी जमनाबाईंनी त्यांची ही बदली तूर्त तहकूब करावी म्हणून हिंदुस्थान सरकारास पत्राद्वारे कळविले. त्या पत्राचा जबाब त्या सरकारकडून खाली

---

*तारीख ११ माहे डिसेंबर सन १८७७ रोजी सर टी. माधवराव यांनी या राज्याची जी वार्षिक हकीकत हिंदुस्थान सरकारास कळविली, तीतील कलम ४९३.

**तारीख २१ डिसेंबर सन १८७७, नंबर ८१४० चा हिंदुस्थान सरकाराकडे सविस्तर हकिकतीच्या केलेल्या रिपोर्टाचे कलम ५८.

लिहिल्याप्रमाणे आला. "सर रिचर्ड मीड यांची बदली काही अपरिहार्य कारणांमुळे करावी लागली आहे, याबद्दल आम्हास फार वाईट वाटते. तथापि, त्यांच्या जागेवर आम्ही ज्या हुशार व विद्वान गृहस्थाची नेमणूक केली आहे, ते गृहस्थही त्यांच्याच तोडीचे आहेत. त्यांची आपणास चांगली मदत होईल, अशी हिंदुस्थान सरकारास मोठी उमेद आहे." असा जबाब मिळाल्या कारणाने ब्रिटिश सरकारने केलेली योजना कबूल करणे त्यांस भाग पडले. पी.एस. मेलविल यांच्याकडून राज्यकारभारात चांगली मदत झाली. त्यांच्या अंगातील हुशारी पाहून या गुणग्राहक महाराणीसाहेबांनी आपले सरळ व तारतम्य शक्तीने ओतप्रोत भरलेले मत त्या सरकारास योग्य वेळी कळविण्यास विलंब लावला नाही. महाराणी जमनाबाई यांच्याकडून पी.एस. मेलव्हिल यांना राज्यकाराभारात जी मदत झाली, तिजविषयी त्यांनी आपला अभिप्राय पहिल्याच रिपोर्टात खाली लिहिल्याप्रमाणे नमूद केला आहे. "राणी जमनाबाई यांच्या अंगची हुशारी, त्यांचे प्रेमळ विचार व ब्रिटिश सरकारने योजिलेल्या हितकर उपायांना अनुकूळ होण्याची त्यांची तत्परता. यामुळे राज्यकारभारांत त्यांचे आम्हास चांगलेच साहाय्य होत असते. ज्या कामात आम्ही त्यांची मदत मागतो त्यात समंजसपणाचा अभिप्राय धारण करून त्या आम्हास सहानुभूती दाखविण्यास व त्याप्रमाणे वागण्यास तयार असतात."* ब्रिटिश सरकारशी शत्रुभाव ठेवणाऱ्या राष्ट्राशी लढाई देण्याचा प्रसंग हिंदुस्थान सरकारवर आल्यास आम्ही तशा प्रसंगी हिंदुस्थान सरकारचा पक्ष घेऊन लढाईच्या मैदानात जाऊ, अशी गायकवाड घराण्याची पूर्वापार इच्छा, तिची वाढ महाराणी जमनाबाई यांनी केली. सन १८७८ मध्ये त्यांच्याकडून हिंदुस्थान सरकारकडे जे पत्र गेले त्यात त्यांनी स्पष्ट लिहिले आहे की, "काबूलचा अमीर किंवा आशियातील दुसऱ्या बलाढ्य राष्ट्रांशी लढण्याचा दुर्दैवी योग हिंदुस्थान सरकारास आल्यास आम्ही सर्वतोप्रकारे आपणास मदत देण्यास तयार आहोत." हा महाराणी जमनाबाई यांच्याकडून राजनिष्ठेचा गेलेला जबाब पाहून हिंदुस्थान व इंग्लंडचे सरकार फारच खुश झाले व त्याबद्दल आभारप्रदर्शक पत्र ता. ३ डिसेंबर १८७८ चे महाराणी जमनाबाई साहेबांस आले. या पत्रात त्यांची थोरवी व हुशारी यांचे फारच खुबीदार वर्णन केले आहे.

### महाराणी जमनाबाईसाहेब यांनी बडोद्यास 'जमनाबाई डिस्पेन्सरी' स्थापिली

बडोदे शहरातील लोकांच्या आरोग्याचे संरक्षण व्हावे याकरिता महाराणी जमनाबाईंनी एक दवाखाना स्थापन करण्याचा विचार केला व त्याकरिता एक भव्य इमारत बांधविली. या इमारतीसाठी एक लाख रुपये खर्च झाले. या दवाखान्यास 'जमनाबाई डिस्पेन्सरी' असे नाव देऊन त्याची रचना उत्तम पायावर केली. ही दवाखान्याची इमारत पुढे फौजखात्याच्या कचेरीस दिली व दवाखाना घडियाळी पोळेत फत्तेसिंहराव महाराजांच्या इमारतीत आणून ठेवला. शहरात

*मि. पी. एस्. मेलव्हिल 'स्पेशल कमिशनर व एजंट टू दी गव्हर्नर जनरल बडोदे राज्य' यांचा रिपोर्ट नंबर ५५३४ तारीख २४ ऑगस्ट सन १८७६ कलम ५८

दवाखाना स्थापन केल्यामुळे लोकांस बरेच सुख झाले. पूर्वी या शहरात गरीब लोकांस फुकट औषधे मिळण्याची सोय नव्हती, ती यावेळी झाल्याने त्यांचे हे एक प्रकारचे स्मारकच होऊन राहिले आहे. सर टी. माधवराव दिवाण यांनी इ.स. १८७७-७८ सालच्या वार्षिक रिपोर्टात या दवाखान्यासंबंधाने वर्णन करून त्याचे खरे महत्त्व हिंदुस्थान सरकारपुढे मांडले आहे. या दवाखान्याकरिता जी इमारत बांधली आहे ती नमुनेदार असून, महाराणीसाहेबांच्या नावास शोभण्यासारखी आहे. डॉक्टर कॉडी यांनी असे म्हटले आहे की, "मी या देशात ज्या व्यवस्था पाहिल्या आहेत, त्या सर्व व्यवस्थेवर 'जमनाबाई डिस्पेन्सरी' ही ताण करू शकेल." कुलीन स्त्रियांच्या औषधांच्या सोईसाठी स्वतंत्र योजना या दवाखान्यात महाराणी जमनाबाईंनी मुद्दाम करविली होती.

## महाराणी जमनाबाईसाहेब या राज्यकारभारात पूर्ण वाकबगार असल्यामुळे युरोपियन मुत्सद्दी लोकांकडून त्यांना मिळालेला मोठा मान

सर टी. माधवराव दिवाण यांनी राज्यातील वाढलेला खर्च कमी करण्याकरिता चालविलेल्या व्यवस्थेत महाराणी जमनाबाईंनी पूर्ण मदत दिली. लोकांची मने बिथरू न देता त्यांनी राज्यात सुधारणा करविली. त्या राज्यकारभारात पूर्ण वाबगार असल्याकारणाने मोठमोठे युरोपियन मुत्सद्दी लोक त्यांना मोठा मान देत असत. त्यांच्या संबंधाने* खाली लिहिल्याप्रमाणे उल्लेख एका पुस्तकात झाला आहे. "त्या स्वतः दृढ मनाच्या आणि कसलेल्या बुद्धीच्या असल्यामुळे बडोद्याच्या भावी राजाच्या शिक्षणाचे योग्य बूज जाणण्यास समर्थ आहेत. महाराणी जमनाबाई यांच्याकडून राज्यकारभारातील इतर बाबतींप्रमाणे सर्व महत्त्वाच्या कामांत चांगली मदत मिळत गेली. पूर्वेकडील राज्यांना वेढून भ्रष्ट करणाऱ्या दुर्गुणांपासून तरुण महाराजांस त्यांनी अगदी दूर ठेवले होते. या त्यांच्या साहाय्याबद्दल व अप्रतिहत सावधगिरीविषयी त्यांचे आभारच मानले पाहिजेत. या घडामोडीच्या दिवसांतील महाराणीच्या सुज्ञ वर्तणकीविषयी त्यांची प्रशंसाच करणे इष्ट आहे. महाराजांचे चांगले कल्याण व्हावे आणि त्यांस उत्कर्षावस्था यावी यासाठी त्या फार झटत असतात. यासंबंधाने त्या आदरास पात्र आहेत. त्यांची राज्यकारभारास व महाराजांच्या शिक्षणास जी मदत झाली तिजबद्दल कृतज्ञता व सद्बुद्धी दाखविण्याचा आनंददायक योग महाराणी व्हिक्टोरिया यांच्याकडून सर रिचर्ड मीड यांना बडोदे सोडण्यापूर्वीच मिळाला."

## महाराणी जमनाबाई साहेब यांच्या न्यायशीलतेबद्दल हिंदुस्थान सरकारकडून झालेली प्रशंसा

महाराणी जमनाबाई साहेब यांच्यात न्यायशीलता फारच उत्तम प्रकारची वसत होती. सरदार व दरकदारांच्या घरात जे त्यावेळी तंटे चालत असत, त्यांचे त्यांनी केलेले निकाल फारच विचार करण्यासारखे आहेत.

---

*सर रिचर्ड मीड यांचे चरित्र (पृष्ठ २२६)

सन १८७७ मध्ये धायबराच्या घराण्यात चाललेल्या तंट्याचा निकालही त्यांनी उत्तम न्यायशीलतेस अनुसरूनच केला. या ठरावासंबंधाने हिंदुस्थान सरकारने त्यांच्या न्यायशीलतेविषयी फारच श्रेष्ठ मत प्रगट केले आहे. हिंदुस्थानचे व्हाईसरॉय लॉर्ड लिटन यांनी कलकत्याहून ता. १७ फेब्रुवारी सन १८७७ चे एक पत्र महाराणी जमनाबाईसाहेबांना लिहिले. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "... मी खात्रीपूर्वक आपणास असे कळवितो की, ज्यांच्याबद्दल आम्ही फार कीर्ती ऐकत होतो आणि ज्यांनी बडोदे राज्यासंबंधाने फार कळकळ बाळगली, त्यांचा आपणाशी परिचय आणि मैत्री झाल्याने लेडी लिटन व मला स्वतःला फार आनंद झाला. चांगल्या व न्यायी लोकांच्या वाट्यास येणारे आरोग्य, सामर्थ्य यांचा उपभोग आपल्या मुलांसह आपणास फार दिवस मिळो, अशी आम्ही ईश्वराजवळ अंतःकरणपूर्वक प्रार्थना करितो." तसेच महाराणी जमनाबाई साहेब यांची स्वारी सयाजीराव महाराजांस बरोबर घेऊन नवसारी प्रांतात फिरण्यास व प्रजेची स्थिती पाहण्यास गेली होती, त्याजवरून नामदार व्हाईसरॉय लॉर्ड लिटन यांनी तारीख २८ मे १८७७ चे पत्र महाराणी जमनाबाईंनी पाठविले. त्यात त्यांनी म्हटले आहे की. ... आपण तरुण सयाजीरावांसह नवसारीस जाऊन तिकडील स्थिती पाहत असून, बडोद्याचा राज्यकारभार सुधारण्याकरिता फार श्रम करीत आहात, हे पाहून आम्हास फार संतोष वाटतो. हिंदुस्थान सरकारवर आपले अकृत्रिम प्रेम आहे व निस्सीम राजनिष्ठा आपण धारण करताना त्याबद्दल मला आपले वारंवार आदरपूर्वक स्मरण होत जाईल..." याच मासल्याची लेडी लिटन यांचीही बरीच पत्रे महाराणी जमनाबाई यांना येऊन, त्यांचा गौरव इंग्लिश लोकांकडून झाला असल्याचे आढळते.

❍❍❍

# भाग सोळावा

# महाराजांच्या शिक्षणासंबंधाने वापरलेली कार्यदक्षता

## सर रिचर्ड मीड यांचे भाषण

दत्तकविधान झाल्यानंतर मातृधर्मास अनुसरून पुत्रास भावी आयुःक्रमात सुकीर्तीप्रद होणारे सच्छिक्षण देण्याचा काळ सुरू झाला. हिंदुस्थान सरकारच्या मतास मान देऊन मि.एफ.ए.एच. एलियट यांच्या हातून सयाजीराव महाराजांस योग्य शिक्षण देण्यास सुरुवात झाली. मनुष्य धर्माचे खरे मूळ बाळपणात आहे. यात जे वळण लागते तेच बहुधा त्याच्या आयुष्यापर्यंत त्याजबरोबर राहते, हे मनात वागवून सयाजीराव महाराजांवर ईश्वराने जी जबाबदारी सोपवली होती ती ओळखून ते आपल्या प्रजेचे संरक्षण करण्यास शक्तिवान होतील, असे त्यास बनविण्याचा महाराणी जमनाबाई यांनी प्रयत्न केला. सर रिचर्ड मीड यांच्या हस्ते श्रीमंत सरकार महाराजसाहेब व सरदारांच्या मुलांच्या पाठशाळेचा पाया घालण्याचा समारंभ ता. १८ ऑक्टोबर सन १८७५ रोजी झाला. त्यावेळी सर रिचर्ड मीड साहेबांचे जे भाषण झाले. त्यात पालक या नात्याने महाराणी जमनाबाई यांच्यावर खाली लिहिल्याप्रमाणे जबाबदारी टाकली होती. ते आपल्या भाषणात म्हणाले की, "नवीन व्यवस्थेसंबंधाने विचार करण्यासारख्या अतिमहत्त्वाच्या गोष्टींपैकी या मोठ्या आणि महत्त्वाच्या संस्थानाच्या गादीवर बसविलेल्या तरुण राजाची विद्या आणि शिक्षण ही एक गोष्ट होती. हा विषय महाराणी जमनाबाई. दिवाण यांना व मला फार गूढ विचार करण्यासारखा होता. या मोठ्या साम्राज्यात सांप्रत आणि पुढेही हिंदुस्थानातील एतद्देशीय राजांना त्यांच्या उच्च स्थितीला योग्य व ते विद्येच्याद्वारे चांगले न्यायी आणि समर्थ असे राज्यकर्ते बनतील, असे शिक्षण त्यास मिळणे अवश्य आहे. या संबंधाची खरी महत्त्वाची जबाबदारी आपल्या महाराजांचा ताबा आणि त्यांची व्यवस्था ज्यांच्याकडे सोपवली असेल, त्या सर्वांवर राहते. हिंदुस्थानातील एतद्देशीय संस्थानात ज्यांच्या स्वभावावर आणि लायकीवर राज्यकारभार चालविण्याचे विशेषतः अवलंबून राहते, अशा भावी राजांच्या शिक्षणासंबंधाने पुष्कळ तजवीज



एच-४९
९

झाली आहे...... ज्याअर्थी माझ्या दृष्टोत्पत्तीस असे येते की, पुष्कळ सरदार लोक या समारंभात आज हजर आहेत. त्याअर्थी त्यांच्या वर्गाला राजापासून नोकऱ्या पदव्या मिळण्याचे जुने मार्ग आता बंद झाले आहेत, हे त्यांना दाखविण्यास हीच चांगली संधी आहे. आपल्या पूर्वजांप्रमाणे गायकवाडांचे लवाजम्याला धैर्याने व श्रमाने मदत करून हत्यारबंद लोकांच्या पुढाऱ्यांना संपत्ती आणि पदवी मिळविण्याचे दिवस आता निघून गेले. आमची अशी खात्री आहे की, असे दिवस पुन्हा यावयाचे नाहीत आणि या सुपीक देशाच्या रहिवाशांना आपले धंदे शांतपणे चालविता येऊन आपल्या सुपीक जमिनीत फळांचा व उत्पन्नाचा उपभोग घेता येऊन जीव आणि मालमत्ता या संबंधाने निर्धास्त राहण्यास मिळेल...... या तरुण राजाचे शिक्षण त्यांच्या भाग्याला योग्य आणि भविष्यकाळी त्यांच्या देशाला व सर्व वर्गाच्या प्रजेला कल्याणकारक होवो, तसेच आम्हाला पूर्ण खात्री आहे की, महाराजांच्या बरोबर शिकणारे बडोद्याचे गादीचे जुने सरदार हे मोठे कामदार व राज्यसंरक्षक होवोत.*"

## सर टी. माधवराव यांचे भाषण

सर रिचर्ड मीड यांच्या पूर्वोक्त भाषणास उत्तर देऊन त्यांचे आभार मानताना दिवाण सर टी. माधवराव हे म्हणाले की, "सर रिचर्ड मीडसाहेब, या समारंभात आपण जी महत्त्वाची कामगिरी बजावली, त्याबद्दल महाराजसाहेब आणि त्यांच्या मातुःश्री महाराणी जमनाबाईसाहेब यांच्यातर्फे मनापासून आभार मानण्याची पाळी माझ्यावर आली आहे. आपण चांगल्या इच्छेने आणि दूरदर्शीपणाने केलेली ही कामगिरी वरवर पाहणारास ती साधारण आणि बिन श्रमांची वाटेल. तथापि खरी विचारशील मनुष्ये ती शिल्पशास्त्रसिद्धतेच्या पलीकडची मानतील. बाहेरून दिसणाऱ्या कामापेक्षा वास्तविक आपणास जास्त श्रम घ्यावे लागले आहेत. आपण हल्ली जे पाहत आहोत. ते सुधारलेल्या काळातील विलक्षण आवश्यकतेच्या म्हणजे ज्ञान आणि सत्ता यांचा संयोग करण्याच्या गरजेच्या ओळखीचे क्रियासिद्ध पूर्ण दर्शक आहे. राज्य कारस्थाने बिनचूक रीतीने अमलात आणण्यापूर्वी पुष्कळ दिवसांची तयारी असावी लागते. तसेच हा समारंभ आणखी एका बाबतीचा दर्शक होईल. सार्वभौम सरकारच्या राज्यपद्धतीला एतद्देशीय संस्थाने उपयुक्त राखण्याच्या आणि ती चिरस्थायी करण्याच्या ब्रिटिश सरकारच्या अकृत्रिम इच्छेचे हे फळ आहे. सत्ता आणि चिरस्थायीपणाचा पाया अज्ञानावस्थेत असावा, ही गोष्ट इंग्लंड नापसंत करते. इंग्लंडची राजनीती अज्ञानांधकारापासून बचाव करू इच्छिणारी नाही. प्रकाशकारक होण्याची इंग्लंड इच्छा करते व राजे आणि लोक यांना ते सुखी होण्यास सांगते. मी आशा बाळगतो की, हा चकचकीत आणि आल्हाददायक प्रातःकाळ नवीन कारकीर्द की जिचा आपण पाया घातलात, तिचा पूर्ण बोधक आहे. तीस वर्षांच्या लांब मुदतीत ज्या हाताने पुष्कळ सत्यकृत्ये घडली, तसेच जो हात योद्ध्याची तलवार, मुत्सद्याची लेखणी व हल्ली आपण पाहत आहोत ती गवंड्याची

*सर रिचर्ड मीड यांचे चरित्र पृष्ठ क्रमांक २३७, परिशिष्ट ए.

'करणी' धरण्यास समर्थ आहे, अशा पक्वज्ञानी आणि महानुभावी हाताने या इमारतीचा पाया घातला गेला, ही मोठ्या सुभाग्याची गोष्ट आहे. ज्या महाराजांच्या आकलनशक्तीची पूर्ण चिन्हे प्रथमच दिसून आली, ते ईश्वरकृपेने त्यांच्या उरोभागावर चमकणाऱ्या मौल्यवान रत्नापेक्षाही जास्त किमतीचे गुणसंपादन करतील. म्हणजे पुनरुज्जीवन झालेल्या राज्याच्या शहाण्या आणि सद्गुणी राज्यकर्त्यांच्या मनात जे करण्याची नुसती कल्पना येईल, ते हे महाराज पूर्णपणे अमलात आणतील, अशी आस्थापूर्वक आशा बाळगण्यास सबळ कारण आहे. या समारंभात भाग घेऊन मित्रत्वाची आस्था प्रदर्शित केल्याबद्दल हजर असलेल्या मंडळींचे महाराज आणि राणीसाहेब यांच्या तर्फेने मी आभार मानतो. सर रिचर्ड मीड साहेब, आपल्या संबंधाने मी पूर्वीच आभार मानले आहेत. जी गोष्ट तुमच्या लक्षात आली नाही, अशी एक गोष्ट आता मला येथे उघड करू द्या. महाराजांच्या विद्यालयाचा पाया घालताना या संस्थानाशी असलेल्या आपल्या उदार संबंधाच्या सुंदर स्मारकाचा आपण सहजगत्या पाया घातला आहे."

### महाराणींची शिक्षणविषयक अप्रतिम दक्षता

जेथे राजकीय शिक्षणाची व वळणाची बिलकूल कल्पनाच होऊ शकणार नाही, अशा गावात व लोक समूहात निर्माण झालेल्या या बालराजास राजकीय शिक्षणाची दिशा समजून ते खऱ्या राजवंशी पुरुषांप्रमाणे बनावेत, यासाठी महाराणी जमनाबाई यांनी अत्यंत परिश्रम घेतले. सरदार लोकांच्या हुशार व राजकीय वळणातील वाकबगार अशा मुलांच्या संसर्गाने सयाजीराव महाराजांच्या अंगात राजकीय वळणाचे बीजारोपण त्यांनी करविले. राज्यातील हुशार अंमलदारांकडून राज्यकारभाराची माहिती त्यांना करून देऊन त्यांना राजकार्यधुरंधर बनवून त्यांच्या हातून पुढे जी महत्त्वाची कामे घडविली, त्याचे सर्व श्रेय महाराणी जमनाबाईंसच दिले पाहिजे. महाराजांची बाळपणातील अप्रतिम आकलनशक्ती व त्यांना त्यांच्या पूर्व सुकृतीने मिळालेले बुद्धिचातुर्य यांचा पूर्ण निकस महाराणी जमनाबाई यांनी केला. हे मोठे विद्वान आणि राजकारणपटू आहेत, असे थोड्याच दिवसांत मोठमोठ्या युरोपियन लोकांच्या प्रत्ययास त्यांनी आणून दिले. महाराजांवर कोणत्याही दुर्गुणांचा संस्कार घडू नये, याकरिता त्यांनी जे प्रयत्न केले त्यात महाराणी जमनाबाई या पूर्ण विजयी झाल्या. महाराजांच्या शिक्षणासंबंधाने दिवाण सर टी. माधवराव यांनी आपल्या रिपोर्टात म्हटले आहे की, "....महाराजांच्या सुधारणेसाठी आणि विद्यार्जनाकरिता राणी जमनाबाईसाहेब या फार काळजी बाळगतात ही गोष्ट त्यांना अत्यंत भूषणावहच होय. त्यांच्या शिक्षणाकरिता त्यांनी ज्या सोयी केल्या आहेत, त्याहून जास्त कोणत्याही एतद्देशीय राज्यात केलेल्या आढळणार नाहीत. या मोठ्या बुद्धिमान आणि सुसंस्कृत मनाच्या असल्यामुळे बडोद्याच्या भावी राज्यकर्त्यांस चांगले शिक्षण मिळणे हे अत्यंत महत्त्वाचे काम त्या पूर्णांशाने जाणतात. ही खरोखर मोठ्या सुभाग्याचीच गोष्ट समजली पाहिजे."* तसेच

---

*सन १८७५-७६ सालच्या राज्याचे वार्षिक रिपोर्टाचे कलम १४५

दुसऱ्या एका रिपोर्टात त्यांनी आणखी असे म्हटले आहे की, "तरुण गायकवाड सरकारच्या शारीरिक व नैतिक शिक्षणावर महाराणी जमनाबाईंची देखरेख पहिल्याप्रमाणेच उत्तम रीतीने चालली आहे......" मि.पी.एस. मेलव्हिल यांनी आपल्या रिपोर्टातही असेच उद्गार काढले आहेत.*

### शिक्षणास महाराणींची प्रत्यक्ष मदत

महाराज साहेबांवर त्यांची फारच माया असे. त्या त्यांना बिलकूल विसंबत नसत. त्यांच्या आरोग्यासंबंधीने योग्य दक्षता वापरून त्यांनी त्यांना सुदृढ बनविले. त्यातच व्यवहारचातुर्य व प्रसंगावधान यांचा प्रवेश व्हावा म्हणून त्यांनी अनेक युक्त्या योजिल्या. 'एतद्देशीय राजे हे केवळ दुर्गुणांचे पुतळे' अशी कित्येक युरोपियन गृहस्थांची जी समजूत झाली होती, ती राणी जमनाबाईंनी आपल्या प्रयत्न सामर्थ्याने खोटी पाडली. एतद्देशीय राजांचे संरक्षक जर चांगले असतील, तर तशांच्या देखरेखीखाली तयार झालेले राजे फारच हुशार व सद्गुणशाली निपजल्यावाचून राहणार नाहीत, असे त्यांनी प्रत्ययास आणून दिले. सर टी. माधवराव दिवाण यांनी राणी जमनाबाईंच्या संबंधाने हिंदुस्थान सरकारास जी हकीकत कळविली तीत त्यांनी म्हटले आहे की, "....त्यांचा हल्ली एक मुख्य हेतू आहे तो हा की, महाराजांच्या मोठ्या प्रारब्धाला योग्य असे शिक्षण त्यांना मिळावे. त्यांनी ब्रिटिश सरकारास यशदायक व बडोदे येथील गायकवाडांच्या घराण्यास अभिमान बाळगण्यासारखे निपजावे, असा त्यांचा दृढ हेतू आहे. हा त्यांचा उत्कृष्ट उद्देश सिद्धीस जावा म्हणून त्यांनी पराकाष्ठेचे प्रयत्न चालविले आहेत..." राणी जमनाबाईंच्या कर्तव्यतत्परतेबद्दल ब्रिटिश सरकारच्या गुणग्राहक विद्वान कामदारांनी वारंवार त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या या सद्गुणास प्रोत्साहन दिले. तसेच सर रिचर्ड मीड हे हैदराबादेस असता त्यांनी तारीख १३ माहे सप्टेंबर सन १८७९ चे एक पत्र महाराणी जमनाबाईंस पाठविले. त्यास त्यांनी सयाजीराव महाराजांच्या शिक्षणासंबंधाने म्हटले आहे की, ".....सयाजीरावांसंबंधाने ज्या हकिकती ऐकू येत आहेत, त्यामुळे मला फार आनंद होतो. आपण जे अप्रतिम विचार व जी इच्छा धारण करता, तिला अनुसरून ते सुशील व राजकार्यनिष्णात व्हावेत असे मी इच्छितो..."

### या प्रयत्नाबद्दल महाराणींची प्रशंसा

बडोदे राज्याची खराबी कशाने झाली, ते राणी जमनाबाईंना पूर्णांशाने ठाऊक होते. तशी कारणे आता पुढे घडू नयेत, यासाठी त्या फारच जपत असत. त्याचीच सुफळे आज बडोद्यातील लोकांस चाखण्यास मिळत आहेत. त्यांनी ही जी दक्षता वापरली, तिचे हिंदुस्थानच्या व्हाईसरॉय यांनी वारंवार अभिनंदन केले आहे. नामदार लॉर्ड लिटन यांनी एका पत्रात त्यांच्या या योग्य तत्परतेबद्दल व त्यांच्या हुशारीबद्दल बरीच प्रशंसा केली आहे.

○○○

*रिपोर्ट नंबर ५५३४, तारीख २४ ऑगस्ट सन १८७६, कलम ३९.

## भाग सतरावा

# राज्ञीपुत्र प्रिन्स ऑफ वेल्स (हल्लीचे बादशहा) यांची भेट

### प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या भेटीकरिता मुंबईस आगमन

सयाजीराव महाराज हे बडोद्याच्या गादीचे मालक झाल्यावर महाराणी व्हिक्टोरिया यांचे ज्येष्ठ चिरंजीव आल्बर्ट एडवर्ड प्रिन्स ऑफ वेल्स यांची स्वारी हिंदुस्थानातील प्रवासाकरिता येण्याचे ठरले. त्यांच्या भेटीकरिता महाराणी जमनाबाई यांनी आपले पुत्र सयाजीराव व दिवाण सर टी. माधवराव यांच्यासह जाण्याचे ठरविल्यावरून तारीख २४ ऑक्टोबर सन १८७५ रोजी खास गाडीने स्वाऱ्या मुंबईस गेल्या. या स्वारीबरोबर बरीच मंडळी गेली होती. राज्यातील मुख्य सरदार, मानकरी व दरकदार यांना मुद्दाम बरोबर नेले होते. राज्ञीपुत्राचे पवित्र दर्शन होऊन नामदार महाराणी व्हिक्टोरिया अलेक्झांड्रिना यांच्याशी बडोदे राज्याचा जो पूर्वापार संबंध जडला होता, तो दृढ करण्याची ही उत्तम संधी आली. तारीख २५ रोजी स्वाऱ्या तेथे जाऊन पोहोचल्या. सरकारने व लोकांनी यांचा तेथे सत्कार फारच चांगला केला. यांचा मुक्काम लालबागेत ठेवला होता. मोठमोठे विद्वान व राजकार्यनिष्णात मुत्सद्दी असे युरोपियन व एतद्देशीय गृहस्थ येऊन त्यांनी बडोदे राज्याचे संरक्षण करणाऱ्या या महाराणी जमनाबाई साहेबांचे अत्यंत आभार मानले. ज्या युरोपियन लोकांकडून महाराणी जमनाबाई यांना संकटकाळी चांगली मदत झाली, त्यांच्या प्रत्यक्ष भेटी यासमयी झाल्याने त्यांना फारच आनंद वाटला. मुंबईचे गव्हर्नरसाहेब यांनी महाराणी जमनाबाई व त्यांचे पुत्र सयाजीराव यांचे चांगले स्वागत करून आनंद प्रदर्शन केले. नामदार लॉर्ड नॉर्थब्रुक हिंदुस्थानचे व्हाईसरॉय आणि गव्हर्नर जनरल यांचीही या स्वारीत भेट झाली. 'बडोद्याचे राज्य ब्रिटिश सरकारशी ज्या सख्यत्वाचे ग्रंथीने बांधले गेले ती ग्रंथी ऐन आणीबाणीच्या प्रसंगी हिंदुस्थान सरकारने आमच्याकडे लक्ष देऊन बाळासाहेबांना (सयाजीरावांना) बडोद्याच्या गादीवर बसवन मजबूत केली' असे म्हणून व्हाईसरॉय साहेबांचे महाराणी जमनाबाई यांनी फार आभार मानले. मुंबईचे गव्हर्नर व कौन्सिलचे सभासद यांच्या भेटी व परतभेटी मानपूर्वक झाल्या.

यासमयी सयाजीराव यांनी मुंबईतील प्रख्यात व प्रशंसनीय संस्था पाहून आपला आनंद महाराणी जमनाबाई यांच्या पुढे व्यक्त केला. नामदार प्रिन्स ऑफ वेल्स यांना श्री. सयाजीराव महाराज यांनी चांदीची चहादाणी व रेशमाने गुंफलेल्या दोन ढाली नजर केल्या. तसेच श्रीमंत महाराणी जमनाबाई यांनी युवराजांच्या पत्नीकरिता मूल्यवान मुक्ताहार व जडावाचा कंठा नजर केला. हे दोन अलंकार फारच मोठ्या किमतीचे होते.

## बडोद्यास आगमन व त्यावेळचे पॉलमाल पत्राने केलेल्या वर्णनाचा सारांश

युवराज प्रिन्स ऑफ वेल्स यांची स्वारी मुंबईस आल्याने तर 'आपण बडोद्यास यावे व आपले वागत करण्याची आम्हाला संधी द्यावी' अशी अत्यंत उत्कंठा महाराणी जमनाबाई यांनी दाखविल्यावरून युवराजांनी आभारपूर्वक हा मान बडोदे राजधानीस देण्याचे कबूल केले. त्यामुळे तारीख १८ नोव्हेंबर रोजी महाराणी जमनाबाई, सयाजीराव महाराज व दिवाण सर टी. माधवराव यांनी बडोद्यास येण्याकरिता मुंबई शहर सोडले. मिळालेल्या थोड्याशा अवधीत यांनी स्वागत समारंभाची तयारी केली. नोव्हेंबरच्या १९ च्या तारखेस सकाळी युवराज प्रिन्स ऑफ वेल्स यांची स्वारी मंडळींसह बडोदे येथे आली. याकाळी बडोदे शहर हल्लीप्रमाणे सुधारलेले नव्हते. रेल्वे स्टेशन सुशोभित असे असल्याने तेथून बाहेर पडेपर्यंत या शहरासंबंधाने पाहुणे मंडळीस बरोबर कल्पना होऊ शकली नाही. विलायतेतील 'पॉलमाल' पत्रामध्ये या प्रसंगाचे वर्णन खाली लिहिल्याप्रमाणे प्रसिद्ध झाले आहे. :- यासमयी बडोद्यातील लोकांचा देखावा अगदी साधा होता. त्यांना चहाच्या किटल्यांचीही बरोबर माहिती नव्हती. अव्यवस्थित थोडीशी दुकाने, घामट व मळक्या कपड्यांनी सुशोभित झालेले लोक व अरुंद सडका यांचा देखावा पाहून त्या युरोपस्थ पाहुण्यांना मोठा चमत्कार वाटला. येथे खानावळी व सुधारलेल्या पद्धतीची दुकाने नव्हती. नामदार प्रिन्स ऑफ वेल्स यांची स्वारी येण्याचे ठरताच आगगाडीच्या स्टेशनपासून रेसिडेन्सीपर्यंत रस्ता शृंगारण्यासाठी हजारो मजूर लावून त्या मार्गास प्रेक्षणीस स्वरूप आणले होते. रस्त्याच्या दोन्ही बाजू लतापल्लवांनी सुशोभित केल्या होत्या. ध्वजा व सुंदर तसबिरी लावून फारच थोड्या अवकाशात रस्त्याचा मनोहर देखावा दाखविला होता. झाडीत व खोलगट जागेत बडोदे शहर असतानाही त्यांच्या शोभेत यासमयी बरीच भर पडली. युवराजांच्या स्वागताची बडोद्याने पूर्ण तयारी केली होती. तसेच राजपुत्रावलोकनार्थ नागरिक फार उत्सुक झाले होते. सर टी. माधवराव यांनी आपल्या अकलेने व चातुर्यानेही थोड्या अवधीत केलेली तयारी फारच अवर्णनीय अशी होती. त्यांनी मुंबईस असता असे बोलून दाखविले होते की, 'नामदार साहेबांस हिंदुस्थानात कोठेही पाहण्यास मिळणार नाही, असा देखावा मी बडोद्यास दाखवीन.' हे त्यांचे भाषण अगदी यथार्थ झाले. जुन्या व पडक्या अवस्थेत असलेल्या बडोदे शहरास त्यांनी थोड्या वेळात प्रेक्षणीय शोभा आणली होती, तसेच यापुढे ते याहीपेक्षा जास्त मनोरम होत जाईल, असे त्यांनी स्पष्ट बोलून दाखविले होते. त्या वेळचे जुने बडोदे शहर ज्यांनी पाहिले होते, त्यांना

आज त्यांचे थोड्या काळात चांगले रूपांतर झालेले पाहून साल्हाद आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. यासमयी श्रीमंत गायकवाड सरकारची पायदळ फौज नव्या पोशाखाने सशस्त्र होऊन रस्त्याच्या एका बाजूस रांगेने उभी होती. मराठेशाही पागोटी व हिरवे डगले घालून गायकवाडी रिसाला एका बाजूस रांगेने उभा होता. त्यांच्या मध्यभागी शृंगारलेले पंधरा हत्ती उभे असून, ते पिवळया, तांबड्या, हिरव्या व निळया रंगांनी रंगविलेले होते. त्यांचे कपाळ, सोंड व शरीराचा इतर भाग यांच्यावर हिंदू पद्धतीची निरनिराळी मनोवेधक चित्रे व वेलबुट्टी काढलेली होती. नामदार साहेबांच्या स्वारीकरिता शृंगारलेल्या हत्तीवर जरीच्या झुली घातलेल्या होत्या. त्या हत्तीवरील सोन्याच्या अंबारीची किंमत सुमारे चार लाख रुपयांची असावी. त्या हत्तीच्या शेपटीवर सोन्याचे मूल्यवान गेंद घातलेले होते. त्यांच्या पायांत सोन्याच्या मोठ्या साखळया होत्या. त्यांचे विस्तीर्ण कानही उत्तम शृंगारलेले होते. दुसरे हत्तीही सोन्या-चांदीच्या अलंकारांनी व चित्रविचित्र प्रकारच्या रंगांनी सुशोभित केल्यामुळे तो गजसमुदाय युरोपियन मंडळीस फार प्रेक्षणीय वाटला. स्टेशनवर नामदार साहेबांची गाडी येताच लष्करी सलामी झाली. परस्पर आगतस्वागत होऊन स्वाऱ्या वाद्यांसह कॅम्पात गेल्या. तेथे या दिवशी टुमदार व प्रेक्षणीय असा दरबार झाला. या दरबारात श्रीमंत सयाजीराव महाराज व नामदार प्रिन्स ऑफ वेल्स हे एकाच सुवर्णमय आसनावर विराजमान झाले होते. दोन प्रहरी नामदार साहेबांकरिता अंगणात हत्तीच्या टकरा, साठमारी, डागदारी, मल्लांच्या कुस्त्या व इतर प्रकारचे मनोरम खेळ झाले. ते पाहण्यास सर्व युरोपियन पाहुणे मंडळी गेली होती. हे खेळ झाल्यानंतर एका मोठ्या वाघास साखळदंडाने बांधून दाखविण्यासाठी आणले होते. मेंढ्यांची गाडी, हरणांची जोडी व निरनिराळे जंगली पशु-पक्षी हे मुद्दाम दाखविण्यासाठी तेथे आणले होते. ते पाहिल्यानंतर स्वाऱ्या परत कॅम्पात गेल्या. रात्री रेसिडेन्सीत मोठी मेजवानी झाली. त्यावेळी तऱ्हे-तऱ्हेचे सुंदर दारूकाम सोडले होते. दुसरे दिवशी स्वारी चित्ते घेऊन हरणांच्या शिकारीस जाऊन आली व त्यांनी मोतीबागेचा शृंगारलेला बंगला पाहिला. या समारंभात शहरातील सर्व राजमार्ग शृंगारलेले होते व रात्री दीपोत्सवही मोठ्या थाटाचा केला होता. एकंदरीत या थोड्याशा अवधीत युवराज व त्यांच्या बरोबरच्या मंडळीस मेजवान्या देण्याची, करमणुकीकरिता अतिषबाजी सोडण्याची व निरनिराळे खेळ करून दाखविण्याची एकच धांदल उडून गेली होती. त्यांच्या या आगमनाने बडोदे राज्याचा ब्रिटिश सरकारशी जोडला गेलेला पूर्वीचा संबंध बराच मजबूत झाला. महाराणी जमनाबाई यांना तर हे युवराजांचे आगमन फारच आनंदकारक झाले. नामदार प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या प्रवास वर्णनात म्हटले आहे की, "महाराणी जमनाबाई यांचे डोळे पाणीदार असून, त्यांचे हास्यमुख फारच देदीप्यमान दिसले. त्यांचे हातपाय गोंडस आहेत. त्यांनी हाताच्या बोटांत मौल्यवान व चमकणाऱ्या अंगठ्या व पायात सोन्याच्या वजनदार साखळया घातल्या होत्या. त्यांच्या भारामुळे चालताना त्यांना फारच श्रम होत असले पाहिजेत. नामदार प्रिन्स ऑफ वेल्स यांची बडोद्यात भेट

झाली. त्यावेळी महाराणी जमनाबाई या इतर राजस्त्रियांप्रमाणे गोषात नव्हत्या. त्यांनी अंगावर जरीकाठी व जरीच्या नक्षीची शालजोडी पांघरली होती व ती वारंवार त्या सावरीत होत्या. त्यांनी मांडीवर ताराबाबा यांना घेतले होते..."तारीख २३ नोहेंबरच्या दिवशी सायंकाळी युवराजांनी बडोदे सोडले. बडोदे सोडताना त्यांना व श्रीमंत सयाजीराव आणि त्यांच्या मातुःश्री महाराणी जमनाबाई यांना फार वाईट वाटले. युवराजांनी येथे जास्त दिवस राहावे, असा त्यांचा फार मनोदय होता; परंतु त्यांच्या प्रवासाचे दिवस अगोदरच ठरले गेले असल्यामुळे त्यांना येथे राहता आले नाही.

❍❍❍

# भाग १८ वा

# दिल्लीचा बडा दरबार व काशीयात्रा

## दिल्लीस स्वारी जाते

महाराणी व्हिक्टोरिया अलेक्झांड्रिना यांनी 'हिंदुस्थानची बादशाहीण' हे पद धारण करण्याचा समारंभ तारीख १ माहे जानेवारी सन १८७७ रोजी ठरविला होता. या समारंभास महाराणी जमनाबाई, दत्तकपुत्र सयाजीराव, प्रिय कन्या ताराबाई व दिवाण सर टी. माधवराव यांच्यासह दिल्लीस अवश्य यावे, असे नामदार लॉर्ड लिटन यांच्याकडून निमंत्रण झाले. या आमंत्रणाप्रमाणे दिल्ली दरबारास जाण्याकरिता महाराणी जमनाबाई, श्रीमंत सयाजीराव, ताराबाई, मि.पी.एस. मेलविल साहेब, दिवाण सर टी. माधवराव, मीर कमालुद्दीन हुसेनखान नबाब, मीर इम्राहीअल्ली, आर. रघुनाथराव, काशीनाथराव गायकवाड, दौतलराव माने, जगोबा जगताप, खाशेराव शिर्के, तात्यासाहेब माने, बाळासाहेब धायबर, माधवराव रामचंद्र फडणीस, बळवंतराव पांडुरंग, अण्णा अर्जीवाले वगैरे मंडळींसह तारीख ७ माहे डिसेंबर सन १८७६ रोजी खास गाडीने स्वाऱ्या बडोद्याहून निघाल्या. या स्वारीत शागीर्दपेशासुद्धा १०४५ मनुष्ये, १७२ घोडे, १० हत्ती, शिवाय बैल व उंट अगोदरच पाय रस्त्याने रवाना झाले होते. आश्विन शुद्ध १२ ला पहिली पलटण हत्ती व दुसरे स्वारीचे सामान आणि जनावरे दिल्लीकडे रवाना झाली. माणेकजी टबाक यांनी दिल्लीस जाऊन स्वारीच्या मुक्कामाकरिता जागा तयार करविली. मुंबई, कल्याण, जबलपूर, प्रयाग, विटावा वगैरे ठिकाणी मुक्काम करून तारीख १५ डिसेंबर रोजी सकाळी स्वाऱ्या दिल्लीस पोहोचल्या. या स्वारीची व्यवस्था ठेवण्याकरिता ब्रिटिश सरकारतर्फे अमरेली व काठ्यावाडचे पोलिटिकल एजंट मि. मेन यांना नेमले होते. वामनराव नारायण अकोलकर हे गायकवाड सरकारचे यावेळी स्वारी एजंट होते. त्यांनी स्वारीचा बंदोबस्त उत्तम रीतीने ठेवला होता.

## लॉर्ड लिटन यांची भेट

तारीख २५ माहे डिसेंबर रोजी नामदार व्हाईसरॉय साहेबांची स्वारी कलकत्त्याहून दिल्लीस यावयाची आहे, अशी सूचना असलेल्या सर्व राजमंडळात फिरली. तिजवरून श्रीमंत सयाजीराव महाराज सर टी. माधवराव. मेलव्हिल साहेब. मानकरी व सरदार मंडळींसह नामदारांस स्टेशनावर घेण्यास गेले. रस्त्याच्या दोन्ही बाजूने हिंदुस्थानातील राजे, नवाब वगैरे लोकांचे सैन्य व लवाजमा उभा केला होता. नामदार व्हाईसरॉय लॉर्ड लिटन यांची स्वारी ४ वाजून १० मिनिटांनी स्टेशनवर उतरली. जमलेले सर्व राजे व नवाब यांच्या पृथक भेटी झाल्या. नंतर अत्तर गुलाब, हारतुरे व पानसुपारी होऊन नामदार साहेबांची स्वारी एकदम गजावर आरूढ झाली. स्वारीच्या पुढे शंभर हत्ती लवाजम्यात होते. त्यापैकी काही हत्तीवर लहान लहान तोफा चढविल्या होत्या. त्यांच्यापुढे गोरी पलटण असून, तिचा अग्रभाग गुरखे लोकांच्या पलटणीने सुशोभित केला होता. या पलटणीच्या पुढे रासभारूढ उल्हाट यंत्रे (तोफा) चालली होती. याप्रमाणे ही स्वारी मोठ्या थाटाने आपल्या मुक्कामावर येऊन दाखल झाली.* दुसऱ्या दिवसापासून नामदार व्हाईसरॉय साहेबांनी राजे व नवाब यांच्या भेटी आपल्या तंबूवर घेण्यास आरंभ केला. तारीख २७ रोजी ४ वाजता नामदार व्हाईसरॉय लार्ड लिटन यांची स्वारी गायकवाड सरकारच्या मुक्कामावर खासगी भेटीसाठी आपल्या मंडळींसह आली.

यावेळी व्हाईसरॉय यांच्या शेजारच्या कोचावर महाराणी जमनाबाई साहेब, त्यांच्या शेजारी श्रीमंत महाराज साहेब व ताराबाई आणि उजव्या बाजूस मि.पी.एस. मेलविल साहेब, सर टी. माधवराव आदी करून मंडळी बसली होती. फॉरिन सेक्रेटरी हे व्हाईसरॉय यांच्या मागे खुर्चीवर बसले होते. रीतसर नजराणा झाल्यानंतर अत्तर गुलाब, हारतुरे, पानसुपारी व बहुमान पोशाख होऊन हा छोटा दरबार बरखास्त झाला. तारीख २ रोजी महाराज साहेबांची स्वारी आपल्याबरोबर पाच मानकरी घेऊन व्हाईसरॉय साहेबांच्या मुक्कामावर भेटीसाठी गेली होती.

## प्रसिद्ध दिल्ली दरबार

जानेवारी सन १८७७ च्या १ ल्या तारखेस नामदार महाराणी व्हिक्टोरिया यांनी हिंदुस्थानचे सार्वभौमपद स्वीकारल्याबद्दलचा अर्धचंद्राकार भव्य मंडपात व्हावयाचे ठरले होते. या दरबाराला सर्व राजे व नबाब यांना आपल्या लष्करासह येण्याचे आमंत्रण होते. प्रत्येक राजाबरोबर पंधरा मनुष्यांना दरबारात फुकट येऊ देण्याची मोकळीक होती. प्रेक्षकांना पाच रुपयांची तिकिटे निराळी ठेवली असल्याकारणाने त्यांचा समुदाय बराच जमला होता. अकरा वाजता नामदार लॉर्ड लिटन यांची स्वारी दरबारात आली व मध्यम भागाच्या सिंहासनावर विराजमान झाली. 'कैसर-ए-हिंद'

---

*ही स्वारीची हकीकत महाराणी जमनाबाई यांचे कारभारी रा. रा. बळवंतराव पांडुरंग यांच्या रोजनिशीवरून घेतली आहे. प्रसिद्ध दिल्ली दरबाराच्या वर्णनातही याच मासल्याची हकीकत आढळून येते.

हे पद यावेळी महाराणी व्हिक्टोरिया यांच्यातर्फे लॉर्ड लिटन यांनी धारण केले. या आनंदाच्या प्रदर्शनार्थ राजे व नबाब यांना बऱ्याच पदव्या दिल्या. यावेळी महाराणी जमनाबाईस 'महाराणी', श्रीमंत सयाजीराव यांना 'फर्जंदे-इ-खास-इ-दौलत-इ-इंग्लिशिया', दिवाण सर टी. माधवराव यांना 'राजा', नायब दिवाण विनायकराव जनार्दन किर्तने यांना 'रावबहादूर', मीर कमालुद्दीन हुसेनखान, काजी शहाबुद्दीन, पेस्तनजी जहांगीरजी व खरखेटजी रुस्तमजी यांना 'खान बहादूर' या पदव्या नामदार हिंदुस्थान सरकारकडून मिळाल्या. श्रीमंत महाराज साहेब व महाराणी जमनाबाई यांचा हा जो बहुमान झाला त्याच्या सनदा नामदार हिंदुस्थान सरकारकडून मिळाल्या. श्रीमंत महाराज साहेब व महाराणी जमनाबाई यांचा हा जो बहुमान झाला त्याच्या सनदा नामदार लॉर्ड लिटन साहेबांनी याच दरबारात मोठ्या सत्काराने दिल्या.

## तुकोजीराव होळकर यांची भेट

दिल्लीचा किल्ला व दुसरी प्रेक्षणीय स्थळे पाहिल्यानंतर श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर यांना तारीख ३ जानेवारी रोजी महाराणी जमनाबाई यांच्याकडून मोठ्या थाटाची मेजवानी झाली. "पूर्वी जी संकटे येऊन त्यांनी मनास औदासीन्याने घेरून टाकले होते, त्यातून बचाव करण्याच्या कामात आपण जी मेहनत घेतली तिचेच फळ आज मिळाले. आज आम्हास दिल्ली पाहण्यास मिळाली, ते सर्व आपल्या श्रमाचे फळ आहे," असे महाराणी जमनाबाई यांच्या तोंडून यावेळी उद्गार निघताच श्रीमंत तुकोजीराव होळकर यांना फारच गहिवर आला. "ईश्वर वाईट दिवस नेहमी ठेवीत नाही, ते शेवटी निघून गेले आहेतच. आता सुखाने राज्यकारभार चालवून प्रजेला व सार्वभौम सरकारास संतोष द्यावा म्हणजे श्रमाचे सार्थक होईल." हे त्यांच्या मुखातून निघालेले प्रेमोद्गार या आनंदाच्या वेळी महाराणी जमनाबाई यांना अमृततुल्य वाटले. श्रीमंत तुकोजीरावांनी मोठ्या आनंदाने सयाजीरावांस 'खाऊ करिता' शंभर मोहरा दिल्या. तारीख ४ रोजी रात्री दिल्लीच्या किल्ल्याजवळ इंग्लिश नाटक झाले. ते पाहण्यास येण्याविषयी आमंत्रण आल्यावरून महाराणी जमनाबाई, महाराज सयाजीराव व ताराबाई ही मंडळी नाटकास गेली होती.

## लॉर्ड लिटन हे भेटीस आले

तारीख ५ माहे जानेवारी सन १८७७ रोजी व्हाइसराय लॉर्ड लिटन हिंदुस्थानचे व्हाइसराय यांची स्वारी गायकवाड सरकारच्या मुक्कामावर महाराणी जमनाबाई यांच्या भेटीस आली. प्रथम परस्पर क्षेमप्रश्न झाल्यावर महाराणी साहेबांनी बडोद्याच्या राजगादीवर दत्तक मुलगा देऊन राज्य कायम ठेवले, याबद्दल हिंदुस्थान सरकारचे कृतज्ञतापूर्वक आभार मानले. त्याच्या उत्तरात लॉर्ड लिटन हे म्हणाले की, "कै. खंडेराव महाराजांनी हिंदुस्थान सरकारशी मित्रपणा कायम ठेवण्याकरिता अत्यंत परिश्रम घेतले व त्यांनी फार नुकसानही सोसले. त्याचा बदला आपणास आपल्या अंगची विलक्षण हुशारी, तार्तम्यज्ञानशक्ती आणि इंग्रज सरकारवरील

आपली निस्सीम भक्ती पाहूनच मिळाला आहे. आम्ही हे जे कार्य केले ते कै. खंडेराव महाराज राजांच्या कामगारीच्या बदल्यास यथार्थ पात्र होण्याइतकेही नाही. आपणास आणखीही जास्त चांगला बदला लवकरच देण्याची आमची खास इच्छा आहे. ईश्वरकृपेने तो दिवस लवकर येईल. महाराज मल्हारराव यांच्या कारकिर्दीत आपण अनेक संकटे सोसली. त्यातून आपणास ईश्वराने मुक्त करून हे चांगले दिवस दाखविले आहेत. राजमाता या नात्याने आपल्यावर प्रस्तुत बरीच मोठी जबाबदारी पडली आहे. ती ओळखून आपण राज्यकारभारास हल्ली चांगली मदत करीत आहात, हे ऐकून मला फार आनंद वाटतो. आपण आपला मदत करण्याचा क्रम अवश्य चालू ठेवाल, अशी मी मोठी उमेद ठेवतो." नंतर नामदार साहेबांनी असे म्हटले आहे की, "आता आपण बडोद्यास जाणार किंवा दुसऱ्या कोणत्या ठिकाणी फिरण्यास जाण्याची आपली इच्छा आहे." असे आदरपूर्वक विचारल्यावरून महाराणी जमनाबाई यांनी "आपल्या धर्माने पवित्र मानलेले श्री काशी क्षेत्र येथून जवळच असल्याने तेथे जाऊन गंगेचे स्नान करावे एवढी इच्छा आहे; परंतु ती सफल होणे आपल्या कृपेवर सर्वथैव अवलंबून आहे." असे सांगितल्यावरून त्यांनी आपली खुशी दर्शविल्यानंतर हा खाजगी भेटीचा दरबार हारतुरे, अत्तर गुलाब, पानसुपारी व नजराणा होऊन आटोपला.

## काशीयात्रा करण्याचा निश्चय

तारीख ६ रोजी सकाळी ८ वाजता नामदार साहेबांच्या सेक्रेटरीकडून, काशी यात्रेस जाण्याची रीतसर परवानगी येऊन पोहोचली. मि.पी.एस. मेलविल एजंट साहेब व राजा सर टी. माधवराव यांची इच्छा महाराणीसाहेबांनी यावेळी काशीयात्रेस जाऊ नये अशी होती; परंतु नामदार साहेबांकडून एकदम ही परवानगी येऊन पोहोचल्यामुळे त्यांना मोठे आश्चर्य वाटले. काशीयात्रेस जाण्याकरिता परवानगी मिळविण्याची खटपट कोणी केली, त्याचे या उभयतांस मोठे गूढ पडले होते. त्यांनी बराच तपास केला तेव्हा त्यांना खुद्द महाराणीसाहेबांच्या विनंतीवरूनच ही गोष्ट घडली असे समजले. तेव्हा या उभयतांनी प्रथम खर्चाची अडचण दाखविली. ही यात्रा यावेळी करू नये, असेही ते स्पष्ट सांगण्यास चुकले नाहीत; परंतु या धर्मशील महाराणीसाहेबांनी जो निश्चय केला होता तो ढळू दिला नाही. त्यांचा या बाबतीत अतिशय आग्रह पडलेला पाहून मि.पी.एस. मेलविल साहेब व राजा सर टी. माधवराव यांनी वाटाघाट करून त्यांनी तीस हजार रुपयांत ही काशीयात्रा करावी, असे मोठ्या कष्टाने ठरविले.

## यात्रा

तारीख ९ रोजी दिल्लीहून स्वारी निघाली. दुसऱ्या दिवशी लखनौस जाऊन पोहोचली. लखनौ शहरास जुन्या व त्यात पाश्चात्त्य पद्धतीच्या नवीन रचनेचे मिश्रण झाल्याने आलेली अपूर्व शोभा पाहून त्यांच्या मनास फार आल्हाद झाला. स्वारीचा मुक्काम ज्या ज्या शहरांत झाला तेथील महत्त्वाचे सर्व देखावे, जुना इतिहास प्रसिद्ध आणि प्रेक्षणीय इमारती व अन्य स्थळे पाहून

यापैकी अनुकरण करण्यासारखे काय आहे व ज्या स्थळांचे उत्तम प्रकारे स्मरण राहू शकेल असे काय आहे, याचा महाराणी जमनाबाई या शांतपणे विचार करीत असत. लखनौची स्थिती व तेथील लोकांच्या आचारविचारांची फारच थोड्या वेळात त्यांनी चांगली माहिती करून घेतली. तेथील काही विद्वान व प्रख्यात पुरुषांच्या भेटी झाल्या व त्या भेटीत त्यांनी त्या लोकांचा उत्तम प्रकारे सत्कार केला. तसेच तिकडील गायक वगैरे लोकांमधील अप्रतिम गुण पाहून त्यांचीही संभावना त्यांनी त्यावेळी केली असल्याचे आढळन येते. बडोद्यास परत जाण्याची फार निकड असल्यामुळे त्याच दिवशी स्वारी परत फिरली व तारीख ११ रोजी आग्र्यास येऊन पोहोचली. येथे सयाजीराव महाराज व राजकुमारी ताराबाई यांना बळवंतराव पांडुरंग यांच्या देखरेखीखाली ठेवून २५ मनुष्यांच्या लवाजम्यासह स्वारी मथुरेस यात्रेकरिता गेली. मथुरा हे शहर पुराणप्रसिद्ध आहे. दिवाण, नायब दिवाण व आर. रघुनाथराव वगैरे मंडळी जयपूर शहर पाहण्यासाठी गेली होती. जयपूरची रचना फारच प्रेक्षणीय आहे. या मासल्याचे दुसरे शहर हिंदुस्थानात बिलकूल नाहीच, असे म्हटले तरी चालेल. मथुरा, गोकुळ वृंदावन वगैरे पाहून महाराणीसाहेबांची स्वारी आग्र्यास परत गेली. तेथे पाच मुक्काम होऊन महाराज, ताराबाई, मि. मेलव्हिल वगैरे मंडळींसह स्वारी काशीक्षेत्री जाऊन दाखल झाली. तेथे दहा दिवसांपर्यंत मुक्काम होता. या सर्व क्षेत्रांत त्यांनी बराच दानधर्म केला. विद्वान व धर्मशील ब्राह्मणांस आणि अनाथांस बरेच साहाय्य केले. ब्राह्मण भोजन, अनाथांस अन्नवस्त्र, विद्वान व शास्त्री मंडळींची सभा भरवून त्यांची योग्य संभावना, सत्पात्र ब्राह्मणास पीतांबर, शाली वगैरे उंची वस्त्रे देऊन त्यांचा केलेला बहुमान आणि कालभैरवास ३०० रुपयांची एक मोत्यांची कंठी देऊन मिळविलेला लौकिक यांच्यामुळे त्यांच्या कीर्तीत तेथे बरीच भर पडली. महाराणी साहेबांनी येथे फार दिवस न राहता लवकर निघावे, असे मि. मेलविल यांनी सुचविले; परंतु त्यांची ती सूचना महाराणीसाहेबांनी मान्य न केल्यामुळे मेलविलसाहेबांस फार वाईट वाटले व त्यांनी कलकत्त्यास यासंबंधाने रिपोर्ट केला. नामदार साहेबांनी या रिपोर्टाचा जवाब महाराणीसाहेबांच्या लाभात दिल्यामुळे मि. मेलव्हिल यांना स्वस्थच बसावे लागले. इतकेच नव्हे तर महाराणीसाहेबांचे वजन हिंदुस्थान सरकारकडे बरेच आहे, असे समजून ते पुढे त्यांच्या मताप्रमाणेच वागू लागले असे म्हणतात. रीतीप्रमाणे सर्व यात्रा आटोपून, स्वारी तारीख ५ फेब्रुवारी सन १८७७ रोजी बडोद्यास येऊन पोहोचली.

○○○

# भाग १९ वा

# हिंदुस्थान सरकारने केलेला सत्कार

## व्हिक्टोरिया महाराणीसाहेब यांच्याकडून महाराणी जमनाबाई यांना 'इंपिरियल ऑर्डर ऑफ थ्री क्राऊन ऑफ इंडिया' ही पदवी मिळाली

महाराणी जमनाबाईंची अत्यंत राज्यनिष्ठा, आपल्या प्रजेला चांगले सुख मिळावे याकरिता त्यांनी योजिलेले अपर्व प्रयत्न. त्यांच्या मनाचा मोठेपणा व त्यांच्याकडून राज्यकारभारास मिळालेली चांगली मदत इत्यादी प्रशंसनीय सद्वर्तनाकडे लक्ष देऊन महाराणी व्हिक्टोरिया यांच्या राज्याच्या ४१ व्या नूतन वर्षासमारंभाच्या समारंभात हिंदुस्थान सरकारने महाराणी जमनाबाई यांना 'इंपिरियल आँर्डर ऑफ दी क्राऊन ऑफ इंडिया' (हिंदुस्थानच्या बादशाही दर्जाचा मुगुट) ही बहुमानाची पदवी दिल्याबद्दल सरकारी आज्ञापत्रात जाहीर केले. ब्रिटिश सरकारने त्यांना जो मान दिला, त्यावरून त्या सरकारच्या गुणग्राहकतेची चांगली कल्पना येते. ही पदवी देण्याबद्दलचा समारंभ तारीख ५ जुलै सन १८७८ रोजी नजरबागेतील बंगल्यात झाला. या समारंभाची हकीकत त्या सालच्या राज्यकारभाराच्या रिपोर्टात बरीच मुद्देसूद दिली आहे. त्यात म्हटले आहे की, तारीख ६ माहे जुलै सन १८७८ रोजी आकाश अगदी निरभ्र होते. तो दिवस मोठा पवित्र आणि महत्त्वाचा दिसत होता. नजरबागेच्या समोर लष्कराचे लोक व्यवस्थीशीर उभे केले होते. प्रेक्षकांची रस्त्यात बरीच गर्दी झाली. दरबाराचा भव्य दिवाणखाना सरदार, दरकदार, आमदार व राज्यकारभारातील अंमलदार व इतर वरिष्ठ प्रतीचे नोकर यांच्या अपार समुदायाने अगदी खचून भरला होता. दिवाणखान्याच्या मागील भागात आपल्या लवाजम्यानिशी महाराणी जमनाबाई या उल्हसित मुद्रेने येऊन बसल्या. मि. मेलविल यांच्या पत्नी व कित्येक युरोपियन स्त्रियांही तेथे आल्या. एजंट मि. मेलव्हिल साहेब व बडोद्यास राहणारे सभ्य आणि प्रतिष्ठित युरोपियन गृहस्थ हे आपल्या रथातून लहरीपुऱ्याच्या विस्तीर्ण व मजबूत दरवाजापर्यंत आले. तेथे दिवाणसाहेब यांनी त्यांचे प्रेमपूर्वक स्वागत केले आणि शृंगारलेल्या गजावर त्यांना बसवून

राजमार्गाने त्यांना दरबाराच्या जागी आणले. या वेळच्या स्वारीचा देखावा मोठा मनोरम होता. मि. मेलविल साहेबांची स्वारी राजवाड्याजवळ येताच लष्करी सलामी झाली. सुस्वर मनोहर बँड वाजू लागले. रीतीप्रमाणे सलामीच्या तोफा झाल्या. महाराजसाहेबांनी एजंटसाहेबांचे स्वागत केले. सर्व मंडळी दरबाराच्या सुशोभित आणि भव्य दिवाणखान्यात येऊन स्थानापन्न झाली. गव्हर्नर जनरल साहेबांचे असिस्टंट एजंट कॅप्टन जॅक्सन साहेब हे व्हाईसरॉय साहेबांकडून आलेले बहुमानपत्र (खलिता) व चांद घेऊन आले. तेव्हा श्रीमंत महाराज साहेब व मि. मेलविल साहेब उठून दिवाणखान्याच्या मध्यापर्यंत आले आणि जॅक्सन साहेबांना घेऊन आदरास पात्र आणि मानास योग्य अशा महाराणीसाहेब ज्या ठिकाणी विराजमान झाल्या होत्या तिकडे गेले. समयसूचक आणि राज्यकार्यनिष्णात महाराणीसाहेबांनी हिंदुस्थान सरकारच्या प्रतिनिधींचा यथोचित सन्मान केला. मि. मेलव्हिल साहेबांनी मानपूर्वक ते चंद्रपद महाराणीसाहेबांच्या हातात दिले व त्यांनी थोडक्यात त्यांचे गुणानुवान वणून 'आपल्या सद्गुणांना व कार्यदक्षतेला हा मान फार आहे असे नाही. तथापि, ब्रिटिश सरकार आपली कृतज्ञता ज्याअर्थी प्रगट करण्याचा प्रयत्न करते, त्याअर्थी या किताबाचा आपण स्वीकार करावा' असे व्यावहारिक थोडक्यात भाषण केले. मि. मेलव्हिल साहेबांनी महाराणी व्हिक्टोरिया यांच्या सहीचा जाहीरनामा व त्यांच्यासोबत व्हाईसरॉय साहेबांकडून आलेला खलिता महाराणी जमनाबाई साहेब यांना सादर केला. राजा सर टी. माधवराव दिवाण यांनी त्या मोहोरबंद थैल्या सोडून जाहीरनामा व खलिता यातील आशय निवेदन केला व ब्रिटिश सरकारकडून या झालेल्या सन्मानाबद्दल महाराणी जमनाबाई यांनी आभार प्रदर्शित केले. या आनंदाच्या प्रदर्शनासाठी तोफांची सलामी होऊन हा विधी आटोपला. नंतर श्रीमंत महाराजसाहेब, मि. मेलव्हिल, कॅप्टन जॅक्सन व राजा सर टी. माधवराव हे दरबाराच्या दिवाणखान्यात परत आले. दरबारात आल्यावर मि. मेलव्हिल साहेबांनी समयास अनुसरून दोन शब्द सांगितल्यावर नामदार व्हाईसरॉय साहेबांकडून आलेला खलिता व त्या बरोबरचे कागद वाचून दाखविले. महाराणी व्हिक्टोरिया यांच्या ठायी आमची फार आदरबुद्धी वसत आहे, असे दाखविण्यासाठी दरबारातील सर्व मंडळी यावेळी उठून उभी राहिली होती. इंग्लंडहून आलेल्या सनदेचे मराठी भाषांतर सरसुभे खा. ब. काजी शहाबुद्दीन यांनी सर्वांस यावेळी वाचून दाखविले :

व्हिक्टोरिया, एम्स ऑफ इंडिया.

श्रीमंत महाराणी जमनाबाईसाहेब गायकवाड,

आपणास आनंदाने सलाम करून कळवितो की,

'इम्पिरियल ऑर्डर ऑफ धी क्राऊन ऑफ इंडिया'चे मेंबर ठरविण्यास आपण योग्य आहात असे आम्हास वाटल्यावरून आम्ही तुम्हास ही पदवी आदरपूर्वक नजर करून यावर लिहिलेल्या किताबाच्या अलंकाराचा उपभोग घेण्यास, त्या पदकास घालण्यास व त्यासंबंधी जितके हक्क आहेत त्यांचा उपभोग घेण्याची पूर्ण सत्ता आम्ही आपणास देतो. हा किताब आम्ही आमच्या

राज्याच्या ४१ व्या वर्षी सन १८७८ च्या जानेवारी महिन्याच्या तारखेस आमचा दरबार आसबर्न येथे भरला तेथे आपणास दिला.

सालिसबरी,
प्राइम मिनिस्टर

ही सनद वाचून दाखविल्यानंतर हिंदुस्थानचे व्हाईसरॉय लॉर्ड लिटन यांच्याकडून आलेला खलिता वाचून दाखविला :

आमचे मानदायक मित्र, (महाराणी जमनाबाई गायकवाड)

आपणास कळविण्यास मजला फार आनंद वाटतो की, राणी सरकार यांनी हिंदुस्थानचे 'कैसरए-हिंद' हा किताब स्वीकारला. त्याच्या सन्मानार्थ बहुमानाचा नवीन दर्जा काढला आहे आणि त्याचे नाव 'इंपिरियल ऑडर ऑफ धी क्राऊन ऑफ इंडिया' म्हणजे 'हिंदुस्थानच्या राज्याच्या बादशाही दर्जाचा मुगुट' असा आहे. हा मान त्यांचे राजकीय घराण्यातील व हिंदुस्थानातील राजे लोकांच्या राज्यकार्यधुरंधर स्त्रिया आणि राणी सरकारच्या आप्तातील व त्या पसंत करतील त्या सद्गुणी स्त्रियांस तो मान देण्यात येईल. कळविण्यास अतिशय आनंद वाटतो की, महाराणी सरकारांनी आपणासंबंधाने राजकीय कृपेच्या बहुमानार्थ हा किताब आपणास प्रेमपूर्वक समर्पण केला आहे.

विलियम फोर्ट.

१-१-१८७८

आपला प्रामाणिक मित्र,
**लिटन**
हिंदुस्थानचे व्हाईसरॉय आणि गव्हर्नर जनरल

आनंदप्रदर्शक टाळयांच्या आवाजात हे वाचन संपल्यानंतर श्रीमंत सरकार महाराज साहेबांचे समयात अनुसरून भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, "मि. मेलविल महाराज साहेब व सभ्य गृहस्थहो, आजचा हा दिवस आमच्या भाग्याचा आहे. आमच्या परमपूज्य आणि अत्यंत प्रिय मातोश्री मासाहेबांस आज नामदार महाराणी साहेबांकडून जे सन्मानचिन्ह देण्यात आले, ते आमच्या घराण्यास बहुमोल भूषणच आहे. गेल्या तीन वर्षांत आम्हास जी प्रसादचिन्हे देण्यात आली, त्यांच्या योगाने आम्ही राणी सरकारशी प्रेमपाशांनी पूर्वीपेक्षा अधिक बांधले गेलो आहोत. दयाळू महाराणी व्हिक्टोरिया यांच्या पवित्र चरणी आमची सेवा, भक्तिपूर्वक सादर करण्यास पाहिजे तेव्हा आम्ही तयार आहोत." नंतर हारतुरे, अत्तर गुलाब, पानसुपारी वगैरे दिल्यानंतर आनंदाच्या टाळयांच्या गजरात हा दरबार बरखास्त झाला.

## मोतीबागेत मेजवानीच्या वेळी राजा सर टी. माधवराव यांनी केलेले भाषण

याच रात्री मोतीबागेत युरोपियन लोकांची मेजवानी झाली. या आनंददायक समयी महाराणी जमनाबाई यांचे मि. मेलविल यांनी दीर्घायुष्य चिंतल्यानंतर त्यांचे आभार मानण्यासाठी राजा सर टी. माधवराव यांचे फारच सुरम्य भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, "मि. मेलव्हिल, कुलस्त्रिया व सभ्य गृहस्थहो, आपण सर्वांनी महाराणी जमनाबाई साहेब यांचे अक्षयी क्षेम असावे असे चिंतले, त्यासंबंधाने आपले आभार मानण्याचे काम माझ्या वाट्यास आले आहे, त्याबद्दल मला फार आनंद वाटतो. महाराणी जमनाबाई यांच्या पवित्र व सत्संस्कारयुक्त अंतःकरणावर आपल्या ममताळूपणाचा आणि योग्य गुणग्राहकतेचा शुभ संस्कार झाल्यावाचून राहणार नाही. दुर्दैवाच्या किंवा साडेसातीच्या पक्क्या फेऱ्याने पूर्वी त्यांना सौख्यगिरीवरून दुःखरूपी महान गर्तेत एकदम कसे फेकून दिले होते हे सर्व आपण जाणतच आहोत. त्यांचा छळ करणाऱ्या अन्यायमूर्तीला काळगतीने योग्य शासन आपल्याद्वारे होऊन महाराणी जमनाबाई या आपल्या पूर्ववैभवास पोहोचल्या, या गोष्टीला आज तीन वर्षे झाली. ज्या वाड्यातून त्या दुःख करीत निराश होऊन निघाल्या, त्या वाड्यात त्या ज्या दिवशी आल्या, तो सुदिन मला चांगला स्मरतो. त्या दिवशी प्रातःकाळची वेळ शांत असून, पहाटेस एक विलक्षण व क्वचित दिसणारा देखावा अंतरिक्षात दृग्गोचर झाला होता. हा देखावा मी मोठ्या उत्कंठतेने पाहत होतो. एक तर तो देखावा फार मनोरम होता व त्यात महाराणी जमनाबाई यांच्या दैवदुर्लीलेच्या अस्ताचे प्रतिबिंब पडले होते, असे म्हटले तरी चालेल. त्या नीळवर्ण व निरभ्र आकाशात शुक्राची सोज्वळ चांदणी आपल्या दिव्य तेजाने चमकत होती. इतक्यात, ती एकाएकी चंद्रबिंबाच्या आड गेल्याने तिचा अस्त झाला. आकाश निष्प्रभ व भयाण दिसू लागले; परंतु ही संध्याकाळची स्थिती फार वेळ राहिली नाही. थोड्या वेळाने तीच तेजदार शुक्राची चांदणी तेजशून्य झालेल्या चंद्राच्या आडून बाहेर येऊन पुन्हा प्रकाशित झाली. त्या दिवशी शुक्राची जशी ग्रहणातून मुक्तता झाली तशीच महाराणी जमनाबाईसाहेबांची त्यांना ग्रासू पाहणाऱ्या राजकीय ग्रहणातून मोकळीक झाली. या तेजस्वी आणि स्वयंप्रकाशित महाराणी जमनाबाई, ब्रिटिश सरकारशी कृतज्ञतेने वागून आपला काळ आनंदात घालवीत आहेत. त्यांच्या या पुण्याईच्या बळाने त्यांना एकामागून एक असे आनंदाचे दिवस येत असून, सन्मानावर सन्मान मिळत आहेत. त्यांच्या स्वर्गीय व प्रौढप्रतापी राज्यकर्त्यांकडून त्यांना 'क्राऊन ऑफ इंडिया' पदवीचा अत्यंत श्रेष्ठ मान मिळून त्या मानाचे चंद्रपदक पिढीजात होत असलेल्या रत्नोपचयात त्यांच्या दिव्य आणि मनोहर शरीरावर विराजत आहे. आज त्यांचा अलंकारविधी संपूर्ण झाला, असे म्हणण्यास हरकत नाही. हे परम मानार्ह भूषण धारण करण्यास ईश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो असे मी इच्छितो." याप्रमाणे हा आनंददायक समारंभ साजरा झाल्यानंतर महाराणी जमनाबाई यांनी राज्यकारभारात मदत करणाऱ्या सद्गृहस्थांचा चांगला सत्कार केला. त्यांना बडोद्यास आल्यावर ज्या सर रिचर्ड मीड

साहेबांनी चांगली मदत करून त्यांच्यातील प्रत्येक सद्गुणांची हिंदुस्थान सरकारास ओळख करून देण्याचे काम बजाविले, त्यांना महाराणी जमनाबाईंनी हे सन्मानास्पद वर्तमान कळवून आपल्या प्रेमळ व शुद्ध अंत:करणातील पूज्य बुद्धी व्यक्त केली. या बाबतीत त्यांनी सर रिचर्ड मीड यांना जे पत्र लिहिले, ते पाहण्यासारखे असल्याने त्याचे सरळ भाषांतर येथे देतो :

बडोदे, मोतीबाग.
तारीख ३० जुलै सन १८७८

अत्यंत ममताळू व कृपासागर,

सर रिचर्ड मीड साहेब,

प्रेमपूर्वक लिहिण्याचे की, तारीख ६ मिनहू रोजी नजरबागेत भरलेल्या दरबारात मि. मेलव्हिलसाहेब यांच्याकडून मला 'क्राऊन ऑफ इंडिया' हा किताब मिळाला. हा माझा मोठाच सन्मान झाला असे मी मानतो. मजसंबंधाने उदार व ममताळूपणाची सर्व कृत्ये हिंदुस्थान सरकाराने चालविली आहे याबद्दल मला आनंद वाटतो व त्यासंबंधीने मी फारच आभारी आहे. हा सन्मान देण्याचे काम आपल्याकडे सोपविल्याबद्दल मि. मेलव्हिल साहेबांनी आनंद प्रदर्शित केला. मिसेस मेलव्हिल की ज्या स्त्रियांच्या खानगी दरबारात हजर होत्या व ज्यांनी मि. मेलव्हिल यांना सन्मानाचे पदक टाचणीने अडकविण्यास मदत केली, त्यांच्याकडून ममतेचे व मित्रत्वाचे दाखले मला नेहमी मिळतात. तुम्हाला हे ऐकल्यापासून आनंद होईल हे मी जाणते. कारण तुम्ही नेहमी मजबद्दल विशेष काळजी बाळगून आमच्या राज्याचे अभीष्ट चिंतीत असता. या बहुमानदायक समारंभाच्या वेळी बडोद्यास येण्याविषयी मी आमंत्रिल्यावरून माझे मित्र की ज्यांची मला ऐन संकटात चांगली मदत झाली, असे मि. कोल्स व त्यांच्या पत्नी यांच्या भेटीचा सुयोग आला. यावेळी आपल्या भेटीची आशा होती; पण ती आपण पूर्ण न करता तूर्त तहकूब ठेवली आहे. आपण मला भेटीचा लाभ दिल्यावाचून इंग्लंडास जाणार नाहीत, असा मला पूर्ण भरवसा आहे.

**- जमनाबाई गायकवाड**

## महाराणी जमनाबाई यांनी अभिनंदनपर पाठविलेली पत्रे

महाराणी जमनाबाई यांनी ब्रिटिश सरकारकडून मिळालेल्या मानाविषयी अभिनंदनपर पत्रे महाराणी व्हिक्टोरिया, त्यांचे प्रधान मंडळ, हिंदुस्थानचे व्हाईसरॉय व दुसरे प्रतिष्ठित आणि प्रसंगी उपयोगी पडलेल्या युरोपियन गृहस्थांस पाठवून आपली निर्मळ आणि निस्सीम राजभक्ती व्यक्त केली. सर रिचर्ड मीड यांच्या विद्वान चरित्रकाराने महाराणी साहेबांसंबंधाने अत्यंत उदात्त विचार प्रगट करून त्यांची बरीच थोरवी वर्णन केली आहे.*

ooo

*भाग १५ वा पृष्ठ १६७ पाहा.

# भाग २० वा

# राजकन्या व महाराज यांचा विवाह

## महाराणी जमनाबाईसाहेबांनी आपल्या कन्या-पुत्रांच्या विवाहासंबंधी केलेले प्रयत्न

महाराज सयाजीराव यांना अनुरूप सहचारिणी मिळून ताराबाई यांना योग्य सुगुण संपन्न वर मिळावा, असा महाराणी जमनाबाई यांच्या हृदयात इ.स. १८७८ सालात हेतू उद्भवला. कोणत्याही अवस्थेतील मातेस आपल्या कन्या-पुत्रांच्या विवाहाची काळजी विशेष असतेच. त्यातून राजकार्यनिष्णात आणि हुशार या राजमातेला ती जास्त असणे हे युक्त आहे. साधारण अवस्थेतील व उच्च प्रतीच्या स्थितीतील लोकांस ही लग्नविषयक चिंता बहुधा सारख्याच दर्जाची असते. मुलाच्या लग्नापेक्षा मुलीच्या लग्नाची चिंता मातेला फार असते. स्थळ चांगले मिळावे हा तिचा श्रेष्ठ हेतू असतो. महाराणी जमनाबाई यांना सयाजीराव व ताराबाई या पुत्र-कन्यांच्या लग्नाची सारखीच चिंता पडली होती. आपल्या प्रिय पुत्रास सुस्वरूप आणि सगुणशाली धर्मपत्नी मिळाल्यास या भावी राज्यकर्त्यांची संसारयात्रा उत्तम रीतीने होईल, या महत्त्वाच्या गोष्टीकडे महाराणी जमनाबाईंचे विशेष लक्ष होते. हिंदुस्थानातील एतद्देशीय राजांना जे दुर्गुण लागण्याचा संभव असतो, तो येथे नसावा याकरिता त्यांनी फार परिश्रम घेतले. उच्च पदवीच्या मातेला आपल्या वैभवास अनुकूल पडणारी आणि पूर्वजांच्या सुकीर्तीची वाढ करणारी स्नुषा मिळावी, अशी स्वभावतः इच्छा असते. आपल्या आवडत्या पुत्रास सुगुण संपन्न वधू व लाडक्या ताराबाईस योग्य वर शोधण्यासाठी महाराणी जमनाबाई यांनी दूरच्या प्रदेशांवर अत्यंत विश्वासू व हुशार माणसे गुप्तपणे पाठवून शोध चालविला. तसेच बळवंतराव काका माने व रामराव भोसले वगैरे काही प्रतिष्ठित गृहस्थांना राजकीय वैभवासह वधू-वर योजनेकरिता पाठविले. थोड्याच दिवसांत हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतून विश्वासू लोकांकडून कन्या-वराच्या वर्णनाची पत्रे, योग्य स्पष्टीकरणासाठी तसबिरी, जन्मपत्रिका आणि 'आम्हास पदरात घ्या,' अशी विनंती पत्रे यांचा एकसारखा वर्षाव सुरू झाला. महाराणी जमनाबाई यांनी बडोद्याचे एजंट व दिवाणसाहेब

यांची या कामात पूर्ण मदत घेण्याचा निश्चय केला. काळजीपूर्वक विचार केल्यानंतर योग्य सुगुणांची व वैभवाची चिकित्सा करून राजकन्या ताराबाई यांना सावंतवाडीचे राजे रघुनाथराव बाबासाहेब सरदेसाई या तरुण आणि सगुणसंपन्न राजास देण्याचा निश्चय केला. आपल्या श्रेष्ठ हेतूस अनुसरणारे आणि बडोद्यातील गायकवाडांच्या घराण्यास योग्य अशा कुळाशी संबंध जोडण्याचा महाराणी जमनाबाई यांचा मुख्य उद्देश होता. 'आम्हास सावंतवाडीचे सरदेसाई यांनी पदरात घ्यावे,' अशी महाराणी जमनाबाई यांनी विनंती केली. त्यावरून सावंतवाडीचे पॉलिटिकल एजंट लेफ्टनंट कर्नल एवेस्टाप यांनी ता. १ ऑगस्ट १८७८ चे पत्र बडोद्याचे रेसिडेन्ट मेलविल साहेब यांना पाठविले. त्यात त्यांनी म्हटले होते की, "सावंतवाडीच्या संस्थानावर खर्चाचा बोजा जास्त न पडेल अशी व्यवस्था बडोदे सरकारकडून झाल्यास आमची लग्नासंबंधाच्या बाबतीत हरकत नाही. तसे न झाल्यास सावंतवाडीचे सरकार हे एखाद्या लहान संस्थानातील राजकन्येशी शरीरसंबंध जोडतील," ही त्यांची अट महाराणी जमनाबाई साहेबांनी कबूल केली.

## तंजावर घराण्यातील वधू तरुण सयाजीराव यांच्याकरिता पसंत केली

राजकन्या ताराबाई यांची वर योजना निश्चित झाली; परंतु तरुण सयाजीराव यांच्याकरिता वधू शोधून काढण्याचे काम अतिशय कठीण व भानगडीचे होते. जी वधू योजावयाची ती वयाने बेताची, सशक्त, रूपवान, साधारण लिहिण्या-वाचण्यास शिकलेली, सद्गुणी आणि मोठ्या घराण्यात उत्पन्न झालेली असावी. अशी महाराणी जमनाबाईसाहेबांची इच्छा होती. कुलीन मराठ्यांच्या मुलींची लग्ने बहुधा वयाने लहान असतानाच होतात आणि ज्याअर्थी या तरुण गायकवाडांच्या लग्नास विलंब झाला होता, त्याअर्थी त्या वेळच्या मुत्सद्दी लोकांनी आणि राजमातेने मुलीच्या पसंतीची मर्यादा निश्चित केली होती. कल्पित प्रतिमेशी साम्य असून, अविवाहित अथवा वाङ्निश्चयभूत नसलेली वधू सापडणे* अशक्य होते. तसेच ज्या मुली आल्या होत्या त्या सर्व पाहून त्यांची निवड करण्याचे काम महाराणी जमनाबाईंस शक्य नव्हते. हिंदुस्थानातील पहिल्या प्रतीच्या क्षत्रियांशी लग्न करण्याचा हा संबंध होता. तथापि अतिदरिद्री आई-बापही आपल्या मुली पाहण्याकरिता बडोद्यास पाठविण्याचे नाकारण्याइतके अभिमानी होते. वधू पसंत करण्याचा प्रश्न तरुण सयाजीराव महाराजांपुढे ज्यावेळी आला, तेव्हा त्यांनी 'या बाबतीचा पूर्ण अधिकार मातुःश्री साहेबांस आहे' असे सांगितले. आपल्या प्रेमळ मातुःश्रींच्या हातून जे काम व्हावयाचे ते योग्य विचारपूर्वकच होईल, अशी या परम मातृभक्त सयाजीरावांची पूर्ण खात्री होती. ज्या मुली 'सांगून आल्या' होत्या त्यांचे अवलोकन पुण्यास व्हावे असे ठरल्यावरून राजा सर टी. माधवराव हे महाराजांच्या आप्तमंडळींसह पुण्यास गेले. आलेल्या मुलीचे तेथे अवलोकन केले; परंतु त्यापैकी एकही महाराज सयाजीराव यांच्या रूपास व गुणास योग्य अशी आढळून आली नाही, त्यामुळे महाराणी जमनाबाई या फारच विचारात पडल्या. त्यांनी मुंबई-इलाख्याच्या बाहेर

*इ.स. १८७८-७९ सालचा सर.टी.माधवराव यांचा वार्षिक रिपोर्ट

जी कित्येक महाराष्ट्र क्षत्रियांची कुटुंबे आहेत, त्यापैकी एखाद्या घराण्यातील वधू शोधून काढावी अशी आज्ञा केली. चालू असलेल्या लग्नाच्या हंगामात महाराजांचे लग्न तहकूब ठेवणे हे काही अपरिहार्य कारणांमुळे शक्य नव्हते. दिवाण साहेबांनी एकसारखा शोध चालविला. त्यात शेवटी त्यांना सयाजीराव महाराजांच्या सुभाग्याची वाटेकरीण आणि त्यांच्याशी पूर्वसृकृताने प्रतिबंधित झालेले योग्य रूप आणि सगुणसंपन्न वधू कावेरी नदीच्या काठी आढळून आली. दिवाण राजा सर टी. माधवराव यांनी ही पसंत केलेली वधू महाराणी जमनाबाई आणि त्यांचे आप्तस्वकीय यांनाही पसंत पडली. ज्या तंजावरच्या राजघराण्यात या वधूचा जन्म झाला, ते घराणे सर्व महाराष्ट्रात प्रसिद्ध होते व अशा मोठ्या घराण्याशी शरीरसंबंध जोडला गेल्यास आपल्या नावलौकिकात बरीच भर पडेल, असे महाराणी जमनाबाई यांचे मत होते.

## सावंतवाडीचे राजे रघुनाथराव सरदेसाई यांच्याशी राजकन्या ताराबाई यांचा बडोदे शहरी झालेला लग्नसमारंभ

वर आणि कन्या यांची योजना झाल्यावर हिंदू रिवाजाप्रमाणे तिथीनिश्चयाचे जे काम असते, ते कमी योग्यतेचे नसते. वर आणि वधू यांना कोणती तिथी लाभते याचा निर्णय करण्यासाठी उभय पक्षांकडील ज्योतिषांचा मोठ्या निकराचा वादविवाद सुरू झाला. उभय पक्षांकडील ज्योतिषांचा हा मतभेद फारच आस्थेवाईक होता. वधूपक्ष वधूला जी तिथी लाभते ती आणि वरपक्ष वराला लाभणारी तिथी पसंत करी. याप्रमाणे या दोन्ही पक्षांचा संप कसा करावा, याची मोठी चिंता पडली होती; परंतु दोन्ही पक्षांच्या लोकांना आपली विद्वत्ता दाखविण्यास योग्य संधी दिल्यामुळे थोड्याच वेळात एकोपा झाला. त्यांचा एकोपा होताच लग्नाची तयारी सुरू झाली. रस्ते व इमारती यांची दुरुस्ती किंवा नवीन रचना केली. जयोत्सवाच्या सुरम्य कमानी उभारल्या. दुसरे असंख्य शृंगार केल्यामुळे गायकवाडांची पवित्र राजधानी भव्य सौंदर्ययुक्त दिसू लागली. हा लग्नसमारंभ गायकवाडांची कीर्ती व वैभव यांना साजेल असा करण्यासाठी श्रम, सायास आणि द्रव्यव्यय यांच्याकडे बिलकूल पाहिले नाही. तारीख १५ डिसेंबर सन १८७९ पासून या अपूर्व लग्नसमारंभास सुरुवात होऊन तो तारीख १६ जानेवारी सन १८८० रोजी पूर्ण झाला. या मुदतीत वारंवार मनोवेधक देखावे दृष्टीस पडत असत. लोकांच्या झुंडी सानंद मनाने राजमार्गात फिरत होत्या. वधू-वरांकडील मंगलप्रद भव्य मिरवणुकी वाद्यघोषांसह जात व येत असत. शृंगारलेले गज, सर्व तऱ्हेच्या गाड्या व निरनिराळ्या जातींचा अश्वसमुदाय यांच्या योगाने सर्व राजमार्गाचे रूपांतर होऊन गेले होते. आशिया आणि युरोप खंडातील विविध जातींच्या वाद्यांचा संयोग होऊन, जयघोषाने सर्व आकाश दणाणून गेले होते. या राज्यातील पोलीस, पोशाखी आणि बिन पोशाखी लष्कर आपली कामगिरी बजावण्याकरिता तयार होते. त्यामुळे बडोदे शहराच्या शोभेत विलक्षण भर पडली. दीपोत्साह, खेळ, दरबार, नाच, मेजवान्या व तहेवार आतषबाजी यांनी व समारंभास अप्रतिम तेज आणले. या आनंदप्रद दिवसांत म्हणजे तारीख २१ डिसेंबर सन

१८७९ रोजी शुभमुहूर्तावर राजकन्या ताराबाई यांचा विवाह सावंतवाडीचे सरदेसाई रघुनाथराव यांच्याशी झाला. या समारंभाचे वैभव सावंतवाडीचे राजे, तंजावरची राजकुमारी, राजपिंपला संस्थानचे मुख्य, कोल्हापूरच्या महाराणी खाशीबाई आणि दुसरे प्रख्यात पाहुणे येऊन त्यांनी ते विशेष वाढविले. मुंबईचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल साहेब, कमांडर इन चीफ, मुंबई इलाख्यातील हायकोर्टाचे काही जज्ज, सिव्हिल आणि मिलिटरी ऑफिसर, तसेच दुसरे प्रतिष्ठित युरोपियन गृहस्थ यांनी येऊन या समारंभास बरीच शोभा आणली. सर रिचर्ड मीड व त्यांच्या पत्नी यांनी लग्नसमारंभ आटोपल्यावर बडोद्यास येऊन महाराजसाहेब व त्यांच्या मातुःश्री जमनाबाई यांचे आभार प्रदर्शित केले.

## तंजावरच्या राजकन्या लक्ष्मीबाई यांच्याशी बडोद्याचे राजकुमार सयाजीराव महाराज यांचा विवाह

राजवाड्याच्या बाहेर असंख्य आणि अप्रतिम जयोत्सव चालू असता राजवाडाही आनंदाचे माहेरघर बनले होते. याप्रमाणे या मंगलप्रदसमयी राजकुमार सयाजीराव महाराज यांचे लग्न हिंदू धर्मशास्त्रास अनुसरून तारीख ६ जानेवारी सन १८८० रोजी तंजावर येथील राजकन्या लक्ष्मीबाई यांच्याशी झाले. या नूतन वधूचे नाव चिमणाबाई असे ठेवले. आराध्य देवता आणि धार्मिक संस्कार यांची लग्नमंडपात एकच गर्दी उडून गेली होती. ही दोन्ही लग्ने निर्विघ्नपणे सिद्धीस नेण्याच्या कामात ब्रिटिश सरकारचे बडोदे येथील प्रतिनिधी मि. मेलविल यांची फारच चांगली मदत झाली. राजे सखाराम साहेब आणि तंजावरच्या राणीसाहेब यांनी आपली जबाबदारी ओळखून या समारंभात त्यांनी फारच चांगली कामगिरी बजावली. आपल्या आयुष्यातील सर्वांत प्रिय आणि संस्मारक हेतू सिद्धीस गेल्या कारणाने महाराणी जमनाबाई यांना पराकाष्ठेचा संतोष झाला. आपल्या प्रिय पुत्रास पुत्र संतती होऊन बडोदे राज्याला चिरस्थायीपणा यावा, या महाराणी जमनाबाईसाहेबांच्या आशेचा पाया यावेळी मोठ्या समारंभानेच घातला गेला.

## मुंबईचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल यांचे बडोद्यास आगमन

मुंबईचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल यांचे आगमन बडोद्यास झाल्याने राजकन्या ताराबाई आणि तरुण सयाजीराव महाराज यांच्या या लग्नसमारंभास अवर्णनीय शोभा आली. हिंदू रिवाजास अनुसरून पुत्र व कन्या यांच्या लग्नसंस्कारात भेद कसा आहे, ते पाहण्याची युरोपियन लोकांनी स्वभावतः इच्छा असते. त्यांची ती प्रबळ; परंतु आस्थेवाईक इच्छा, बडोद्यातील या लग्नाच्या वेळी परिपूर्ण झाली. लग्नाचे गीर्वाण भाषेतील करार आणि प्रतिज्ञा करण्याची वेळ फारच मौजेची होती. लग्नाचा खरा हेतू आणि सप्तपदीक्रमण यांचे तत्त्व या युरोपियन शोध विद्वानांना येथे सप्रयोग समजल्यावरून त्यांना फार आल्हाद झाला. लग्नोत्सव चालला असताना मोठ्या दर्जाच्या ब्रिटिश ऑफिसरांचे व दुसऱ्या प्रसिद्ध लोकांचे आगमन झाल्यामुळे समारंभास विशेष

सौंदर्य आले. सर रिचर्ड टेंपल मुंबईचे गव्हर्नर यांच्या आगमनाने तर त्यात विशेष भर पडली, असे राजा सर टी. माधवराव यांनी राज्याच्या वार्षिक रिपोर्टात म्हटले आहे.

## सर रिचर्ड मीड साहेब यांना महाराणी जमनाबाईसाहेब यांनी चि.सौ. ताराबाई यांना अनुरूप पती मिळाल्याबद्दल आनंद प्रदर्शित करणारे पाठविलेले पत्र

सर रिचर्ड मीड साहेबांना तारीख १८ फेब्रुवारी सन १८८२ चे पत्र महाराणी जमनाबाई यांनी लिहिले. त्यात त्यांनी ताराबाई यांच्या पती सुखाविषयी खाली लिहिल्याप्रमाणे उद्गार काढले. "...राज्याभिषेकाचा समारंभ पाहण्याकरिता आमचे जामात सरदेसाई हे येथे आले होते. चि. सौ. ताराबाईला ते सर्वथैव अनुरूप पती आहेत. याबद्दल मला फार आनंद वाटतो. सुमारे दोन महिन्यांपर्यंत त्यांचा येथे मुक्काम झाला. त्यावरून त्यांच्या सद्गुणांची मला कल्पना करण्यास बरीच संधी मिळाली. त्यांचा स्वभाव फार मनमिळावू असून, त्या उभय दांपत्याचे परस्पर प्रेमही अत्यंत सोज्वळ असे मला आढळून आले. आता मी असे ऐकिते की, थोड्याच दिवसांत त्यांना त्यांच्या संस्थानचे पूर्ण अधिकार मिळावयाचे आहेत व ते मिळतील, तर मला मोठा आनंद होईल..." राजकन्या ताराबाई यांना हे चांगले सुस्थळ मिळाले. त्यामुळे महाराणीसाहेबांना फार मोठा आनंद झाला. त्यांनी या आनंदाच्या प्रदर्शनाकरिता तीन लाख रुपयांची देणगी सावंतवाडीकरांना दिली व खुद्द ताराबाईंच्या चोळी-बांगडीकरिता दरसाल तीस हजार रुपयांची नेमणूक बडोदे राज्यातून देण्याचा ठराव केला. ही रक्कम ताराबाईंच्या हयातीपर्यंत तिकडे पोहोचविण्यात येत होती.

❍❍❍

# भाग २१ वा

# श्रीमंत सयाजीराव महाराज यांचे अधिकारारोहण

### सयाजीराव महाराजांस राज्याधिकार

सयाजीराव महाराज यांच्या बाल्यावस्थेत महाराणी जमनाबाई यांनी त्यांच्या शिक्षणासंबंधाने बरीच दक्षता ठेवली होती. राजा सर टी. माधवराव व ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधी यांच्या नजरेपुढे सयाजीराव महाराजांच्या सुशिक्षणाची व योग्य दक्षतेची उदाहरणे मांडून ते आपल्या राज्याचा कारभार चालविण्यास सर्वथैव लायक बनले आहेत, असे त्यांच्या प्रत्ययास आणून दिले. ज्या मुलाचा जन्म एका कानाकोपऱ्यातील खेड्यात झाला व तेथील भाषा खऱ्या मराठी भाषेपासून बरीच भिन्न आणि संस्कारहीन अशा ठिकाणच्या मुलास राज्यकारभारात लायक बनविण्याची आणि त्याची प्रख्यात पुरुषांत गणना करविण्याची योजना ज्या महाराणीसाहेबांनी केली. त्यांच्या या कर्तव्य तत्परतेविषयी करावी तितकी स्तुती थोडीच आहे. प्रत्यक्ष पोटच्या मुलाप्रमाणे वागवून त्याच्यावर जी अकृत्रिम माया ठेवली, तिचाच सुपरिणाम बडोदे राज्यातील प्रजेस यथेच्छ भोगण्यास मिळत आहे. सयाजीराव महाराज हे वयात येऊन ते राज्यकारभार चालविण्यास लायक बनले असल्याची उदाहरणे ब्रिटिश सरकारास दाखवून देऊन 'त्यांना राज्याधिकार लवकर मिळावा, अशी हिंदुस्थान सरकारास त्यांनी विज्ञाप्ती केली. दत्तक विधान झाल्यानंतर जी सहा वर्षे गेली, त्या काळातील राज्यव्यवस्था सुनियंत्रित चालल्यानंतर तारीख २८ डिसेंबर सन १८८१ रोजी सयाजीराव महाराजांना राज्यकारभार सोपविण्याचा समारंभ झाला. हा दिवस बडोदे राज्यातील सर्व लोकांच्या भाग्याचाच होता. या आनंददायक समारंभाची बडोद्यात फारच धामधूम उडाली. सर्व नगर ध्वजापताकांनी सुशोभित केले. मोठमोठ्या युरोपियनांना व एतद्देशीय सभ्य आणि सन्मान्य गृहस्थांना या समारंभास येण्यासाठी निमंत्रिले. ता. २५ डिसेंबरपासून आरंभ झालेला हा समारंभ तारीख ३१ डिसेंबरपर्यंत एकसारखा चालला. अनेक तऱ्हेचे खेळ, तमाशे, कसरती वगैरे करवून हे आनंदाचे दिवस साजरे झाले. यावेळी मोतीबागेच्या बंगल्यात भव्य प्रदर्शन

उघडले. त्यात पाच हजारांपेक्षा जास्त कारागिरांकडून तयार झालेल्या वस्तूंचे नमुने व्यवस्थीशीर ठेवले होते. प्रदर्शनातील वस्तूंचे एकोणीस वर्ग पाडून त्या व्यवस्थेने विभागल्या होत्या. तारीख २८ डिसेंबर, बुधवार रोजी सकाळी ८ वाजता नजरबागेच्या बंगल्यात सर्व युरोपियन अंमलदार, राज्यातील सरदार, दरकदार, असामदार, महान व राज्याच्या अभिष्ट चिंतनात काळ घालविणारे सभ्य गृहस्थ जमून त्यांनी त्या विशाल आणि शृंगारलेल्या सभामंडपास सुशोभित केले. मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन हे ब्रिटिश सरकारतर्फे बडोद्यास आले होते. ते सयाजीराव महाराजांस बरोबर घेऊन या सभामंडपात आले. स्थानापन्न झाल्यानंतर नामदार गव्हर्नर साहेबांनी हिंदुस्थान सरकारकडून आलेला खलिता वाचून दाखविला. त्यातील आशय असा होता की, "आजपर्यंत महाराजांचे शिक्षणासंबंधाने व योग्य वर्तणुकीविषयी जे काही रिपोर्ट आमच्या कानावर आले, त्यावरून आमची अशी खात्री झाली आहे की, ज्या मोठ्या अधिकारपदावर आपण आता विराजित होणार, त्यास योग्य असेच आपण वर्तन ठेवाल. त्याचा दुरुपयोग करणार नाही, अशी आम्हास मोठी उमेद आहे. आपण आपल्या वाडवडिलांप्रमाणे ब्रिटिश सरकारशी दोस्ती ठेवून ती वृद्धिंगत करण्याचे मनात बाळगाल. आपण आपल्या सरदार मंडळींच्या व विद्वान नीतिज्ञात्यांच्या मसलतीने राज्यकारभार चालवून आपल्या प्रजेस संतोष देण्यासाठी जपाल, अशी महाराणी सरकारची फार इच्छा आहे. प्रजेकडून शाबासकी मिळवून योग्य रीतीने राज्यकारभार चालवाल, अशी आम्ही उमेद ठेवतो." इ. इ. खलित्यांचे वाचन झाल्यानंतर जेम्स फर्ग्युसन यांचे थोडक्यात चटकदार भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात कळविले की, "राज्य व प्रजा ही स्वतःचे वैभव आणि सुखाकरिताच आहे, असा महासमर्थ बादशहांचा मानण्याचा जुना काळ आता निघून गेला आहे. स्वतःच्या सुखाकरिता हे राज्यवैभव नाही. राजकुटुंब हे प्रजेच्या हितासाठीच निर्माण झाले आहे. चांगले व वाईट करण्याचे साधन ज्यांच्या हातात आहे त्यांनी स्वत:ची जबाबदारी ओळखूनच वागले पाहिजे. तसे वागून रात्रंदिवस जर प्रजेची काळजी बाळगली तरच त्याची चांगली फळे मिळतील. जिच्या योगाने आपणास दूषण लागण्याचा संभव असेल, अशा अयोग्य गोष्टींपासून आपण नेहमी अलिप्त राहण्याचा प्रयत्न करावा. ज्या महाराणी जमनाबाई यांनी आपणास योग्य वळण लावून, या स्वरूपास आणले त्यांच्या प्रयत्नाचा आपण चांगला उपयोग करून दिल्यास त्यापासून आपल्या भावी आयुष्यात अत्यंत श्रेष्ठ असेच सुख मिळेल." या भाषणानंतर राज्यकारभाराची सूत्रे महाराजसाहेबांच्या हाती देण्याकरिता हिंदुस्थान सरकारकडून जो खलिता आला होता, तो जेम्स फर्ग्युसन यांनी सयाजीराव महाराजांच्या हातात देऊन ब्रिटिश सरकारकडून आलेला पोशाख त्यास दिला. या समयी आनंदप्रदर्शक टाळ्यांचा गजर होऊन तोफांची सरबत्ती झाली व लष्करी बँड वाजवून पलटणीची सलामी झाली. नंतर श्रीमंत सरकार महाराज साहेबांनी समयोचित भाषण करून ब्रिटिश सरकारविषयी आपले असलेले प्रेम व्यक्त केले. "मी आपल्या प्रजेचे माझ्या जिवापेक्षा जास्त ममतेने पालन करीन. मला वेळोवेळी हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी योग्य सल्ला देऊन माझ्यावर जी राजकीय जबाबदारी येऊन पडली

आहे, तीत मला माझ्या हितासाठी मदत करतील अशी उमेद आहे." महाराज साहेबांचे हे भाषण झाल्यावर अत्तर गुलाब, हारतुरे, पानसुपारी वगैरे होऊन हा अधिकारारोहणाचा दरबार बरखास्त झाला.

## महाराणी जमनाबाई यांची सर जेम्स फर्ग्युसन हे भेट घेतात

हिंदुस्थान सरकारच्या हुकुमावरून मुंबई गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन हे बडोद्यास आल्यानंतर त्यांनी महाराणी जमनाबाई यांची प्रथम खासगी भेट घेऊन महाराज सयाजीराव यांना राज्यकारभार सोपविण्याविषयी आपली इच्छा दर्शविली. तारीख २८ डिसेंबर रोजी अधिकाररोहणाच्या दरबारापूर्वी त्यांनी महाराणी जमनाबाई यांना व्हाईसरॉय साहेबांकडून त्यांच्या नावाचे आलेले पत्र त्यांस दिले. या पत्राचे भाषांतर या खाली दिल्याने त्यातील हेतू, महाराणी जमनाबाई यांची हुशारी आणि कर्तव्यदक्षता यांची चांगली कल्पना करता येईल. -

"माझे सन्मान्य स्नेही यांस -"

"ज्या दिवशी हे पत्र आपणास पोहोचविले जाईल, त्या दिवशी आपले दत्तक चिरंजीव सयाजीराव महाराज यांना बडोदे राज्याचा राज्याधिकार सोपवला जाईल."

"महाराजसाहेबांस जो श्रेष्ठ अधिकार मिळावयाचा त्याच्यासाठी विद्याभ्यास होत असता महाराजसाहेबांच्या कल्याणाकरिता आपण या सहा वर्षांत सतत काळजी बाळगून या राज्याचे काम चालविण्याकरिता नेमलेल्या कामदारास अपेक्षिल्या वेळी आपल्या अनुभवसिद्ध विचाराने व सल्ल्याने आपण अत्यंत साहाय्य केले."

"महाराजांच्या विद्याभ्यासाविषयी आणि राज्याच्या यथार्थ कल्याणाकरिता आपण सदा तत्पर होता."

"याकरिता यासमयी ब्रिटिश सरकारच्या तर्फेने मी आपले फार उपकार मानतो."

"आपणास हे आनंदकारक वर्तमान समक्ष कळविण्यास मजला बनले नाही, म्हणून मी फार दिलगीर आहे."

"परंतु हे पत्र माझ्यातर्फेने मुंबईचे गव्हर्नर नेक नामदार सर जेम्स फर्ग्युसन साहेब हे आपणास पोहोचवतील."

"आणि महाराजांचे बाल्यावस्थेत आपण जी सद्बुद्धी व जे सौजन्य दर्शविले, ते हिंदुस्थान सरकार विसरणार नाहीत."

## यासंबंधाचा पत्रव्यवहार

सर जेम्स फर्ग्युसन यांनी हे दिलेले पत्र महाराणी जमनाबाई यांनी आभारपूर्वक घेतले. हिंदुस्थान सरकारने यावेळी जी कृतज्ञता प्रगट केली, तिच्याबद्दल त्यांना मोठा आनंद वाटला. या दिवशी रात्री युरोपियन लोकांस दरबाराकडून मेजवानी देण्यात आली. यावेळी दारूकाम बरेच सोडले. हा समारंभ झाल्यानंतर तारीख १८ फेब्रुवारी सन १८८२ रोजी सर रिचर्ड मीड

यांना महाराणी जमनाबाई यांनी एक खासगी पत्र लिहिले. त्यात त्यांनी या राज्याधिकाराच्या बाबतीत म्हटले आहे की, "...चिरंजीव बाळासाहेब यांना हिंदुस्थान सरकारने मोठ्या समारंभाने विधिपूर्वक राज्याभिषेक करून बडोद्याच्या गादीवर बसविले, याबद्दल मला फार आनंद वाटतो. चिरंजीव बाळासाहेबांना राज्याधिकार मिळावा, एवढीच काय ती माझी इच्छा राहिली होती; ती शेवटी सफल झाली.....हवा चांगली असल्यामुळे चिरंजीव बाळासाहेब, मी व ताराबाई खुशाल आहोत ..." महाराज सयाजीराव यांचा राज्याभिषेक होऊन त्यांना योग्य रीतीने राज्यकारभार चालविण्याची परवानगी मिळेपर्यंत महाराणी जमनाबाई यांच्या जिवात जीव नव्हता. सयाजीराव महाराजांना बडोदे राज्याचा अधिकार मिळाल्याची खबर इंग्लंडास जाताच तेथील फॉरेन सेक्रेटरी यांचे हिंदुस्थान सरकारकडे तारीख ९ मार्च १८८२ चे पत्र आले. त्यांचे भाषांतर त्या सरकारकडून बडोदे दरबार व महाराणी जमनाबाई यांच्याकडे आले. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "तारीख २३ जानेवारीच्या नंबर १० च्या राजकीय पत्राबरोबर बडोद्याच्या गायकवाड सरकारास नूतन राज्याधिकार मिळाला, त्यासंबंधाच्या हकिकतीचे पत्र आले ते वाचून आनंद झाला. हा मोठा अधिकार चालविण्याकरिता गायकवाड सरकारास जे शिक्षण दिले आहे, त्यावरून अनुमान करण्यास सबळ कारण आहे की, गायकवाड सरकार न्यायाने व शहाणपणाने राज्यकारभार चालवतील आणि आपल्या प्रजेचे कल्याण करतील. महाराणी जमनाबाई साहेबांनी महाराज सयाजीराव हे लहान असताना त्यांच्या अभ्यासावर पूर्ण देखरेख ठेवली व नीट काळजी बाळगली आणि राज्याचे काम चालविण्यासाठी जे अंमलदार नेमले होते त्यांना त्यांनी योग्य मदत दिली, त्याची राणी सरकारास विस्मृती होणार नाही. महाराज सयाजीराव हे अल्पवयीन असतानादेखील राज्यकारभार नीट चालल्यामुळेच बडोद्याचे राज्य महाराजांना चांगल्या अवस्थेत सोपवण्यास आम्हास सापडले. याबद्दल महाराणी जमनाबाई, दिवाण राजे सर टी. माधवराव व तेथील आमचे प्रतिनिधी यांचे आम्ही अत्यंत आभार मानतो...."

ooo

# भाग २२ वा

# पौत्रावलोकन

## सौ. चिमणाबाई साहेब यांचे गुणवर्णन

सयाजीराव महाराजांना ईश्वर कृपेने जी सद्धर्मचारिणी मिळाली ती विशेष सगुणसंपन्न असल्यामुळे महाराणी जमनाबाई यांना फार संतोष वाटत असे. महाराज व सौभाग्यवती चिमणाबाई यांचे निष्कपट प्रेम आणि उभयतांतील अद्वितीय सलोखा हा महाराणी जमनाबाई यांना फारच आनंददायक झाला. चिमणाबाई या कुलशील संपन्न असून, सरळ आणि मनमिळाऊ स्वभावाच्या असल्याने महाराणी साहेबांच्या आज्ञेबाहेर वागण्याचे त्यांच्या मनातसुद्धा येत नसे. थोडक्याच दिवसांत चिमणाबाई या गायकवाडांच्या घराण्यास भूषणरूप झाल्या. राज्यकारभारातही त्या सल्ला देण्यास सुपात्र असल्याने बडोदे राज्याचा चिरस्थायीपणा वाढविण्याकरिता ईश्वराने सयाजीराव महाराजांना ही चांगली वधू प्राप्त करून दिली, असे बऱ्याच लोकांना वाटले. अनेक संकटे सोसून बडोदे राज्याची पुन्हा संस्थापना करणाऱ्या आपल्या सासूला ही कुलवधू अत्यंत मान देत असे. आपल्या सगुण चातुर्याने कुटुंबातील सर्व मंडळीस चिमणाबाई या वंद्य झाल्या. या कुलवधूच्या अंगात ईश्वराने असे काही गुण साठविले होते की, प्रत्येक खेपेस तिच्या गुणावाची थोरवी नजरेस पडल्यावाचून राहत नसे. त्यांचे मोहक स्वरूप, त्यांच्या ठायी प्रौढ विचारशक्ती आणि महाराजांचे मन आकर्षण करून घेऊन त्यांच्यात विवेकबुद्धीचे बीजारोपण करण्याची अलौकिक हातोटी ही फार अवर्णनीय होती.

## महाराणी चिमणाबाईसाहेब यांचा गरोदरपणा

महाराणी चिमणाबाई यांना दोन कन्या झाल्या; परंतु त्यांचे सुख फार दिवस त्यांना मिळाले नाही. अगदी लहान असताच त्या निवर्तल्या. तिसऱ्या खेपेस राणी चिमणाबाई यांना गर्भधारणा होऊन काही दिवस लोटल्याची खबर महाराणी जमनाबाई यांना लागली. ही महत्त्वाची गोष्ट

समजताच ईश्वराने आपल्या परिश्रमाने सुफळ देण्याची वेळ जवळ आणली आहे असे त्यांना वाटून त्यांनी गायकवाडांच्या गादीस पुरुष वारसा व्हावा याकरिता नवस करण्यास सुरुवात केली. पहिल्या दोन खेपेला जसे झाले तसे यावेळी न व्हावे, याकरिता अनेक ठिकाणी त्यांनी अनुष्ठाने बसवून ईश्वराचा कृपाप्रसाद मिळविण्याचा प्रयत्न केला. गरोदर स्त्रियांच्या वासना तृप्त करण्याचे वैद्यकशास्त्राप्रमाणे कुटुंबातील अग्रेसर मंडळींचे जे मुख्य कर्तव्यकर्म ते यथार्थ बजविण्याकडे महाराणी जमनाबाई यांनी बिलकूल दुर्लक्ष केले नाही. आपल्या स्नुषेवर कन्येप्रमाणे ममता करून तिच्या मनाला संतोष देण्याचा आणि 'सासू म्हणजे आई' असा भाव उत्पन्न करण्याचा त्यांनी प्रयत्न केल्यामुळे 'सासू व सून' हे नाते जाऊन 'आई व मुलगी' हाच संबंध लोकांच्या नजरेत येत चालला. अशिक्षित सासवा आपल्या सुनांना ज्या रीतीने वागवितात, त्या रीतीचा येथे बिलकूल मागमूसही नव्हता त्यामुळेच हे राजकुटुंब आनंदभुवनात नांदू लागले होते.

## युवराज फत्तेसिंहराव यांचा जन्मोत्सव

पूर्ण दिवस भरताच श्रावण शुद्ध १ शके १८०५ ता. ३ ऑगस्ट सन १८८३ रोजी रात्री दहा वाजता सौभाग्यवती राणी चिमणाबाई यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. ही सुवार्ता महाराणी जमनाबाई यांना त्यांच्या हुजऱ्याने सांगितली. त्यासमयी त्यांना फारच आनंद झाला. ताराबाई या राजपुत्रांचे अवलोकन करण्यासाठी ताबडतोब जाऊन आल्या. महाराणी जमनाबाई यांनी राजरीतीस अनुसरून काही अपरिहार्य कारणांमळे आपला पौत्रावलोकनास जाण्याचा बेत दुसऱ्या दिवसावर तहकुब ठेवला. ठरल्याप्रमाणे त्या पौत्रावलोकनास गेल्या. मुलाचे मुखावलोकन होताच त्यांना जो आनंद झाला त्या आनंदाच्या भरात त्यांनी आपल्या गळयातील दहा हजार रुपयांच्या किंमतीचा हिरे, माणिक आणि पाचू यांचा कंठा सुवार्ता सांगणाऱ्या हुजऱ्यास बक्षीस देऊन टाकला. सरकारी जवाहीरखान्यापैकी हा कंठा असताना तो महाराणीसाहेबांनी हुजऱ्यास एकदम बक्षीस दिला म्हणून त्या वेळचे खानगी कारभारी रावजी विठ्ठल यांनी हरकत घेतली; परंतु महाराणीसाहेबांनी त्यांचे न ऐकता त्यांस सांगितले की, "मला यावेळी जो आनंद झाला, त्यात हा कंठा मी दिला, तो परत घेता येणार नाही. ईश्वरकृपेने आज पौत्रदर्शन झाले, हा या राज्यास फारच मोठा लाभ झाला. या लाभापेक्षा या कंठ्याची किंमत बिलकूल जास्त नाही." रावजी विठ्ठल हे त्या जबाबावरून निरुत्तर झाले. तथापि, त्यांनी ही गोष्ट महाराजसाहेबांस कळवून त्यांचे मन आपल्या मताकडे वळविण्याचा प्रयत्न केला; परंतु परम मातृभक्त सयाजीराव महाराजांनी त्यांचे न ऐकता तो कंठा इनाम बक्षीस खात्यात खर्च लिहून टाकण्याचा त्यांना हुकूम केला. ज्यांच्या हृदयात स्वाभिमान आणि स्वदेशप्रीती वसते व ज्यांना आपल्या पुत्रांचे चांगले व्हावे अशी खास इच्छा असते, अशा सद्व्यक्तींना ईश्वराने अनुकूलता दिल्यावर त्यांच्या हातून अशा उदारपणाची उदाहरणे घडणे हे सहाजिकच आहे. 'कोठावळयाचे पोट दुखते' या म्हणीप्रमाणे वागून यजमानास प्रिय होण्याचा हा रावजींचा प्रयत्न होता. या वेळच्या महाराणीसाहेबांच्या आल्हादाची दिशा एका दृष्टीने फारच

महत्त्वाची होती. आपण महतप्रयासाने जो वृक्ष लावला, त्यांचे फळ सुदैवाने आज दृष्टीस पडले. त्यामुळे त्यांनी यावेळी ईश्वराचे फार आभार मानले.

## नामकरण विधी

पौत्रोत्सवानिमित्त सर्व बडोदे राज्यात निरनिराळ्या प्रकारचे समारंभ सुरू झाले. राजमंदिर तर केवळ आनंदाचे आगर बनले होते. बडोदे राज्याचा भावी राजकर्ता ज्या दिवशी जन्मला तो दिवस अत्यंत महत्त्वाचा होता त्यात संशय नाही. जन्मलेल्या या नूतन राजपुत्राचे नाव 'फत्तेसिंहराव' असे महाराणीसाहेबांनी मुद्दाम ठेवले. नामकरणाचा समारंभ मोठ्या थाटाने साजरा झाला.

❍❍❍

# भाग २३ वा

# सौ. चिमणाबाई यांचा स्वर्गवास व श्रीमंत सयाजीराव महाराज यांचे दुसरे लग्न

## सौ. चिमणाबाई महाराणी यांचा स्वर्गवास व त्यांचे स्मारक

ज्या स्नुषेच्या सगुणांवर व जिच्या कर्तव्य तत्परतेवर महाराणी जमनाबाई या विशेष अनुरक्त झाल्या, त्या सौ. चिमणाबाई साहेब यांची प्रकृती एकदम बिघडल्याचे ऐकून त्यांना फारच वाईट वाटले. अनेक प्रकारच्या औषधोपचारांची योजना झाली; परंतु त्यांना यश आले नाही. युवराज फत्तेसिंहराव यांचे बालपण व त्यांच्या मातेचे अत्यवस्थ आजारपण महाराणी जमनाबाई यांना अत्यंत असह्य झाले. मोठमोठे डॉक्टर, वैद्य व हकीम यांची औषधयोजना शेवटी व्यर्थ गेली. त्यांच्या शक्तीचा उपयोग झाला नाही व तारीख ७ मे सन १८८५ रोजी महाराणी चिमणाबाई यांचा मोतीबागेच्या बंगल्यात स्वर्गवास झाला! याप्रसंगी महाराणी जमनाबाई व सयाजीराव महाराज यांना अतिशय दुःख झाले. शेवटी त्यांनी युवराज फत्तेसिंहराव यांच्याकडे दृष्टी देऊन आपल्या मनाचे समाधान करून घेतले. या राजपत्नीच्या स्मारकार्थ पुढे श्रीमंत सयाजीराव महाराज यांनी घोकांट्यात 'चिमणाबाई टॉवर' व लहरीपूर दरवाजासमोर 'चिमणाबाई न्यायमंदिर' या नावाच्या मोठ्या इमारती बांधविल्या. पहिली इमारत आज वेळेचा बोध व दुसरी लोकांस न्याय देण्यात प्रसिद्ध आहे. न्यायमंदिरातील भव्य दिवाणखान्यात या राजपत्नीचा पुतळा शृंगारून स्मरणार्थ ठेवला आहे.

## दुसरे लग्न व अपत्यप्राप्ती

सयाजीराव महाराजांनी दुसरे लग्न करावे, अशी महाराणी जमनाबाई यांची फार इच्छा होती; परंतु त्यांच्या त्या हेतूस महाराजसाहेब हे प्रथम बिलकूल अनुकूल झाले नाहीत. त्यांच्या मनावर मृत राणीच्या स्वभावाची व सद्गुणांचे बरीच छाया पडलेली होती. परम साध्वी चिमणाबाई यांचा प्रत्येक सुगुण त्यांना आठवत असे व त्या सुगुणाची व त्या प्रेमपात्र स्वभावाचे त्यांना ज्या ज्या

वेळी स्मरण होत असे, त्या त्या प्रसंगी दुःख झाल्यावाचून राहत नसे. त्यांची मनोहर मूर्ती व सौजन्य हे आठवून त्यांना ते एकदम अदृश्य कसे झाले याचाच मोठा विस्मय वाटत असे. असो. पुढे आप्तस्वकीय व इतर वजनदार मंडळींच्या आग्रहावरून सयाजीरावांनी लग्न करण्याचा विचार केला. हा विचार होताच बऱ्याच मराठे सरदारास आपल्या कन्येस हे अप्रतिम स्थळ मिळावे, अशी इच्छा झाली व तत्संबंधी प्रयत्नही त्यांच्याकडून सुरू झाले. त्यासमयी कन्या परीक्षणाचे काम फारच दुर्घट होते; परंतु ते महाराणी जमनाबाई यांनी सयाजीराव महाराज यांच्या इच्छेवर आघात न होईल असे रीतीने करून संस्थान देवास येथील सरदार बाजीराव अमृतराव घाडगे 'सर्जेराव' यांची कन्या गजराबाई या वधू नेमस्त झाल्या. लग्नाचे वहाड नजरपागेत मोठ्या थाटाने देवास येथून आले व तारीख २८ डिसेंबर १८८५ रोजी गोरज मुहूर्तावर लग्न झाले. या लग्नास ताराबाई या आपल्या प्रिय पतीसह सावंतवाडीहून आल्या होत्या. त्यांचा मुक्काम चिमणबागेजवळच्या बंगल्यात होता. सयाजीराव महाराज यांच्या प्रथम विवाहसमयी ज्या प्रकारचा थाट केला होता, तसाच याही वेळी केला होता. लग्नाकरिता ठिकठिकाणांहून आलेल्या युरोपियन व देशी पाहुण्यांची बडदास्त उत्तम प्रकाराने ठेवली होती. हिंदुस्थानातील बरेच प्रख्यात युरोपियन गृहस्थ या लग्नसमारंभाकरिता आले होते. लग्नाच्या वेळी दाखल्याप्रमाणे ब्रिटिश सरकारकडील तोफांची सलामी झाली व पोशाखही आला. या नूतन राजपत्नीचे नामकरण करताना प्रथम पत्नीचेच 'चिमणाबाई' हे पवित्र नाव ठेवले. यांचा स्वभाव फारच पोक्त व विचारशील असा आहे. बडोदे येथील गायकवाड राजघराण्यास त्या खरोखर भूषणरूप अशाच आहेत. त्यांना लिहिण्या-वाचण्याचे ज्ञान चांगल्या प्रकारचे झालेले आहे. तसेच त्यांनी युरोपातील प्रवास केल्यामुळे त्यांच्या ज्ञानात फारच मोठी भर पडली आहे. स्त्री शिक्षणास उत्तेजन देण्याकरिता त्या फार झटत असतात. सारांश, राजपत्नीच्या अंगात जे उत्तम गुण असण्याची आवश्यकता आहे त्या सर्व सुगुणांची देणगी ईश्वराने त्यांना दिली आहे. यांना ता. १३ मे सन १८८९ रोजी जयसिंगराव या नावाचा पुत्र झाला. हा राजपत्रही फार हुशार आहे. तसेच शिवाजीराव, धैर्यशीलराव हे आणखी दोन मुलगे व इंदिराराजा नावाची कन्या याप्रमाणे यांना तीन पुत्र व एक कन्या ही अपत्ये आहेत.

ooo

# भाग २४ वा

# श्रीतारकेश्वर महादेवाची स्थापना

## व्रतोपोषणे व धार्मिक श्रद्धा

महाराणी जमनाबाई यांची श्रीशंकरावर फार निष्ठा असे. सर्व संकटांतून सोडविण्यास तोच एकटा समर्थ आहे, अशी त्यांची समजूत होती. पुण्यास असताना व्रतोपोषणे करणे व इतर धार्मिक मार्ग हे बरेच प्रज्वलित झाले. सोमवार, पक्षप्रदोष आणि शिवरात्र हे उपवास गायकवाड कुटुंबात फारच मान पावलेले व शंकर हे या घराण्याचे कुलदैवत म्हणवीत असल्याने त्या आपल्या या आराध्य देवतेची नित्य आराधना करीत असत. आपल्या हातून शिवलिंगाची स्थापना होऊन त्या देवतेची आराधना घडावी यासाठी तात्यासाहेब मान्यांना राहण्याकरिता सूरसागराच्या उत्तम बाजूस घेतलेल्या जागेतच शिवालय बांधण्याची त्यांना प्रेरणा झाली. त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी महाराणी जमनाबाई या कधी कधी येत असत. त्यांनी शिवालय बांधण्याचा निश्चय करून दर महिन्याच्या नेमणुकीतून शिवालयाकरिता एक हजार रुपये निराळे काढून ठेवण्याचा क्रम चालविला. हा त्यांचा क्रम तारकेश्वराचे देवालय पुरे होईपर्यंत एकसारखा चालूच होता.

## श्रीतारकेश्वराकरिता जागा मुक्रर होते

मुसलमान लोकांच्या कबरी ज्या ठिकाणी आहेत, तेथे शिवालय बांधल्यास त्या लोकांस फार वाईट वाटेल व त्याचा कदाचित भयंकर परिणामही घडेल, हे महाराणी जमनाबाई यांना पूर्णांशाने ठाऊक होते; परंतु त्यांच्या मनाचा येथे शिवालय बांधण्याचा जो निश्चय झाला होता, तो ढळू न देण्यासाठी त्यांनी फार प्रयत्न केले व ते ईश्वरकृपेने सिद्धीसही गेले. त्यांनी आपला हेतू दिवाणास व इतर मंडळीस कळविला. येथे मंदिर बांधल्यास मुसलमान लोक फार चिडतील याकरिता सूरसागराच्या दक्षिण बाजूस खासपागेची जागा आहे, तेथे ते बांधावे व त्याच्या खर्चाकरिता दरबारातून पन्नास हजार रुपये देववितो असे दिवाणांनी खाजगी रीतीने सांगितले; परंतु तेवढ्याने महाराणी जमनाबाई यांचा झालेला निश्चय ढळला नाही. त्यांनी यासमयी राजा सर टी. माधवराव



एच-४९
११

यांना सांगितले की, "ही जागा मूळची हिंदूंची, तसेच या देशातील खरे वतनदार हिंदूच असे असताना मुसलमानांचा चालता काळ आला तेव्हा त्यांनी आपल्या पूर्वजांच्या स्मरणार्थ येथे कबरी बांधल्या. मोठमोठ्या बादशहांनी हिंदूंची देवालये मोडून तेथे मशिदी बांधल्या. अशा वेळी आमचे हिंदू लोक जर चिडले नाहीत, तर मी येथे शिवालय बांधण्याची मनापासून इच्छा ठेवत असता त्यांनी का चिडावे? जसजसा काळ लोटत जातो, तसतशा अशा भानगडी व्हावयाच्याच. हिंदूंच्या जागेचे मालक मुसलमान झाले. त्यांच्या जागेचे पुन: मालक हिंदू बनले, पुनः त्या जागा मुसलमानांच्या ताब्यात गेल्या, त्यांच्यापासून त्या इंग्रजांना मिळाल्या. हा नियम सृष्टीक्रमास अनुसरून चालू असावयाचाच. एकही मालक आपली सत्ता किंवा आपला मालकी हक्क कायम ठेवू शकत नाही. आमच्या येथील मुसलमान सरदार या कामास अनुकूल होतील यात संशय नाही. ते चांगले हुशार असून, कालमान जाणून वागणारे आहेत." हा जबाब दिवाणास बराच आवडला. मुसलमान लोकांची समजूत करून त्यांची या कामात संमती घेण्याचे काम महाराणी जमनाबाई यांनी आपले कारभारी बळवंतराव पांडुरंग यांना सांगितले. त्यांनी नवाब साहेब, डोस महंमद वगैरे मुसलमान सरदारांशी व त्या जातीच्या पंचांशी अनेक प्रकारचे कोटिक्रम लढवून त्यांची अंत:स्थ परवानगी मिळविली. हलक्या दर्जाच्या मुसलमानांत चळवळ न व्हावी या करिता शके १८०५ च्या फाल्गुन महिन्यात एके दिवशी रात्रीस काही मुसलमान मजुरांच्या हातूनच बळवंतराव पांडुरंग यांनी त्या कबरा खोदविल्या. लहान मोठ्या एकंदर ९५ कबरी तेथे होत्या. ही जागा साफ झाल्यानंतर काही मुसलमान लोकांनी ब्रिटिश सरकारकडे या कृत्याबद्दल दाद मागण्याकरिता अर्जही केले; परंतु बडोद्यातील प्रख्यात व सुज्ञ मुसलमानांच्या अनुमतीने हे काम झाले असल्याने त्या तक्रारीचा निकाल मुसलमानांच्या लाभात होऊ शकला नाही.

## तारकेश्वराचे मंदिर

इमारतीकरिता सामानाची जुळवाजुळव करण्यास सुरुवात झाली. खानविलकरांच्या वाड्याच्या पाटड्या रिकाम्या होत्या, त्या या शिवालयाकरिता दरबारातून घेतल्या. फारच प्रेक्षणीय असे हे शिवालय बांधून त्याच्या जवळच आपणास राहता येईल, अशा प्रकारच्या जागेची व्यवस्था केली. या मंदिरास सुमारे पावणेदोन लाख रुपये खर्च आला. मंदिराचे सर्व काम बळवंतराव पांडुरंग यांच्या देखरेखीखाली झाले. त्यांनी या कामात फारच परिश्रम घेतले. हे मंदिर बरेच भव्य असून, प्रेक्षणीय असे आहे. अलीकडच्या उत्तम कारागिरांनी आपले कौशल्य दाखवून या मंदिराद्वारे अर्वाचीन शिल्पशास्त्र आणि कोरीव काम हे अमर करून ठेवले आहे. बडोद्याच्या एकंदर इतिहासात अलीकडे तयार झालेल्या तारकेश्वराच्या मंदिराच्या कोरीव कामाचा आणि कारागिरीचा हा नमुना अनंत काळपर्यंत प्रशंसनीय गणला जाईल.

## शिवलिंगाची स्थापना

या मंदिरात शिवलिंगाची स्थापना करण्यासाठी अनेक ठिकाणची शिवलिंगे शोधून आणून ती तांदळांच्या पोत्यांत घालून ठेवली होती. त्याच शंकरबागेत यमुनाबाई गायकवाड यांनी

आणून ठेवलेले शिवलिंगही बळवंतराव पांडुरंग यांनी या लिंगात आणून ठेवले. सर्व पोत्यांत सारखे तांदूळ असतानाही शंकरबागेतील लिंग ज्या पोत्यात होते, त्यातील तांदूळ मात्र वाढले व इतरांतील बरेच कमी झाले! त्यामुळे शंकरबागेतील शिवलिंगाची स्थापना करण्याचा विचार ठरविला; परंतु बडोदे येथील काही कुल्सित ब्राह्मण मंडळीने मराठ्यांना लिंग स्थापन करण्याचा अधिकार नाही, असे नवीन खूळ उभे केले. अर्थात ते काम तूर्त काही दिवस तहकूब ठेवावे लागले. महाराणीसाहेबांनी विद्वान ब्राह्मणास विचारून याचा शास्त्रार्थ करून घेतला; परंतु हट्टास पेटलेल्या येथील ब्राह्मणांनी तो मानला नाही! पुढे सुदैवाने श्रीशारदामठाधिश्वर श्रीमच्छंकराचार्य महाराज यांची स्वारी बडोद्यास आली. त्यांचा अनुग्रह महाराणीसाहेबांनी घेऊन त्यांच्या हस्ते या शिवलिंगाची स्थापना करविली. प्रत्यक्ष धर्माध्यक्षांनीच महाराणींच्या इच्छेप्रमाणे शिवलिंगाची स्थापना केली. त्यामुळे विलक्षण प्रवाद करून हिंदू समाजात दुही उद्भवण्यास कारणीभूत झालेल्या लोकांना मुकाट्याने बसावे लागले. या शिवलिंगाचे नाव 'तारकेश्वर' असे ठेवले. ज्या शंकराने अनेक संकटांतून मुक्त करून बडोद्याच्या राजगादीचे तारण केले, त्या ईश्वराच्या निरंतर स्मरणासाठीच हे नाव ठेवले आहे. शिवाची स्थापना झाल्यानंतर महाराणी जमनाबाई या बहुतेक तेथेच राहू लागल्या.

## तारेकश्वराच्या मंदिरातील उत्सव

अनुग्रह घेतल्यापासून शिवार्चन केल्याशिवाय अन्न व पाणी ग्रहण करावयाचे नाही, असा त्यांचा नित्य नियम होता. सोमवार, पक्षप्रदोष आणि शिवरात्र हे दिवस त्यांचे शिवार्चनातच जात. अनाथ, निराश्रित व सत्पात्र अशा लोकांस या तारकेश्वराच्या मंदिराकडून मदत देण्याचा क्रम महाराणी जमनाबाई यांनी सुरू केला. महाशिवरात्रीचा उत्सव या मंदिरात फारच मोठा होत असे. तसेच त्रिपुरी पौर्णिमेच्या दिवशी या मंदिरात दीपोत्सव, दीपावली आणि दीपालंकार यांची शोभा फारच प्रेक्षणीय होत असे. चातुर्मासात ब्राह्मण भोजनाचा सपाटा एकसारखा चाले. यांच्या अंगी उदारपणा हा गुण फारच वसत असल्यामुळे त्या प्रसिद्ध अहिल्याबाई होळकरणींसारख्या देदीप्यमान झाल्या. प्रदोष व सोमवारी प्रदोष काळी शुभ्र वस्त्र परिधान करून ललाटास भस्म लावून आणि हस्त व कंठाच्या ठायी रुद्राक्ष माळा धारण करून निष्ठापूर्वक शिवार्चन करीत असत. या ध्यानस्थ बसल्यानंतर त्यांचा हा भव्य देखावा पाहून कोणीतरी मोठी तपस्विनी बसली आहे, असा भास होत असे. दया, दाक्षिण्य, ईश्वरोपासून आणि औदार्य इत्यादी सद्गुणांच्या योगाने महाराणी जमनाबाई या विशेष तेजस्वी दिसत होत्या. यांनी आपल्या पश्चात या मंदिराची व्यवस्था नीट चालावी याकरिता आपले प्रिय पुत्र सयाजीराव महाराज यांच्याकडून मंदिराला कायमची नेमणूक बांधून देण्याविषयी सुचविले. या सूचनेचा विचार पुढे त्यांच्या पश्चात श्रीमंत सयाजीराव महाराजांनी योग्य रीतीने केला.

○○○

# भाग २५ वा

# प्रतिष्ठित लोकांनी बडोद्यास येऊन महाराणी साहेबांस दिलेला मान

## लॉर्ड डफरीन यांचे आगमन

सयाजीराव महाराज यांचा राज्याभिषेक झाल्यानंतर बऱ्याच युरोपियन आणि एतद्देशीय राज्याच्या समूहात अग्रपद मिळविण्यास पात्र झाल्याची वार्ता थोड्याच दिवसांत सर्वत्र पसरली. सयाजीराव व त्यांच्या मातुःश्री यांच्या परिश्रमाने बडोदे राज्यात चांगली व्यवस्था सुरू होऊन ते अप्रतिम बनत चालल्याची हकीकत वर्तमानपत्रांद्वारे प्रसिद्धीस आली. त्यामुळे राज्यकार्यनिष्णात आणि हुशार लोकांस बडोदे शहराचे अवलोकन करण्याची व तेथील राज्यव्यवस्था पाहण्याची उत्कंठा होत असे. तारीख ८ नोव्हेंबर सन १८८६ रोजी दोन प्रहरी दीड वाजता हिंदुस्थानचे व्हाईसरॉय लॉर्ड डफरीनसाहेब यांची स्वारी प्रसिद्ध आणि सभ्य मंडळींसह बडोद्यास आली. त्यांच्या स्वागताकरिता बडोदे शहर शृंगारून त्यास प्रेक्षणीय शोभा आणली होती. नामदार साहेबांचा बडा दरबार लक्ष्मीविलास राजमहालात झाल्यानंतर त्यांच्यातर्फे लेडी हेलेन ब्लॅकवूड या सायंकाळी साडेचार वाजता महाराणी जमनाबाई यांच्या भेटीसाठी नजरबागेतील बंगल्यात आल्या. या समारंभास सौ. चिमणाबाई, मिसेस एलियट आणि सौ. नंदाबाई पितळे या आल्या होत्या. परंपरागत आगतस्वागत झाल्यानंतर लेडी हेलेन ब्लॅकवूड यांनी 'नामदार लॉर्ड डफरीन यांचे आपल्यासंबंधाने फारच चांगले मत आहे, ते आपणास विशेष पूज्य मानतात. हिंदुस्थानातील सर्व राजकुटुंबांमधील स्त्रियांत ते आपणास अग्रपद देत असतात, असे महाराणी जमनाबाईसाहेब यांना सांगितले. त्यांचे त्याबद्दल आभार मानल्यानंतर हा खासगी भेटीचा दरबार बरखास्त झाला. ता. ९ च्या दिवशी युरोपियन लोकांना नजरबागेत मोठी मेजवानी झाली. त्यावेळी नामदार व्हाईसरॉय साहेबांनी बडोद्याच्या राज्यव्यवस्थेची आणि या राज्यात थोड्या काळात झालेल्या सुधारणांची थोरवी वर्णन करून महाराजांच्या व त्यांच्या मातुःश्रींच्या थोर गुणांबद्दल तारीफ केली. ते म्हणाले की, 'लोकांचे भाग्य मोठे म्हणूनच आपल्यासारखे हुशार, सुज्ञ आणि

कर्तव्यदक्ष राज्यकर्ते हिंदुस्थानात निपजले, याबद्दल हिंदुस्थान सरकारास फार अभिमान वाटतो. बडोद्यामधील राज्यकर्त्यांच्या जागेकरिता आपली निवड करणाऱ्या आणि आपणास प्रस्तुतच्या दिव्य स्वरूपास आणणाऱ्या राज्यकार्यनिष्णात आपल्या प्रिय मातुःश्रींच्या सद्गुणांबद्दल प्रशंसा केल्यावाचून माझ्याने राहवत नाही.' त्यांनी हा जो गौरव केला, त्यास महाराणी जमनाबाई सर्वथैव पात्र होत्या. नंतर नामदार साहेबांनी बडोदे सोडले.

## म्हैसूरचे महाराज यांचे आगमन

तारीख ७ फेब्रुवारी सन १८८८ रोजी म्हैसूरचे महाराज चामुराजेंद्र वाडियार यांची स्वारी बडोद्यास आली. या समयी श्रीमंत सयाजीराव महाराज यांची स्वारी युरोप खंडातील प्रवासास गेली होती. चामुराजेंद्र यांच्या स्वारीची व्यवस्था 'दिवाण बहादूर' लक्ष्मणराव जगन्नाथ वैद्य यांनी महाराणी जमनाबाई यांच्या इच्छेस अनुसरून उत्तम रीतीने ठेवली होती. या समयी सयाजीराव महाराज हे येथे नसल्याने राज्यकारभाराची सर्व जोखीम दिवाणांवरच होती. त्यांनी महाराज साहेबांची उणीव बिलकूल भासू दिली नाही. यावेळचे दिवाण लक्ष्मणराव जगन्नाथ हे फारच पोक्त, हुशार, चाणाक्ष व कर्तव्यदक्ष असे मोठे मुत्सद्दी होते. त्यांनी चामुराजेंद्र यांच्या सत्कारार्थ नजरबागेत मोठा दरबार भरविला. या दरबारास येताच महाराज चामुराजेंद्र यांनी युवराज फत्तेसिंहराव महाराज गायकवाड यांच्यावरून देश रिवाजाप्रमाणे ५० रुपये, ५ पुतळ्या व ५ मोहरा यांचा सत्कार' केला. हा दरबार आटोपण्यापूर्वी जवळच्याच दिवाणखान्यांत महाराणी जमनाबाईसाहेब या मानकरी बाया मंडळींसह बसल्या होत्या. त्यांच्या भेटीस ते युवराज फत्तेसिंहराव यांच्यासह गेले. प्रथम क्षेमकुशलतेचे प्रश्न विचारणे झाल्यानंतर राजकीय बाबतीसंबंधी बोलणे झाले. त्या कामातील त्यांचा धूर्तपणा पाहून चामुराजेंद्र महाराज यांनी महाराणी जमनाबाईसाहेब यांचे आभार मानले. या बड्या दरबारास व कॅम्पातील सर्व ब्रिटिश कामदार मंडळी आली होती. दुसरे दिवशी महाराज चामुराजेंद्र यास मेजवानी झाली व रात्री १० वाजल्यावर खास गाडीने ही पाहुण्यांची स्वारी मुंबईस गेली.

## नामदार लॉर्ड रे यांचे आगमन

तारीख ३० डिसेंबर सन १८८९ च्या रात्री मुंबईचे लोकप्रिय गव्हर्नर नामदार लॉर्ड रे हे आपल्या पत्नीसह बडोद्यास आले. यांचा मुक्काम येथे जोपर्यंत होता, तोपावेतो बडोदे शहर हे केवळ आनंदभुवन बनले होते. नगराचे विलक्षण सौंदर्य, निरनिराळया जातींचे खेळ, दीपोत्सव, मेजवान्या आणि अग्निक्रीडा यांची दिव्य शोभा यांच्यामुळे हे शहर अवर्णनीय दिसू लागले. 'दिवाण बहादूर' दिवाण लक्ष्मणराव जगन्नाथ वैद्य यांची नामदार साहेबांचे उत्तम रीतीने स्वागत केले. राज्यकारभार सुव्यवस्थित पाहून त्यांची स्वारी या हुशार दिवाणांसंबंधाने फारख खुश झाली. तारीख २ जानेवारी सन १८९० रोजी बारा वाजता नामदार लॉर्ड रे व त्यांच्या प्रिय

पत्नी यांच्या स्वाऱ्या मोतीबागेत महाराणी जमनाबाई यांच्या भेटीकरिता आल्या. परस्पर कुशल प्रश्न झाल्यावर नामदार साहेबांनी महाराणी जमनाबाई यांनी बडोदा राज्याचे संरक्षण करण्याच्या कामात जे परिश्रम केले व त्या राज्यास चांगल्या स्वरूपात आणले, त्याबद्दल त्यांची थोरवी वर्णन करून ते म्हणाले की, '...आपले चिरंजीव सयाजीराव महाराज हे बडोद्याचे राज्य उच्च पदवीला घेऊन जाण्याची आपली उत्कंठा पूर्ण करतील, असे आपण त्यास योग्य शिक्षण देऊन तयार केले आहे. आपल्यासारख्या स्वकर्तव्यदक्ष राजमातेची हिंदुस्थानातील एतद्देशीय राज्यकर्त्यास फार जरूरत आहे. आपण जर इंग्लंडात असता, तर आपल्या या सुगुणाचे सार्थक तिकडे फारच चांगले झाले असते. आपण राज्यकारभारास उचित असे शिक्षण मिळवून या राज्याला चिरस्थायीपणा आणला, हे या देशातील प्रजेवर आपले फारच उपकार झाले आहेत. येथील प्रजेने हिंदुस्थान सरकारास वेळोवेळी रिपोर्ट करून आपल्यासंबंधाने पूज्यबुद्धी आणि अलौकिक प्रेम व्यक्त केले आहे. सयाजीराव महाराजांनी राज्यात निरनिराळ्या प्रकारच्या सुधारणा केल्या व त्यास आपले पूर्ण अनुमत आहे, हे ऐकून मला मोठा आनंद वाटतो.'

○○○

# भाग २६ वा

# महाराजांच्या आरोग्यासंबंधी उत्सव

### महाराजांच्या आरोग्याबद्दल काळजी

सयाजीराव महाराज यांचे आरोग्य चांगले असावे, याकरिता महाराणी जमनाबाई या फार जपत असत. व्यायाम आणि कसरत करून त्यांचे शरीर सुदृढ करण्याचे उपाय त्यांनी लहानपणापासूनच सुरू करविले होते. राज्यकर्त्याच्या आरोग्यावर राष्ट्रातील लोकांचे सुख अवलंबून असते. वैद्य किंवा डॉक्टर लोकांच्या औषधांवर महाराजांची प्रकृती अवलंबून राहू नये, याकरिता त्या राजमातेने अनेक प्रकारचे उपाय योजिले. त्यांचा आहार व व्यवहार नियमित राहण्याकरिता त्यांच्या बाळपणातच त्यांनी विशेष दक्षता ठेवली होती. महाराजांचे शरीर संवर्धनार्थ कडक देखरेख ठेवून शत्रूना कोणत्याही प्रकारचा कावा साधण्यास संधी मिळू नये, यासाठी नेहमी सावध राहण्याचे शिक्षण या राजमातेने त्यांना दिले. महाराजांचे शिक्षक एफ.ए. एच. इलियट यांनी महाराजांच्या आरोग्यसंबंधाने त्यांच्या बाल्यावस्थेत बाळगलेली काळजी त्याच मासल्याची होती. महाराजांना प्रौढावस्था येऊन ते राज्याचे पूर्ण मालक बनल्यावर गुरुजींच्या योग्य दक्षतेची मर्यादा संपली; परंतु या राजमातेच्या अधिकाराची मर्यादा संकुचित होऊ शकली नाही. महाराजांना वेळोवळी उपदेश करून त्यांनी आपल्या प्रकृतीस फार जपावे, अशी महाराणीसाहेबांकडून प्रत्येक खेपेस सूचना होत असे.

### महाराजांची प्रकृती बिघडली व प्रकृतीस आराम होताच उत्सव झाले

सन १८९० च्या डिसेंबर महिन्याच्या अखेरीस सयाजीराव महाराज यांच्या पाठीवर 'कालपुळी' होऊन त्यांची प्रकृती एकदम फार बिघडली. हा रोग फारच भयंकर असल्याचे वैद्य लोकांच्या तोंडून महाराणी जमनाबाई यांनी ऐकल्यामुळे त्या विशेष चिंताग्रस्त झाल्या. चांगले मर्मज्ञ वैद्य किंवा डॉक्टर यांचे औषध सुरू करण्याबद्दल महाराज साहेबांना व त्यांच्या दिवाणास

त्यांनी सुचविले. मुंबईचे प्रसिद्ध डॉक्टर होजेल यांना दररोजचे दीड हजार रुपये वेतन देऊन मुद्दाम येथे आणविले व त्यांचे औषध सुरू केले. यासमयी दैवी उपायही चालू होते. महादेवास रुद्रावर्तने व इतर देवतांपुढे अनुष्ठाने बसवून त्या देवतांचा कृपाप्रसाद महाराजांस मिळो, याकरिता हे प्रयत्न चालले होते. आपल्या धर्मनियमांना अनुसरून त्यांनी जे उपाय चालविले, त्यांच्या सांगतेकरिता मोठ्या गंभीर विचारांनी भरपूर असे संकल्प करण्यासही त्यांनी आळस केला नाही. यात मुख्य मुद्दा असा होता की, कसेही करून महाराजांच्या प्रकृतीस आराम पडो आणि ते आपल्या प्रजेच्या सुखदुःखांकडे लक्ष देण्यास शक्तिमान होवोत. ईश्वरकृपेने म्हणा किंवा डॉक्टर होजेल यांच्या औषधांच्या सामर्थ्याने म्हणा, महाराज साहेबांची प्रकृती जानेवारी सन १८९१ च्या अखेरीस बरीच सुधारली. त्यांना हिंडण्या-फिरण्याचे बरेच सामर्थ्य आले. ज्या दिवशी ते प्रथम बाहेर फिरावयास निघाले, तो दिवस खरोखर फारच आनंदाचा गेला. या दिवशी शहरातील लोकांनी मोठमोठे उत्सव केले. नगर यावेळी शृंगारण्यात आले होते. महाराणी जमनाबाई यांनी सुरू केलेल्या उत्सवाची दिशा फारच निराळी होती. त्यांनी अनाथांस अन्नवस्त्र देऊन त्यांना यथास्थित आश्रय दिला. पूर्वी बसविलेल्या अनुष्ठानांची आणि रुद्रावर्तनाची समाप्ती करण्यासाठी त्यांनी सहस्र भोजने सुरू केली. तसेच दुसरेही कित्येक उत्सव सुरू करून त्यांनी आपल्या हृदयातील निष्कलंकित पुत्रप्रेम प्रदर्शित केले.

ooo

# भाग २७ वा

# ठिकठिकाणच्या यात्रा आणि त्यांचे औदार्य

## काशी, गोकुळ, वृंदावनाची यात्रा

सयाजीराव महाराज हे आपला राज्यकारभार दक्षतापूर्वक पाहू लागल्यावर महाराणी जमनाबाई यांनी राजकीय बाबतीतून आपले मन काढले व पारमार्थिक विषयांकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ती झाली. तीर्थयात्रा करून या मानवी देहाचे सार्थक करावे, ही त्यांची धार्मिक श्रद्धा जितकी तेजस्वी होती तितकीच पवित्र धामे पाहून तेथील स्थितीचे अवलोकन केल्याने आपल्या हृदयात ज्ञानप्रकाश पडेल, अशीही त्यांची समजूत होती. इ.स. १८८३ च्या फेब्रुवारी महिन्यात सयाजीराव महाराजांची स्वारी सौ. चिमणाबाई महाराणी यांच्यासह कलकत्त्यास गेली. त्याच सुमारास जमनाबाई महाराणी यांनी काशीयात्रेस जाण्याचा निश्चय केला. त्यांनी नामदार व्हाईसरॉय लॉर्ड रिपन यांना विनंती केली की, 'हिंदुस्थान सरकारने आजपर्यंत बडोदे राज्यावर जशी कृपादृष्टी ठेवली, तशीच पुढे ठेवून ब्रिटिश सरकारास बडोद्याकडून वेळोवेळी मदत होईल अशा अवस्थेत या राज्यास ठेवावे.' नामदार सरकारने ही विनंती मान्य करून 'आजपर्यंत बडोद्याचे राज्यकर्ते राजनिष्ठेने वागले, तसेच ते पुढे वागून सार्वभौम सरकारास साहाय्य करतील अशी हिंदुस्थान सरकारास उमेद आहे,' असे त्यांना कळविले. काशीक्षेत्राची तीर्थयात्रा करून गोकुळ, वृंदावन वगैरे पाहून महाराणी जमनाबाई यांची स्वारी परत फिरली. यावेळी दानधर्म व अनाथांना अन्नवस्त्र देऊन आणि विद्वानांचा योग्य सत्कार करून त्यांनी आपले नाव त्या पवित्र क्षेत्री अमर केले व कीर्ती संपादिली. या यात्रेत त्यांनी बराच खर्च केला.

## गोकर्ण महाबळेश्वराची यात्रा व त्यांचे औदार्य

महाराणी जमनाबाई यांना पुढे गोकर्ण महाबळेश्वरच्या यात्रेस जाऊन येण्याची इच्छा झाली. या यात्रेकरिता ता. ३१ जानेवारी सन १८९६ रोजी मेल गाडीने स्वारी निघाली. मुंबईस खंबाला हिलवर स्वारीचे दोन मुक्काम झाले. तारीख ३ फेब्रुवारी रोजी स्वारी बेळगावास पोहोचली.

तेथे दोन मुक्काम करून स्वारी मार्मागोवा येथे गेली. गोव्याचे पोर्तुगीज गव्हर्नर हे महाराणी जमनाबाई यांच्या स्वागतार्थ सामोरे आले होते. तेथील सरकारने यासमयी महाराणी जमनाबाई यांचा फारच चांगला सन्मान ठेवला होता. तेथे त्यांनी दोन मुक्काम केले. नंतर आगबोटीत बसून स्वारी तदडी बंदरावर उतरली. या बंदरापासून गोकर्ण महाबळेश्वर चार मैल लांब आहे. तेथील मामलेदार हे पोलीस पार्टी घेऊन महाराणी जमनाबाई यांच्या आदरातिथ्याकरिता बंदरावर आले होते. चार घोड्यांच्या गाडीत बसून स्वारी लागलीच गोकर्णास गेली. तेथील मुशाफर बंगल्यात स्वारीचे तेरा मुक्काम झाले. या स्वारीचे चीफ ऑफिसर कृष्णराव रघुनाथ धारकर दिघे हे होते. ते शांत स्वभावाचे, इमानी व हुशार असल्याने त्यांनी स्वारीचा बंदोबस्त उत्तम प्रकारे ठेवला होता. महाराणी जमनाबाई यांनी या स्थळी बराच दानधर्म केला. विद्वानांच्या सभा भरवून त्यांचा योग्य सत्कार व ब्राह्मण भोजने आणि अनाथास आश्रय देऊन त्यांनी तेथे बरीच कीर्ती मिळविली. गोकर्ण महाबळेश्वरास सहा हजार रुपयांच्या किंमतीची गंगाजमनी (चांदी-सोन्याची) 'जलाधारी' अर्पण करून महाराणी जमनाबाई यांनी आपले नाव व कर्तव्य तेथे कायम ठेवले आहे. या यात्रेस त्यांनी फारच खर्च केला. तारीख २२ फेब्रुवारीच्या दिवशी ही यात्रा संपून स्वारी परत फिरली. येताना गोवा प्रांतातील पणजी शहरातील इतिहासप्रसिद्ध वास्को-दी-गाम्याच्या वेळच्या सुंदर व भव्य इमारती पाहून महाराणी साहेबांच्या मनाचे फारच समाधान झाले. तेथून स्वारी बेळगावास गेली व सावंतवाडीचे राजे सरदेसाई यांच्याकडून अतिशय आग्रह झाल्यामुळे तारीख ३ मार्च रोजी महाराणी साहेबांची स्वारी सावंतवाडीस गेली. तेथील दरबाराकडून यांचा बराच सन्मान ठेवण्यात आला. तेथून स्वारी पुण्यास आली व तेथे एक महिनाभर मुक्काम ठेवला.

### धौम्य महाबळेश्वरच्या यात्रा व औदार्य क्रम

नंतर थोड्याच दिवसांनी महाराणी जमनाबाई यांची स्वारी धौम्य महाबळेश्वरच्या यात्रेस गेली. तेथील पवित्र स्थळे व रमणीय शोभा पाहून त्या फार खुश झाल्या. त्यांनी तेथील विद्वान लोकांचा निरनिराळ्या तऱ्हेने सत्कार करण्यासाठी बराच दानधर्म केला. ब्राह्मण भोजने व रुद्रावर्तने चालवून क्षेत्रस्थ लोकांना संतोष देण्याचे मुख्य व्रत त्यांनी धारण केले होते. या उदार व धर्मशील महाराणींची स्वारी तेथे आल्याची खबर लागताच आजूबाजूच्या तीस कोसांतील भिक्षुक मंडळींच्या झुंडी नित्यशः तेथे याचनेस येऊ लागल्या. त्या सर्वांच्या इच्छा महाराणी जमनाबाई यांनी तृप्त केल्या. त्यांनी कोणासही विन्मुख जाऊ दिले नाही. हा त्यांचा उदारप्रचुर क्रम पुढे बऱ्याच दिवसांपर्यंत कायम होता. त्या बडोद्यास आल्या तरी त्यांनी हा क्रम सोडला नव्हता. त्यांची नेमणूक यांना पुरत नसे, याचे कारण तरी हेच. गोष्टी सांगणारे, गवई, कीर्तनकार, पुराणिक व दुसरे हरहुन्नरी लोक यांचे हे केवळ आश्रयस्थान होते. अनाथ प्रेतसंस्कार, अनाथ मुलांच्या मुंजी व मुलींची लग्ने करून देण्याच्या कामाकडे त्यांनी बराच द्रव्य व्यय केला. कन्यागतांत तर त्यांनी असंख्य कन्यादाने करून त्याचे श्रेय संपादन केले.

ooo

# भाग २८ वा

# सौ. ताराबाई यांचा शेवट

## ताराबाईंची प्रकृती आजारी होती

सयाजीराव महाराज आणि त्यांची भगिनी ताराबाई यांच्यातील परस्पर प्रेम अकृत्रिम होते. आपल्या सुगुणांनी आणि सौजन्याने ताराबाई या पितृ व भर्तृकुलास आनंददायक झाल्या. त्यांची प्रकृती चांगली सुदृढ होती. त्यांचे स्वरूपही सुरेख व मोहक होते. त्या लिहिण्यास व वाचण्यास बऱ्याच शिकल्या होत्या. हल्लीच्या काळास अनुसरून ज्या शिक्षणाची राजकन्येस आवश्यकता असते, ते त्यांनी संपादन केल्याकारणाने आणि ज्या मातेच्या देखरेखीखाली या प्रौढावस्थेस आल्या, त्या महाराणी जमनाबाई यांच्या योग्य दक्षतेमुळे ताराबाई या आपल्या पतीचे मन आपल्याकडे आकडून घेण्यास शक्तिवान झाल्या. ताराबाई या आपल्या भर्तृमंदिरी योग्य रीतीने वागतात व त्या उभयतांचे प्रेमही चांगले आहे, हे ऐकून महाराणी जमनाबाई यांना मोठे समाधान वाटत असे. याप्रमाणे त्या आनंदात नांदत आहेत, तोच तारीख ७ फेब्रुवारी सन १८९३ रोजी सावंतवाडीचे पॉलिटिकल एजंट यांच्याकडून ताराबाईंच्या आजारपणाची तारेने खबर आली. त्यावरून महाराज सयाजीराव हे आपल्या मातुःश्रींच्या भेटीस आले व त्यांनी हे वर्तमान कळवून मी सावंतवाडीस जातो असे त्यांना कळविले. महाराणी साहेबांनी तुम्ही न जाता 'मला जाऊ द्या म्हणजे माझ्या मनास समाधान वाटेल,' असे सांगितल्यावरून महाराज साहेबांनी तिकडे जाण्याचा बेत रहित केला. त्याच दिवशी मेलगाडीने महाराणी जमनाबाई व रेऊबाईसाहेब यांच्या स्वाऱ्या सावंतवाडीस जाण्याकरिता निघाल्या. बेळगावाहून आंबोलीच्या घाटाने तारीख ११ रोजी स्वाऱ्या सावंतवाडीस जाऊन पोहोचल्या. तेथील डॉक्टरांचे औषधोपचार चालू होतेच; परंतु गुण आला नाही. त्यामुळे ताराबाईस घेऊन महाराणी जमनाबाई या जामात राजे रघुनाथराव सरदेसाई यांच्यासह ता. ८ मार्च रोजी मुंबईस येण्याकरिता निघाल्या. वेंगुर्ल्याकडून या स्वाऱ्या ता. ९ मार्चला मुंबईस येऊन दाखल झाल्या. तेथे त्यांचा मुक्काम खंबाला हिलवर मार्कर

हॉलमध्ये होता. महाराणी साहेबांची स्वारी सावंतवाडीत असताना तेथील मुलांस शारीरिक शिक्षण देण्याच्या शाळेच्या इमारतीकरिता पाच हजार रुपये त्यांनी बक्षीस दिले. ताराबाई यांची प्रकृती बरीच नादुरुस्त झाल्याने बडोद्याहून युवराज फत्तेसिंगराव हे तारीख ११ रोजी मुंबईस आले. त्यांच्या प्रकृतीस उपचार करीत असता आराम होत नाही म्हणून तारीख ३० मार्च रोजी खुद्द सयाजीराव महाराज हे बडोद्याहून मुंबईस गेले. त्यांनी तेथील डॉक्टर सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांच्या मार्फतीने डॉक्टरांची कमिटी भरविली. या कमिटीत डॉक्टर डिमक, डॉक्टर इंजिनियर, डॉ. पिची, डॉ. ओवेल, डॉ. खोटे व डॉ. यशवंत मंगेश हे प्रख्यात डॉक्टर होते. सर्वांच्या विचारे खंडाळयास हवाफेर करण्यासाठी ताराबाईंस न्यावे असे ठरल्यावरून स्वाऱ्या त्यांना घेऊन खंडाळयास गेल्या. तेथे डॉक्टर सर भालचंद्र यांचे औषध सुरू होते. ताराबाईंच्या श्रृषेकरिता तीन स्वतंत्र युरोपियन नर्सा (दायिणी) ठेवल्या होत्या. प्रकृतीस लवकर चांगला आराम पडत चालला. ताराबाई यांची प्रकृती बरोबर सुधारत चालली. तेव्हा सयाजीराव महाराज व महाराणी जमनाबाई यांची काळजी बरीच दूर झाली. नंतर तारीख १ माहे मे सन १८९३ रोजी सयाजीराव महाराज यांची प्रकृती नादुरुस्त झाल्याने ते हवाफेर करण्यासाठी इंग्लंडास गेले. हा त्यांचा विलायतेचा चौथा प्रवास होता. त्यांनी हा लांबचा प्रवास यावेळी करू नये, अशी महाराणी जमनाबाई यांची इच्छा होती; परंतु ताराबाईंच्या अकस्मात आजारपणामुळे महाराजांना आपली इच्छा कळवू शकल्या नाहीत. ताराबाईंच्या प्रकृतीची खबर सयाजीराव महाराज यांना दररोज तारेने इंग्लंडास दिली जात असे. यासमयी सयाजीराव महाराज हे केवळ प्रकृती नादुरुस्त राहते व डॉक्टर डिमक वगैरेंनी सल्ला दिल्यामुळे विलायतेस गेले होते. ताराबाई या खंडाळयास असताना त्यांच्या समाचारासाठी दिवाण मणीभाई जसभाई हे तेथे आले व त्यांनी डॉक्टर सर भालचंद्र याच्या विचारांनी स्वाऱ्यांनी वांद्र्यास राहावे असे ठरविण्याचा घाट घातला. महाराणी जमनाबाई साहेबांनी ते न ऐकता पुण्यास राहण्याचाच बेत केला. पुण्यातील रेकॉर्ड हॉलमध्ये त्यांचा मुक्काम जुलै अखेरपर्यंत होता. तेथे त्यांची प्रकृती फार चांगली झाली म्हणून त्यांना बरोबर घेऊन महाराणी जमनाबाई या बडोद्यास परत आल्या. ताराबाईंच्या आरोग्यार्थ केलेले नवस त्यांनी बडोद्यास फेडले. पुढे थोड्याच दिवसांनी ताराबाई या सावंतवाडीस गेल्या. या आजारपणाच्या निमित्ताने औषधे व डॉक्टरांची फी वगैरेंकडे एकंदर खर्च रुपये ६३,३७२ झाला. हा खर्च श्रीमंत सयाजीराव महाराजांनी फारच संतोषाने मंजूर केला.

## ताराबाई यांचा मृत्यू

महाराणी जमनाबाई साहेब यांची प्रकृती पुढे बरी राहीनाशी झाली. हवाफेर करण्यासाठी त्या वारंवार चांदोद-करनाळीस जात असत. सन १८९५ च्या जानेवारी महिन्यात अतिसाराच्या विकाराने त्यांची प्रकृती फार बिघडली; परंतु पुण्याचे लागवणकर वैद्यांचे औषध सुरू होताच ती सुधारली. त्या नेहमी हवाफेर करण्यासाठी हिंदू धर्माच्या पवित्र मानलेल्या क्षेत्री जात असत.

सन १८९७ च्या मे महिन्यात त्या चांदोदास गेल्या होत्या. तेथे असताना तारीख १४ जून सन १८९७ सोमवारच्या रात्रीस ताराबाईचा अंत झाला! ही दुःखवार्ता बडोद्यास मंगळवारी दोन वाजता आली. यावेळी सयाजीराव महाराजही बडोद्यास नव्हते. ते इटोले गावच्या जंगलात हरणाच्या शिकारीस गेले होते. त्यांना ही दुःखदायक खबर लागताच ते ताबडतोब बडोद्यास आले. ते व राधाबाईसाहेब यांच्या स्वाऱ्या स्पेशल गाडीने महाराणी जमनाबाई साहेब यांना आणण्याकरिता चांदोदेस गेल्या. ते बुधवारी त्यांना घेऊन बडोद्यास आले. प्रिय कन्या ताराबाई यांच्या अकाली मृत्यूची खबर अकस्मात महाराणी साहेबांना ज्या प्रसंगी समजली, ती वेळ फारच भयंकर होती. अगोदरच त्यांची प्रकृती क्षीण झालेली आणि त्यात या दुःखाने येऊन भर घातली! अर्थात याप्रसंगी त्यांच्या आरोग्यासंबंधाने विशेष काळजी बाळगणे भाग पडले. त्यांनी अन्नपाणी वर्ण्य केले. त्यांनी अलंकारांचा त्याग करून त्या वैराग्ययुक्त बनल्या. महाराज साहेबांनी व राजकुटुंबातील पोक्त आणि समजूतदार मंडळींनी महाराणी साहेबांना या दुःखाची विस्मृती पडावी याकरिता पुष्कळ प्रयास केले; परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. ताराबाईंच्या प्रत्येक सद्गुणांची व त्यांच्या बाळपणाच्या लीलेची प्रत्येक वेळी त्यांस आठवण होऊन त्यांनी एक सारखे विलाप चालविले. दिवसातून दोनदा स्वतः महाराज साहेब हे आपल्या मातुःश्रींच्या सांत्वनार्थ जात असत. त्यांचा दुःखभार हलका करण्यासाठी त्यांनी फार प्रयास केले. ताराबाईंचा हा अकाली स्वर्गवास बडोद्यातील व सावंतवाडीतील लोकांना फार असह्य झाला. बडोद्यातील बाजार, सरकारी कचेऱ्या आणि शाळा या दुःखातिशयामुळे तीन दिवस बंद होत्या. स्वतः महाराजसाहेब हे जास्त विवेकी असतानाही या दुःखामुळे आठ दिवसांपर्यंत त्यांनी राज्यकारभाराचे काम पाहण्याकडे लक्ष दिले नाही. ते नेहमी उदास असत. सावंतवाडीचे राजे सरदेसाई रघुनाथराव यांची स्थिती सुशील पत्नीच्या दुःखामुळे फार विलक्षण झाली. त्यांचे सौजन्य, गुणग्राहकपणा, सद्वर्तन, सहिष्णुता व ईश्वराने दिलेला मोहकपणा यांची आठवण प्रत्येक मनुष्यास वारंवार होत असे. ज्या ताराबाईंकडे पाहून महाराणी जमनाबाई यांनी संकटकाळचे दिवस काढले, ती तारा अस्तास गेल्याची दुःखवार्ता ऐकल्यापासून महाराणीसाहेब या फारच खंगल्या व त्यांना आता जगात राहणे हे निरर्थक असे पूर्ण वाटू लागले.

ooo

# भाग २९ वा

# जन्मभूमीचे दर्शन

### रहिमतपुरास गमन

ताराबाई यांना घेऊन महाराणी जमनाबाई यांची स्वारी खंडाळ्यास गेल्यानंतर तेथे त्यांचा मुक्काम एक महिनाभर होता, ही हकीकत मागील भागात दिली आहे. त्यांची प्रकृती बरीच सुधारल्यावर महाराणी जमनाबाई यांना आपल्या जन्मभूमीचे एकदा दर्शन घ्यावे अशी इच्छा झाली. केशवराव बाबूराव पंडित मास्तर यांना बरोबर घेऊन स्वारी तारीख १३ मे सन १८९३ रोजी रहिमतपुरास जाऊन पोहोचली. स्वारीबरोबर पलटणचे दोन पहारे बॉडीगार्डपैकी ५ स्वार हत्यारबंद व इतर कामगार मंडळी तिकडे गेली होती. ज्या जन्मभूमीचा त्यांना त्यांच्या बालपणातच वियोग झाला होता तिचे त्यांना अशा श्रेष्ठावस्थेत पुनः दर्शन झाल्याने त्यांच्या मनास फार आनंद वाटला. लहानपणात व गरिबीत असताना त्यांनी रहिमतपूर सोडले होते. पुढे त्यांचा बडोद्याचे गायकवाडी राजघराण्याशी संबंध जडून त्यांना अत्यंत सुख मिळाले व त्यानंतर आपत्तीचा प्रसंग येऊन त्यातून त्यांचा बचाव झाल्याने पुनः राजवैभव भोगण्याचा त्यांना योग आला. अशा महाराणी साहेबांना यावेळी रहिमतपुरास येणे झाल्याने ईश्वराचे या लीलेबद्दल वारंवार स्मरण होत असे. रहिमतपूर येथील लोकांनी यथाशक्ती महाराणी जमनाबाई यांचे स्वागत करून त्यांच्यासंबंधाने आपल्या हृदयातील पूज्यबुद्धी व्यक्त केली. ज्या राजपत्नीचा जन्म आपल्या गावात झाला, तिचे आपणास आता दर्शनही होत नाही. यामुळे रहिमतपूरच्या लोकांना जे वाईट वाटत असे, ते त्यांचे दुःख महाराणी जमनाबाईंच्या हेतुपूर्वक आगमनाने या वेळी एकदम नष्ट झाले. त्यांचे बालपणचे मित्र, त्यावेळच्या त्यांच्या जिवलग सोबतिणी व त्यांच्यावर निस्सीम माया करणारे त्यांचे आप्तस्वकीय हे त्यांना येऊन भेटले व त्यांचा त्यांनी कृतज्ञतापूर्वक सत्कार केला. या राजमातेचे आगमन हे तेथील सर्व आबालवृद्धांस आनंददायक झाले होते. त्यांच्या

सोबतिणी ज्या बाहेरगावी राहत होत्या त्या त्यांना मोठ्या उत्सुकतापूर्वक येऊन भेटल्या व त्यांचा महाराणीने योग्य रीतीने सत्कारही केला.

## त्या बाजूस त्यांनी प्रगट केलेले औदार्य

जन्मग्रामातील सर्व लोकांना त्यांनी पंचपक्वान्नांचे मोठे सहभोजन दिले, तसेच त्यांना त्यांनी चांगले पोशाखही दिले. सुवासिनीस चोळी-बांगड्या व लुगडी देऊन त्यांनी त्यांना तृप्त केले. तेथे त्यांनी बरीच ब्राह्मण भोजने घालून आपल्या खऱ्या औदार्याची छाप सर्व लोकसमुदायाच्या हृदयावर पाडली. साताराच्या 'महाराष्ट्रमित्र' वर्तमानपत्राचे चालक गणपतराव कोल्हटकर यांस त्यांनी फारच चांगला आश्रय देऊन त्यांना उत्तेजन दिले. विद्वान लोकांची चांगली संभावना तयार करण्याचा नित्यक्रम सारखा चालूच होता. आजूबाजूचे ब्राह्मण याचनेसाठी तेथे येत व ते यांच्याकडून संतोषित होऊन जात असत. त्यामुळे तिकडे यांची कीर्ती फार पसरली. पंचक्रोशीतील सर्व लोकांना त्यांनी एक जे भोजन दिले, ती त्यांची योजना फार खुबीदार व लक्षात ठेवण्यासारखी होती. निरनिराळ्या जातींतील लोकांच्या पंक्ती निरनिराळ्याच केल्या होत्या. अत्यंत लहानांपासून ते थेट श्रेष्ठ म्हणविलेल्या ब्राह्मण जातीच्या पंक्तीच्या सर्वांच्या पानांपुढे रांगोळी काढली होती व सर्वांच्या पानांपुढे उदबत्त्या लावून त्या समारंभास प्रेक्षणीय स्वरूप आणले होते. वाढवून सर्वांची सारखी व बेतही सर्वांचा सारखाच ठेवला होता. सर्वांचा समाचार व सर्वांस आग्रहही सारख्या रीतीने त्यांनी केला. इतकेच नव्हे तर भोजनोत्तर त्या लोकांस ज्याचे त्याचे योग्यतेनुरूप पोशाखही दिले. या समानतेच्या दृष्टीमुळे त्यांची ख्याती त्या बाजूस फार झाली. असे समान दृष्टीस कोणीही इतके अप्रतिम भोजन दिले नव्हते असे म्हणतात. समारंभ आटोपून स्वारी परत खंडाळयास आली.

❍❍❍

# भाग ३० वा

# शेवटची तीर्थयात्रा आणि औदार्य

## मेलवणीची यात्रा व तेथे दाखविलेले औदार्य

प्रिय कन्या ताराबाई यांचा अकाली स्वर्गवास झाला, त्यावेळी महाराणी जमनाबाई साहेब यांची प्रकृती बरोबर नव्हती. या कन्यावियोगजन्य दुःखातिशयामुळे तर त्यांची प्रकृती फारच क्षीण होत चालली. ज्या बडोदे शहरात राहण्यामध्ये त्यांना अलौकिक सुख वाटत होते तेच ठिकाण या वेळेपासून त्यांना भयाण दिसू लागले. त्यांच्या या दुःखाची मर्यादा दिवसेंदिवस संकुचित व्हावयाची तशी ती न होता, उलट ती वाढतच चालली. वैद्य व डॉक्टर यांनी रोगपरिहारार्थ औषधे दिली; परंतु त्यांपासून गुण येईना. शेवटी कृष्णातीरी जावे व शेवटचे दिवस तेथेच काढावेत असा निश्चय करून, त्यांनी बडोदे सोडले व वाईजवळ 'मेणवली' या गावी त्यांनी आपला मुक्काम ठेवला. या गावची हवा चांगली असून, ते पवित्र क्षेत्र असल्याने, तेथे त्यांचे मनावरील दुःखाचा भार कमी होईल असे पूर्वी वाटत होते; परंतु तेही शेवटी मिथ्या ठरले. त्यांचे मन दुःखाने जरी उद्विग्न झाले होते; तथापि त्यांनी निरनिराळी पुण्यकर्मे सुरू करून, पारमार्थिक कल्याण करून घेण्याचा यत्न चालविला. ब्राह्मण भोजने व इतर रीतीने त्यांनी वाई क्षेत्रातील ब्राह्मणांची चांगली संभावना केली. विद्वान, शास्त्री, पुराणिक आणि वैदिक लोकांना शाली व पीतांबर देऊन, त्यांचा उत्तम सत्कार केला. तसेच ब्राह्मण दाम्पत्यांना मांगलिक स्नाने घालून, सौभाग्यसूचक मूल्यवान बांगड्या त्यांस भरल्या. त्यास पंचपक्वान्नांचे भोजन देऊन, लुगडी व चोळया दिल्या आणि खणा-नारळांनी त्यांच्या ओट्या भरविल्या. पंचक्रोशीतील ब्राह्मण व तादितर जातींच्या स्त्रीपुरुषांस त्यांनी पंचपक्वान्नांचे भोजन देऊन त्यांना संतुष्ट केले. या भोजनाचा थाटही मागील भागात सांगितल्याप्रमाणे समानतेचाच होता. तेथे त्यांनी वृषोत्सर्ग करून नवचंडीचे हवनही केले. या धर्मकृत्याकडे त्यांनी बराच पैसा खर्चिला. यांचा मुक्काम

या क्षेत्रात जोपर्यंत होता, तोपावेतो कृष्णेच्या काठच्या वाचनोत्सुक द्विजांच्या झुंडीच्या झुंडी यांच्याकडे येऊन, याचना करीत; त्या सर्वांचे हेतू तडीस नेण्याचा यांनी विडाच उचलला होता. निराधार दीन द्विजपत्रांचे व्रतबंध आणि निराश्रित कन्यांची कन्यादाने करण्यासाठी. याचकांना त्यांनी बरीच मदत केली. दीनोद्धार करण्याचा त्यांचा या वेळचा क्रम फारच वर्णनीय होता. जीर्ण स्थितीला आलेल्या देवस्थानांचा जीर्णोद्धार करून; त्यातील देवतांच्या अर्चनेची व्यवस्था नीट राहावी, म्हणून त्यांनी बरीच मदत दिली. या त्यांच्या कृतीने तिकडे त्यांचे नाव बऱ्याच अंशी अमर राहिले. त्यांच्या या वेळच्या कर्णसदृश औदार्याची आठवण तिकडील लोकांस खात्रीने बऱ्याच काळापर्यंत राहील. दातृत्वाच्या आणि धार्मिक श्रद्धेच्या बाबतीत महाराणी जमनाबाई यांच्यासारखी सद्गुणशाली विभूती ईश्वरांशावाचून उत्पन्न होणे अशक्य, अशी तिकडील विद्वान लोकांची समजूत आहे. त्यांची विद्येवर फार प्रीती असे. विद्यार्जनाची इच्छा दाखविणाऱ्या मुलांचे हेतू परिपूर्ण करण्यासाठी, यांनी बरीच मदत दिली. या यात्रेतील धर्मकृत्यांत सुमारे पंचवीस हजारांपेक्षा जास्त रुपयांचा खर्च झाला. यासमयी याप्रमाणे धार्मिक कृत्ये चालली आहेत, तोच त्यांची तब्येत फार बिघडली. अशा स्थितीत त्यांनी तेथे राहणे हे श्रीमंत सयाजीराव महाराजांस योग्य न वाटून, महाराणी जमनाबाई यांनी बडोद्यास येऊन राहावे, अशी यांनी विज्ञप्ती केली. तिचा स्वीकार करून त्यांनी ही शेवटची यात्रा संपवली व तारीख २८ ऑक्टोबर सन १८९८ रोजी यांची स्वारी बडोद्यास परत आली.

○○○



एच-४९
१२

# भाग ३१ वा

# आयुष्याची अखेर

## आजारपण व महाराणी जमनाबाईंचा स्वर्गवास

बडोद्यास आल्यावर महाराणी जमनाबाई यांच्या प्रकृतीत जरासा फेर पडला; परंतु तो कायमचा नव्हता असे लवकरच प्रत्ययास आले. शरद ऋतू लागताच त्यांची प्रकृती एकदम फार बिघडली. आजाराने भयंकर रूप धारण केले. सं. १९५५ सालची दीपावली ही त्यांची शेवटचीच आहे, असा बऱ्याच लोकांचा तर्क होता व तोच शेवटी खरा ठरला. त्यांच्या प्रकृतीस लवकर आराम पडावा म्हणून पुष्कळ उपचार केले; परंतु त्यांचा उपयोग झाला नाही. दिवसेंदिवस त्यांच्या प्रकृतीचे मान विशेष बिघडत चालले. त्यामुळे त्यांचा मुक्काम महाराज साहेबांनी मोतीबागेतील बंगल्यात आणून ठेवला. 'लक्ष्मीविलास' राजमहाल येथून नजीक असल्याने श्रीमंत महाराज सयाजीराव हे दिवसातून बराच वेळपर्यंत त्यांच्या जवळ बसत असत. मातुःश्रींची प्रकृती अस्वस्थ झाल्यापासून महाराजांच्या मनावर उदासीनतेची छाया पडत चालली. त्यांचे लक्ष राज्यकारभाराकडे बरोबर लागेना. अत्यंत महत्त्वाची कामे तेवढी ते निरुपायास्तव पाहत असत. मातुःश्रींच्या इच्छेस येईल तसा त्यांनी दानधर्म करावा. यासाठी खासगी कारभाऱ्यांना उदारपणाचे हुकूम दिले. पुण्याच्या लागवणकर वैद्यांच्या औषधांपासून प्रथम गुण आला होता. त्याचप्रमाणे यावेळी त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना रक्कम देऊन त्यांना येथे आणले व त्यांचे औषध सुरू केले; परंतु तोही प्रयत्न निरर्थक गेला. रोगाने भयंकर रूप धारण करून त्याने वैद्यांच्या अमृत संजीवनीतुल्य औषधींना शेवटी पराभूत केले! ता. २९ नोव्हेंबर सन १८९८ कार्तिक वद्य १ शके १८२० मंगळवारचा दिवस हा फारच भयंकर उगवला. घडी घटकेची विलक्षण स्थिती उद्भवली. एक वाजण्याच्या सुमारास महाराणी साहेबांची तब्येत अत्यवस्थ झाली. त्यांवरून 'लक्ष्मीविलास' राजमहालात सयाजीराव महाराज, दिवाण श्रीनिवासराव आयंगार व दुसरे मुख्य मुख्य अंमलदार, राज्यातील प्रसिद्ध सरदार आणि मानकरी येऊन दाखल झाले. या प्रकृतीचे

आता प्रमाण नाही, असे समजताच श्रीमंत सयाजीराव महाराज, महाराणी चिमणाबाई व दुसऱ्या खाशा बाया यांच्या स्वाऱ्या मोतीबागेच्या बंगल्यात महाराणी जमनाबाई यांच्याकडे आल्या. देहावसान होईपर्यंत जमनाबाई महाराणी साहेब या सावध होत्या व स्पष्ट रीतीने बोलत होत्या. त्यांच्या मुखातून शिवनामाचा उच्चार एकसारखा चालला होता. यासमयी त्यांच्या हातून दोन हजार रुपयांचा दानधर्म महाराज साहेबांनी करविला. त्यांनी आपली मांडी या निर्वाणसमयी मातुःश्रींच्या मस्तकाखाली देऊन ते उदास होऊन बसले होते. अंत:काळचा समय येताच महाराज साहेबांनी गंगोदक व दूध मातुःश्रींच्या मुखात घातले. इतक्यात सायंकाळचे पाच वाजले आणि महाराणी जमनाबाई यांच्या पवित्र आत्म्याचा एकदम अस्त झाला! या परोपकारी आणि उदार दिव्य मूर्तीचा ज्या भयंकर व्याधीने अस्त केला, त्या रोगाचे नाव 'राजयक्ष्मा' असे होते. या रोगाने हा सहस्रावधी अनाथ लोकांचा आधारस्तंभ उलथून पाडला! सयाजीराव महाराजांच्या मातृसुखाची परमावधी झाली! महाराणी जमनाबाई यांनी आपले दिव्य शरीर आणि अचल कीर्ती मृत्युलोकीं ठेवली व त्यांच्या पवित्र आत्म्याने स्वर्गलोकाचा रस्ता स्वीकारला. ज्या कार्यासाठी ईश्वराने त्यांना या जगावर पाठविले होते, ते संपवून त्या आज स्वर्गलोकी गेल्या. महाराजांचे मातृछत्र गेल्याने त्यांच्यावर हा दुःखाचा केवळ पर्वतच कोसळला; परंतु त्यांनी आपले धैर्य खचू न देता, कृतज्ञ हिंदुपुत्राचे जे खरे कर्तव्य ते महाराजांनी पूर्णांशाने बजावले. कृतज्ञ, विद्वान, गुणवान, विख्यात, धैर्यशाली आणि परमदक्ष अशा सुपुत्राच्या मांडीवर मस्तक ठेवून ज्या महाराणी जमनाबाई यांनी मृत्युलोकाची यात्रा संपविली, त्यांच्या अगाध पुण्याईचे वर्णन करणे अशक्य आहे. महाराणी साहेबांच्या मृत्यूची वार्ता सर्व शहरात व राज्यात तेव्हाच पसरली. मोतीबागेचा बंगला केवळ शोकमय बनून गेला होता. दिशा उदास दिसू लागल्या! खाशा बायांनी व महाराणी साहेबांजवळ लहानपणापासून वागलेल्या दासी वर्गाने आकांत करून तेथील दुःखमय देखाव्यास विशेष भयाण स्वरूप आणले! कामदार, सरदार, दरकदार, मानकरी वगैरे मंडळी खिन्न मुद्रेने बंगल्याजवळ बसली होती. शहरात ही दुःखदायक बातमी पोहोचताच या परम चतुर, धैर्यशाली आणि सगुणसंपन्न महाराणींच्या अकाली वियोगामुळे लोक फारच हळहळले. त्यांचे थवेच्या थवे मोतीबागेजवळ येऊन दाखल झाले. बंगल्याजवळ लोकांची इतकी गर्दी झाली की, जासूद व दुसरे सरकारी नोकर यांना जाण्यासही मार्ग मोकळा उरला नव्हता. महाराणींच्या मृत्यूची वार्ता फौजखात्यास समजताच त्या खात्याने महाराणी जमनाबाई यांना शेवटचा लष्करी मान देण्याची तयारी दोन तासांच्या आत केली.

### स्मशानयात्रेची स्वारी

पुत्रधर्मास अनुसरून मातुःश्रींच्या पवित्र देहाचे सार्थक करण्याचा महाराज साहेबांनी पूर्ण संकल्प केला व तो त्यांनी शेवटासही नेला. थोडक्याच वेळात या शेवटच्या स्वारीची सर्व तयारी झाली. आबालवृद्ध महाराणी साहेबांचे शेवटचे दर्शन घेण्याकरिता स्वारी जाण्याच्या

रस्त्याच्या दोन्ही बाजूस येऊन उभे राहिले. 'आपली महाराणी आपणास आज सोडून चालली' असे म्हणून त्यांनी अतिशय विलाप केला. थोडक्याच वेळात महाराणी जमनाबाई साहेबांचे परम पवित्र आणि दिव्य शव बंगल्याच्या बाहेर आणले व त्यास प्रथम उष्णोदकाने आणि नंतर गंगोदकाने स्नान घालण्याचा विधी झाला. त्यांस पैठणी नेसविल्यावर शिविकारोहण झाले. त्यांच्या शवावर याप्रसंगी जरीकाठी शालजोडी घातली होती. तसेच बरेच अलंकार त्यांना चढविले होते. उखाजीराव व हिंमतबहादूर आनंदराव दादा, अवचितराव काका व दादासाहेब (पांडुरंगराव) माने यांनी ही पालखी उचलली. पालखीच्या पुढे माधवराव काशीद मंत्री यांनी चांदीच्या कासाडीत अग्नी घालून, ते शिंके झाले होते. वाजत गाजत व दुःखाच्या आक्रोशात बंगल्याजवळून पालखी निघाली. त्यासमयी काही वेळपर्यंत सयाजीराव महाराजांनी पालखीस खांदा देऊन राजकीय चालीरीतीप्रमाणे पुत्रधर्म बजावला. महाराज साहेब हे मातुःश्रींच्या या स्वारीबरोबर अनवाणी निघाले. या स्वारीत फौजेपैकी सर्व रिसाले व पायदळ होते. रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास ही स्वारी मोतीबागेतून निघाली. स्वारीबरोबर मोठी व छोटी खासपागा, महाराणीची शरीरसंरक्षक फौज (बॉडीगार्ड), फत्तेसिंहरावांची पागा, हुजरात, तिसरी व चौथी पलटण, खालसा शिबंदी, दलबादल वगैरे सर्व कारखाने शोकमय देखाव्याने चालले होते. पराभूत झालेली फौज हतवीर्य होऊन, ज्याप्रमाणे दुःखाने व्यथित झालेली दिसते, त्याचप्रमाणे या स्वारीचा देखावा पाहून मनात उदासीनता उद्भवली नाही, असा मनुष्य एकही सापडणे त्यावेळी अशक्य होते. सर्व फौजेने आपल्या बंदुकी, तलवारी उलट्या धारण केल्या होत्या. पालखीपुढे दुःखप्रदर्शक चिन्हांनी युक्त असा फौजखात्यातील बँडचा कारखाना शोकसूचक स्वरावर बँड वाजवीत चालला होता. त्याचे जवळच सूर, सणया, शिंगे वगैरे एतद्देशीय वाद्ये दुःखोद्वेगजनक सुरात वाजत चालली होती. दिवाण, सरसुभे, न्यायाधीश, खाजगी कारभारी, हिशेबी खात्याचे मुख्य व दुसरे सर्व अंमलदार यांनी या दुःखमय स्वारीत सहानुभूती दाखवली. महाराणी साहेबांस शेवटचा मान दिला. पालखीवर गुलाल व फुले यांची एकसारखी वृष्टी चालली होती. स्वारीच्या पाठीमागे शहरातील गरीब व श्रीमंत, लहान व मोठे, स्त्रिया आणि पुरुष यांची एकसारखी गर्दी झाली होती. स्वारीबरोबर अधेल्या, पावल्या, चवल्या व पैसे यांची खैरात करणाऱ्या गाड्या पिछाडीस चालल्या होत्या. त्याच्या सभोवती अनाथ लोकांची गर्दी होऊन खैरात वाटणारांची धांदल उडून गेली होती. मोतीबागेपासून केदारेश्वराजवळील राजकुटुंबाच्या स्मशानभूमीपर्यंत लोकांच्या गर्दीने दुतर्फी रस्ते भरून गेले होते. मार्गातील प्रत्येक मनुष्य महाराणी जमनाबाई यांचे शेवटचे दर्शन घेण्यास अत्यंत आतुर झाला होता. पालखी जवळ येताच लोकांच्या मुखातून उद्वेगजनक उद्गार बाहेर पडून त्यांच्या डोळयांतून दुःखाश्रू पडल्यावाचून राहिले नाहीत. स्वारी दहा वाजण्याच्या सुमारास केदारेश्वरी जाऊन पोहोचली. यावेळी महाराज साहेबांकडून दुःखाचे आवरण होऊ शकले नाही. त्यांनी पुष्कळ विवेक केला; परंतु हृदयात प्रबळ झालेल्या

दुःखातिरेकापुढे त्यांचे काहीच चालले नाही. उपाध्याने दाखवल्याप्रमाणे मंत्र्याकडून जागा शुद्ध करविली व बरोबर आलेल्या आप्तस्वकीय मंडळींकडून शुभा रचविल्या व चंदनादी सुगंधित द्रव्यांनी चिता पूर्ण केली. खंडेराव महाराजांच्या छत्रीजवळ चंदन चितेवर शव ठेवल्यावर त्यास महाराज सयाजीराव यांनी कर्पूरयुक्त अग्निसंस्कार केला. यावेळी वाद्यांचा एकसारखा गजर करण्यात आला. वयाच्या मानाने ४५ तोफांची सरबत्ती होऊन पलटणीकडून तीन फायरणी झाल्या. बडोदे येथील ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधी कर्नल मार्टली व त्यांचे मदतगार कॅप्टन कॉक्स हे या स्मशानयात्रेस आले होते. महाराणी जमनाबाई यांचा देह चितेवर ठेवताच तेथे येऊन त्यांनी आपल्या टोप्या काढल्या व सलाम करून त्यांच्या ठायी ब्रिटिश सरकारची असलेली अकृत्रिम पूज्यबुद्धी व्यक्त केली. ज्या पुण्यशील आणि उदार मूर्तीने या देशातील अनाथांचे तारण केले, त्या मूर्तीच्या दर्शनाचा हा शेवटचा समय फार दुःखदायक झाला. दहा वाजून वीस मिनिटांनी चितेस अग्निसंस्कार झाला. जी राजमाता राजवैभवातील मृदुशय्येवर निजत असे, तिचा तोच देह आज चंदनकाष्ठावर ठेवताच स्मशानयात्रेस आलेल्या सर्व लोकांचे कंठ दाटून आले. त्यांच्या मुखातून दुःखोद्गारांची एकसारखी वृष्टी झाली. आज या पवित्र मूर्तीचा अस्त झाला. बडोद्याचे मातृतेज गेले. येथील औदार्य नष्ट झाले. अनाथांचे आश्रयस्थान लयास गेले. एक उत्तम सल्लागार गेला आणि महाराजांचे मातृछत्र नष्ट झाले वगैरे निरनिराळ्या प्रकारच्या विलापप्रचुर वाक्यांनी हा शोचनीय प्रसंग असह्य झाला.

## महाराणी जमनाबाई यांचे और्ध्वदंडित कार्य

महाराणी जमनाबाई यांच्या स्वर्गवासानिमित्त कॅम्पातील ब्रिटिश सरकारचा विजयशाली झेंडा अर्ध्या भागापर्यंत उतरला होता. एक मोठा मान हिंदुस्थान सरकारने मोठमोठ्या राज्यकर्त्यांनासुद्धा दिला नव्हता असे म्हणतात. हा मोठा मान देऊन त्या सरकारने अपली पूज्यबुद्धी प्रगट केली. बडोदे राज्यातील सर्व ठिकाणांचे झेंडे व निशाणे गुंडाळून ठेवली होती. तीन दिवसांपर्यंत बाजार बंद होते. सरकारी कचेऱ्या व शाळा पाच दिवसांपर्यंत बंद होत्या. महाराणी जमनाबाई यांचे और्ध्वदेहिक कार्य व्यवस्थीशीर व चांगले व्हावे यासाठी श्रीमंत सयाजीराव महाराज यांनी संपतराव गायकवाड, नारायणराव घाडगे, तात्यासाहेब घाडगे आणि देवस्थान-धर्मादाय खात्याचे कामदार यांची एक कमिटी नेमली. बद्रीनाथ शास्त्री, भिकाचार्य ऐनापुरे व त्रिभुवनशास्त्री यांनी वैदिक संप्रदायास अनुसरून लिहून दिलेल्या शास्त्राधाराप्रमाणे महाराणी साहेबांचे और्ध्वदेहिक कार्य करण्याचा ठराव पूर्वोक्त कमिटीने केला. तिसरे दिवशी सकाळी रक्षा सारवण्याचा व काकबली विधी झाला. दाखल्याप्रमाणे मंत्री माधवराव यांनी क्षौरकर्म केले. रक्षा नर्मदेत प्रवाह करण्यासाठी पाच स्वार बरोबर देऊन चांदोद कर्नाळीस ती रवाना केली. ताम्रकलशात अस्थी घालून त्या तेथेच बेलाच्या झाडाजवळ काशी क्षेत्री पाठविण्याकरिता पुरून ठेवण्यात आल्या. तिसऱ्या-चौथ्या दिवशी सांत्वनाचा मोठा दरबार 'लक्ष्मीविलास' राजमहालात झाला. अंतेष्टीच्या

प्रयोगास अनुसरून तिसऱ्या दिवसापासून उत्तरक्रियेस आरंभ झाला. अश्व, गज, गो, शिबिका, भूमी वगैरे दाने देण्यात तेरा दिवस निघून गेले. तेराव्या दिवसाचे श्राद्धसुद्धा सयाजीराव महाराज यांच्या हस्ते झाले. केदारेश्वरी जी खिचडी ब्राह्मणास वाटतात ती या दिवशी दुप्पट देण्यात आली. भाकरीच्या कारखान्यातून ज्या अनाथ व अपंग लोकांना नेहमी भाकरी मिळते, त्यांना या दिवशी बुंदीच्या लाडवांचे भोजन दिले. ग्यारमीतील मुसलमानांना खिचडीच्या ऐवजी गोड्या मुलाव्याचा खाना दिला. मोतीबागेत या दिवशी मराठे मंडळींचे ज्ञातिभोजन झाले. गायकवाड सरकारच्या आश्रयाखाली असलेल्या देवस्थानास चांदीच्या पळया, पंचपात्र्या व ताम्हणे देण्यात आली. अमरेली, कडी व नवसारी प्रांतांतील गरीब लोकांना कपडे वाटले. तारीख १४ डिसेंबर रोजी केदारेश्वरी गरीब लोकांसही कपडे दिले. याशिवाय इतर प्रकाराने बराच दानधर्म करण्यात आला. जुन्या कारकीर्दीत अशाप्रसंगी फक्त ब्राह्मणांनाच दानधर्म करण्यात येत असे; परंतु यासमयी तो प्रकारच यावेळी बदललेला दिसला. सर्व जातींच्या लोकास यावेळी दानधर्म करण्यात आला. केवळ या उत्तरक्रियेसाठी वीस हजार रुपये खर्च झाले. कोल्हापूर, अक्कलकोट, सावंतवाडी, देवास वगैरे संस्थानकडून व बडोदा, हिंदुस्थान सरकारकडून रीतीप्रमाणे दानधर्म करण्यात आला.

ООО

# भाग ३२ वा

# श्रीमंत सयाजीराव महाराजांची कृतज्ञता

### तारकेश्वरची नेमणूक व त्या देवस्थानाचा कारभार

श्रीमन्मातुःश्री महाराणी जमनाबाई साहेब यांच्या स्वर्गवासानंतर महाराज साहेबांनी आपली निश्चल व निस्सीम मातृभक्ती व्यक्त केली. मातुःश्रींनी ज्या तारकेश्वराचे मंदिर बांधून तेथे त्याची स्थापना केली, त्या देवस्थानाची व्यवस्था नीट व अबाधित नेहमी चालावी याकरिता त्यांनी एक कमिटी नेमली. त्या कमिटीने मागील दाखले वगैरे पाहून या देवस्थानाकडे होणाऱ्या खर्चाचा अंदाजित आकडा काढून तो महाराज साहेबांस कळविला. त्यावरून दरसाल सहा हजार रुपयांची नेमणूक या देवस्थानास श्रीमंत महाराज साहेबांनी ठरवून दिली. या कायमच्या नेमणुकीमुळे या देवस्थानाच्या पूजा अर्चनादी विकासास बराच चिरस्थायीपणा आला असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही. तारकेश्वराची स्थापना महाराणी जमनाबाई यांच्या हस्ते झालेली असल्यामुळे त्या संस्थानावर महाराज साहेबांचीसुद्धा श्रद्धा विशेष आहे. महाराणी जमनाबाई या विद्यमान असतां, या देवस्थानाचे कारभारात फारसे व्यवस्थेशीर स्वरूप आले नव्हते, ते आणण्यासाठी महाराज साहेबांनी फार परिश्रम घेतले. हल्ली या देवस्थानाचा कारभार सुरळीत चालत आहे, याचे सर्व श्रेय सयाजीराव महाराज यांनाच दिले पाहिजे.

### महाराणी जमनाबाई साहेबांच्या आश्रितांचा परामर्श

महाराणी जमनाबाई यांना ज्या लोकांचा प्रसंगी चांगला उपयोग घडला, त्यांना योग्य मोबदला देण्याची संधी सयाजीराव महाराजांनी व्यर्थ घालविली नाही. त्यांचा योग्य प्रसंगी सत्कार करून त्यांचे श्रमाचे सार्थक करण्यात आल्याचे आढळून येते. महाराणी जमनाबाई यांच्या कृपेतील व त्यांच्या आश्रयास असलेल्या नोकर वर्गांच्याही अन्नवस्त्रांची व्यवस्था महाराज साहेबांनी योग्य रीतीने लावली आहे. त्यांच्याजवळ असलेले कारकून व मुत्सद्दी, हुजरे व शिपाई, दासीवर्ग

व आश्रित बाया यांचा योग्य समाचार घेऊन त्यांना पोटाला पुरेसे अन्न व वस्त्र देण्यासाठी कळवळ्याचे हुकूम सोडण्यास महाराज साहेबांनी आळस केला नाही. जे लोक नोकरी करण्यास लायक होते त्यांना त्यांनी ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे निरनिराळ्या खात्यांत नोकऱ्या देवविल्या व ज्यांना नोकरी करण्याचे सामर्थ्य नव्हते अथवा जे नवीन सुधारलेल्या काळात नोकरी करण्यास तयार नव्हते, अशा लोकांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था नीट लावून दिल्यामुळे ते लोक श्रीमंत महाराज साहेबांचे उपकार वारंवार स्मरत असतात. राजकुटुंबातील एखादा मनुष्य परलोकवासी होताच त्याच्या तैनातीतील व आश्रयातील लोकांना अनाथ होऊन निर्वाहार्थ अनेक स्थळी याचना करण्याचा प्रसंग असतो, तसा तो येऊ न देण्यासाठी महाराज साहेबांनी फार काळजी बाळगली. महाराणी जमनाबाई यांच्या आश्रितांना दानदशा येणे हे महाराज साहेबांस मुळीच आवडले नाही, त्यामुळेच त्यांनी त्या लोकांची चांगली सोय लावून दिली. असे म्हटले असता चालेल. राज्यकारभाराची एवढी मोठी जोखीम अंगावर असताना त्यातल्या त्यात वेळ काढून सयाजीराव महाराजांनी आपल्या मातुःश्रींच्या आश्रित मंडळींचा परामर्श घेण्याचा जो प्रयत्न केला तो फारच प्रशंसा करण्यासारखा आहे. त्यांच्या या सर्व गुणांबद्दल प्रत्येक विद्वान व समंजस मनुष्यास आल्हाद झाल्यावाचून राहणार नाही.

## महाराणी जमनाबाई यांचे स्मारक

महाराज साहेबांनी आपल्या प्रिय मातुःश्रींचे कायम व विद्वानांना वंद्य असे स्मारक करण्याचाही दूरदृष्टीपूर्वक विचार करून त्या कामासाठी आपल्या खाजगीतून काही रक्कम येथील शाळाखात्यास सोपवली. ही रक्कम दिवाण व शाळाखात्याचे मुख्य यांच्या संमतीने चार किंवा पाच टक्क्यांच्या व्याजाचे व नियमित मुदतीचे कर्जरोखे (प्रॉमिसरी नोटा) खरेदी करण्यात घालून त्या रकमेच्या व्याजातून शाळाखात्याने नवीन व उपयुक्त पुस्तकांना आश्रय द्यावा, असा हुकूम महाराज साहेबांनी सोडला आहे. ज्या ग्रंथांना या रकमेतून आश्रय देण्यात येईल, त्या ग्रंथात मातुःश्री महाराणी जमनाबाई यांच्या स्मारकाचा उल्लेख केला जावा, अशा आशयाची उदात्त आज्ञा ता. ५ डिसेंबर सन १८९८ च्या हुकुमात स्पष्ट दर्शविली आहे. या स्मारकाची सर्व जबाबदारी शाळाखात्यावर ठेवली असल्याचे आढळून येते. महाराणी जमनाबाई यांचे हे स्मारक इतके महत्त्वाचे आहे की, त्यामुळे महाराष्ट्र ग्रंथसंग्रहात त्यांचे नाव अनंत काळापर्यंत कायम राहील व त्यापासून या देशातील विद्वान व होतकरू लोकांना उत्तम रीतीने लाभ मिळेल यात संशय नाही. या स्मारकाची मूळ रक्कम कायम राहून तिच्या व्याजातून ज्या उपयुक्त ग्रंथांना उत्तेजन मिळेल, त्यांची संख्या थोड्याच दिवसांत बरीच वाढली जाईल, ही गोष्ट कमी महत्त्वाची नाही. महाराज साहेबांचा हा हुकूम इतका महत्त्वाचा व विचार करण्यासारखा आहे की, त्यावरून त्यांची खरी मातृभक्ती व मराठी भाषेवरील त्यांचे अलौकिक प्रेम यांचे अभिनंदन करण्यास चांगली संधी मिळते. मातुःश्री महाराणी जमनाबाई यांच्या और्ध्वदेहिक कार्याकडे खर्चीलेल्या रकमेपेक्षा

या उपयुक्त कामाकडे खर्च होणाऱ्या रकमेची किंमत सहस्रपटीने मोठी आहे. हिंदुस्थानातील इतर एतद्देशीय राज्यकर्त्यांकडून ज्या प्रकारचे स्मारक अद्यापि झाले नव्हते तशा मासल्याचे अद्वितीय काम करून या देशातील सर्व राज्यकर्त्यांना उत्कृष्ट उदाहरण महाराज सयाजीराव यांनी घालून दिले, त्याबद्दल त्यांची करावी तितकी स्तुती थोडीच आहे.

❍❍❍

# उपसंहार

# चरित्रक्रमाचे सामान्य समालोचन

## गुणवर्णन

महाराणी जमनाबाई यांचा जन्म ज्या माने कुळात झाला त्या घराण्याच्या पूर्वापार नावलौकिकास अनुसरून या चरित्र नायिकेपासून वर्तन घडले. त्यांच्या अंगातील प्रत्येक सुगुण हिंदुस्थानातील एतद्देशीय राज्यात वरिष्ठ प्रतीच्या ठरलेल्या महाराण्यांच्या समुदायांत अग्रभागी शोभण्यासारखा होता. त्यांच्या माता-पित्यांनी व त्यांच्यासंबंधाने काळजी बाळगणाऱ्या आप्तेष्टांनी त्यांना बाल्यावस्थेत जे शिक्षण दिले, त्याच्या प्रभावाने बडोदे राज्याची ख्याती सर्व आशिया, युरोप व अमेरिकेत होऊ शकली. त्यांचे सद्गुण व त्यांचे चिरंजीवांचे उदात्त विचार हीच या गोष्टीची प्रत्यक्ष साक्ष आहे. महाराणी जमनाबाई यांच्या शरीराचा बांधा सडपातळ होता. तसेच त्यांचे सुप्रसन्न सुंदर वदन हा एक उत्कृष्ट नमुनाच होता. इ.स. १८७७ मध्ये दिल्लीस भरलेल्या बड्या दरबाराच्या वेळी महाराणी जमनाबाई यांची तसबीर काढण्यात आली. तिची प्रसिद्धी 'लंडन न्यूज' व इतर सन्मान्य पत्रांत झाल्यामुळे सर्व युरोप व अमेरिका खंडात त्यांच्या स्वरूपाची विशेष ख्याती झाली. हिंदुस्थानातील राजकुटुंबात गोषाचा रिवाज असल्याने राजस्त्रियांची स्वरूपे परकीयांस दिसण्याचा मार्ग नसतो; परंतु दिल्ली दरबारच्या वेळी नामदार लॉर्ड लिटन यांच्या अत्यंत आग्रहास्तव महाराणी जमनाबाई यांची तसबीर काढविल्यामुळे, त्यांच्या ठायी लोकांचा पूज्यभाव बराच बसला. आणि मुखश्रीचे तेज फारच अलौकिक होते. त्या रूपाने जशा सुंदर तशा गुणानेही तेजस्वीच होत्या. दयाळूपणा, परम धार्मिक स्वभाव, ईश्वरावरील निष्ठा, गुणग्राहकता, प्रसंगावधान आणि सहिष्णुता या गुणांची देणगी ईश्वराने त्यांना अप्रतिम दिली होती. त्यांच्यात विद्याप्रीती व अर्थगांभीर्याचे परिज्ञान फार होते. तसेच राज्यकारभार चालविण्याच्या कामात ज्या श्रेष्ठतम गुणांची आवश्यकता असते, त्यापैकी बहुतेक सुगुण यांच्यात मूर्तिमंत वसत होते. यांचा स्वभाव आनंदी व महत्त्वाकांक्षी असा होता; त्यामुळे त्यांना राज्यकारभार उत्तम रीतीने चालविता

आला. प्रत्येक गोष्टीचा त्या फार दूरवर विचार करीत असत. स्नेहसंवर्धन आणि स्वदेशाभिमान, राजनिष्ठा आणि समयोचितपणा; उदारता आणि धर्मश्रद्धा, राजकारणपटुत्व आणि बालसंगोपन शक्ती, दयाळूपणा आणि कुटुंबवात्सल्य इत्यादी सद्गुणांनी मंडित महाराणी जमनाबाई या बडोदे राज्याला भूषणरूप होत्या. विद्वानांशी संभाषण करण्यात आणि आपल्या धर्माची खरी तत्त्वे शोधून काढून, त्याप्रमाणे वागण्यात या फार दक्ष असत. यांना असत्याचा फार तिटकारा असे. लबाडी व असत्य यांच्यासंबंधाने त्यांना फार चीड येत होती. त्या मनाच्या मोकळया व अपकारावर उपकार करणाऱ्या अशा होत्या. ज्या मल्हारराव महाराजांनी यांची विटंबना करून, प्राणहारक यत्न चालविले होते; त्यांस प्रतिबंध होऊन मद्रासची हवा खाण्याचा योग आल्यावर, सर रिचर्ड मीडसारख्या वजनदार व धूर्त, कर्तव्यदक्ष आणि शोधक व एतद्देशीय राज्यांच्या हितासाठी ज्यांनी आपले सर्व आयुष्य खर्ची घातले, त्यांनी महाराणी साहेबांनी मल्हाररावांचा सूड उगवावा असा सल्ला त्यांस दिला असतानाही त्यांनी 'त्यांस उत्तम रीतीने वागवावे, त्यांचे मन दुखवू नये व ते आनंदात राहातील असे करावे' असे सांगून आपल्या मनाचा खरा मोठेपणा व्यक्त केला. त्यांच्या या गुणांची करावी तितकी स्तुती थोडीच आहे. प्रत्येक खेपेस ज्यांनी त्रास देऊन, यांच्याकडून बडोद्याचा त्याग करविला; त्या मल्हाररावांस त्रास व दुःख होऊ नये, यासाठी महाराणी साहेबांनी पराकाष्ठेची काळजी बाळगली. मल्हाररावांस नेमणूक बांधून देण्याची सत्ता मिळाल्यावर पूर्वीचे वैषम्य विसरून जाऊन, आपल्या उदारतेचा व मनाच्या मोकळेपणाचा लाभ मल्हाररावांस महाराणी जमनाबाई यांनी दिला; ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. या राजमातेचा प्रत्येक सुगुण हृदयपटावर कोरून ठेवण्यास पात्र आहे, यात बिलकूल संशय नाही.

## बडोदे राज्याचे संरक्षण व चांगल्या विचारांच्या माणसांची मदत, प्रजेची गादीविषयी निष्ठा

माने कुटुंबातील मुत्सद्दी मंडळीने महाराणी जमनाबाई यांचे गतवैभव पुनः संपादन करून देण्याकरिता आणि बडोदे राज्याची पुनरपी स्थापना करण्यासाठी जे परिश्रम घेतले, तेही कमी महत्त्वाचे नव्हते. मल्हाररावांचे कारकीर्दीच्या अखेरीस बडोदे राज्य खालसा होण्याच्या तयारीत होते. त्या समयी ब्रिटिश सरकारचे शाळाखात्याकडून हिंदुस्थानचे जे नकाशे छापले गेले, त्यात बडोदे राज्याला लाल रंग लावून, ब्रिटिश प्रदेश बनविला असल्याचेच आढळून येते. काही इंग्लिश ग्रंथकारांनी मल्हाररावांच्या अखेरीसंबंधी उल्लेख करताना, बडोदे राज्य हे ब्रिटिश सरकारच्या पूर्ण ताब्यात आले असतानाही खंडेराव महाराजांच्या योग्य कामगिरीच्या बदल्याची महाराणी जमनाबाई व त्यांचे चुलते दौलतराव माने यांनी हिंदुस्थान सरकारास वेळेवर आठवण देऊन, त्या सरकाराकडून अन्याय होऊ दिला नाही, याबद्दल फार आभार मानिले आहेत. मल्हाररावांच्या दुष्ट कृतींचा बदला त्यांना तर मिळालाच; परंतु त्यांच्या वारसांचेही हक्क ब्रिटिश सरकारने बडोद्याच्या गादीवरून उडवून टाकले. महाराणी जमनाबाई यांची

विनंती मान्य करून, त्यांना त्या सरकारने दत्तक पुत्र घेऊ दिला व ते चिरंजीव वयात येताच त्यांना राज्याची पूर्ण सत्ता दिली. ही गोष्ट सर्वांत फार विचार करण्यासारखी आहे. ग्वाल्हेर, इंदूर, जयपूर आणि दुसरी एतद्देशीय राज्ये यांनी गायकवाड सरकार यांच्या सत्तेचा नाश होऊ नये, याकरिता शेजारच्या राष्ट्रधर्मास स्मरून, सरकारकडून या राज्याचे बरोबर संरक्षण करविले, ही त्यांची कामगिरीही सामान्य नव्हती. प्रसिद्ध अहिल्याबाई होळकर यांनी पेशव्यांच्या तीक्ष्ण कटाक्षांतून इंदूर संस्थानचा बचाव करण्यासाठी शिंदे, भोसले व गायकवाड यांची मदत घेऊन त्यांचे संरक्षण केले, त्याच इतिहासाची पुनरावृत्ती महाराणी जमनाबाई यांनी करून, बडोद्याची राज्यसत्ता कायम ठेविली. बडोदे राज्य हे मल्हारराव महाराजांच्या कृत्याकडे लक्ष देऊन त्यावेळी खालसा झाले असते तर त्याचा परिणाम फारच विपरीत पडला असता; असे त्या वेळच्या एकंदर पत्रव्यवहारांवरून आणि बडोद्यातील कणसारे लोकांच्या दंग्यावरून अनुमान करण्यास हरकत नाही. ती वेळ फारच आणीबाणीची होती अशा प्रसंगी योग्य प्रसंगावधानाचा उपयोग करून, ब्रिटिश सरकारवर येणाऱ्या वाईट प्रसंगास ज्या महाराणी जमनाबाई व त्यांच्या सल्लागारांनी अग्रोपाय योजून प्रतिकार केला; त्यांची कीर्ती अर्वाचीन काळच्या हिंदुस्थानच्या इतिहासात अजरामर होऊन राहील यांत संशय नाही. दौलतराव माने यांस महाराणी जमनाबाई यांनी एक पत्र पाठविले; त्यात त्यांनी जे लिहिले आहे, ते वाचून कोणाही सदस्याचे हृदय द्रवल्यावाचून राहणार नाही. ...आमचे वडिलांनी आम्हास जन्म दिला व बडोद्याचे राजघराण्याशी संबंध जोडून देऊन ते स्वर्गवासी झाले! त्यांच्या पश्चात आपण आम्हास पितृतुल्य आहात. याकरिता या संकटातून सोडवून, बडोदे राज्याची पुनः स्थापना केल्यास, आम्हाला आपण पुनः जन्म दिला असे होईल. ..' महाराणी जमनाबाई यांनी हा पुनः मागितलेला जन्म दौलतरावांनी त्यांस दिला; इतकेच नव्हे तर बडोदे राज्य अप्रतिम बनेपर्यंत त्यांनी आपली कामगिरी बजाविली व तेही शेवटी संसारयात्रा सोडून चालते झाले! महाराणी जमनाबाई यांच्यावर जे संकटमय प्रसंग आले, त्यात त्यांना मदत करणाऱ्या लोकांपैकी काहींच्या प्राणाचे हरण मल्हाररावांनी केले; तथापि त्यांच्या पक्षातील लोकांनी आपले धैर्य खचू न देता, त्यांनी आपले कर्तव्य बजावून, बडोदे राज्यासाठी जी मेहनत घेतली, तिचा बदला देण्याच्या कामात त्यांचे पुत्र सयाजीराव यांनी आळस केला नाही. चांगल्या कामाचा बदला नेहमी चांगलाच मिळतो, हे या चरित्रावरून पूर्णांशाने प्रत्ययास येईल. शेवटी निराधार अबलेला छळणाऱ्या मल्हाररावांस आणि त्यांच्या सल्लागारास अंशतः झालेले शासन, हे कृत्यांच्या प्रमाणाने फारच थोडे होते. मल्हारराव महाराजांवर त्यांच्या रयतेचे जरी प्रेम नव्हते, तरी गायकवाडांच्या गादीवर तिचे निःस्सीम प्रेम आणि भक्ती ही फारच जास्त होती. गायकवाडांच्या गादीस मान देण्यास राज्यातील प्रत्येक मनुष्य तयार होता. मल्हारराव हे दृष्टीस पडताच त्यांच्या संबंधाने लोकांच्या मनात तिरस्कार उत्पन्न होत असे. त्यांना पदभ्रष्ट केले याबद्दल कोणासही वाईट वाटले नव्हते; परंतु बडोद्याच्या गादीवर राजा ठेवल्यावाचून त्यांना

पदच्युत केले, याबद्दल राज्यातील शहाण्या लोकांस वाईट वाटून त्यांनी ब्रिटिश सरकारकडे अर्ज केले. त्या अर्जाचा निकाल लागण्यास विलंब झाल्यामुळे शेवटी दंगाही झाला. मल्हाररावांच्या मुलाचा गादीवर हक्क नसावा, असे प्रजेचे मत नव्हते. बडोद्यास एतद्देशीय राजसत्ता पाहिजे, एवढाच प्रजेचा खास हेतू होता. गादीशी राजनिष्ठेने वागणे यातच हिंदुस्थानातील लोकांना मोठे भूषण वाटत असते. त्याचे प्रत्यंतर मल्हारराव महाराजांच्या पदभ्रष्टतेनंतर पूर्णांशाने आले.

## कर्नल बार यांच्या मदतीचा परिणाम

मल्हाररावांना गादीवर बसविल्यास त्याचा परिणाम काय घडेल, ते बडोद्यातील लोक जाणत होते. त्यास गादी मिळू नये, असे त्या वेळच्या हुशार कामदारांचे मत होते असे दिसते; परंतु कर्नल बार साहेबांनी मल्हाररावांचा पक्ष स्वीकारून आपल्या मतास जे वजन आणले ते विचार करण्यासारखे आहे. मल्हाररावांच्या स्वच्छंदीपणाची मर्यादा वाढविण्यास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने कर्नल बार हे बऱ्याच अंशाने कारणीभूत झाले, असे म्हणण्यास हरकत नाही. भाऊ शिंदे यांना दिवाणगिरीतून दूर केल्यानंतर मल्हारराव एके दिवशी त्यांना आपल्या बग्गीत घेऊन हिंडले. असे करण्याचे कारण, खंडेराव महाराजांच्या वेळच्या मंडळींविषयी आपल्या मनात असलेला विरुद्धभाव लोकांच्या नजरेस येऊ द्यावयाचा नव्हता एवढेच होते. तथापि ते सहन न होऊन कर्नल बार यांनी भाऊ शिंद्यांच्या वाड्यावर जप्ती बसवून मल्हारराव महाराजांच्या हातून जे कृत्य करविले, ते ब्रिटिश सरकारच्या दरबार वकिलास बिलकूल शोभण्यासारखे नव्हते. गायकवाड सरकार हे स्वतंत्र असताना त्यांच्या सत्तेत हात घालून किंवा त्यांना स्वच्छंदी बनवून त्यांच्या राज्यावर शेवटी प्रसंग कसा आणला, ते या चरित्रावरून उत्तम रीतीने कळेल. खंडेराव महाराजांच्या कृपेतील मनुष्यांसंबंधाने मल्हाररावांकडून जो अन्याय घडला असेल, तर त्याची निदान अर्धी जोखीम तरी कर्नल बार यांच्यावर येऊ शकेल. निराश्रित होऊन अन्नवस्त्रांकरिता बडोदे राज्यातून नेमणूक मागणाऱ्या महाराणी जमनाबाईंना वेळोवेळी जो त्रास, जो अपमान आणि जे दुःख सहन करावे लागले, त्याचे कारण तरी कर्नल बार साहेब हेच होय. याशिवाय दुसरे एखादे कारण असेल तर ते अद्यापिसुद्धा उघडकीस येऊ शकले नाही, हेही एक आश्चर्यच समजले पाहिजे. खंडेराव महाराज हयात असताना जे बार साहेब त्यांना पुत्राप्रमाणे मानीत होते, त्याच महाराजांच्या पश्चात ते इतके उलटले की, त्यांनी त्या महाराजांची अर्धांगिनी, त्यांचे नातलग, आश्रित आणि त्यांच्या कृपेतील लोक यांना जो त्रास दिला त्याचा विचार केल्यास प्रथम दोस्ती दाखवून प्रसंगी उलटणारे लोक कसे असतात त्याची कल्पना करता येईल. ब्रिटिश सरकारचा दरबार वकील इतका राज्य बिघडविण्यास कारणीभूत झाला असतानाही त्याबद्दल तपास न करता फक्त त्याची बदली होते आणि मल्हारराव महाराजांच्या कृतीचे परीक्षण करण्यासाठी कमिशन नेमून तपास होतो; परंतु त्या कामातही कर्नल बार साहेबांचे किती अंग होते, त्याचा तपास बिलकूल होत नाही. यातील 'पॉलिटिकल' कारण काय होते हे कोणासही कळले नाही.

## मल्हारराव महाराजांच्या वर्तनाचे सामान्य निरूपण

मल्हारराव महाराजांच्या हातून घडलेले अनेक विषप्रयोग किंवा प्राणहारक उपाय, त्यांनी चालविलेला स्वच्छंदीपणा, त्यांच्या सल्लागारांच्या कृत्रिमपणाने घडलेला संस्कार व एतद्देशीय राजांना एखाद्या प्रसंगी बिघडविण्यास सार्वभौम सरकारचे काही स्वार्थी नोकर कसे कारणीभूत होतात, त्याची प्रत्यक्ष उदाहरणे या चरित्रापासून कळून येतील. महाराणी जमनाबाई आणि त्यांच्या पक्षातील मंडळी ही जर कच्च्या धैर्याची व भोळ्या दिलाची असती, तर मल्हाररावांनी त्या सर्वांचे प्राण थोड्याच दिवसांत हरण करून टाकले असते. एका बाजूस सर्व सत्ताधारी आणि जे म्हणेल ते करून दाखविणारा प्रमुख राजा व दुसऱ्या बाजूस एक अनाथ अबला की जिच्याविषयी काळजी बाळगणारा त्या वेळच्या बडोदे दरबारात एकही मनुष्य नव्हता. अशा प्रसंगी या अनाथ महाराणी साहेबांच्या प्राणाचे रक्षण झाले व त्या अन्यायवर्ती राजाला प्रतिबंधात पडण्याची पाळी आली, ही गोष्ट सामान्य नाही. राजाच्या मनावर सद्वर्तनाचा व लोकलज्जेचा काहीतरी दाब असावयास पाहिजे. तो तसा नसल्यास किती अनिष्ट परिणाम घडतात व राजाच्या अयोग्य वर्तनाचा ठसा नागरिकांच्या मनावर कसा उमटतो ते विचार करण्यासारखे आहे. 'राजा कालस्य कारणम्' अशी गीर्वाण भाषेच्या साहित्य ग्रंथात एक म्हण आहे, तिला अनुसरून मल्हारराव हे बडोद्याचे कालचक्र फिरविण्यास सर्वांशाने कारणीभूत झाले. राज्यात सुधारणा करण्यासाठी ब्रिटिश सरकारने दीड वर्षाची मुदत देऊन चांगले हुशार कामदारही दिले होते; परंतु सुधारणा न होता उलट बखेडेच झाले, त्याची कारणे अनेक होती. नवीन आलेल्या कामदारांचे मल्हाररावांनी ऐकू नये याकरिता बळवंतराव राहूरकर, दामोदरपंत नेने, बळवंतराव देव, खानविलकर, हरिबा गायकवाड यांनी प्रयत्न चालवून त्या हुशार म्हणविलेल्या कामदारांविषयी त्यांचा वाईट ग्रह केला व त्या कामदार मंडळीस उदास बनविले. त्यांना नाराज करून ते कामास अयोग्य आहेत, असे त्यांनी त्यांस भासविले. राजा एककल्ली असल्यामुळे त्यास या कामगारांची सल्ला व युक्ती रुचेना. राज्यकारभारात पूर्वोक्त बालमित्र व खेळगडी मंडळींचा सल्ला येऊन, राजकारभारातील हुशार मंडळीचा पाडाव करीत असत; इतकेच नव्हे तर त्यांनी पुष्कळ वेळा त्यांचा पाणउतारा केल्याचेही आढळून येते. या लबाड लोकांचे वर्चस्व नवीन आलेल्या शहाण्या कामगारांस फारच असह्य झाले. प्रजेने राजाचे भय बाळगावे व राजाने प्रजेचे वजन कायम ठेवण्याचा यत्न करावा, हे जे राजनीतीतील मुख्य तत्त्व ते मल्हाररावांस बिलकूल ठाऊक नव्हते. राजाची सत्ता फार अपार आहे, त्यात हटकवण्याचा कोणासही अधिकार पोचत नाही, अशी ज्या सल्लागारांनी मल्हाररावांची समजूत केली होती, तीच मंडळी या राजकीय बखेड्याच्या मुळाशी होती यात संशय नाही. शहाण्या व पोक्त कामगारांचा ही मंडळी पदोपदी अपमान करून, आपले अन्यायी वर्चस्व स्थापन करीत असे व त्यास प्रत्यक्ष राज्यकर्त्याचे पाठबळ असल्याने, हुशार म्हणविलेली माणसेही शेवटी निरुपयोगी ठरण्याचा प्रसंग आला. राजाला ज्या लोकांचे साहचर्य घडावयाचे

ते कसे असले पाहिजे, त्याचे ज्ञान मल्हाररावांस नव्हते. वस्तुतः मल्हारराव हे राजकुळात व गर्भश्रीमंतीत उत्पन्न झालेले असता. त्यांना आपल्या कर्तव्याचे बरोबर ज्ञान नसावे व ते छांदिष्ट बनावेत हे ईश्वरीसत्र फारच विलक्षण आहे. त्यांच्या दुरभिमानाची व नीच स्वभावाची फळे शेवटी ईश्वराने त्यांस दिली. सदाचरणाचे फळ चांगले व दुराचरणाचे वाईट, याचा प्रत्यक्ष धडा मल्हारराव महाराज व त्याचे मित्रमंडळ यांजकडून त्या कारकीर्दीच्या अखेरीस सर्व लोकांस मिळाला. ज्या लोकांनी या जुलमी आणि अन्यायवर्ती कारकीर्दीत यथेच्छ हात मारून व राजास स्वच्छंदी बनवून आपला 'तळीराम गार' करण्याचा यत्न केला, त्या लोकांना व त्यांच्या वंशजांना आज कोणती दशा भोगावी लागत आहे, त्याचा विचार केल्यासही सद्बोध मिळण्याचा संभव आहे. जे सल्लागार मल्हारराव यांच्या जवळ नसावेत किंवा ज्यांना त्यांनी आपल्याजवळ ठेवू नये, अशी ब्रिटिश सरकारने सूचना दिली होती; तिचा अंमल बरोबर झाला असता, तर पुढे त्या भोळ्या राजावर जो अनिष्ट परिणाम घडला तो बिलकूल येऊ शकला नसता. मल्हाररावांस स्वतः काही समजत नसे, तथापि 'मी मोठा शहाणा, धूर्त व मुत्सद्दी' अशी त्यांची समजूत असल्याने ते इतर शहाण्या माणसांस धिक्कारीत असत. दादाभाई नौरोजी व काजी शहाबुद्दीन यांना या राज्याची भावी अवस्था चांगली न वाटून, त्यांना राजीनामे देऊन जाण्याचा प्रसंग येणे आणि मल्हाररावांच्या बोलण्यात धरबंद नसणे, या दोन गोष्टी राजकीय दृष्टीने फारच अनिष्ट घडल्या. दोघांची भांडणे लावून देणे व आपण मौज पाहात बसणे हा दुर्गुणही मल्हाररावांत पूर्णांशाने वसत होता. याच गोष्टीमुळे कर्नल फेयर व दादाभाई नौरोजी यांच्यात वितुष्ट पडून, चांगल्या हुशार म्हणविलेल्या दिवाणांत बडोदे सोडण्याचा प्रसंग आला. मल्हाररावांना दादाभाई हे आवडले नाहीत. याजवरून त्यांना चांगली माणसे आवडत नसत हे उघड होते. राज्यकारभाराची सूत्रे हातात येईपर्यंत मल्हाररावांचे प्रजेशी वर्तन कशा प्रकारचे होते व नंतर त्यांचा स्वेच्छाचार कसा कसा वाढत गेला, आणि त्यांच्या प्रत्येक बाबतींविषयी ब्रिटिश सरकारचे मत कसे बदलत चालले, त्याचे परिज्ञान या उदाहरणावरून होईल. ज्या प्रजेच्या पैशावर मल्हारराव हे ऐश्वर्य भोगीत होते, त्या प्रजेचे त्यांच्याकडून होणारे छळ आणि राज्यसंस्थापनेस कारणीभूत झालेल्या लोकांच्या वंशजांवर त्यांनी आणलेले प्रसंगही ध्यानात ठेवण्यासारखे आहेत. त्या सरदारांना बडोद्यात आता राहणे नको असेच झाले होते. मल्हाररावांकडून घडलेली प्रत्येक गोष्ट त्यांच्याविरुद्ध खटपट करणाऱ्या पक्षास किती उपयुक्त होऊन पडली व ब्रिटिश-सरकारकडे कागाळ्या घेऊन जाणाऱ्या लोकांस, त्या अन्यायवर्ती राजास पदभ्रष्ट केल्यानंतर, त्यांस काय बदला मिळाला, तेही विचार करण्यासारखे आहे.

### मल्हाररावांच्या गुणांचा प्रताप

मल्हारराव महाराजांचा उदारपणा हा बऱ्याच अंशाने सहेतुक होता. त्यांच्या विलक्षण इच्छा आणि नित्यक्रम, यांस ज्या लोकांनी मदत केली त्यांना मल्हाररावांनी गब्बर केले. संकट काळात

ज्यांचा त्यांना उपयोग पडला त्यांचे उपकार फेडण्याचा आणि ज्याला 'आपला' असे म्हटले, त्यांच्या कल्याणासाठी झटणे हा सुगुणही त्यांच्यात वसत होता. हा त्यांचा सद्गुण शेवटी दुर्गुणांतच मोडला गेला. कोणत्या मनुष्याला कोणता हुद्दा द्यावा व त्याच्या जवळून राज्यकारभारातील कोणते काम घ्यावे त्याचा त्यांना विचार नव्हता. त्यांच्या उदार स्वभावाचा लाभ अपात्र लोकांस मिळून, त्यांच्यातील दुर्गुण मात्र विशेष वाढले. 'हांजी हांजी' करणारांचा व दुर्वर्तनीयांचा जोर या राजाजवळ जसजसा वाढत चालला, तसतशी बडोद्याच्या राज्यरूपी आकाशात अनिष्ट ढगे येत चालली. शेवटी तर भयंकर संकटमय कडाक्याची वृष्टी होऊन, राज्यावर प्रलयकाल येतो की काय अशी धूर्त लोकांस चिंता पडली. राजकीय संपत्तीचा विनियोग वाईट मार्गाला करून व साथीदाराच्या तंत्राने वागून, मल्हाररावाने आपल्या नावास इतिहासात दूषणे मात्र लावून घेतली. भावी राज्यकर्ते व श्रीमंत लोक यांनी या उदाहरणापासून योग्य धडा घेण्यास चुकू नये. मल्हाररावांस राज्यकारभार चालविण्यासाठी चांगली मनुष्ये मिळाली होती; परंतु कोंबड्यास सापडलेल्या रत्नाप्रमाणे त्यांची स्थिती झाली.

राज्यकारभारांस वाकबगार काय ते आपले सल्लागार व खुशमस्करे हेच आहेत; अशी त्यावेळची समजूत होती. एखाद्या नकल्याने नव्या व हुशार अंमलदाराची नक्कल करून दाखविल्यास हा रंगेल व चैनी राजा खुश होऊन, त्या नकल्यास पारितोषिक देत असे; परंतु मल्हाररावांच्या दोस्तांपैकी कोणाची खरी नक्कल करून दाखविल्यास, मात्र त्याजवर रोष होत असे. आपल्या कृपेतील मनुष्य कितीही वाईट असेल, तरी त्याला चांगले मानून त्याचा राजदरबारात सन्मान होत असे. अवकृपेस पात्र झालेला मनुष्य कितीही हुशार व सद्गुणी असेल तरी तो मल्हारराव महाराजांच्या व त्यांच्या सल्लागारांच्या दृष्टीने त्याज्यच ठरत असे. खऱ्या सद्गुणांची पारख या राजाला बिलकूल नव्हती. तो स्वतःस फार मोठा शहाणा व तत्त्वज्ञानी म्हणवीत असे. 'महाराज फार हुशार आहेत,' असे सहज म्हटल्यास त्यांचा चांगला सत्कार होत असे. खोटी स्तुती करणारांचा धंदा यावेळी बराच ऊर्जित दशेत आला होता. खंडेराव महाराज हे गुणवान व कर्तव्यदक्ष होते आणि मल्हाररावांत त्या गुणांचा सर्वस्वी अभाव होता. रात्रंदिवस विलासात दंग होऊन बसणाऱ्या राजाच्या कारकीर्दीत बखेड्यांचा उद्भव होण्याचा विशेष संभव असतो. ती गोष्ट मल्हाररावांनी प्रत्यक्ष दाखविली आहे. राजे लोक चैनी, विलासी, हलक्या स्वभावाचे व विवेकशून्य निपजल्याने असंख्य राज्ये नष्ट झाल्याचे इतिहासावरून शाबीत होते.

## मल्हाररावांच्या वर्तनाचा परिणाम

बडोद्याची गादी ताब्यात येताच मल्हारराव महाराजांनी आपल्या बंधूंचा सूड उगविण्यासाठी भ्रातृपत्नी व बंधूंचे आश्रित यांना त्रास देण्यास आरंभ केला. त्यांना त्रास दिल्यास ते लोक कंटाळून निघून जातील व आपल्या राज्यात घोटाळे होणार नाहीत अशी त्यांची समजूत होती. खंडेराव महाराजांच्या वेळी राज्यकारभारात हुशार ठरलेली माणसे त्यांनी नालायक ठरविली.

इतकेच नव्हे तर त्यांच्यावर तर्कटे उभी करून त्यांना यांनी खराबही केले. त्या लोकांच्या जागेवर मल्हाररावांनी आपले खुशमस्करे व करमणूक करणारे यांच्या नेमणुकी केल्या. मनुष्याची लायकी न पाहता त्यांनी आपले आप्त व इष्टमित्र यांना मोठमोठ्या जागा देऊन त्यांच्या हातून राज्यकारभार घेण्यास आरंभ केला. राज्यात खरा सल्लागार कोणी उरला नव्हता. मुत्सद्दीपणा शिल्लक नसल्याने यत्किंचित हुजऱ्यासुद्धा राजकीय भानगडीत पडून आपले वर्चस्व स्थापन करीत असे. खराब चालीचे लोक यावेळी वैभव शिखरास पोहोचत. त्यामुळे तसे होण्याची प्रवृत्ती विशेष वाढली. मल्हारराव महाराजांची कारकीर्द म्हणजे त्यांच्या जवळच्या मंडळींची अपार वाढलेली राजसत्ता हीच होय. ताटवाल्या पोरींपासून ते थेट दिवाणापर्यंत सर्व नोकर आपले वर्चस्व स्थापून राज्याच्या कामास लागण्याच्या प्रयत्नांत गढून गेले होते. कामाठी, हुजरे, खिजमतगार हेच काय ते राजकारणी मुत्सद्दी पुरुष अशीही समजूत या राजाची झाली होती. कित्येक वेळी दिवाण दादाभाई हे कामे समजावीत असताना हुजऱ्यांनी मध्यंतरी बोलून त्या हुशार म्हणविलेल्या दिवाणाचा अपमान केला असल्याचे आढळून येते. मल्हाररावांच्या या स्वभावाचा लाभ हलक्या दर्जाच्या लोकांनी बराच मिळविला. या स्वभावामुळे चांगल्या स्वभावाच्या माणसांचे मात्र फार नुकसान झाले.

## ईश्वरी संकेताने घडलेल्या ठळक गोष्टी

बडोद्यास मल्हारराव महाराजांच्या राजकीय हक्कांची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून ईश्वरी सूत्रास अनुसरून ज्या गोष्टी घडल्या त्या एकंदरीत फारच महत्त्वाच्या होत्या. आपल्या बंधूला ठार मारून राज्य मिळविण्याची अत्युत्कट इच्छा व त्या कामात मल्हाररावांस आलेले अपयश, त्यांच्या या घातकी वर्तनाचा बदला त्यास मिळून पात्र्यास कैदेत जाऊन बसण्याचा दुर्दैवी योग, खंडेराव महाराजांचा अंत होताच त्यांना अनायासे मिळालेले राज्यवैभव, महाराणी जमनाबाईस पुत्र झाल्यास राजलक्ष्मीस मुकावे लागेल ही त्यांची भीती, तिच्या निवारणार्थ त्यांनी योजिलेले घातकी उपाय, त्या कामात त्यांची झालेली निष्फळता, पुत्र न होता महाराणीस कन्यारत्नाची प्राप्ती होणे, ईश्वराने कायमचे राज्य आपणास दिले म्हणून मल्हाररावांस आनंद होणे, पूर्व सुकृताविषयी त्यांना अभिमान वाटणे, खंडेराव महाराजांच्या प्रिय पत्नीला आपण खास दुर्दैवी आहोत असे वाटून त्यांच्या मनास औदासीन्य येणे, तरुण व ऐश्वर्यसंपन्न महाराणीचे वैभव शिखरावरून एकदम पडणे, तिचे खुशीने हद्दपार होणे, पुनः बडोद्यास न येण्याचा निश्चय होणे, त्यांनी पुनः बडोद्यास पाऊल ठेवू नये असा मल्हाररावांकडून प्रयत्न चालणे, गादीवर असलेल्या राजास कैदेत जावे लागणे, हद्दपार झालेल्या अनाथ राणीला राज्यवैभव मिळून तिचे बडोद्यात परत येणे, जो एका खेडेगावातील गरीब कुटुंबात जन्मलेला मुलगा तो या महाराणी साहेबांचा दत्तकपुत्र होणे, त्यास राज्यवैभव मिळून बडोद्याचे पूर्ण सत्ताधारी बनणे, त्यांचे आचरण

गर्भश्रीमंताप्रमाणे* भासणे, उखाजीराव व काशीराव यांचे फार दिवसांचे प्रयत्न सफल होणे त्या लोकांच्या स्वप्नीसुद्धा आपल्या गावात राज्यकर्ता निपजल्याची वार्ता येत नव्हती. तेथेच एक उत्कृष्ट राज्यकर्ता निर्माण होणे, त्याजकडून जन्मग्रामाचा उद्धार होणे, तो उत्कृष्ट राज्यकर्ता निपजला म्हणून जगावर ख्याती होणे, तो सर्व शास्त्रे व सर्व देश यांच्याबरोबर ज्ञान मिळवितो व बडोदे राज्यास अप्रतिम बनवितो वगैरे गोष्टी दैवी संकेताच्या वृत्तांत्तांनी पूर्ण भरल्या असून, त्यांवरून ईश्वराच्या अगाध लीलेचा स्पष्ट बोध होतो.

## बडोद्याचे झालेले रूपांतर

सयाजीराव महाराज हे सद्गुणशाली निपजले व बडोदे राज्याचा कारभार उत्तम रीतीने चालविण्यास समर्थ झाले, त्याचे सर्व श्रेय महाराणी जमनाबाई यांनाच आहे. त्यांची नीतिमत्ता वाढवून त्यांना निष्कलंकित बनविले. इतकेच नव्हे तर ते उत्तम नीतिमान आहेत असे लोकांच्या प्रत्ययास आणून दिले; या सद्गुणाबद्दल महाराणी जमनाबाई यांची प्रशंसाच केली पाहिजे. सयाजीराव महाराजांच्या अंगातील सद्गुण इतके श्रेष्ठ आहेत की, ते आज वीस लक्ष प्रजेवर शांतपणाने राज्य करीत आहेत. तसेच हिंदुस्थानातील सर्व राजेलोकांत यांचा दर्जा बराच श्रेष्ठ पदास जाऊन पोहोचला आहे. पूर्वीच्या गायकवाडांनी केवळ समशेरीच्या व अंमलदारांच्या जोरावर राज्य संपादन प्रजेचे संरक्षण केले आणि महाराणी जमनाबाई व त्यांचे प्रिय पुत्र सयाजीराव यांनी केवळ बुद्धिसामर्थ्याचा उपयोग करून प्रजेत स्वस्थता ठेवून तिच्या वळणात सुधारणा केली. तलवारीच्या बळावर राज्य चालविण्याचा काळ निघून जाऊन शांततेचा समय येताच सर्व एतद्देशीय राज्यात या बडोदे राज्यानेच सुधारणेमध्ये अग्रपद मिळविले. शौर्यकाळात जे राज्यकर्ते पुढे होते, तेच शांततेच्या काळातही पुढे आले, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

## सुगुण श्रेष्ठतेमुळे महाराणी जमनाबाई या विशेष पूज्य झाल्या

अनाथ व शहाण्या लोकांचे महाराणी जमनाबाई हे आश्रयस्थान होते. त्यांनी धार्मिक व राजकीय कामांत चांगला लौकिक मिळविला. दुःखी व कष्टी लोकांना हातभार लावण्याच्या कामात त्या फार तत्पर असत. परदुःख त्यांना विशेष तापदायक वाटत असे. ईश्वराने त्यांना उदात्त विचार आणि उदार स्वभावाची दिलेली देणगी फारच अपार होती. त्यांच्या या सुगुणामुळे

---

*राजा सर टी. माधवराव यांनी महाराणी जमनाबाई यांच्या संक्षिप्त चरित्रात म्हटले आहे की, .... गादीवर बसलेला राजा पुनः तुरुंगात जातो, हद्दपार झालेली राणी पुनः राजमहालात येऊन राजमाता या नात्याने वैभव भोगू लागते, तिचा दत्तकपुत्र की जो अगदी थोड्या दिवसांपूर्वी एका खेडेगावचा रहिवासी होतो, तो सर्वोत्कृष्ट एतद्देशीय राज्याचा एक महाराजा होतो, शहाणपणाने आणि स्थिती सांभाळून तो गर्भश्रीमंताप्रमाणे आपले खरे कर्तव्य बजावितो. या फेरफारांबद्दल महाराणी जमनाबाई या कृतज्ञतापूर्वक ईश्वराचे नेहमी आभार मानीत असतात... ... ..."

त्या लोकांत विशेष पूज्य झाल्या. त्यांना जो मान मिळत असे, तो फक्त राजाची माता एवढ्याच उद्देशाने मिळत नव्हता. त्यांच्यातील सद्गुणांमुळे त्या जास्त मान मिळविण्यास पात्र झाल्या. हिंदुस्थान सरकारने त्यांचा वेळोवेळी गौरव केला. त्याचे कारण तरी त्यांची सुगुणसंपन्नता हेच होय. प्रत्येक राजकीय कामात त्या यशस्वी झाल्या. त्याचे खरे कारणही वर नमूद केलेलेच होते. प्रतिपक्षाकडून केवळ अन्याय बुद्धीने त्यांचा छळ झाला असतानाही त्या आपल्या खऱ्या सत्वास ढळल्या नाहीत. त्यांनी आपला निश्चय कधीही ढळू दिला नाही. ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. ही गोष्ट करण्यासारखी आहे. क्षत्रिय पत्नींच्या अंगात राजकार्यनिपुणत्व व सत्त्वशीलवृत्ती याचे मुख्यतः वास्तव्य असावे लागते. हे दोन्ही गुण यांच्या ठायी विशेष वसत होते. चांगल्या लोकांच्या सल्ल्याने चालण्याचा त्यांचा निश्चय हो त्याचीच सुफळे त्यांना पुढे अक्षय मिळाली. जेथे खऱ्या सुगुणाची किंमत असते ते स्थान नेहमी विजयशाली निपजल्यावाचून राहत नाही, असा जगाचा नियम आहे.

## त्यांच्या दानधर्माचे सामान्य स्वरूप

या धार्मिक बाबतीत फार उदार होत्या हे त्यांच्या चरित्रक्रमावरून नजरेस येईल. महाराणी साहेबांनी मोठमोठे साधू, महंत, विद्वान वगैरे लोकांस वारंवार देणग्या व बक्षिसे देण्याचा बराच खर्च झाला. त्यांनी इ.स. १८७७ मध्ये जुलै महिन्यात पैठणकरबुवांस एक सुंदर व तरुण हत्ती शृंगारून बक्षीस दिला. हा हत्ती देण्याच्या कामांत राजा सर टी. माधवराव दिवाण यांची पूर्ण अनुकूलता होती. या औदार्यामुळे त्यांची कीर्ती सर्व महाराष्ट्रात विशेष पसरली. एकंदरीत त्यांचा बहुतेक दानधर्म, देणगी विशेष करून ब्राह्मणभोजने करणे, त्यांस भरपूर दक्षिणा देणे, त्या जातीस संतुष्ट करणे, एवढ्याच प्रकारचा विशेष होता असे आढळून येते. ती ब्राह्मण जातीतील विद्वानांची संभावना करण्याकडेही त्यांचे बरेच लक्ष होते. याच कारणावरून 'भाग्य विप्रगणस्य' अशी विद्वान लोकांकडून त्यांची वारंवार स्तुती होत असे. ब्राह्मणेतर जातीतील विद्वान व बहुश्रुत आणि हुशार लोकांसही त्यांनी उत्तेजन देण्यात बराच पैसा खर्चिला. विद्या व कला यांना त्या चांगले उत्तेजन देत असत. अर्वाचीन विचारांना प्राधान्य देऊन शाळा, दवाखाने व इतर प्रकारच्या लोकोपयोगी संस्था याकडे त्यांनी पैशाचा बराच विनियोग केला असता, तर त्याचा देशस्थितीवर फारच चांगला परिणाम घडला असता. तथापि त्या समयास अनुसरून त्यांनी जो दानधर्म केला. तो योग्य मार्गानेच झाला असे म्हटले पाहिजे. त्यांच्याजवळ असलेल्या मंडळींच्या समजुतीस अनुसरून त्या गोष्टी घडल्या असाव्यात. अथवा त्यांनी जो जुन्या चालीरीतीस अनुसरून दानधर्म केला. त्याचे कारण त्यांची पूर्वापार चालत आलेली धर्मश्रद्धा हेही असू शकेल. त्यांची धर्मश्रद्धा जशी अलौकिक होती, तशीच त्यांच्यात स्वदेश प्रीतीही विशेष वसत होती. नव्या व जुन्या विचारांच्या लोकांना त्यांचा चरित्रक्रम एकंदरीत सारखा आदरणीय वाटल्यावाचून राहणार नाही. राष्ट्रास ऊर्जितावस्था येण्या समयीच अशी माणसे निपजत असतात, असे जगाच्या एकंदर इतिहासाचे परिशीलन केल्यास आढळून येते.

○○○

# परिशिष्ट पहिले

# रहिमतपूर येथील माने घराण्याचा वंशवृक्ष



## परिशिष्ट दुसरे

# महाराणी जमनाबाई साहेब गायकवाड यांची जन्मपत्रिका

श्री गणेशाय नमः सजयति सिंदूरवदनो देवो यत्पादपंकजस्मरणम् । वासरमणिरिव तमसां राशी नाशयतु विघ्नानाम् ॥ श्री विक्रमार्क संवत् १९१० श्रीमन्नृपशालीवाहन शके १७७५ प्रमादीनाम संवत्सरे याम्यायनगते श्रीसूर्ये वर्षाऋतौ महामांगल्यप्रदमासे श्रावण मासे कृष्ण पक्षे १० घटि १० पलानि ३६ सह ११ चंद्रवासरे आर्द्रा नक्षत्रे घटि ४९ प. ४ सह पुनर्वसू जन्म नक्षत्रे सिद्धीयोग घटि ४४ प. २५ सह व्यतिपात योगे बव करणे एवमादि पंचांगशुद्धावत्र दिने श्रीसूर्योदयात् इष्ट घटि ५३ पलानि ५ समये गौब्राह्मणप्रतिपालक श्रीमती महाराज्ञी जमनाबाई गायकवाड येषां जन्म.




॥ शुभं भवतु. ॥

## परिशिष्ट तिसरे

# श्रीमंत सेनाखासखेल समशेर बहादूर गायकवाड सरकार यांच्या राजकुळाचा वंशवृक्ष

- नंदाजी
  - केरोजी
    - दमाजी पहिले (१) (मृत्यू १७२१)
      - पिलाजीराव (दत्तक आले) (२) (मृत्यू १७३२)
        - दमाजीराव दुसरे (३) (मृत्यू १७६८)
          - गोविंदराव (४) (८) (मृत्यू १८००)
            - आनंदराव (९) (मृत्यू १८१९)
            - सयाजीराव (दुसरे) (१०)(मृत्यू १८४७)
              - गणपतराव (११) (मृत्यू १८५६)
              - खंडेराव (१२) (मृत्यू १८७०)
                - सयाजीराव (१४) तिसरे (दत्तक आले) सांप्रतचे सयाजीराव महाराज
              - मल्हारराव (१३) (पदच्युत १८७५)
            - फत्तेसिंगराव
              - गोविंदराव (दत्तक)
                - सदाशिवराव
                - मुरारराव
            - कान्होजीराव दासीपुत्र
          - सयाजीराव (५) (पहिले) (मृत्यू १७९२)
          - फत्तेसिंगराव (६) (मृत्यू १७८९)
          - मानाजीराव (७) (मृत्यू १७९३)
        - २ खंडेराव कडीचे जहागिरदार
        - प्रतापराव
          - काळोजीराव
            - गबाजीराव
              - भिकाजीराव
                - सखारामराव
                - उखाजीराव
                - गबाजीराव
                - काशीराव
                  - आनंदराव
                  - गोपाळराव सांप्रतचे सयाजीराव महाराज (दत्तक गेले)
                  - संपतराव
                - बाबूराव
    - हिंगोजी
      - पिलाजी (पहिले) पहिल्या दमाजीरावांस दत्तक)

# परिशिष्ट चौथे

## अथ श्रीयमुनादेवी प्रयाणशोक श्लोकाः*

भूमौ केनचिदुग्रभूरितपसा दैवाद्यदप्यागता,
याता कल्पलतो स्वरे तदुचितं सीता यथा मातरम्;
अस्ताद्रेः कलिकालकोटरतनोः संमर्गतः किं प्रभा,
भानोरस्तमिताद्य नाम यमुना नोलक्ष्यते केन चित् ॥१॥

भाग्यं विप्रगणस्य धर्मयशसोर्मूले वणिग्वैभवम्
तेजः क्षत्रगणस्य मानमथवा भृमण्डस्थायिनाम्;
आदाय प्रमदोत्तमां शरशरांकेन्दद्वकोर्जेऽसिते,
द्वित्वा क्रान्तितिथो महीजदिवसे संसारमेषा जहौ ॥२॥

गृहीत्वा देशानां भयरहितनैपुण्यमथवा,
नृपाणां स्वातंत्र्यं जनपदसुखानीह सहसा;
गता लोकं हित्वा सपदियमुना तर्हि यमुना,
मनाक् चित्तस्वास्थं कथमिव विघन्तां जलतनुः ॥३॥

बुधानां सर्वस्वं हृतमिव बदालद्यविधिना,
न जाने भृत्यानां किमिह परिहीनं करुणया;
परं जाने नूनं जगति विदितं वेदवद्यनै
विधिः कर्ता मर्ता सकलजनहर्तेति सदृढम् ॥४॥

---

*हे श्लोक महाराणी जमनाबाई यांच्या मृत्यूनंतर ता. १८ डिसेंबर १८९८ च्या 'बडोदा वत्सल' पत्रात प्रसिद्ध झाले आहेत. यातील वर्णन ईशः खरे असल्याने हे काव्य येथे दिले आहे.

महाशोकं लोको विशति तमसा व्याप्तमिवरम्,
सयाजीरावाणां कथमिव सुधैर्य प्रमयतु!
गतं नष्टं सर्व मिलति भुवने किन्तु जननी,
मृता लभ्या केन प्रचुरतरयत्नेऽपि जगति ।।५।।

दत्वा दानं जगति विपुलं लब्धवत्या यशासि,
प्राप्ती मृत्युस्समयवंशतो नायमत्यन्तगोः,
लोकीः शोकाकलितं हृदयास्सर्वमेवाक्षिपन्ति,
स्वीयं दोषं बहुविधममीदैवसादामनन्ति ।।६।।

इतिश्री यमुनादेवी - प्रयाण निर्मितं मया;
सुधियः सुप्रसन्नास्युर्वटोदरपुरी गताः ।।७।।

इति श्री बलियामण्डलान्तर्गत कुरेजीग्राम निवासी पंडित लालजी
शास्त्रिणा विरचितो यमुनादेवीस्वर्गवासशोकः ।।

❍❍❍

# परिशिष्ट पाचवे

# अथराज्ञीयमुनाचरितम् ।

संस्कृतचे प्रोफेसर सोमनाथ सदाशिव वाडीकर, ग्वाल्हेर कॉलेज यांनी महाराणी जमनाबाई साहेबांच्या स्वर्गवासानंतर तयार केलेले काव्य.

नीवृत्यास्ते[१] रहिमतपुरं शोभनं दाक्षिणात्ये,
मानेवंशो विलसतितरां तत्र विख्यात कीर्तीः
तस्मिन्जाता प्रचितयशसः पुरुष केऽप्यसख्याः..
कृत्वा युद्धं स्वविषयकृते [२]कालधर्म गता थे ॥१॥

तस्मिस्वंशे समजनिमहादैवशालीसुबुद्धि ....
रन्येषां यो हितकृदमिधा यस्य विश्वासरावः;
कन्यारत्नागुणगणयुतं तस्य दरिषु अज्ञे,...
तिथ्यामादौ वियति विमले चंद्रलेखवशुक्रे ॥२॥

शाके वर्षे शरमुनिमुनिब्रह्मसंज्ञे (१७७५) दशग्याम्,
तिथ्यां पासे [३]नभति बननं कृष्णपक्षके समासीत्;
तस्मादहप्रभृतिनितरामृद्धिमत्सदम तस्या
स्तातस्यासीद्धवति सुखदं तादृशां जन्मलोके ॥३॥

सा चात्यन्तं मधुरवचना तीव्रबुद्धिप्रकाशा,
पिन्नोर्वेश्मन्यविस्तमुखं प्रापिता बुद्धिमापत्;

---

१. नीबृति देशे ('तीवृज्जनपदोदेश' इत्यमरः)

२. कालधर्म गतः मृता :।

३. नभति श्रावण (नभा श्रावणिकश्च इत्यमरः)

वोढा कामं धुरमति गुरुं राजयानस्य यस्मा
द्धाता नूनं सुमतिविभवं दत्तवान्कोमलाग्यै ॥४॥

मानीशूरः सकलसुधियाँ संग्रहीता वदान्यः,
खंडेरावोऽतिसुरभियशसा गुर्जराणां महीपः।
तुष्टस्तस्यागुणनिवहतस्तामियोषात्मदारान्,
कर्तुं वाच्छन्निवनिजगुणग्राहितामष्यवन्ध्याम् ॥५॥

लब्वा सद्यो नृपतिसदने भूमिसापत्न्यमावं,
देवीश्दं युवतिजनप्रार्थ्यमानं च शस्यम्:
मुब्जानासा कतिपयसमो राजभोगाननैषीत्,
मत्रां सार्ध मुदितमनसा दुःखलेशाद्विनैव ॥६॥

शत्रूज्जेता गुरुजनमुदं चापि दातातिविद्वान् :
पृथ्वीपालः सविनयमुहृदुर्विनीतान्विनेत;
पुत्रो मे स्यान्निखिलजगति ख्यात इत्याशया सा,
हर्षाधिक्यं युवतिरवहभभारेण सत्रा ॥७॥

गर्भानो स्यायद्यि सुजनयोऽहं तदामीव मक्त्या,
देवीमम्बामसुरमथिनी पूज्ययिष्ये प्रयत्नात्;
इत्थं चाशा मनसि बहवः प्रादुरासन्महत्यः
कालस्तस्याः पतिमपहरंस्तांश्चलातुं प्रवृत्तः ॥८॥

दुर्दैवेन [1]त्रिदशगणनां प्रापिते हन्त! पत्यौ,
राज्ञी बाला पतिविरहजं शोकमारं बमार;
अस्तं याते दशशतकरे सर्वलोकैकजीवे,
सायंकाले [2]तुहिननिकृता म्लानतां पद्मिनीव ॥९॥

क्वेयं राज्ञी बत मुरुचिरा शोकलेशानभिज्ञा,
घोरः क्वायं हृदयदलनो भतृनाशः कृतान्त!
प्रोचुः पौरा अहह! घटनानहयोमेलनेव,
लोके यत्ते विषमकरणे पाटवं दर्शितं तत् ॥१०॥

ऋद्धं राज्यं सपदि यमुनां चापि वैधव्यदूनां,
हित्वा याते पुरजनमनः पद्ममूर्वेऽव नीशे;

---

१. देवत्थं मरणमिति यावत,

२. हिमपीडिता

तस्य भ्राता नृपपदमनुप्रापत मल्हारराव:,
यस्मिन्दण्डं धृवति तनाः स्मारितः पूर्वराजान् ॥११॥

भ्रातृढेषात्किमपि यदयंमय्यनार्थ विदध्यात्,
[१]देवाकष्टं तदिति हृदये शङ्कमानेव तस्यौ;
आकांक्षन्ती प्रसवसमयं [२]स्वाश्रयेणाधिराज्या,
भर्तु शो भवति हि भृशं दुःखकारी सतीनाम् ॥१२॥

काते प्राप्ते नृपति वनिता हन्त! कन्यं प्रसूता,
खाशाभङ्गात्समधिकृतूरं व्यग्रचित्ता बभूव;
देवादत्तां परिमिततमां वृत्तिमादाय चक्रे,
वासं [३]पुर्योभिघपुरवरे दानशीला यतात्मा ॥१३॥

इंदूरस्थो व्यतरदनिशं भ्रातृवात्सल्ययुक्तः,
तत्साहाय्यं यदभिलपितं राजवर्यस्तुकोजी;
संपत्तिं स्वां परहितकृते ये विमुश्चन्ति सन्तः,
नृयणां वंद्यास्त इह भुवने तेहि धन्या न चान्ये ॥१४॥

दैवी चित्रा गतिरितिजना यद्दन्तीह लोके,
कर्तृ सत्यं तदिवनृपतिश्चावितः स्वाधिकारात् ;
चक्रेशिन्याः प्रतिनिधिपदालंकृतो नॉर्थब्रूकः
भपं साकं मितपरिजनैः प्राहिणो [४]दूरदेशम् ॥१५॥

प्रत्यागन्तुं स्वविषयमथो दत्रिमं पुत्रमाशु,
स्वीकर्तृ सा निजकुलजनि बालकं राज्ययोग्यम्;
लब्ध्वानुज्ञां शिरसिनिहितं कार्यभारं समीक्ष्य,
निर्वोढुं तं स्वजननिवहं ढौकयामास दृष्टिम् ॥१६॥

यस्मात्सौधानृपवतिमहिला सौनिराशा निवृत्ता,
पर्वं तं मा परिजनयुता प्राविशत्पूर्णकामाः
को वा जानाधदियमबला तत्पदं प्राप्स्यतीति,
नस्यात्सिद्धदं किमिव हि फलं हन्त! दैवेऽनुकूल ॥१७॥

---

१. भ्रात्युम्रीता। (श्यालाः स्युर्मांतरः पत्न्याः स्वामिनो देवृदेवरी त्यमरः)

२. अधिराज्ञाः चक्रेशिन्याः।

३. पुणे इति प्रसिद्धे।

४. मद्रास इतिरूपातम्.।

सर्वोत्कृष्टः सुमति विभवो योऽति विख्यात आसीत्,
तस्या दैव्या सनयकुशलैः सम्परीक्षेत यस्मिन्;
सोऽयं कालो नियतिवशतः प्रादुरासी प्रजानाम्,
एवं रुपः कथमपि खलु प्राप्यते सुप्रसङ्ग ॥१८॥

यस्मिन्नायं वितरतिजनो विस्मरेत्पूर्वभूपान्,
दण्डं धृत्वा मनुनियमतः पालयेद्यः प्रजाः स्वाः ;
राज्यं प्राप्यस्मयविरहितः स्यान्नालंकृतोयः,
लप्स्ये बालं कुत इति बहुश्चिन्तयन्ती स्वचिते ॥१९॥

चिन्वाना सा निजजनण्दे तादृशं नैव लेमे,
तस्मात्खिन्ना स्वदृशमहिनोन्नाशिकाख्यं प्रदेशम्,
वस्मिस्तस्या विमलशसो गोत्रजाः केचिदासन्,
अन्नौ वैषा मम हृदयगावासनासेत्स्यतीति ॥ युरमकम् ॥२०॥

आसीदेतैः सुजनमहितैर्लक्षितात्मा,
राज्त्वार्थं विधिविराचितो नूनमेकः सपिण्डः
आनीयमुं समुचितजनैः स्थापयामास राज्ये
नाम्ना चैनं सुधियमकरीत् श्रीसयाजीति राज्ञी ॥२१॥

राजामात्यावितिसुविहिते राज्ययानस्य चक्रे,
ताभ्यांहीनं भवति यदिचेतेन केऽर्थः प्रजानाम्;
किं वैकं स्यात्तदपि न गतिर्जायते तस्य सम्यक
वीक्ष्येत्थं सा मनसि चतुरा चिन्तयामास साध्वी ॥२२॥

राष्ट्रस्यांगं नृपतिरितियत्तन्मया सभ्यगाप्तम् ।
मंत्रीत्येत्कथमिव भवेल्लुभ्दमेताब्दिचार्यत्:
एवंध्यात्वा सदयहृदयाच्छीतुकोजीनृपालायत्:
ख्यातंलोके प्रमुखसचित माधवं सा ययाचे ॥२३॥

बालावस्थं कृतकतनथं विद्ययालंकरिष्णुः ।
शालामेकां विनयिकगुरुभिर्मंडिता कारायित्वा;
बालानन्यानपि कतिपयानाभिलाज्यादियुक्तान् ।
राज्ञासार्धं श्रुतवितरणैर्वर्धयामास तस्याम् ॥२४॥

काले काले प्रखरधिपणं मंत्रिणं प्रेप्य तत्र ।
प्रोत्सात्यैतान्मधुरवचनैर्बोधयुक्तैरनेकैः ।

राजप्रीतीः प्रकृतिषु कथं वर्धते तद्वद्वेव ।
लोकानां सा नृपतिषु कथं चेति तान् शिक्षतेस्म ।।२५।।

नृत्ने राज्ये प्रकृतिमनसस्तोषणं दुष्करं यत् ।
तन्नूनं सा सुकरमकरोन्मंत्रिणे माधवाय ।
योग्ये काले समुचिततरं राज्यकारेषु तस्य ।
साह्यं कृत्वा स्ममतित्विभवैर्विस्मितं तं चकार ।।२६।।

इंद्रप्रस्थे नहति सदसि प्राप्तुकामाः प्रसादन् ।
चक्रेशिन्याः प्रतिनिधी कृतां दुर्लभा सत्कृतीं च ।
सर्वे जग्मुः परिजनयुता भारतीया नरेशास्तत्रागन्तु
[१]तनयसहिताकरिता राजपत्नी ।।२७।।

आज्ञापालैर्विभवगुरुभिः सर्वसामन्तलौकेः ।
स्वीयैः सार्धं गमनमुचितं [२]मर्यमानान्वयुंक्तव ।
मुख्यामात्यं जनहितरतं सत्तनानां सखा यं ।
सज्जीकर्तुं द्रततरमसौ सर्वमेवाति दाक्षात् ।।२८।।

[३]सकन्धावारो हयगजयुतो दुर्णदांभीषणोऽभूत् ।
यस्मिन्याति प्रजविनिनते वा भवद्धूतधात्री ।
कृत्वैवं यत्सकलमपि सत्साधनं यानयोगयं ।
राज्यादाय [४]प्रकृतिपुरुषं प्रास्थिता सौ सपुत्रा ।।२९।।

प्राप्ता तत्र प्रतिनिधिहितै[५]: स्वागते नाभिनन्या ।
प्रेक्षा वद्भिर्विनयसहितैः पूजिता हृष्टचित्ता ।
शस्ते देशे पटगृहशतैः शोभितः सन्निवेशः।
आसीत्तस्मिन्नियत समये प्रापिता प्रत्यवात्सीत् ।।३०।।

यूने राज्ञे महतिशिबिरे दर्शनं स्वंव्यतारीत् ।
सत्कृत्यैनं प्रतिनिधिरसौ राजयोग्योपचारैः।
युक्तं दृष्ट्वा प्रकृतिसुभगैराजलक्ष्मीविलासैर्धन्यामेने
तनयकर्णे चातुरीं राजमातुः ।।३१।।

---

१. तनय सहित आकारिता.

२. आदिदेशः।

३. सेन्धं गमनयोग्यम्।

४. मैत्रिणम।

५.प्रेषितैः।।

तारानाम्नी निजदुहितरं सुन्दरांगी गृहित्वा।
साकं राज्ञी प्रतिनिधिवधूं माननीयां ददर्श।
साध्वी प्रत्यागमनमुदितां राजपत्नी चकार।
सिद्धोलोके कृतिविनिमयः शोभनोऽशोमनो वा ॥३२॥

आगच्छन्ती पथिपुरवरे चांगराख्ये प्रसिद्ध।
द्रष्टुं योग्यं यवननृपतेः शाजहानस्य पत्न्याः।
चक्रेकामं नथनपथगं स्मारकं शिल्पिकर्म।
यद्वै लोके गुणिगणनुतं चाद्वितीयं विभाति ॥३३॥

दृष्ट्वा पापं हरति मथुरा यत्र कंसं जघान।
मातुर्बन्धुं द्विजकुलिरिपुं गोपवेषो मुकुन्दः।
इत्यं श्रुत्वा सुजनमुखतस्तत्र गन्जु निदध्यौ।
भक्त्युदेकान्मनसि हषिता साधयामास यात्राम् ॥३४॥

पादन्यासैर्यदुकुलपतेश्चिन्हितं भूविभागम्।
वृंदारण्ये पशुपशिशुभिर्यत्र चिक्रीड कृष्णः।
पश्यन्तीसा सहपरिचजना गोकुलं प्रापदाशु।
बाळक्रीडामतनुत हरिपत्र भक्तानुकम्पी ॥३५॥

भागीरथ्या तपनतनया यत्रसंयोगमार्छत्।
तस्मिन्क्षेत्रे त्रिदिनमवसद्धर्मकृत्येषु मग्ना।
तत्रत्यान्सा धनवितरणैरन्नदानैश्च लोकान्।
सन्तोष्यायात् त्रिनयनपुरीं मुक्तिदां चेहसद्यः ॥३६॥

विश्वामित्राकुशिकतनयात्तद्वदेवानृताद्यः,
स्वत्राणार्थं सकरितुरगं राजमस्मै वितीर्यः
व्यक्रीणादै तनयसहितां स्वां वधू चात्मदेहम्,
अस्मिन्स्थाने शिव! शिव! हरिश्चंद्रनामावशीनः ॥३७॥

चाण्डालस्यासहतभवने सेवयात्यन्तदुःखम्,
अत्रैवास्य प्रियतनुभुवं तक्षकोऽहिर्ददंश;
एवं लोकैः सदयहृदया दर्शितानेहदेशान्,
पश्यन्ती तान्व्यतनुतसती देवता दर्शनानि ॥३८॥

तत्रोषित्वा कतिचनदिनान्यात्मयोग्यौः सुदानैः,
विप्रांस्तुष्टानकृतसमुता राजमाता च पश्चात्;

प्रत्यागन्तुं स्वामतिमकरोद्रज्यातिचन्तापरा सा,
[१]सर्वांन्धर्मान् विहिततमं स्वस्थ कमार्तिशेते ।।३९।।

यात्रां कृत्वा विधिवदखिला स्वां पुरोमुत्पताकां,
स्थाने स्थाने कुसुममिलितैस्तोरणैः शोभमानाम्;
पुत्रं कन्यानिजपरिजनं चाददानविवंश,
मक्तया सर्वेः प्रमुदितजनैः स्तूयमानाभिनन्द्य ।।४०।।

प्रत्यावृत्त्यवस्वनगरमसौ पूर्ववद्राज्यसूत्रम्,
राज्ञो माता पुनरपि चिरं बिभ्रमी दत्त चित्ता;
तन्निर्वाहेऽधिकृतजनतानिर्गतां कष्टलभ्याम् ।।४१।।

चक्रेशिन्या [२]प्रतिनिधमुखाद्धारतीर्थ ललामे
ऽत्यंतं मानं पुरजनपुरः प्रापिता गौरवेण;
जन्मन्येकं सुदिवसममुं वीक्ष्यमाणापि साध्वी,
स्वात्मानं सा स्मयवशगतं नैव चक्रे कदाचित् ।।४२।।

प्राप्तावस्यं प्रथितसुमति भद्रपीटेपविष्टम्,
चक्रेसुनू हृषितहृदया राजमाता सुबुद्धिः
उद्योगेन प्रभवति जनः साधितुं स्वेष्टसिद्धम्
अर्थं चेमं सकलजगते दर्शयामास नूनम् ।।४३।।

सद्धर्वा स्वां प्रियदुहितरं ग्राहयित्वा विवाहे,
सन्तुष्टाभूब्दिभवसहिता प्रेष्यतां नैवसामकम्;
निस्संदेहं परघ्नमसौ कन्यकान्यसम्तम्,
किंवा दुःखी भवितुमुचित यस्य तस्मै वितीर्थ ।।४४।।

विख्याताया द्रविडविषये भोसलेवंशजातैः
सद्भूपालैर्विदितविभवैर्धर्मतः पालिताया;
तन्जापुर्याः सुविनयवर्ती कन्यकां राजवंशयाम
अनाय्यामूं स्वतनुजनुपो धर्मपत्नी चकार ।।४५।।

तस्यां जातः सुललितवपू राजचिन्हैरुपेतः,
फत्तेसिंहो निजजनयितुर्योमुदं बव्हतानीत;
त्यक्तवा तं सा तनयप्रभवन्नाममात्रैकशेषा,
स्वर्गेऽपीष्टा; खलुजनमता ये भवन्तीह लोके ।।४६।।

---

१. उत्तमरीत्या कृतम्।

२. काउन ऑफ इन्डिया' इत्याख्या पदवीम्।

धन्यामन्यां मधुरवपुषं मालवस्थात्प्रसिद्धात्,
देवासारख्यान्नगरवरतः कन्याकां रुपयुक्ताम;
अनीयास्याः सुरुचिरकरं भूभुजाग्रहायत्सावैधूर्यं
तं वयसितरुणे शोभनो नेति मत्वा ॥४७॥

इत्थं सर्वं नरपति हित साधयित्वास्य माता,
चक्रेरक्तं बहुनिजमनः शूलपाणौ महेशे;
काशीयात्रा पुनरपि सती चैकवार चकार,
सत्कृत्यं यत्सकृदपि वरं किं पुन.कदाचित् ॥४८॥

गोकर्णाख्यं त्रिपुरदहनं प्रश्चिमांभोधितोरे,
दृष्टा भक्तया परमदृढया पावसामास देहम्;
यो स्मिन्लोके [१]करणफलदे सत्सुमत्साघनेषु,
स्वात्मौन्नत्यं बत न कुरुते सोऽति मूढोहि नृणाम् ॥४९॥

अन्या शैव्यो मरतवसुधा विश्रुतायाः सुसंस्थाः,
तासां यात्रा अकृतमनसा श्रद्दधानेन साध्वी;
मिथ्या प्रायां वसर्तिमहसा मन्यमानेव नूनं,
स्वायुःशेष व्यर्यतविभवे धर्मकृत्ये निनाय ॥५०॥

तारामृत्योर्व्यतिमनसः कोमरेऽस्याः शरीरे,
मन्दं मन्दं पदमतनुमग्लानिकत्रो मनोरूक;
साभूदस्या भृशमरतिकृत्सर्वसंसारसौख्ये,
प्रादाच्चास्यै किल दृढतरं धूर्जटौ भक्तियोगम् ॥५१॥

दुःखाधिक्यं प्रियनिजसुतानाशतः साध्यगच्छत्,
तेजस्तस्या अवनतिपरंचाभवत्तद्दिनाद्धि;
योऽयं लोकांस्तपतिकिरणैरुग्रतेजास्तमोहा,
मध्यादन्हो भवति बहुधा कान्तिहीनोऽशुमाली ॥ ५२॥

कृष्णानद्यास्तटभुविनुतां शोमनां ब्राह्मणानाम्,
वृंदैर्युक्तां वसतिमग मन्नाम वाईति यस्याः,
ख्यातं तत्र स्वधनविसरैस्तोपयामाससर्वान्,
वेदैःशास्त्रैरपि च सहितान्भूमिदेवान्गुणाड्यान् ॥ ५३ ॥

---

१. कर्म फलप्रदे (कारणे हेतु कर्माणो रिति विश्वः।)

एवं साध्वी महितचरिता सर्वकामानवाप्य,
शत्रूब्जित्वा तनयतनयं वीक्ष्य सम्प्राप्त विद्यम्;
पुत्रं दृष्ट्वा प्रकृतिहृदयनन्दने सक्तचितम्,
राजानं सा त्रिदिवगमने व्यग्रचेता वभूव ।।५४।।

हित्वा पैराज्जनपदजनांश्चापि दुःखावनत्रान्,
ह! हा! देवी धरणितलतः कीर्तिमात्रकशेषा;
भौमेवारे प्रतिपदि तिथौ कार्तिके वद्य पक्षे,
स्वर्ग याता खनयनवसुब्रम्हमाने (१८२०) शकाद्धे ।।५५।।

पुत्रौऽयं मे प्रकृतिमनसो रञ्जनाद्राजशद्वम्,
अन्वर्थं वा अकृत तदलं मेऽघुना वेक्षया किम;
मन्वानैवं भुविनिजयशो राशिभावं प्रपन्नाम
मुक्त्वा यात त्रिनयनविभोस्तारकेशस्यसंस्थाम् ।।५६।।

तुंगान्शैलानपिनिजपदौविलघ्यांधकारम,
दूरी कूर्वन् सुखयति जगत्सर्वचैजन्यदायी;
सायं सोऽपि व्रजति निलयं लोकबन्धुर्विवस्वात्,
तिष्ठत्यस्यां चिरतरमहो! कः शरीरी पृथिव्याम् ।। ५७।।

शिष्ठो दुष्टो सुपतिरधनो बालको वापि जीनः;
विद्वान्मूर्खः सुरुचिरवपुरूपहीनो बलाढ्यः;
तद्वद्योवै बलविरहितश्चेत्यमीष स्वशक्तिम,
तुल्यत्वेन प्रकटयति यस्तेन नीता बतार्या ।।५८ ।।

मान्धात्रादीनवनिपवरान्योऽग्रसत्पौरुपेण,
यो वे रामं दशमुखरिपुं नाम शेषं चकार;
कृष्णं चापि स्वजनसहितं योऽकरोत्कर्णपेयं
सोऽयं राज्ञीमहह! यमुनां मृत्युलोकाजहार ।। ५९।।

❍❍❍

# परिशिष्ट सहावे

# राजा सर टी. माधवराव दिवाण यांनी लिहिलेले महाराणींचे चरित्र

बडोदे संस्थानाच्या महाराणी आ. जमनाबाईसाहेब गायकवाड यांचे राज्याचे दिवाण कै. सर टी. माधवराव यांनी रेखाटलेले शब्दचित्र :

महाराणी जमनाबाईसाहेब यांचा जन्म इ.स. १८५४ मध्ये सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर येथील माने घराण्यात झाला. या प्रतिष्ठित मराठा कुटुंबाला अनेक शूर सरदारांचा वारसा लाभलेला आहे. त्यांच्या वडिलांचे नाव अण्णासाहेब आणि आईचे नाव बजाबाई असे होते. ते दोघेही आता हयात नाहीत. त्यांच्या आई बजाबाई म्हणजे महाराजा गणपतराव गायकवाड यांच्या धर्मपत्नीच्या म्हणजे महाराणींच्या भगिनी होत. अशा रीतीने माने घराण्याचा आधीपासूनच बडोदा घराण्याशी नातेसंबंध होता.

माने घराण्याची जहागीर असलेल्या रहिमतपूरमध्ये जन्म झाल्यानंतर वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत जमनाबाईंनी सुखात आणि शांततेत काळ व्यतीत केला. त्यानंतर त्या आईसाहेब बजाबाई यांच्यासमवेत बडोदे संस्थानात गेल्या.

याच काळात बडोदे राजघराण्यातील महाराजा खंडेराव गायकवाड यांनी राज्यारोहण केले होते. महाराजांची धर्मपत्नी अंबाबाई यांचे नुकतेच निधन झाल्यामुळे त्यांच्यासाठी वधुसंशोधनाचे काम सुरू होते. या शब्दचित्राचा मुख्य विषय असलेल्या महाराणी जमनाबाई यांचे स्थळ महाराजांच्या त्वरित पसंतीस उतरले. विवाहाचा मुहूर्त काढण्यात आला.

हिंदू पद्धतीने वाङ्निश्चय आणि विवाहसोहळा पार पडला. जमनाबाई त्यावेळी केवळ अकरा वर्षांच्या होत्या. त्यांच्या शिक्षणाची सुरुवात आता विवाहानंतर झाली होती. अत्यंत कुशाग्र असलेल्या त्यांच्या बुद्धिमत्तेला योग्य वातावरण लाभले. त्यांच्या मातृभाषेत, म्हणजेच मराठीत त्यांनी उत्तम प्रगती केली. तारुण्यावस्थेत पदार्पण करतांनाच त्यांच्या ज्ञानकौशल्याला बहर आला. त्यांनी इंग्रजी बोलण्याचे कौशल्य देखील अवगत केले होते; पण ते प्रयत्न नंतर तिथेच

थांबले. इतर सामान्य स्त्रियांपेक्षा खूप महत्त्वपूर्ण ज्ञान आणि कला त्यांनी अवगत केल्या. त्यांना क्रोशाकाम, विणकाम, भरतकामाचे ज्ञान आहे. सुमधुर आवाजाची देण त्यांना लाभली असून त्या सुंदर गातात.

महाराजा खंडेरावांना या सौंदर्यपूर्ण, तरुण, उच्च अभिरुचीपूर्ण, कर्तबगार आणि निष्णात व्यक्तिमत्त्वाची भुरळ न पडती तरच नवल! त्यांना महाराणी जमनाबाईविषयी कमालीचे कौतुक होते. अशा रीतीने महाराणी जमनाबाई समृद्धी, पद आणि प्रतिष्ठेच्या वैभवी शिखरावर विराजमान झाल्या होत्या. परंतु क्रूर अशा नियतीने त्यांना उत्कर्षाच्या शिखरावरून खोल दरीत ढकलले. तरुण, बलशाली महाराजा खंडेराव गायकवाडांच्या आकस्मिक मृत्यूचा आघात त्यांच्यावर झाला. महाराणी जमनाबाई यांच्या आयुष्यातला अत्यंत सुंदर, परंतु अल्प कालावधी, अत्यंत दुःखद अशा दिवसात रूपांतरित झाला. त्यानंतरचा प्रत्येक दिवस अधिकाधिक अंधकारमय होत गेला. अकाली वैधव्य प्राप्त झालेल्या महाराणी त्यावेळी तीन महिन्यांच्या गर्भवती होत्या. त्यांना जर पुत्रप्राप्ती झाली असती तर तो बडोद्याच्या राजगादीचा वारस ठरला असता आणि जर त्यांना कन्या झाली असती तर मल्हारराव (कै. खंडेराव महाराज यांचे बंधू) यांनी राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतली असती.

वैभवी अशा बडोदे संस्थानाच्या राजघराण्याची स्थिती अशी डळमळीत झालेली होती. मल्हाररावांना नशिबाने अत्यंत दोलायमान आणि गंभीर वळणावर आणून ठेवले होते. त्यांचे राजा होणे वा रंक होणे महाराज खंडेरावांच्या विधवा अर्धांगिनीवर अवलंबून होते.

अशा परिस्थितीत मल्हारराव निसर्गनियमाप्रमाणे घडून येणाऱ्या घटनांची वाट पाहणाऱ्यातले नव्हते. अत्यंत दुःखद व नाजूक परिस्थितीत असलेल्या जमनाबाईविषयी त्यांच्या मनात कमालीचा द्वेष भरलेला होता. सुरुवातीला त्यांनी महाराणी जमनाबाई गर्भवती आहेत हेच लपवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. हा प्रयत्न फोल ठरल्यानंतर सत्याकडे पूर्ण डोळेझाक करत त्यांनी ही स्त्री ढोंग करत आहे अशी हाकाटी केली. जमनाबाईंचे राज्याच्या वारसाला जन्म देण्याचे स्वप्न भंग पावावे म्हणून जंगजंग पछाडले गेले. काही विपरीत घडावे या भावनेने मंत्रोच्चारण, जपजाप्य ठिकठिकाणी सुरू करण्यात आले. थोडक्यात जमनाबाईसाहेबांचे आयुष्य संकटांच्या खाईत ढकलले गेले. विषबाधा होण्याची त्यांना सतत भीती वाटे. सत्तेच्या लालसेपायी कोणत्याही क्षणी गुप्तरीतीने आपल्या हत्येचा कट रचला जाईल अशी त्यांना सतत भीती होती. निराधार अशा विधवेसाठी, एकाकी स्त्रीसाठी हा अत्यंत कठीण असा काळ होता. चहुबाजूंनी संकटांनी या राजघराण्यातील दुर्दैवी स्त्रीला जणू घेरून टाकले होते.

परंतु तिने मात्र या भयंकर काळाला अविचल अशा धैर्याने आणि सहनशक्तीने तोंड दिले. विलक्षण बुद्धिचातुर्य, संयम आणि दृढनिश्चयाच्या जोरावर जमनाबाईंनी त्यांच्याविरुद्ध रचलेल्या कटकारस्थानांना तोंड दिले. त्यावेळी ब्रिटिश सरकारला आपल्यावरच्या विपरीत परिस्थितीविषयी त्यांनी कळवले. त्यांची होणारी छळवणूक आणि नजीकच्या भविष्यात

उद्भवणारी राजकीय परिस्थिती यांविषयी सविस्तर माहिती त्यांनी ब्रिटिश शासनाच्या लक्षात आणून दिली.

ब्रिटिश शासनाने अर्थातच पावले उचलली; परंतु दुर्दैवाचा तडाखा इतका जोरदार होता की, सुरुवातीला युरोपियन डॉक्टरांनीदेखील जमनाबाईसाहेब या खरोखर गर्भवती नाहीत असे सांगितले. त्यांच्या संपर्कातल्या विश्वासू माणसांनीदेखील गर्भवती असल्याचे ढोंग केल्याची शंका व्यक्त केली. मल्हाररावांनी अगोदरच संस्थानातील संपत्ती आणि अधिकारी यांना हाताशी घेऊन हुकुमत सुरू केली होती. आता ते सत्याची गळचेपी करून सत्ता काबिज करण्याचे मनसुबे रचू लागले.

पण उचित कालावधीनंतर सत्य उजेडात आले. जमनाबाईसाहेबांची खरी परिस्थिती दृगोच्चर झाली. मल्हाररावांच्या सान्निध्यात कैलासवासी महाराज खंडेरावांच्या पत्नीला राहू देणे धोकादायक असल्याचे ब्रिटिश सरकारच्या ध्यानात आले. जमनाबाईंची बडोद्याच्या राजवाड्यातून सुटका करण्यात आली. ब्रिटिश रेसिडेन्सी ही इमारत रिकामी करून त्यामध्ये जमनाबाईसाहेबांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली. ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार ब्रिटिश सुरक्षारक्षकांनी त्यांच्या सुरक्षिततेची हमी घेतली.

यानंतरही जमनाबाई भयमुक्त राहू शकल्या नाहीत. मल्हाररावांच्या सर्व लोकांना ब्रिटिश रेसिडेन्सीबाहेर घालवता आले नव्हते. आम्हाला इथे राहण्याचा अधिकार आहे असे त्यांचे म्हणणे होते. कदाचित जमनाबाईसाहेबांना मुलगी झाली तरी, अदलाबदली करून मुलगाच झाल्याचे सांगितले जाईल, या बतावणीपायी मल्हाररावांचे काही विश्वासू लोक तिथेच राहिले आणि त्यांनी जमनाबाईंची छळवणूक करणे थांबवले नाही.

अत्यंत क्लेशदायक असा हा काळ होता. राज्याला वारस न लाभता जमनाबाई यांना कन्याच व्हावी म्हणून मल्हाररावांनी पुजाऱ्यांना तसेच धार्मिक ठिकाणी भरपूर बक्षिसी आणि देणग्या देणे सुरूच ठेवले. ग्रहांची दिशा बदलून आपल्या मनासारखे व्हावे म्हणून ज्योतिषांना कर्मकांडांसाठी, पूजापठणासाठी भरघोस रकमा देण्यात आल्या.

कदाचित देवादिक, पुजारी आणि ग्रह आपला लोभी हेतू साध्य होऊ देणार नाहीत म्हणून मल्हाररावाने मोठ्या प्रमाणात महालातील जडजवाहीर, दागिने यांची उचलबांगडी करणे सुरू केले. त्याच्या मित्रांनी आणि अनुजिवी लोकांनी तशाच प्रकारे किंबहुना काकणभर जास्तच लयलूट करणे सुरू ठेवले.

पूर्ण दिवस भरल्यानंतर जमनाबाईंनी कन्यारत्नाला जन्म दिला. मल्हाररावाच्या सार्वभौमत्वावर अधिकृत शिक्कामोर्तब होऊन ते बडोदे संस्थानाचे राजे झाले. त्याने स्वतः आणि त्यांच्या अगणित मित्रांनी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या नातेवाईकांनी जल्लोष केला. या घटनेमुळे अमाप अशा धनसंपत्तीवर आपला हक्क प्रस्थापित झाला आहे असे त्यांना वाटू लागले.

दुःखीकष्टी झालेल्या, एकाकी पडलेल्या जमनाबाईंना आपल्या दुःखी वर्तमानाप्रमाणेच आपले भविष्यदेखील अटळ अंधकारमय आहे याची जणू खात्रीच पटली. त्यांनी बडोदे संस्थानचा कायमचा निरोप घेऊन शांत वैयक्तिक आयुष्य घालवायचे ठरवले. या गोष्टीतही अनेक अडचणींचा सामना त्यांना करावा लागला. आपल्या कैलासवासी पतीचा वैभवी वारसा मागे ठेवून एकांतवासात महाल सोडून झोपडीत राहाणे कठीण होते; परंतु जमनाबाईंचा निश्चय ठाम होता. त्यांच्याजवळ असणारी एकमेव मौल्यवान संपत्ती म्हणजे त्यांची छोटीशी कन्या तारा हिला घेऊन जमनाबाईंनी घर सोडले. जमनाबाईंच्या गच्च अंधारलेल्या वर्तमान आणि भविष्यातून लुकलुकणारा तारा म्हणजे त्यांचं इवलंसं कन्यारत्न होतं.

पुन्हा कधी न परतण्याच्या निश्चयाने जमनाबाईंनी बडोदा सोडले. मात्र सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर या त्यांच्या माहेरच्या गावी जाऊन राहणेही त्यांना प्रशस्त वाटेना. त्यांनी रहिमतपूर कौमार्यावस्थेत समृद्धीच्या शिखरावर असताना सोडले होते- आता एकाकी वैधव्याच्या परिस्थितीत तिथे परतणे अशक्य होते. रहिमतपूरमधील त्यांचे सगेसोयरे त्यांच्याकडे एक धनवान महाराजाची राणी, हिरामाणकांनी मढवलेले सुंदर, भारी व दुर्मिळ दागिने घालणारी कुलवधू म्हणून पाहत होते.

आज सगळे वैभव नष्ट झालेल्या निराधार परिस्थितीत तिथे जाऊन राहणे त्यांना उचित वाटेना. आता त्यांना एक शांत निवृत्तीचे आयुष्य हवे होते. पतीगृहापासून लांब तसेच त्यांच्या माहेरापासूनही लांब असणारे पुणे शहरात त्यांचे उर्वरित आयुष्य घालवणे त्यांनी पसंत केलं.

दुष्ट प्रवृत्तीच्या व विजयोन्माद झालेल्या मल्हाररावाने, स्वयंनिर्णयाने बडोद्याबाहेर जाणाऱ्या या विधवा स्त्रीला चरितार्थ चालवण्यासाठी पुरेसा निर्वाहनिधीदेखील मंजूर करणे नाकारले. त्यांना तिचा स्वाभिमान सहन झाला नव्हता. मल्हाररावाला हा बाणेदारपणा लक्षात येणेही कठीणच होते. ताराच्या जन्मानंतर जमनाबाई साहेबांशी जुळवून घेऊन त्यांची बडोद्यातच राहाण्याची व्यवस्था करण्याची त्याच्या मनात होते. मल्हाररावांसारख्या चैनी व विषयासक्त मनुष्याच्या बतावणीवर जमनाबाईसाहेबांचा विश्वास बसणे अशक्य होते. बेबंदशाही माजवणाऱ्या मल्हाररावांच्या सर्व प्रकारच्या गर्भित इशाऱ्यांकडे अथवा सूचनांकडे त्यांनी निग्रहाने दुर्लक्ष केले. यामुळे मल्हाररावांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली होती.

जमनाबाईंना खरंतर पुण्यातील वास्तव्यात सर्व परिचितांपासून लांब विस्मरणात राहण्याची इच्छा होती; परंतु त्यांना स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी रक्कम मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला. शिणवून टाकणाऱ्या प्रदीर्घ संघर्षानंतर आणि ब्रिटिश सरकारच्या मध्यस्थीनंतर त्यांना मल्हाररावाकडून त्यांच्या चरितार्थासाठी नियमित रूपाने मिळणारा भत्ता मंजूर झाला. त्यानंतर जमनाबाईंनी पुण्यात शांत, स्थिर असा काळ व्यतीत केला. त्यांनी वाचन, लेखन, संगीत आणि एकुलत्या एक हसऱ्या लेकीच्या संगोपनात स्वतःचा जीव रमवला.

परंतु याच काळात बडोदे संस्थानात विविध घडामोडींनी खळबळ माजली होती. तिथल्या परिस्थितीने वाईटाकडून अतिवाईट असे वळण घेतले होते. मल्हाररावाच्या बेबंदशाहीमुळे त्याच्या अडचणीत भर पडून त्याचा अधिकार धोक्यात येण्याची चिन्हे दिसत होती. मनोबलाने कमकुवत असणाऱ्या, अज्ञानरूपी अंधकाराने ओतप्रोत भरलेल्या प्रशासकाकडून अजून कोणती अपेक्षा केली जाऊ शकत होती? पुष्कळ काळ तुरुंगाच्या गजाआड राहिलेल्या आणि अचानकपणे सिंहासनावर बसलेल्या व्यक्तीकडून काही चांगले घडण्याची अपेक्षा नव्हतीच.

संस्थानाचा राज्यकारभार डबघाईला आणण्यात मल्हाररावाच्या विसंगत वागणुकीबरोबरच त्यांच्या बेलगाम मित्रमंडळींचाही मोठा हात होता. मल्हाररावांची मित्रमंडळी राज्याच्या तिजोरीची शक्य तितकी लुबाडणूक करून ही लुटलेली मालमत्ता कुठेतरी सुरक्षित अशा ठिकाणी हलवण्याची व्यवस्था करत होते; जणू काही दिवसाढवळ्या राजसंपत्तीवर दरोडे पडत होते.

अखेर या सर्व दुष्कर्मांनी कळस गाठला. ब्रिटिश शासनाने कोर्टामध्ये ब्रिटिश प्रतिनिधीवर विषप्रयोग केल्याच्या आरोपावरून मल्हाररावाला अटक केली. कोर्टात चालवलेल्या या खटल्याने संपूर्ण भारतभरातील जनमानसात खळबळ उडाली होती. त्याचा निकाल तर सर्वांनाच माहीत आहे. मल्हाररावाला राजगादीवरून हुसकावण्यात आले. अन्यायाचा बदला घेऊन सत्याचा विजय झाला.

जमनाबाई आणि त्यांचे आप्तस्वकीय यांनी बडोदा संस्थानातील या सर्व घडामोडींपासून स्वतःला अलिप्त ठेवले होते. मल्हाररावांच्या ऱ्हासाविषयी त्यामुळेच त्यांच्या कुटिल शत्रूंपैकी कोणी काहीही शंका घेऊ शकत नव्हते.

अलिप्त राहून चांगले वागण्याचा परिणाम चांगलाच झाला. बडोदे संस्थानाच्या रिक्त राजगादीवर कुणीतरी आरूढ होणे गरजेचे होते. महाराणी जमनाबाईसाहेबांना मुलगा दत्तक घेण्याची परवानगी मिळाली आणि तो राजा आज तत्त्वाला जागल्याचे दिसून येत आहे. जमनाबाईसाहेबांचा दत्तकपुत्र म्हणजेच आजचे महाराजा सयाजीराव गायकवाड. या तरुण राजपुत्राची निवड जमनाबाईसाहेबांनी स्वतः पारख करून केली. दत्तकपुत्र सयाजीराव आणि जमनाबाईसाहेब यांच्यातील ममत्व वाखाणण्याजोगे आहे. राजकन्या तारा आणि सयाजीराव एकत्र खेळतात. बागडतात. त्यांचे सभद्रा आणि कृष्णासारखे बंधुप्रेम आनंददायी प्रतीत होते...

भूतकाळात डोकावून पहिल्यास लक्षात येते की, जमनाबाई त्यांच्या पतीच्या निधनानंतर बडोद्याच्या भूमीवर परत पाऊल ठेवणार नाही अशा ठाम निश्चयाने निघून गेल्या होत्या. सुदैवाने ते सर्व मागे पडले. बडोद्याच्या राजवाड्यात त्या पुन्हा वैभवाच्या शिखरावर विराजमान आहेत. ऐश्वर्य त्यांच्या घरी पाणी भरत आहे. ब्रिटिश रेसिडेन्सीत जन्म घेतलेल्या छोट्या ताराने दुःखदायक अशा वातावरणात, विपन्नावस्थेत आपल्या आईसोबत बडोदा सोडले होते. आज तीच तारा आपले थोरले बंधू सयाजीराव यांच्या समवेत भव्य राजदरबारात बसून राज्यकारभार

कसा चालवला जातो याचे निरीक्षण करते. ही संपूर्ण कथा चित्तवेधक घटनांनी ओतप्रोत भरलेली असून मानवी आयुष्यातील दैवघटित फेरफारांची प्रचीती देणारी आहे. एक यौवनसंपन्न आणि तरुण महाराणी नियतीच्या फेऱ्यामुळे अचानक समृद्धीच्या आणि सुखाच्या शिखरावरून दरीत फेकली जाते. स्वतःच्या राजवाड्यात असह्य छळाला तोंड देऊन तिला पन्हा कधीही माझ्या या वैभवी घरात परत येणार नाही. अशी प्रतिज्ञा करावी लागते. एक अंधारलेले भविष्य नजरेसमोर घेऊन तिला स्वतःचे गाव सोडावे लागते. तुरुंगात बंदीवान असणारा कैदी मुक्त होतो आणि राजगादीवर बसतो. 'कुणीही थोपवू शकणार नाही आता माझ्या बेबंदशाहीला' असा विचार करून महाराणीचा इतका छळ करतो, की ती या भूमीवर परत पाऊल न ठेवण्याची शपथ घेऊन दूर निघून जाते; परंतु कालचक्राची गती अगम्य असते आणि नियतीची खेळी गूढ.

राजगादीवर बसलेला परत तुरुंगात धाडला जातो. आपली राजधानी सोडून परागंदा झालेली राणी परत आपल्या महालात परतते. एका छोट्याशा खेड्यातला शेतकऱ्याचा पोरगा भारतवर्षातील एका महत्त्वपूर्ण संस्थानाचा महाराजा होतो आणि स्थिर, शांत वृत्तीने जणू काही त्या राजघराण्यातच जन्म घेतला असावा अशा झपाटलेपणाने प्रजेच्या हिताचे निर्णय घेतो. ही कहाणी खरोखर उत्कंठावर्धक आहे. जमनाबाई यांनी कृतज्ञतापूर्वक या बदलाचा स्वीकार केलेला आहे. त्यांनी अत्यंत नम्रपणाने आणि निष्ठेने या घडामोडींना तोंड दिले आहे. आयुष्यातील अनेक कठीण प्रसंगांनी त्यांना अगणित धडे दिले. राजगादीवर बसलेले तरुण महाराज सयाजीराव गायकवाड यांनी त्यांच्या पदाला शोभेल असे कार्य पार पाडण्यासाठी योग्य प्रकारे प्रशिक्षित व्हावे ही त्यांची प्रखर इच्छा आहे. त्यांनी बडोदा संस्थानाची मान उंचावेल आणि ब्रिटिश शासनाच्या पसंतीस उतरेल असे कार्य करावे यासाठी त्या प्रयत्नशील आहेत. बडोदे संस्थानाची पुनर्बांधणी करून, ब्रिटिशांच्या मदतीने भारतातील एक आदर्श असे राज्य उभारण्याच्या दृष्टीने त्यांची निरंतर अशी घोडदौड सुरू आहे.

❍❍❍

बडोदा संस्थानचे तत्कालीन राजे खंडेराव गायकवाड यांना संतती नसल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर राजगादीला वारस राहिला नाही. खंडेराव महाराजांच्या पश्चात लहान बंधू मल्हारराव गायकवाड बडोद्याच्या राजगादीवर आले. परंतु अवगुणांमुळे त्यांना पदच्युत व्हावे लागले. इंग्रजांनी वारसाअभावी हे राज्य खालसा न करता खंडेरावांच्या पत्नी महाराणी जमनाबाईसाहेब गायकवाड यांना दत्तक पुत्र घेण्यास परवानगी दिली.

मुळातच हुशार, चाणाक्ष आणि बुद्धिमान असणाऱ्या जमनाबाईंनी दत्तकपुत्र निवडताना दक्षता घेतली. राज्याचे भाग्य उजळणारा खेडेगावातील गोपाळला दत्तक घेतले. त्यांनी शिक्षकांच्या मदतीने सुसंस्कारी, प्रतिभावान आणि प्रज्ञावंत राजा (महाराजा सयाजीराव गायकवाड) घडवला. या राजाने बडोदा राज्यात 'न भूतो न भविष्यती' अशा सुधारणा केल्या.

महाराणी जमनाबाई यांच्या दूरदृष्टीमुळे महाराजा सयाजीराव गायकवाड गादीवर आले. अशा या महाराणी जमनाबाईसाहेब गायकवाड यांचे हे चरित्र निश्चितच प्रेरणादायी आणि बोधप्रद आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ